# कृष्ण सखा माझा

4

श्रीपरमानंदस्वामी



| | | |
|---|---|---|
| ई - पुस्तक | : | कृष्ण सखा माझा भाग-4 |
| लेखन | : | श्रीपरमानंदस्वामी (श्री. अविनाश मोरेश्वर लिमये) |
| संपर्क | : | ०२२-२४३६ १५१४ । ९९६९८ ७६८५०. |


| | | |
|---|---|---|
| ई - प्रकाशन | : | ई साहित्य प्रतिष्ठान |
| हक्क | : | सौ. अनुपमा अविनाश लिमये<br>१३, नवलकर बिल्डिंग, न.चि. केळकर रोड,<br>दादर, मुंबई ४०० ०२८. |

www.esahity.com
esahity@gmail.com
eleventh floor, eternity
eastern express highway
thane, 400604.



विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे .

- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहेतसे न केल्यास . .कायदेशीर कारवाई होऊ शकते

©esahity pratishthan®2016

# समर्पण

सगुण प्रेमभक्तिचा आनंददायी मार्ग दाखविणाऱ्या
सद्गुरुनाथ श्रीअवधूतस्वामी यांच्या पवित्र चरणी
त्यांच्याच कृपेने लाभलेले हे भक्तिभावाचे सुमधूर फळ,
सप्रेम समर्पण.

- श्रीपरमानंदस्वामी



# पुस्तक परिचय

नारदऋषी आणि लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडत जाणारे हे कृष्णाचे गोकुळापर्यंतचे जीवनचरित्र अतिशय बोधप्रद आहे. कृष्णचरित्र हे अनेक चमत्कारांनी भरलेले आहे, असेच नेहमी वर्णन केले जाते. परंतु, श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेले हे कृष्णचरित्र वाचताना, त्या प्रसंगांमधील तर्कसंगतता वाचकांना विचार करायला लावणारी आहे. ते वाचताना हे प्रसंग असेच घडले असणार असेच वाटते. उदाहरणार्थ,

कृष्ण सखा माझा - भाग एक मधील कृष्णाची बंदीशाळेतून मुक्तता, यमुनेला आलेला पूर, नंदराजाच्या कन्येला घेऊन वसुदेवाचे मथुरेला येणे इत्यादीमधील चमत्कारांपेक्षा त्यामधील तर्कसंगत विचार मनाला भावतात आणि बुद्धीलाही पटतात. तसेच 'चमत्कार' या विषयाबद्दल नारद व लक्ष्मी यांचा संवादही वाचकांना विचार करायला लावणारा आहे.

कृष्ण सखा माझा - भाग दोन मध्ये कृष्णाच्या बाललीला तसेच कृष्ण व पेंद्या यांच्यातील सख्यत्व श्रीपरमानंदस्वामी यांनी अतिशय सुंदरपणे रंगविले आहे. कृष्णचरित्रामध्ये 'गोपीवस्त्रहरण' या नावाने प्रचलित असलेल्या प्रसंगाचे (जो लोकांच्या दृष्टीने अजूनही कृष्णावरील टीकेचा एक विषय ठरलेला आहे) श्रीपरमानंदस्वामी यांनी केलेले वर्णन (गोपिकांचे लज्जारक्षण) वाचताना तेच त्या प्रसंगातील वास्तव आहे असेच जाणवते. तसेच बाजाराला जाणाऱ्या गवळणींची दह्या-दूधाची मडकी फोडण्याच्या प्रसंगातील वास्तविकताही जाणवते.

कृष्ण सखा माझा - भाग तीन मध्ये राधा-कृष्ण यांची प्रथम भेट, त्यांच्या भेटींमध्ये घडणारे प्रसंग व त्यांचे एकमेकांशी होणारे संवाद, त्यांच्या भेटींमधील अडचणी इत्यादींमधून राधा-कृष्ण यांच्यातील सर्व नात्यांच्या पलिकडे असलेले भक्तिभावाचे संबंध जाणवतात. तसेच गोवर्धन

साहित्य प्रतिष्ठान®

पूजन आणि मुसळधार वृष्टीचे संकट यांमधून पुन्हा एकदा चमत्कारांपलिकडील वास्तविकताच लक्षात येते.

कृष्ण सखा माझा - भाग चार मधील राधा-कृष्ण यांच्यातील प्रेमभक्तिभावाचे संबंध वाचताना भक्तिमार्गाचे श्रेष्ठत्व मनावर ठसते. तसेच कालिया मर्दनाचाही प्रसंग अतिशय वाचनीय आहे.

कृष्ण सखा माझा - भाग पाच मध्ये अक्रूराचे आगमन, राधेचा कृष्णाला भावपूर्ण निरोप, कृष्णाचे मथुरेकडे प्रयाण, कृष्णरूप राधा, कृष्णजयंती सोहळा असे अतिशय भावपूर्ण प्रसंग वाचायला मिळतात.

'कृष्ण सखा माझा' या ग्रंथाचे मुखपृष्ठही अतिशय सुंदर असून, ते श्रीपरमानंदस्वामी यांच्या संकल्पनेतूनच साकार झालेले आहे. राधा व कृष्ण यांच्यातील सख्यत्व तर यातून जाणवतेच, पण त्याचबरोबर ते एकमेकांच्या अतिशय जवळ असूनसुद्धा ते एकमेकांकडे पहात नाहीत, तर कृष्ण स्वतः स्वतःतच रमलेला आहे आणि राधा कृष्णप्रेमात रमलेली आहे हे जाणवते. दोघांनीही हातात धरलेली एकच मुरली हे राधा-कृष्ण यांच्या ऐक्यत्वाचेच प्रतीक आहे. एकूणच भक्तिमार्गाबद्दल असलेले गैरसमज दूर करणारा हा ग्रंथ आहे.

'ई साहित्य प्रकाशन' यांनी हा सुंदर ग्रंथ पाच भागांमध्ये वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे मान्य केले, याबद्दल त्यांना धन्यवाद!

सौ.प्रतिमा प्रविण आठवले

# भाग-४

## अनुक्रमणिका -


३१ राधेचा दृढ भक्तिभाव

३२ राधेचे कृष्णाला प्रेमपत्र

३३ अनयाला सापडली प्रेमपत्रे

३४ कृष्णाने केलेला न्याय

३५ राधेची व्याकुळता व निश्चयात्मकता

३६ कालिया मर्दन व अनयाचे रक्षण

३७ राधेची अंतर्मुखता

३८ कुंजवनातील राधाकृष्ण भेट

३९ राधाकृष्ण ऐक्यभाव




## राधेचा दृढ भक्तिभाव

**ए**वढा वेळ श्रवण करण्यात तन्मय झालेली लक्ष्मी नारदाच्या बोलण्यातील शेवटी आलेले राधेच्या भावपूर्ण अवस्थेचे वर्णन ऐकून अगदी भारावून गेली होती. त्याच भारावलेल्या अवस्थेत लक्ष्मीच्या मुखातून शब्द बाहेर पडू लागले.

''हे नारदा, तू तर नेहमीप्रमाणेच शेवटी राधा व कृष्ण यांच्या संबंधावर येऊन पोहोचलासच की! खरोखरी राधेच्या अवस्थेचे मला नवलही वाटते आणि कौतुकही जाणवते. प्रत्येक प्रसंगातून तिला कृष्णाच्या माहात्म्याची अधिकाधिक जाणीव होत होती आणि ती कृष्णाच्या अधिकच जवळ येत होती. प्रत्येक गोष्ट ही तर राधेच्या ठिकाणचा ध्यास वाढवणारीच ठरत होती असेच लक्षात येते. मला वाटते राधेचे हे वेगळेपण हेच तिचे विशेषत्व होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिच्या कृष्णाशी असलेल्या प्रेमसंबंधाचे परिणाम सहन करण्याचे केवढे तरी मनोबळ तिला प्राप्त झालेले दिसत होते. कारण इतरांवर त्याचा परिणाम होणे हे तर अटळच होते. विशेषतः म्हाळसेवर आणि त्याहूनही अनयावर होणारे परिणाम हे विपरीतच असणार हेही नक्कीच आहे. तरीही त्या सर्वातून राधेने कसा मार्ग काढला आणि आपला ध्यास कसा कायम राखला हे जाणून घेण्याची माझी उत्कंठा आणखीनच वाढून राहिली आहे.

हे नारदा, माझी तर आता अशी पक्की खात्री झाली आहे, की सगुण भक्तिमार्गातील अडचणी या कधीच संपणाऱ्या नाहीत. कारण एक अडचण संपली असे वाटते न वाटते, तोच त्यातूनच दुसरी अडचण निर्माण होते आहे असे दिसते. मग त्यातून प्रत्यक्ष प्रेमभक्तिचा आनंद केव्हा व कसा अनुभवणार हा एक मोठाच प्रश्न आहे. राधेला तरी या सर्वांतून काय आनंद मिळत होता बरे? मला हे सर्व नीट समजावून सांग बरे.''

लक्ष्मीच्या प्रश्नातील आतुरतेपेक्षा असलेली आर्तता नारदाला जाणवली. त्याचे झालेले समाधान नारदाने आधी स्मितहास्य करून व्यक्त केले आणि नंतर पुन्हा तो लक्ष्मीशी बोलू लागला.

''हे लक्ष्मी, मला तर असे वाटते की राधेच्या अडचणींचा त्रास तिच्यापेक्षा तुलाच जास्त होत आहे. अगं, मुळात जीवनात अडचणी ह्या असतातच. मग त्या कमी असोत वा जास्त असोत. जीवन जगणे ही वाटते तेवढी साधी व सोपी गोष्ट नाहीच मुळी. त्यात वारंवार अचानक व अनपेक्षित अडचणी ह्या येतच असतात. त्या कोणालाही कधीही चुकलेल्या नाहीतच. मग तो लहान असो वा मोठा असो, श्रीमंत असो वा दरिद्री असो, सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, सर्वांनाच केव्हा ना केव्हा तरी आणि कधी ना कधी तरी या अडचणींना तोंड देऊन त्यांच्याशी मुकाबला हा करावा लागतोच. जीवनांतील अडचणींमुळे सामान्यजन नेहमीच त्रस्त झालेले व मेटाकुटीला आलेले असतात. परंतु त्याच बरोबर काही जणांच्या ठिकाणी त्या अडचणींमुळेच त्यांच्या सहनशक्तीची व क्षमतेची कसोटी लागून त्यांचा कस वाढतच राहतो आणि ते

अधिकाधिक सहनशील व सक्षम बनतात. त्यातूनही जे आपल्या जीवनात एखादे ध्येय निश्चित ठरवून त्याचाच ध्यास धरून राहिलेले असतात, ते तर आपल्यावर अनेक संकटे ओढवूनच घेतात. परंतु ध्येयासक्तीमुळे त्यांना त्या अडचणींची काहीच तमा वाटत नाही. उलट ध्येयपूर्तीच्या ध्यासाची अवस्थाही त्यांना आनंददायीच वाटते. कारण अडचणी आहेत तर त्यातून मार्ग हा असतोच. त्या मार्गाने पुढे जाण्याचा उत्साह, तर काही वेळा त्या मार्गाने आक्रमण करण्याचे धैर्य, त्यांच्या ठिकाणी लागलेल्या ध्यासातूनच त्यांना प्राप्त होत असते. राधेचीही अवस्था अगदी अशीच झालेली होती, नाही का?

हे लक्ष्मी, तुला जे राधेचे वेगळेपण लक्षात आले आहे ते अगदी खरेच आहे. पण तिचे ते वेगळेपण यातच होते, की तिला कृष्णाचे व्यक्तिगत माहात्म्य अतिशय जाणवत होते आणि तिच्या ठिकाणची ही जाणीव तिला येणाऱ्या कृष्णाविषयीच्या प्रत्यक्ष अनुभवातून निर्माण होत होती हेच राधेचे विशेषत्व होते. आता राधेला कृष्णाचे माहात्म्य जाणवत होते त्याचे कारण म्हणजे तिच्या ठिकाणी कृष्णाकडे पाहण्याची तशी दृष्टी होती. तशी दृष्टी इतरांकडे नव्हती म्हणून ते कृष्णाकडे एक सामान्य मनुष्यदेहधारी व्यक्ती म्हणूनच पहात होते. अर्थात कृष्णाची बुद्धी, त्याची निर्णय घेण्याची शक्ती, त्याच्याठायी असलेला सर्वांना मदत करण्याचा आपलेपणा व तशी क्षमता या सर्व गुणांचे सर्वांना जरूर कौतुक होतेच. परंतु तीच व तेवढीच त्यांच्या मनाची व बुद्धीची मर्यादा होती.

आता घडलेला प्रसंगच बघ ना. पाऊस पाडणारा म्हणून इंद्र देवतेचीच पूजा सुरुवातीला सर्व गोकुळवासी करीत होते आणि त्यात चूक असे काहीच नव्हते. कारण या पंचमहाभूतात्मक सृष्टीचा लाभ सर्व मानवांना सर्वतोपरीने होत असतो. तेव्हा सामान्यांच्या ठिकाणी त्या विषयी कृतज्ञताभाव असावा आणि ती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी त्यांना उपलब्ध असावी म्हणून ऋषिमुनींनी या देवतांची संकल्पना निर्माण केली. त्या देवतांची पूजा करून त्या द्वारे सामान्यांना परमेश्वराच्या व्यापक सत्तेची आठवण व स्मरण करून द्यावे हाच त्या मागील हेतू होता. पण पुढे काळाच्या ओघात लोक फक्त कृती करीत राहिले आणि त्यामागील मूळ हेतू विसरूनच गेले. परमेश्वरी सत्तेचे स्मरण तर होईच ना, पण त्या देवतांच्या कल्पनेत व त्यांच्या पूजा, व्रतादी कर्मातच अडकून राहिले. तेव्हा त्यांना त्या कल्पनेतून बाहेर काढण्यासाठी आणि कर्मांच्या गुंत्यातून सोडवण्यासाठी कृष्णाने गोवर्धनाचे महत्त्व त्यांच्या लक्षात आणून दिले.

गोवर्धन पर्वतामुळेच पाऊस पडतो हे लक्षात आल्यामुळे काहीजण तरी देवतांविषयीच्या भ्रामक कल्पनेतून बाहेर आले आणि त्यांना गोवर्धनाचे माहात्म्य जाणवू लागले. खरी तर गोवर्धनाचीच पूजा करावयास हवी हे कृष्णाचे सांगणे त्यांना पटले आणि त्यांनी त्याप्रमाणे गोवर्धनाची पूजाही केली. पुढे प्रत्यक्ष सतत कोसळणाऱ्या पावसाचे संकट कोसळले तेव्हा कृष्णाने सर्व गोकुळवासीयांना गोवर्धन पर्वताच्याच आश्रयाला नेले. मग तर गोवर्धनाच्या माहात्म्याविषयी सर्वांचीच खात्री पटली.

परंतु त्यानंतर जेव्हा त्या गुहेतील वरचे कडेच कोसळण्याची वेळ आली, तेव्हा सर्व बळ एकवटून कृष्णानेच आधार देऊन त्या कोसळणाऱ्या कड्यांना सावरून धरले होते, हे मात्र फक्त राधेच्याच लक्षात आले आणि नंतर कायमचे लक्षात

राहिलेही. कृष्णाचे हे प्रगटलेले माहात्म्य पाहून व जाणून राधेच्या ठिकाणचा कृष्णाविषयीचा भक्तिभाव अधिकच वाढला. कृष्णाचा अधिकाधिक सहवास प्रेमाने करून त्याची नित्य प्रगटणारी नवी नवी रूपे पाहणे हेच तिला हवेहवेसे वाटू लागले. कृष्णभेटीचा ध्यास राधेला एवढा लागला, की त्या ध्यासाच्या पूर्तीसाठी असलेल्या अनेक अडचणी जरी तिला जाणवल्या तरी त्या अडचणींना तिने आपल्या मार्गातील अडथळे होऊ दिले नाही. अंतरात ठसलेली कृष्णाची मूर्ती आणि मनात कृष्णप्रेमाची नित्य जागृती या बळावर कृष्णभेटीच्या ध्यासाची पूर्ती राधा करीत राहिली आणि मनाच्या या सर्व अवस्थेतील आनंदाला अनुभवीत राहिली.

हे लक्ष्मी, परंतु या सर्व प्रसंगातून इतरही बाह्य परिणाम अर्थातच होत होतेच. म्हाळसेच्या रागाचा पारा चढलेलाच होता आणि तिच्या परीने ती राधेला मानसिक त्रास देण्यामध्ये जराही कमी पडत नव्हती. अर्थात राधा त्याचा परिणाम करून घेण्याच्या अवस्थेच्याही पलीकडे गेलेली असल्यामुळे राधा म्हाळसेच्या वागण्याला शांतपणे व युक्तीने तोंड देत होती. म्हाळसा सर्व कामकाजासाठी राधेवरच जास्तीत जास्त अवलंबून असल्यामुळे शेवटी म्हाळसाही राधेला बोलण्यापलीकडे अधिक काही करू शकत नव्हती. परंतु अनयाची गोष्ट वेगळी होती. त्याचा राधेवरील राग तो वेगळ्या वेगळ्या प्रकारे व्यक्त करीत असे. कधी राधेशी न बोलून तर कधी तुटक व उपहासात्मक बोलून, कधी राधेवर जोराने रागावून तर कधी कृष्णाविषयीचे अपशब्द राधेला ऐकवून तो राधेला मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न करीत राही. कृष्णाची त्याच्या पाठीमागे टीका व निंदा करण्याची एकही संधी तो सोडीत नसे. तेवढ्यानेही राधेचे कृष्णप्रेम जराही कमी होत नाही हे पाहून अनयाचा संताप मग अधिकच वाढत असे. त्याची परिणती म्हणजे अनयाने राधेला कृष्णाला बाहेर तर भेटायची बंदी केलीच, परंतु कृष्णाला भेटण्यासाठी नंदाच्या वाड्यावर एकटीने जाण्यासही मज्जाव केला. जायचे तर आपण दोघे मिळूनच जायचे असे त्याने राधेला निक्षून सांगितले. परंतु 'केव्हा जायचे?' असे राधेने विचारल्यावर मात्र 'आज नको, उद्या पाहू, पुन्हा केव्हातरी जाऊ' असे म्हणून जाण्याचे सारखे टाळीत राही.

त्याला कामानिमित्त जेव्हा केव्हा दिवसभर बाहेर जावे लागे तेव्हा 'राधेला एकटीने कुठेही पाठवायचे नाही' असे तो म्हाळसेला बजावून सांगत असे. मग राधा केव्हा बाजारात जायला निघाली की म्हाळसाही हट्टाने तिच्या बरोबर जाई. राधेची ही वेळ कृष्णाला माहीत असल्यामुळे तोही नेमका त्याच वेळेस बाजारात काही तरी काम काढून चक्कर मारायला जात असे. कृष्ण मग राधेला पाहून इशारा करीत असे. राधाही कृष्णाची प्रेमखूण ओळखून म्हाळसेला कशात तरी गुंतवून गुंगारा देत असे आणि कृष्णाच्या थोड्यावेळच्या भेटीचाही केवढा तरी आनंद घेत असे. अशावेळी राधेला कृष्णाशी जास्त वेळ भेटणे व बोलणे जसे शक्य होत नसे, तसे तिला तेवढे त्यावेळी आवश्यकही वाटत नसे. तेवढ्या थोड्या वेळातही प्रेमाचे दोन शब्द बोलणे, प्रेमदृष्टीने परस्परांच्या प्रेमाला पाहणे, प्रेमाने हसून प्रेमाचा मोकळेपणा अनुभवणे आणि एकमेकांचे हात क्षणभर हातात धरून प्रेमाच्या स्पर्शाने जवळीकता अनुभवणे एवढे सुद्धा राधेला केवढे तरी मिळाल्यासारखे वाटत असे. म्हाळसेने राधेची शोधाशोध सुरू करायच्या आतच राधा कृष्णाचा निरोप मानेच्या खुणेनेच व मिश्किल हास्याने घेई आणि

राधा लगबगीने म्हाळसेच्या मागे जाऊन उभी राही. कृष्णसुद्धा दुरून ही सर्व गंमत पहात राही आणि हसून व हाताच्या खुणेने राधेला दाद देत असे.

अनयाने नंदाच्या वाड्यावर जाण्याचे कितीही टाळले तरी काही वेळा त्याला तेथे जावेच लागत असे. कारण नंदाकडून किंवा यशोदेकडून त्याची चौकशी होई आणि त्याला बोलावणे पाठवले जात असे. मग मात्र अनयाचा नाईलाजच होई आणि त्याला नंदाच्या वाड्यावर जाणे भागच पडत असे. बरे, तेथे गेल्यावर नंद व यशोदा राधेचीही चौकशी करीत असत. त्यामुळे राधेलाही बरोबर घेऊन जावे लागत असे. तरीही त्यावेळी राधा व कृष्ण यांची एकट्यांची भेट होऊ नये यासाठी अनयाचाही जास्तीत जास्त प्रयत्न असे. परंतु ते त्याला जमतच नसे. कारण कृष्ण तेथे प्रेमाच्या हक्काने नंद व यशोदा यांना आणि अनयालाही सांगून राधेला थोडा वेळ तरी बाजूला घेऊन जातच असे. त्यावेळी राधा व कृष्ण प्रेमाच्या जवळीकतेचा थोड्या वेळातही केवढा तरी आनंदाचा अनुभव घेत असत. अनयाच्या हे सर्व लक्षात येऊनही त्याचा इलाज चालत नसे. तेथे जरी तो प्रयत्नपूर्वक स्वस्थ बसला तरी घरी गेल्यावर मात्र सर्व राग तो राधेवर काढीत असे. अनयाचे राधेला वारंवार एकच सांगणे असे की 'नंद व यशोदा यांच्यासमोर तो कृष्णाला विरोध करू शकत नाही. पण राधेने स्वतःहूनच कृष्णाबरोबर एकटे जाण्याचे टाळले पाहिजे. कारण तसे जाणे हे चुकीचेच नाही, तर अत्यंत गैरही आहे.'

वेळप्रसंगी राधेवर हात उगारायलाही तो कमी करीत नसे. परंतु प्रत्यक्ष हात चालवायला मात्र तो धजावत नसे. कारण त्याच्या मनात कोठेतरी नंद व यशोदा यांच्याविषयी आणि थोडीशी कृष्णाविषयी सुद्धा भीती ही होतीच. जर राधेने या गोष्टी त्यांच्या कानावर घातल्या असत्या तर त्यांना तोंड देणे वा काही खुलासा करणे अनयाला कठीणच गेले असते हे अनय स्वतः जाणून होता. राधेनेही अनयाला त्याच्या नात्याच्या मर्यादेबाहेर कधी जाऊ दिले नाही. अशा तऱ्हेने राधेने कृष्णाशी प्रेमाचे संबंध सर्व अडचणींवर कौशल्याने मात करून राखून ठेवले आणि त्या संबंधाचा आनंद ती अनुभवीत राहिली. पण एवढे करूनही राधा जेव्हा एकांतात असे तेव्हा केव्हा केव्हा बेचैनच होई. काहीतरी कमतरता तिला जाणवत असे. त्याचे नक्की कारण काय हे मात्र तिच्याही लक्षात येत नसे. त्यामुळे ती अधिकच गंभीर होई.

*****

# राधेचे कृष्णाला प्रेमपत्र

**ए**कदा एकांतात बसून राधा स्वतः स्वतःशीच बोलल्यासारखा विचार करीत होती की ''मी कृष्णाला संधी साधून वारंवार भेटत असते. कृष्णाच्या भेटीत त्याच्या अतिशय प्रेमाचाही अनुभव घेत असते. माझे कृष्णावर प्रेम आहे, त्याच्यापेक्षा जास्त प्रेम कृष्णाचे माझ्यावर आहे हेही माझ्या लक्षात येते. किंबहुना, कृष्णाचे माझ्यावर असलेले प्रेम हेच खरे प्रेम आहे. माझ्या ठिकाणी जे काही थोडे फार प्रेम आहे त्याचे मूळ कारणही कृष्णच आहे. नाहीतर, माझ्यासारखी एक सर्वसामान्य स्त्री कृष्णावरती प्रेम ती काय करणार? परंतु त्या कृष्णानेच पुढाकार घेतला म्हणून बरे झाले. भाग्याने मला त्याच्या प्रेमाचा लाभ तरी झाला. कृष्णाचे प्रेम कळायला सुद्धा मला केवढा तरी वेळच लागला. पण कृष्ण मात्र माझ्यावर प्रेम करीतच राहिला. मी केव्हा रागावले, चिडले किंवा नाराजही झाले, तरी कृष्णाचे माझ्यावरील प्रेम मात्र कधीही व किंचितही कमी झालेच नाही. उलट अशावेळी त्याचे प्रेम जास्तच प्रगट होत असे.

मलाही सुरुवातीला किती तरी काळ याचे नवलच वाटत असे की 'माझ्यात असे काय विशेष किंवा काय खास आहे की कृष्णाने माझ्यावर एवढे प्रेम करावे.' नंतर मात्र माझ्या लक्षात आले की सर्वांवर प्रेम करणे हा तर कृष्णाचा स्वभावच आहे. मग हळुहळू मला कृष्णाचे प्रेम आवडायला लागले. तरीही त्याच्याकडून उत्स्फूर्तपणे प्रगटणारी प्रेमाची सर्वच अंगे काही मला रुचत नसत म्हणा किंवा मानवत नसत म्हणा. परंतु कृष्णाच्या वागण्या बोलण्यातील सहजता व स्वाभाविकता मात्र कधीच बदलली नाही किंवा कमी झाली नाही. त्यामुळेच मग मला कृष्णच जसजसा अधिकाधिक आवडू लागला, तसतशी त्याच्या उत्स्फूर्त प्रेमाची सर्व अंगेही आवडू लागली. त्याच्या सहवासात राहता राहता त्या कृष्णाविषयी माझ्या मनात केव्हा व कसे प्रेम निर्माण झाले हे तर माझे मलाही कळले नाही. परंतु त्या प्रेमामुळेच माझे कृष्णाशी अत्यंत मोकळेपणाचे व जवळीकतेचे संबंध निर्माण झाले हे मात्र खरे आहे. त्या संबंधामुळेच मला कृष्णाला अत्यंत जवळून पाहण्याची संधी मिळाली. त्यातूनच कृष्णाचे प्रेमरूप माझ्या मनात पूर्णपणे भरून राहिले. त्या प्रेमाने कृष्णाचा अधिकाधिक सहवास घडू लागल्यावर मला कृष्णाची थोरवीही जाणवू लागली.

सर्वांविषयीच्या आपलेपणाने नित्य भरलेले कृष्णाचे अत्यंत प्रेमळ व निर्मळ मन आणि सर्वांच्या हिताचाच नेहमी विचार करणारे त्याचे विशाल अंतःकरण जसे जसे मला जाणवू लागले, तसे तसे मग कृष्णाचे रूप माझ्या मनात अधिकच ठसले. 'कृष्ण आहे तर सर्वाला अर्थ आहे आणि कृष्ण नाही तर सर्व निरर्थकच आहे' अशीच मनाची धारणा होऊन राहिली. त्यामुळे कृष्णाच्या प्रेमभेटीचा कायमचा ध्यासच लागून राहिला. कृष्णानेही माझ्यावर कृपावंत होऊन माझ्या ध्यासाची नेहमीच पूर्ती करून मला अगदी तृप्त करून ठेवले आहे. परंतु तरीही कृष्णाविषयीचा ध्यास मात्र अजूनही माझ्याठायी कायमच आहे. केव्हा केव्हा कृष्ण अगदी माझ्या अंतःकरणातच अगदी माझ्याजवळ आहे असे जाणवते, तर कधी कधी तो माझ्यापासून फार दूर आहे असेही वाटू लागते. मग माझा कृष्ण खरा आहे तरी कुठे? माझ्या ठिकाणी कृष्णाच्या ध्यासाची

पराकोटी होते तेव्हा त्या ध्यासाची पूर्तीही माझ्या अंतःकरणातच होत असते असाच अनुभव मला येतो आणि मी अतिशय आनंदित होते हे मात्र अगदी खरे आहे.''

अशा तऱ्हेने कृष्णाच्या प्रेमाविषयीच्या व माहात्म्याविषयीच्या विचारात पूर्णपणे बुडून राहिलेल्या राधेच्या ठिकाणी एकदम जाणीव निर्माण झाली की 'कृष्णाचे प्रेम व माहात्म्य हे जेव्हा माझ्या ठिकाणी जागृत असते, तेव्हा कृष्ण माझ्या अगदी जवळ म्हणजे माझ्या अंतःकरणातच असतो आणि जेव्हा कृष्णाचे प्रेम माझ्या ठिकाणी खेळू लागते तेव्हा मी अतिशय आनंदात असते. आता कृष्णाचे प्रेम खेळवायचे म्हणजे तर कृष्णाशीच खेळावयास हवे. त्याचीच भेट घ्यावयास हवी. त्याच्याशीच बोलावयास हवे. त्याचेच माहात्म्य गावयास हवे. पण कृष्णभेटी प्रत्यक्षपणे तर आता कमीच व थोडावेळच होऊ शकतात. पण मला तर आताच कृष्णभेटी झाल्यासारखेच, त्याच्याशी बोलल्यासारखे आणि त्याचे प्रेमही अनुभवल्यासारखे वाटत आहे. हे माझ्या मनातील कल्पनेचे खेळ तर निश्चितच नाहीत किंवा हा माझ्या मनाला होणारा भ्रमही नाही याची मला पक्की खात्री आहे. परंतु हे सर्व कृष्णालाच विचारून घ्यायला हवे. माझ्या मनाची अवस्था ही कृष्णालाच सांगायला हवी. केवळ त्यालाच ती कळू शकेल. पण हे सर्व आताच्या आता कृष्णाला कळवायचे कसे? कारण आता लगेच कृष्ण भेटणे तर शक्यच नाही. बरे, जेव्हा त्याची व माझी थोडा वेळ भेट होईल तेव्हा माझ्या मनाची अवस्था काही आत्तासारखी असणार नाही. ती काही तरी वेगळीच असणार. मग माझी आत्ताची अवस्था योग्य आहे की नाही हे कृष्ण मला केव्हा सांगणार? आणि ते मला कसे कळणार?''



कृष्णाच्या ध्यासाने अशी आर्त झालेली राधा मनाच्या थोड्याशा अस्वस्थ अवस्थेतच घरात येरझाऱ्या घालीत असता, अचानकपणे तिची दृष्टी तेथे ठेवलेल्या अनयाच्या लिखाण सामग्रीकडे गेली आणि ती एकदम जागच्या जागीच थबकली. तिच्या डोळ्यात एक वेगळीच चमक आली. तिच्या मनात विचार चमकून आला की 'आपण कृष्णाला एक पत्र लिहिले तर? त्यातून कृष्णाला आपली मनःस्थिती कळवली तर? कृष्णाला ते आवडेल का?' आणि या मनातील विचाराने राधा आधी स्वतः स्वतःशीच मोकळेपणाने हसली. या विचाराने तिचे तिलाच नवल वाटले आणि तिचे तिलाच हसूही आले. थोडा वेळ पुन्हा पुन्हा स्वतःशीच विचार केल्यावरती तिच्या मनाचा निश्चय झाला की 'यात कृष्णाला आवडण्याचा प्रश्न येतोच कुठे? ही जर माझ्या मनाची जरुरी आहे, तर कुठल्याही परिस्थितीत माझी मनःस्थिती ही कृष्णाला कळवायलाच हवी. माझी अवस्था ही मी त्याच्यापर्यंत पोहोचवायलाच हवी. त्यासाठी हाती येईल

ते आणि जे उपलब्ध आहे त्या साधनाचा उपयोग हा मी करणे हे योग्यच आहे.  त्या नंतर ते योग्य होते की नाही किंवा आवश्यक होते की नाही, हे कृष्णच ठरवेल आणि तसे मला समजावूनही सांगेल.  मग मी ते मान्यही करीन.  त्याची काळजी आतापासूनच करण्याचे मला काहीच कारण नाही.  नव्हे, ते तर चूकच आहे.''  अशा मनाच्या निश्चयापर्यंत राधा आली आणि राधेचे मन एकदम मोकळे होऊन तिला हलके हलके वाटू लागले.  त्याच बरोबर मनातील विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी ती सज्ज झाली.

हे लक्ष्मी, खरे म्हणजे राधेला धड लिहायला, वाचायला तरी कुठे येत होते.  विवाहाच्या आधी तर तिच्यावर शिक्षणाचे काहीच संस्कार नव्हते.  पण गोकुळात अनयाची पत्नी म्हणून आली आणि मग त्यातूनही कृष्णाच्या सहवासात आली.  तिला काहीच लिहिता वाचता येत नाही हे कळल्यावर कृष्णानेच प्रथम तिला शिकण्याचा आग्रह केला.  एवढेच नव्हे, तर स्वतः यशोदेकडून शिकत असताना कृष्ण राधेलाही आपल्या बरोबर बसण्यासाठी भागच पाडे.  सुरुवातीला नाईलाजाने व नाखुशीने बसलेल्या राधेला हळुहळू शिकण्यात आवडी वाटू लागली आणि ती वाढूही लागली.  पण जेव्हा तिला कृष्णच अत्यंत आवडू लागला तेव्हा तिच्या ठिकाणी मग शिकण्याची खरी गोडी निर्माण झाली.  कारण खरे तर, राधेच्या ठिकाणी कृष्णप्रेमाची गोडी निर्माण झालेली होती.  त्यामुळे कृष्णाच्या सहवासात त्याच्यासंगे केलेली कोणतीही गोष्ट राधेला गोडच वाटे आणि गोडच लागे.  कृष्णाच्या प्रेमाच्या गोडीतून राधेला लिहिण्या वाचण्याची गोडी लागली, तर आता लिहिण्याच्या गोडीतून राधा कृष्णप्रेमाची गोडी अनुभवणार होती.

लिहिण्यास आतुर झालेल्या राधेला हे पूर्वीपासूनचे सर्व सर्व आठवले आणि तिला एकदम हसूच फुटले.  लिहायला शिकताना, तिच्या लिहिताना झालेल्या चुका आणि त्यावेळेस त्याची कृष्णाने केलेली चेष्टा, वाचायला शिकताना, वाचताना झालेले चुकीचे उच्चार आणि त्यावेळेस त्याची नक्कल करून कृष्णाने केलेली गंमत, यशोदा जवळपास नसताना कृष्णाने राधेला काढून दाखवलेली नंद, यशोदा, राधा, अनय, म्हाळसा यांची गंमतीदार चित्रे, त्याच बरोबर अनेक फुलांची व पक्ष्यांची कृष्णाने राधेला काढून दिलेली सुंदर सुंदर चित्रे या सर्वांच्या सुरेख व सुखद स्मृती राधेच्या मनात जागृत झाल्या आणि तेथेच खेळून रंगू लागल्या.

कृष्णाच्या प्रेमस्मृतीच्या रंगात रंगलेल्या राधेने त्याच नादात, अनयाने मेजावर ठेवलेल्या अनेक भूर्जपत्रांपैकी एक भूर्जपत्र उचलले आणि ती आपल्या खोलीत आली.  कृष्णाकडून प्रेमाच्या हक्काने मागून घेतलेले व त्याच प्रेमाने आपल्या ठेवणीत ठेवलेले मोरपीस राधेने बाहेर काढले.  तिच्या नित्य वापरातील काजळही तिने आपल्या बाजूला ठेवले आणि त्या मोरपिसाचे टोक काजळात बुडवून राधा एकेक अक्षर हळुहळू काढीत त्या भूर्जपत्रावर लिहू लागली.  'काय लिहावे बरे या कृष्णाला?  कसे लिहावे बरे या कृष्णाला?' या विचाराने राधा क्षणभर थबकलीच.  राधेने आपले नेत्र मिटून घेतले तर तिच्या मनःचक्षूसमोर कृष्णाचीच मूर्ती आली आणि तिचे नेत्र प्रेमजलाने भरून आले.  आतापर्यंत अनेक वेळा झालेल्या कृष्णभेटींचे राधेला स्मरण झाले.  कृष्णप्रेमाने तिचा कंठ दाटून आला आणि तिच्या हातातून एकेक अक्षर झरू लागले.

**'माझा अती आवडता कृष्ण'** असे पहिले चार शब्द राधेने लिहिले मात्र, तिच्या नेत्रातील चार अश्रूबिंदू त्या भूर्जपत्रावर टपकले आणि पुढे काहीही न लिहिता राधा बराच वेळ तेथेच व तशीच स्वस्थ बसून राहिली. बऱ्याच वेळाने राधेने स्वतःला अत्यंत मुश्किलीने सावरले आणि ती पुन्हा लिहिण्याचा प्रयत्न करू लागली. अतिशय सहजतेने तिने एवढेच लिहिले. 'फार फार प्रेम' आणि पुढे फक्त लिहिले 'तुझी राधा'. मग याच्यापुढे मात्र तिला लिहवेचना. तिची मनःस्थिती मात्र त्यावेळेस काही वेगळ्याच अवस्थेत होती. म्हटले तर मन मोकळे झाल्यासारखे वाटत होते. पण तरीही मनातील कृष्णप्रेमही दाटूनच राहिलेले होते. परंतु एका विलक्षण आनंदाची तृप्ती राधा अनुभवीत होती एवढे मात्र खरे. राधेने ते भूर्जपत्र एका छानशा रेशमी वस्त्रात नीटपणे गुंडाळून एका गुप्त जागी लपवून ठेवले आणि ते कृष्णाला देण्यासाठी योग्य संधीची वाट पहात राहिली.

एकदा अशीच एक दिवस राधा काही कामाचे निमित्त काढून बाजारात जाण्यास निघाली. ताबडतोब म्हाळसाही मनात राधेवर लक्ष ठेवण्याचा हेतू बाळगून हट्टानेच राधेबरोबर निघाली. तेथे अपेक्षेप्रमाणे राधेला कृष्ण दिसलाच. राधेनेही नेहमीच्या चतुराईने म्हाळसेच्या नकळत कृष्णाशी थोडा वेळच का होईना, परंतु जवळीकता साधलीच. तेवढ्यातल्या तेवढ्यात राधेने आपल्याबरोबर छातीशी धरून लपवून आणलेले व रेशमी वस्त्रात गुंडाळलेले भूर्जपत्र कृष्णाच्या हातात दिले. छानसे व गोडसे हसून तिने कृष्णाचा निरोप घेतला आणि ती पुढे निघून गेलीसुद्धा. कृष्ण बराच वेळ पाठमोऱ्या राधेकडे आश्चर्याने पहातच राहिला. मोठ्या नवलाईने त्याने त्याच्या हातातील रेशमी वस्त्राची गाठ सोडून पाहिले, तर छानशी घडी घातलेले भूर्जपत्र आतमध्ये त्याला आढळले. मोठ्या उत्सुकतेने कृष्णाने ते उलगडून त्यावर राधेच्या हस्ताक्षरातील लिहिलेला मजकूर वाचला मात्र, कृष्णाचे मुखकमल अतिशय आनंदाने फुलून राहिले. त्याने ते प्रेमपत्र प्रेमाने आपल्या हृदयाशी धरले तर त्याचे नेत्र प्रेमाश्रूंनी भरूनच आले. कृष्णानेही ते भूर्जपत्र पुन्हा त्याच रेशमी वस्त्रात गुंडाळून आपल्या अंगावरील शेल्यात लपवून ठेवले आणि तोही त्वरेने तेथून दुसरीकडे निघून गेला.

इकडे राधा आपल्या सासूबरोबर घरी आली खरी, पण तिच्या मनाला एक वेगळीच हुरहुर लागून राहिली होती. ''आपले पत्र कृष्णाने पाहिले असेल काय? त्याने ते वाचले असेल काय? त्याला ते आवडले असेल काय? आपण पत्र लिहिण्याचे जे धाडस केले ते त्याला पसंत पडले असेल काय?'' अशा अनेक विचारांची गर्दी राधेच्या मनात झालेली होती. कृष्णाची प्रतिक्रिया काय होते हे जाणून घेण्यास राधा अगदी बेचैन झालेली होती. पण बराच काळ राधा व कृष्ण यांची भेटच होऊ शकली नाही आणि त्यामुळे राधेची उत्सुकता मात्र अधिकच वाढून राहिलेली होती. अशीच एक दिवस राधा बाजारहाट करण्यासाठी घराबाहेर पडली असता अचानक कृष्ण तिच्या सन्मुख येऊन उभा राहिला. कृष्णाला पाहून राधेच्या आनंदाला पारावारच राहिला नाही. कृष्ण काही पत्रासंबंधी बोलेल किंवा सांगेल या अपेक्षेने राधा कृष्णाकडे पहात होती. पण कृष्ण 'एक नाही नि दोन नाही.' तो त्यासंबंधी काहीच बोलत नव्हता. कृष्णाने राधेची बाकी सर्व चौकशी अतिशय प्रेमाने केली. तिच्याशी इतर अनेक विषयांवर कृष्ण बोललाही, परंतु त्याने राधेच्या पत्राचा मात्र काहीच विषय काढला नाही.

राधा थोडीशी हिरमुसली आणि नाराजही झाली. शेवटी कृष्णाला 'आपण फार घाई गडबडीत आहोत. मला लवकर घरी जायलाच हवे' असे म्हणून राधा तेथून निघालीच. पुढे गेलेल्या राधेच्या पाठून कृष्ण धावतच गेला आणि राधेचा हात पकडून तिच्या हातात आपल्या बरोबर घडी करून आणलेले रेशमी वस्त्र ठेवले. राधेशी काहीही न बोलता पण एक मिश्किल हास्य करून कृष्ण तेथून त्वरेने दूर निघून गेला. आश्चर्यचकित झालेल्या राधेने ते रेशमी वस्त्र नीट घडी करून आपल्या पदराच्या आत छातीशी लपवून ठेवले. घरी जाईपर्यंत तिची छाती नुसती धडधडत होती ती भीतीने नव्हे, तर त्या रेशमीवस्त्रात कृष्णाने काय बांधून दिलेले आहे याच्या विचाराने व उत्सुकतेने. 'केव्हा एकदा घरी जाते' याच विचाराने मन व्यापून गेलेली राधा जवळ जवळ धावतच घरी जाऊन पोहोचली. तिच्या धावपळीकडे संशयाने व थोड्याशा रागाने पाहणाऱ्या म्हाळसेकडे अजिबात लक्ष न देताच राधा आपल्या खोलीत गेली आणि तिने दार लावून घेतले.

बराच वेळ ती त्या रेशमी वस्त्राला आपल्या छातीशी कवटाळूनच बसली होती. त्या वस्त्राची घडी उलगडण्याचे धाडसच तिला होईना. शेवटी मनाचा हिय्या करूनच तिने ते वस्त्र उलगडले, तर त्यात तिने कृष्णाला पाठवलेले भूर्जपत्रच होते. तिला आश्चर्याचा धक्काच बसला. आपले पत्र कृष्णाला आवडले नसावे आणि म्हणूनच त्याने ते परत केले असावे असे वाटून राधेला वाईटच वाटले. 'जे पत्र कृष्णाला आवडले नाही, ज्या पत्राचा कृष्णाने स्वीकार न करता ते परतच केले ते पत्र आता ठेवण्यात काहीच अर्थ नाही. कारण त्या पत्राला आता काहीच किंमत उरलेली नाही' असे वाटून ते पत्र फाडून टाकण्याच्या हेतूने उचलून राधेने हातात घेतले आणि उलगडले मात्र, तिला आश्चर्याचा दुसरा धक्का बसला. तिने लिहिलेल्या मजकुराच्या खालीच कृष्णाने स्वहस्ताने तांबड्या गंधाने मजकूर लिहिलेला होता. राधेने ते पत्र जवळ धरले आणि त्यातील एकेक अक्षर ती सावकाशपणे वाचण्याचा प्रयत्न करू लागली. कृष्णाने एवढेच लिहिले होते ''अती प्रिय राधा, तुझे गोड गोड प्रेम मिळाले. अतिशय आनंद झाला. तुझाच आवडता कृष्ण.'' कृष्णाने आणखीन एक गोष्ट केली होती. राधेने जेथे 'तुझी राधा' असे लिहिले होते तेथे कृष्णाने तांबड्या गंधाने 'तुझी' या शब्दाच्या नंतर 'च' असे चांगले लांबलचक अक्षर मुद्दामहून काढून 'तुझी' चे 'तुझीच' असे केले होते. तो 'च' पाहून राधा अतिशय मोकळेपणाने हसली.

तिने ते कृष्णाच्या हस्ताक्षरातील पत्र पुन्हा पुन्हा वाचले. एकदा, दोनदा, दहावेळा वाचले तरी राधेचे समाधान म्हणून होईचना. त्या पत्राला आपल्या हृदयाशी घट्ट धरून राधा सर्व खोलीभर किती तरी वेळ आनंदाने नाचतच होती. शेवटी थोड्या वेळाने राधेने स्वतःला सावरले आणि विचार करून ते पत्र तिच्या कपड्यांच्या पेटीमध्ये लपवून ठेवले. तिच्या कृष्णप्रेमाचा व आनंदाचा अत्यंत अमोलिक असा तो ठेवाच होता. दुसऱ्या कोणाच्याही हाताला किंवा नजरेला तो ठेवा पडणे हे अत्यंत धोक्याचे होते हे राधा जाणून होती आणि म्हणूनच अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे हे राधेला ठाऊक होते. पण राधेची हर्षनिर्भर अवस्था मात्र अजूनही तशीच कायम होती. आपल्या खोलीचे दार उघडून बाहेर आल्यावर समोरच उभ्या असलेल्या म्हाळसेकडे पाहून राधा अगदी तोंड भरून हसली आणि स्वतःभोवती एक गिरकी घेऊन धावतच स्वयंपाक घरात गेली. म्हाळसा आश्चर्याच्या धक्क्याने तिच्याकडे पहात राहिली.

साहित्य प्रतिष्ठान®

आज काही तरी खास गोड पदार्थ करायचा आणि कृष्णाला नेऊन द्यायचा असा विचार राधेने पक्का केला. ती त्याच्या तयारीला लागली आणि तो गोड पदार्थ म्हणजे बेसनाचे लाडूच करायचे हाही तिचा निश्चय झालेलाच होता. बराच वेळ स्वतः एकटीनेच मेहनत घेऊन राधेने तिच्या मनाला पसंत येईपर्यंत प्रयत्न करून, कृष्णाला आवडतात तसे पिवळसर तांबूस रंगाचे, तुपामुळे तुकतुकीत दिसणारे आणि मुख्य म्हणजे अतिशय गोड असलेले बेसनाचे लाडू तयार केले. ते लाडू बनवत असताना तर राधा अगदी कृष्णमय होऊन राहिली होती. त्या लाडवांच्या निमित्ताने अनुभवलेले कृष्णप्रेम ती अगदी त्या क्षणालाही तसेच्या तसे अनुभवीत होती. खरे तर, मुळात बेसनाचा लाडू हा तिच्या अतिशय आवडीचा होता. राधेच्या आवडीचा म्हणून मग तो लाडू कृष्णाला आवडू लागला आणि त्यामुळे राधेचे तर त्याच्यावर, म्हणजे लाडवावर नि कृष्णावर, अगदी प्रेमच जडून राहिले होते. असे कृष्णप्रेमाच्या गोडीच्या स्मरणाने झालेले लाडू कृष्णप्रेमासारखे गोड झाले नसते तरच नवल होते.

सर्व लाडू तयार झाल्यावर राधेने त्यातील दोन लाडू प्रथम देवघरातील देवाच्या मूर्तीसमोर ठेवले. त्यातील एक लाडू तिच्या कृष्णासाठी होता, तर दुसरा तिच्यासाठी. मनामध्ये असलेले कृष्णरूप डोळ्यांसमोर आणून राधेने देव्हाऱ्यातील मूर्तीसमोर हात जोडले. दोन्ही कर जुळवतानाच तिच्या अंतरातील कृष्णाविषयीचा सर्व प्रेमभाव एकत्र जुळला गेला आणि तिच्या ठिकाणी असलेले कृष्णप्रेमाचे चैतन्य तिच्याच अंतरात नानाविध रूपाने खेळ खेळू लागले. कृष्णाच्या प्रेमलीलांच्या अनुभवात ती कितीतरी वेळ दंग होऊन राहिली होती. परंतु शेवटी म्हाळसेने रागाने मारलेल्या जोरदार हाकेमुळे राधा देहभानावर आली आणि तिला पहिल्यांदा तोंड द्यावे लागले ते म्हाळसेच्या रागाने बोलण्याच्या भडिमाराला. म्हाळसा राधेला नेहमीप्रमाणे अद्वातद्वा बोलू लागली. 'आता मध्येच हे लाडू करायचे कारणच काय? उगाचच सर्व सामग्री वाया कशासाठी घालवलीस? अनयाला व मलाही बेसनाचे लाडू अजिबात आवडत नाहीत हे तुला माहीत असतानाही तुला मुद्दामहून बेसनाचे लाडू करण्याची हिंमतच कशी झाली?' असे नाना प्रकाराने बोलून व कुत्सित टोमणे मारूनही म्हाळसेने राधेला अगदी भंडावून सोडले. पण कृष्णप्रेमात पूर्णपणे बुडून राहिलेली राधा मात्र बाह्यांगाने अगदी शांतच होती. तिचा शांतपणा बघून म्हाळसेच्या रागाचा पारा मात्र आणखीनच चढत होता.

तेवढ्यामध्ये एक गंमतच झाली. एखाद्या चमत्कारासारखा खुद्द कृष्णच तेथे येऊन थडकला. म्हाळसेने काही बोलायच्या आधीच कृष्णाने पुढे येऊन म्हाळसेला वाकून नमस्कार केला आणि तिच्या तब्येतीची चौकशी केली. म्हाळसेला तर काय करावे हेच सुचेना. तिला कृष्णावर धड रागावता येईना आणि कृष्णाकडे बघून धड हसणेही जमेना. कृष्णाची ही लीला व त्यामुळे म्हाळसेची झालेली कुचंबणा बघून राधेला मात्र तिचे हसू आवरणे कठीणच होऊ लागले. पण तिने मुद्दामहून थोडे खोकल्यासारखे करून आपला हात तोंडावर धरला आणि मोठ्या प्रयासाने आपले हसणे लपवले. म्हाळसेनेही कृष्णावरचा राग आतमध्ये दाबून धरला आणि औपचारिकपणे थोड्याशा चिडक्या व छद्मी सुरातच ती कृष्णाला म्हणाली, ''काय रे कृष्णा, आता तू येथे कसा काय? काय काम काढलेस? कारण कामाशिवाय तू उगाचच इकडे तिकडे जात नाहीस हे मला ठाऊक आहे. मोठ्या माणसांना नमस्कार करायचा ही रीत मात्र तू अजूनही सांभाळून आहेस याचे मात्र मला कौतुक

आहे हं! यशोदेने केलेले काही चांगले संस्कार अजूनही तू टिकवून आहेस हे चांगले झाले. बरे तुझे काय काम आहे? कारण अनय आता घरी नाही. तेव्हा संध्याकाळी जेव्हा तो घरी येईल तेव्हाच तू आलास तर बरे होईल. म्हणजे तुझे जे काही काम असेल ते त्याच्याकडून तुला करून घेता येईल.''

म्हाळसेचे बोलणे ऐकून कृष्णाने एक छानसे हास्य केले. राधेकडे बघून एक प्रेमाचा कटाक्ष टाकून कृष्ण मिश्किलपणे हसला आणि म्हाळसेशी बोलू लागला.

''अहो काकू, त्याचे काय आहे माहीत आहे का? आज माझे काम तुमच्याकडेच आहे. म्हणजे यशोदा माईचा निरोपच तुम्हाला सांगण्यासाठी म्हणून मी येथे आलो आहे. त्याचे काय झाले, काल पासूनच यशोदा माईची तब्येत बरी नाही आणि तिला कुठल्यातरी विशेष पूजेच्या निमित्ताने प्रसादासाठी म्हणून लाडू हवे आहेत. तेही नेमक्या बेसनाच्याच लाडवांची तिला जरुरी आहे आणि अगदी ताबडतोबही हवे आहेत. आता माईला सध्या काही करणे शक्य होत नसल्यामुळे तिला एकदम राधेची आठवण झाली. लगेचच माईने मला बोलावून घेतले आणि सांगितले की, ''म्हाळसा काकूंना जाऊन निरोप दे की जरा राधेकडून तेवढे बेसनाचे लाडू करून घ्या आणि माझ्याकडे ताबडतोब पाठवून द्या.''

मग माईचे काम मी तरी कसे नाही म्हणणार, नाही का? निघालो तसाच तिकडून धावत आणि हा आलो तुमच्याकडे. आता तुम्हाला निरोप देण्याचे माझे काम संपले आहे. माईचा सांगावा तुम्हीच राधेपर्यंत पोचवा आणि मला मोकळे करा. माईला परत तुमचा निरोप काय देऊ ते सांगा. मी काय केवळ निरोपाचा धनी. बाकी तुमचे काय ते तुम्हीच ठरवा आणि मला तसे सांगा. संध्याकाळ पर्यंत तयार झालेले लाडू घेऊन राधेला वाड्यावर पाठवा. तिला वेळ नसेल तर मी स्वतःच संध्याकाळी येथे येईन आणि लाडू घेऊन जाईन. कारण तुम्हाला आता ही धावपळ सहन होणार नाही हे मी जाणून आहे. तुमचीही तब्येत हल्ली बरी नसते हेही मला ठाऊक आहे. खरे तर, या कामासाठी मला दुसऱ्या कोणालाही पाठवता आले असते. मी अगदी स्वतःच येण्याची तशी काही आवश्यकता नव्हती. पण 'बेसनाचे लाडू' आणि तेही राधेच्या हातचे केलेले आणायचे आहेत असे म्हटल्यावर ही 'गोड कामगिरी' आपणच करावी असेच मी ठरवले. म्हणून मी स्वतःच धावत पळत आलो. आता संध्याकाळी परत केव्हा येऊ ते सांगा. म्हणजे मला आता निघायला बरे.''

कृष्णाचा निरोप ऐकून आधी चकित झालेली म्हाळसा नंतर मात्र राधेकडे संशयाने व रागाने बघू लागली. राधा एवढ्या लगबगीने बेसनाचे लाडू करते काय आणि हा कृष्ण लगेचच यशोदेचा निरोप घेऊन येतो काय? बरे, यशोदेलाही नेमकी आताच आणि तीही बेसनाच्या लाडवांचीच जरुरी निर्माण व्हावी हा केवळ योगायोग नसून यात कृष्णाचा काहीतरी डावच आहे अशी तिला शंका येऊ लागली. राधा व कृष्ण यांच्या पूर्व संगनमतानेच हे सर्व झाले आहे याची म्हाळसेला तर खात्रीच वाटू लागली. पण तिला काय व कसे बोलावे हेच सुचेना. कृष्ण व राधा यांच्याकडे आळीपाळीने रागाने बघण्या पलीकडे म्हाळसा दुसरे काहीच करू शकत नव्हती. पण राधा मात्र मनातून व बाहेरूनही अगदी हरखून गेली. कृष्ण नेमका आताच कसा काय आला याचे राधेलाही नवल वाटतच होते, पण त्याहीपेक्षा तिला आनंद जास्त होत होता. त्या आनंदाच्या

भरात ती धावतच आतमध्ये गेली आणि देव्हाऱ्यातील मूर्तीपुढे ठेवलेले बेसनाचे दोन लाडू घेऊन पळतच बाहेर आली. हसून तिने ते दोन्ही लाडू कृष्णाच्या हातावर ठेवले आणि म्हणाली,

''अरे कृष्णा, तुझी तर अगदी कमालच आहे. आज सकाळपासून मी उगाचच एवढ्या आनंदात होते की त्या भरात मी एकदम बेसनाचे लाडूच करायचे ठरवले आणि ताबडतोब केलेही. माझे लाडू आताच करून झाले काय आणि नेमका तूही बेसनाचेच लाडू मागण्याठी कसा काय कोण जाणे पण आताच आलास काय? खरे तर मला सर्वच एखाद्या चमत्कारासारखेच वाटत आहे. अरे, एखाद्या कोणाला संशयही येऊ शकेल की जणू काही तुला हे माहीतच होते किंवा तू आधीच मला ते लाडू करायला सांगितले होतेस. पण हा केवळ योगायोगच म्हणायचा. तेव्हा अगदी ताजे ताजे असे बेसनाचे लाडू तयार आहेत. त्यातील दोन लाडू मी आताच देवाच्या मूर्तीसमोर प्रसादासाठी म्हणून ठेवले होते आणि बाहेर आले तर तूच समोर येऊन उभा राहिलास. मला तर देवच पावल्यासारखे वाटले. म्हणून तेच प्रसादाचे दोन लाडू मी तुला आणून दिले आहेत. ते आधी खा आणि कसे झाले आहेत ते मला सांग. तुला काय, लाडू कितीही गोड केला तरी 'अजूनही थोडा गोड हवा होता' असेच तुला वाटत असते. होय की नाही? बरे ते जाऊ दे. तू लाडू खाईपर्यंत मी आतून जाऊन लाडवाचा डबा घेऊन येते.'' असे म्हणून राधा अत्यंत खुशीने हसत आत पळाली सुद्धा.

कृष्णाने म्हाळसेकडे मिश्किलतेने पहात हास्य केले आणि हातातील लाडू खाण्यास सुरुवात केली. म्हाळसेचा राग लपवण्याचा प्रयत्न अयशस्वी होत होता आणि तिचा काही इलाजही चालत नव्हता. तेवढ्यात राधा लाडवाचा डबा घेऊन बाहेर आली आणि तिने तो कृष्णाच्या हातात सोपवला. डबा हातात घेता घेता कृष्ण राधेकडे पाहून सहेतुक हसला आणि म्हणाला, ''वाहव्वा! राधे, एकदम गोड, अतिशय मिठ्ठास! तुला खरे सांगतो या पेक्षा हा लाडू गोड करणे दुसऱ्या कोणालाही जमणे शक्यच नाही. आणि तो झालाय पण एवढा मस्त की मी तो लगेच खाऊनही फस्त केला. तुझ्या हाताची गोडी असलेला बेसनाचा लाडू खायला मिळणे हा केवळ योगायोग नव्हे, तर माझ्यासाठी तरी तो एक सुयोगच आहे. पण तू हा लाडू खाऊन पाहिलास का नाही? आणि काकूंनाही तो लाडू दिलास की नाही? अहो काकू, हा राधेच्या हातचा लाडू तुम्ही एकदा खाऊनच बघा. त्याची गोडी किती तरी वेळ तुमच्या जिभेवर रेंगाळत राहील बघा. तुमच्या तोंडाला काही कडवटपणा आला असेल तर तो या लाडवाच्या गोडीने कोठच्या कोठे पळून जाईल आणि तुमचे तोंड अगदी गोड करून ठेवील याची मला अगदी खात्री आहे.''

कृष्णाच्या बोलण्याने म्हाळसेच्या रागात भरच पडली आणि तिने आपले तोंड दुसरीकडे फिरवले. पण राधा मात्र कृष्णाच्या बोलण्याचा अर्थ समजली. हसून तिने कृष्णाला दाद दिली आणि ती म्हणाली, ''अरे कृष्णा, आज तू हे सर्व लाडू घेऊन जा. मी घरात पुन्हा करीन. तू काळजी करू नकोस. सासूबाईंना तर पथ्य आहे म्हणून गोड त्यांना अगदी वर्ज्यच आहे. आणि माझ्या यजमानांना तर गोड म्हणून काही पहिल्यापासूनच आवडत नाही. तेव्हा तू हा सर्व डबाच्या डबा घेऊन जा आणि यशोदा माईंना दे. म्हणजे त्यांची जी तातडीची जरुरी आहे ती तरी निश्चितपणे भागेल.'' राधेचे बोलणे

संपल्यावर कृष्णाने आपल्या हातातील आणि त्याने सेवन केलेल्यातील मुद्दाम शिल्लक ठेवलेला अर्धा लाडू राधेच्या हातात ठेवला. लाडवाचा डबा हातात सांभाळीत, म्हाळसेकडे मिश्किलतेने पहात आणि राधेकडे बघून गोड हसत कृष्ण राधेच्या घरातून बाहेर पडला आणि त्याने आपल्या वाड्याकडे धूम ठोकली. म्हाळसा फणकाऱ्याने आत मध्ये निघून गेली. पण राधा मात्र किती तरी वेळ एकटक नजरेने कृष्ण गेलेल्या दिशेकडे प्रसन्न मुद्रेने पाहतच राहिली होती.

अशा तऱ्हेने राधेच्या पत्राला कृष्णाकडून जी गोड पोच पावती मिळाली त्याचा राधेला केवढा तरी आनंद तर झालाच, पण तिच्या ठिकाणचा उत्साहही वाढला. जसे जमेल तसे ती पत्र लिहून कोणाच्याही नकळत कृष्णाला देत असे. सुरुवातीला केवळ एक दोन ओळीच लिहिणाऱ्या राधेकडून हळुहळू जास्त लिखाण सहजपणे होऊ लागले. त्याला कारण म्हणजे तिचा लिखाणाचा सराव वाढला हेच नसून, त्याहीपेक्षा तिच्या मनाचा मोकळेपणा वाढला हे कारण जास्त संयुक्तिक होते. कृष्णाच्या प्रत्यक्ष सहवासात तिचे कृष्णाशी जास्त बोलणे होतच नसे. बऱ्याच वेळा तर राधेने दोन चार वाक्ये बोलल्यावरतीच कृष्णाचे एवढे बोलणे होई, की राधेला मध्ये काही बोलणे शक्यच होत नसे आणि तिला ते आवश्यकही वाटत नसे. कारण कृष्णाचे मधुर व तर्कशुद्ध बोलणे ऐकता ऐकता तिचे देहभानच हरपत असे. परंतु कृष्णाच्या बोलण्याच्या या धबधब्यातून तिच्या ठिकाणी जे कृष्णाविषयीच्या प्रेमाचे निर्झर निर्माण होत किंवा त्यातून कृष्णाचे जे माहात्म्य तिला जाणवत असे, ते प्रगट करायला राधेला संधीच मिळत नसे.

त्या नंतर जेव्हा तिच्या एकांतात कृष्णप्रेमाने युक्त होऊन कृष्णाच्या भेटीचे ते प्रसंग राधा तिच्या अंतरात नित्य वाहणाऱ्या प्रेमरसात घोळवीत व खेळवीत असे, तेव्हा राधेला होणारा आनंद हा केवळ अवर्णनीय असे. पण हा आनंदाचा अनुभव कृष्णाला वर्णन करून सांगण्यासाठी कृष्णालाच त्याच्या एकांतात भेटावे, तर कृष्णाकडून राधेला तिचा आनंद प्रगट करायला तशी जास्त संधीच मिळत नसे. आणि जेव्हा राधा तिच्या एकांतात असताना कृष्णाचे प्रेम व माहात्म्य दाटून येऊन तिला आनंदाचा अनुभव येत असे, तेव्हा कृष्ण तेथे प्रत्यक्ष हजर नसे. तेव्हा कृष्णाचा आनंद हाच जरी सत्य असला तरी त्याच्या आनंदाच्या अनुभवामुळे राधेच्या ठिकाणी जे कृष्णप्रेम निर्माण झाले होते आणि तिला जे कृष्णमाहात्म्य जाणवत होते, त्याचा राधेला होणारा आनंद हाही खराच होता. फरक फक्त एवढाच होता, की कृष्णाचा आनंद हा त्याच्या स्वप्रेमामुळे आणि त्याच्या ठायी असलेल्या व्यापक परमेश्वराच्या जाणिवेमुळे होता, तर राधेचा आनंद हा तिच्या कृष्णप्रेमामुळे आणि तिच्या ठिकाणी निर्माण झालेल्या कृष्णमाहात्म्याच्या जाणिवेमुळे होता. अर्थात कृष्णाच्या माहात्म्याची जाणीव असून घडणाऱ्या कृष्णाच्या प्रेमभक्तिमुळेच ही विभक्तता नाहीशी होणार होती आणि तशी सुरुवातही आता राधेठायी झाली होती.

राधेच्या अंतरातील कृष्णप्रेम व माहात्म्य यांच्या आनंदाचा अनुभव व्यक्त होऊन तो कृष्णाच्या अंतरातील आनंदानुभवापर्यंत पोहोचवण्याचे माध्यमच जणू राधेला या पत्र लिखाणामुळे प्राप्त झाले होते. अतिशय मोकळेपणाने ती आपल्या मनातील कृष्णाविषयीचा भक्तिभाव पत्राच्या रूपाने व्यक्त करीत असे. त्यात कृष्णावरील अलोट व्यक्तिगत प्रेम असे आणि अपार असे कृष्णाचे माहात्म्यही असे. त्यामुळे राधेच्या अंतरातील कृष्णाविषयीचे सर्व भाव नुसते साठूनच किंवा

केवळ दाटूनच न राहता, नित्य प्रवाही राहत असत आणि त्यामुळेच ती अतिशय आनंदात असे. तिचे अंतःकरण मोकळे होई तरी भरलेलेच असे आणि भरलेले राही तरी मोकळेपणाने वाहत असे. सर्वांत महत्त्वाचे व विशेष म्हणजे राधेच्या कृष्णप्रेमाचे हे भक्तिरूप कृष्णाला अतिशय आनंददायी होत असे. स्वानंदात रमणारा कृष्ण राधेच्या या भक्तिभावाने आनंदित होई आणि आपला आनंद राधेच्या त्याच पत्रावर खाली काहीतरी लिहून व्यक्त करीत असे. राधेला तिचे पत्र जेव्हा कृष्णाकडून परत मिळत असे आणि कृष्णाच्या स्वहस्ताक्षरातील लिखाण ती वाचीत असे, तेव्हा तिला होणारा आनंद तर गगनावरतीच जात असे. त्यातून कृष्णाविषयीचे राधेचे प्रेम एवढे प्रवाही होई, की त्या प्रेमाचे तर तिच्या ठिकाणी नित्य पूरच लोटत असत. त्या कृष्णप्रेमात न्हाऊन निघणारे राधेचे मन नेहमीच निर्मळ व प्रेमळ राही आणि राधा आनंदाच्या अनुभवात सदैव रममाण होऊन राही.''

राधेच्या भक्तिभावाचे वर्णन ऐकण्यात एवढा वेळ अगदी रंगून गेलेल्या लक्ष्मीच्या ठिकाणी राधेविषयीच्या प्रेमाचे भरतेच आलेले होते. राधा कृष्णमय झालेली होती तर लक्ष्मी राधामय झालेली दिसत होती. राधेविषयीच्या कौतुकाने पुरेपूर भरलेल्या शब्दांनी लक्ष्मी नारदाशी बोलू लागली.

''हे नारदा, राधेचे कौतुक करायला माझेच काय, कोणाचेही शब्द कमीच पडतील. अर्थात तू म्हणशीलच की हे माहात्म्य सर्व कृष्णाचेच आहे आणि तुझे म्हणणे सत्यही आहे. परंतु कृष्णाचे माहात्म्य प्रगट होऊनही ते सर्वांनाच कळले नाही आणि कळले त्यांनाही ते सर्वच आकलन झाले असेही नाही. हेही खरेच आहे ना? कृष्णाचे प्रेमही सर्वांनाच रुचले वा मानवले असेही नाही. परंतु राधेला कृष्णप्रेमाची अतिशय गोडी तर लागलीच, पण तसेच तिला कृष्णमाहात्म्यही जाणवू लागले ही तर साधी गोष्ट मुळीच नाही. एवढेच नव्हे, तर कृष्णप्रेमाचा अनुभव घेता घेता राधेच्या ठिकाणी कृष्णाविषयी केवढे तरी प्रेम निर्माण होऊन कृष्णाच्या सहवासात ते वाढतच राहिले आणि त्याचबरोबर कृष्णाच्या प्रगटणाऱ्या माहात्म्याचा अनुभवही राधा घेऊ लागली हे विशेषत्व मात्र केवळ राधेच्या भक्तिभावाचेच आहे यात जराही दुमत नाही. परंतु राधेच्या ठिकाणी लागलेल्या कृष्णध्यासाचे मात्र मला कौतुकाबरोबरच नवलही वाटतेच. एखाद्याला एखाद्याविषयी एवढा ध्यास लागू शकतो हे तेवढेसे शक्य वाटत नाही. परंतु राधेच्या बाबतीत मात्र ते सहज शक्य झाले हा तर एक चमत्कारच झाल्यासारखा वाटतो. राधेच्या ध्यासाचे हे मूळ एकदा लक्षात घेतले की मग राधेने शोधून काढलेली पत्रलेखनाची युक्ती काय किंवा बेसनाच्या लाडवाची न ठरवून झालेली गंमत काय, या सर्वांचा अर्थ लागतो, किंबहुना त्यामुळेच या सर्व गोष्टींना अर्थ प्राप्त होतो. नाहीतर त्या गोष्टींची सांगड लागणे किंवा त्यांचे महत्त्व लक्षात येणे शक्यच नाही.

हे नारदा, पण राधा व कृष्ण यांचे हे प्रेमसंबंध गुप्तपणे होते आणि त्याचा अनुभवही ते जास्त करून सर्वांच्या नकळतच घेत असत ही गोष्ट मात्र मला काळजीचीच वाटते. कारण राधा व कृष्ण यांनी कितीही काळजी घेतली तरीही केव्हाना केव्हा तरी ते लोकांच्या नजरेत आल्याशिवाय राहणार नाहीच. मग त्याचा बोलबाला होणार व गाजावाजा होणार हेही साहजिकच आहे. कारण या गोष्टी कितीही लपवल्या तरी लपल्या जाणे शक्यच नाही. एक तर, त्यांची काही ना काही

तरी बाह्य लक्षणे ही दिसणारच आणि दुसरे म्हणजे मनाला कितीही आवर घातला तरी अशी एखादी कृती कळत नकळत घडणारच की ज्यामुळे लोकांना टीका व निंदा करायला संधीही मिळणार. त्यातून लोकांचा किंवा कुटुंबीयांचा होणारा विरोध हा अशा प्रेमसंबंधाला बाधकच ठरणार, नाही का?

हे नारदा, म्हणून राधा व कृष्ण यांच्या संबंधातून पुढे काय घडले हे जाणून घेताना माझ्या ठिकाणी आतुरते बरोबरच काळजीही असतेच. या संबंधाची परिणती सर्व आनंदातच होणार याची मला मनातून पक्की खात्री असतेच. परंतु पुढे पुढे काय होणार आणि त्याच्या मध्ये मध्ये काय येणार हे तर त्या व्यापक परमेश्वरालाही माहीत असणे शक्य नाही. ते तर फक्त तुला व तुलाच ठाऊक आहे आणि तेच तू मला आता सांग बरे. कारण माझी आतुरतासुद्धा जर जास्त ताणली गेली ना, तर त्याचाही होणारा ताण माझ्या मनाला असह्यच होतो.''

लक्ष्मीच्या बोलण्यातून प्रगटणारे राधेविषयीचे कौतुक आणि राधेविषयीची काळजी हे दोन्ही नारदाला जाणवले. नारदाला त्याने समाधान वाटले कारण हे दोन्ही भाव लक्ष्मीच्या ठिकाणी राधेविषयी असलेल्या आत्यंतिक आपलेपणातूनच निर्माण झालेले होते याची जाणीव नारदाला होती. तेच सूत्र मनात धरून नारदाने लक्ष्मीशी पुन्हा बोलायला सुरुवात केली.

''हे लक्ष्मी, मला तर तुझ्या ठिकाणी राधेविषयीचाच ध्यास लागलेला दिसत आहे. बघ ना, राधेचे तुला किती कौतुकही वाटत आहे आणि तिची किती काळजीही तुझ्या ठिकाणी निर्माण झालेली आहे. राधेच्या भक्तिभावाचे नुसते वर्णन ऐकून जर तुझ्या ठिकाणी राधेचा ध्यास लागत असेल, तर मग खुद्द राधेच्या ठिकाणी प्रत्यक्ष कृष्णाच्या सहवासामुळे कृष्णाविषयी अखंड ध्यास निर्माण झाला त्यात नवल ते काय? बरे, हा काही तू म्हणतेस तसा कोणाला तरी कोणाचा तरी ध्यास लागलेला नाही. तर प्रेमस्वरूप अवस्थेतील कृष्णाचा ध्यास, त्याचे प्रेम अनुभवून जिच्या ठिकाणी कृष्णाविषयी आत्यंतिक प्रेम निर्माण झालेले आहे, अशा राधेला लागलेला होता. कृष्णाच्या ईश्वरी अनुभवाविषयी दृढ निश्चय झालेल्या राधेच्या ठिकाणी ध्यास तरी काय होता? तर तिचे कृष्णावरील प्रेम कृष्णालाच अर्पण करावे आणि ते प्रेम अनुभवून त्याचा आनंद घ्यावा.

असा ध्यास लागणे हे तर भक्तिभावाचे मूळ व मुख्य लक्षण आहे. त्या ध्यासाची पूर्ती कृष्णाची प्रत्यक्ष भेट घेऊन करणे हे बाह्य परिस्थितीमुळे जेव्हा राधेला कठीण होऊ लागले, तेव्हा कृष्णाची भेट स्वतःच्या अंतरातच घेणे राधेला आवश्यक ठरू लागले आणि तिला ते शक्यही होऊ लागले. कारण कृष्णाच्या, आधी प्रेमाने आणि मग भक्तिभावाने घडलेल्या सहवासातून व जवळीकतेतून कृष्णाची प्रेममूर्ती राधेच्या अंतरात दृढपणे ठसली होती. त्यामुळेच कृष्णप्रेमाने जेव्हा जेव्हा राधेचे मन भरून येई आणि कृष्णभेटीसाठी व्याकूळ होई तेव्हा तेव्हा तिच्या ठिकाणी निर्माण झालेल्या उत्कट ध्यासामुळे तिचे मन तिच्याच अंतरातील कृष्णाची भेटी घेत असे. त्या भेटीमध्ये अलोट प्रेमाचे केवढे तरी पूरच लोटत असल्याचा अनुभव राधेला येई आणि भक्तिभावाची उत्कटता शिगेला पोहोचल्यामुळे प्रेम व आनंद यांचे ऐक्यच राधेच्या अंतःकरणात घडत असे.

या प्रेमानंदाच्या अनुभवाचे वर्णन करणे ही सुद्धा तिच्या मनाची आत्यंतिक आवश्यकता होत असे. त्यातूनच मग पत्ररूपाने तिने अंतःकरणात अनुभवलेला आनंदही राधा कृष्णालाच अर्पण करीत असे. कारण तिच्या या आनंदाच्या अनुभवाचे मूळ कृष्णच आहे याची जाणीव तिला ठामपणे होती. राधेने घेतलेल्या आनंदानुभवाचे वर्णन ऐकून कृष्णालाही अत्यंत आनंद होई आणि तो आनंद कृष्ण पुन्हा शब्दरूपाने प्रगट करून पत्राच्या रूपाने राधेला कळवीत असे. आपला आनंद कृष्णाला पावला हे कळल्यावर राधेला अत्यंत कृतकृत्यच वाटत असे आणि तिच्या आनंदाच्या अनुभवाची खऱ्या अर्थाने पूर्ती होत असे. पण तरीही भक्तिभावाचा ध्यास कायमच राही आणि राधेला पुन्हा पुन्हा अंतरातच आनंद अनुभवण्यासाठी उद्युक्त करीत राही. पूर्वी कृष्णाची भेट बाह्यांगाने घेऊन त्याचा आनंद अंतरात साठवणारी राधा आता कृष्णाची भेट अंतरात घेऊन मग त्या भेटीचा आनंद बाह्यांगाने प्रगट करू लागली.

हे लक्ष्मी, तू म्हणतेस त्याप्रमाणे खरोखरी हा एक चमत्कारच आहे. पण तो चमत्कार केवळ भक्तिच्या ध्यासानेच घडू शकतो हे मात्र खरे आहे. म्हणूनच भक्तिभावाच्या ध्यासाचेच महत्त्व व माहात्म्य आहे, की जो ध्यास प्रत्यक्ष सगुणरूप ईश्वराची नित्य भेटी आपल्याच अंतरात घडवून आणतो. या सगुण प्रेमभक्तिच्या मुलभूत अवस्थेतूनच सगुण रूपाचे ईश्वरस्वरूपही आपल्या अंतरात अनुभवण्याच्या पुढील मार्गाची वाटचाल सुरू होऊ शकते.

हे लक्ष्मी, ही पत्र लेखनाची कृती राधेकडून तिच्या आंतरिक अवस्थेच्या आत्यंतिक आवश्यकतेतून उत्स्फूर्तपणे घडली होती. तिच्या आंतरिक अनुभवाला व्यक्त करण्याचे हे माध्यम तिला अचानकपणे सापडले होते. त्या संबंधी आधी किंवा नंतरही तिने काहीच विचार केला नव्हता. तिच्या भावाची पूर्ती झाल्याचे समाधान व आनंद अनुभवत असताना तिच्या कृतीचे काय परिणाम होतील याची काळजी राधेच्या मनात जरासुद्धा नव्हती. परंतु त्याचे संभाव्य परिणाम कृष्ण जाणून होता. दुसऱ्या तिसऱ्या कोणीही ती पत्रे पाहिली वा वाचली तर गैरसमज व गैरकल्पना निर्माण होतील याची खात्री कृष्णाला होती. त्याच काळजीपोटी एकदा राधेला तिचे पत्र परत करताना कृष्णाने सावध केले होते.

''हे बघ राधे, तुझा माझ्याविषयीचा भक्तिभाव व त्याचा तुला होणारा आनंद हा जेव्हा तू तुझ्या शब्दांत पत्राद्वारे माझ्यापर्यंत पोहोचवतेस तेव्हा तो तुझा भाव व तुझा अनुभव माझ्यापर्यंत लगेचच व निश्चितपणे पावतो. त्याचा मला होणारा आनंद मी माझ्या शब्दात आणि काही वेळा तुला आवडणाऱ्या व तुला कळणाऱ्या शब्दातही त्याच पत्रावर लिहून देत असतो. ते वाचून माझा आनंदही तुझ्यापर्यंत येऊन तुला पावतो आणि तू अधिक आनंदित व अधिक भावपूर्ण होतेस.

पण राधे, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव, की तेथेच व त्याच वेळी त्या पत्राचे काम संपलेले आहे. त्यानंतर लगेचच ते पत्र फाडून टाक व नाहीसे कर. कारण जर ते पत्र कधीकाळी तुझ्या घरच्यांच्या हातात पडले तर मग तुझीच पंचाईत होईल. विशेषतः जर अनयाने ते वाचले तर आधीच तुझ्या-माझ्या विषयीच्या संशयाने पछाडलेल्या अनयाच्या रागाला ताळतंत्रच राहणार नाही. कारण त्यातील तू तुझ्या शब्दात लिहिलेला मजकूर हा तुझे माझ्याविषयीचे व्यक्तिगत व वैयक्तिक प्रेम व्यक्त करणारा आहे. तुझ्या शब्दांतून तुला जाणवणारे माझे ईश्वरी माहात्म्यही प्रगट होत असते. परंतु या

दोन्ही गोष्टी अनयाला केव्हाही मानवणाऱ्या नाहीत. एकतर तुझे माझ्यावरील व्यक्तिगत प्रेम हे त्याच्या दृष्टीने त्याला गैरच वाटते. दुसरे म्हणजे ईश्वर, ईश्वराचे माहात्म्य आणि ते सुद्धा माझ्या ठिकाणी हे सर्वच अनयाला न समजणारे व न मानवणारे आहे. तेव्हा ही तुझी पत्रे जर अनयाने पाहिली तर आधीच रागाने धुमसत असलेल्या अनयाच्या मनात आगीत तेल ओतल्याप्रमाणे एकदम भडकाच उडेल आणि त्याची झळ तुलाही लागल्याशिवाय राहणार नाही. यावर एकच उपाय म्हणजे ज्यांचे काम संपलेले आहे त्या पत्रांचा काही मागमूसही शिल्लक न ठेवणे हाच होय. उगाचच जोखीम बाळगणे हे अयोग्यच आहे.''

कृष्णाचे बोलणे राधेला समजले. त्याच्या सांगण्याचा हेतूही राधेच्या लक्षात आला. कृष्णाचे म्हणणे राधेला पटलेही. परंतु त्या पत्रांना अशा तऱ्हेने फाडून टाकणे मात्र राधेच्या अगदी जिवावर आले. कारण नाही म्हटले तरी राधेच्या भावना त्या पत्रांमध्ये थोड्याफार गुंतलेल्या होत्याच. तिने असा विचार केला की तिने ती सर्व पत्रे अशा ठिकाणी लपवून ठेवलेली आहेत, की ती कोणालाही कधीही सापडणे शक्यच नाही. त्यातूनही जेव्हा जेव्हा थोडासा एकांत लाभत असे, त्या त्या वेळेस ती सर्व पत्रे काढून वाचण्याचा छंदच राधेला लागला होता. त्यामुळे त्या पत्रांवरती नाही म्हटले तरी तिचा अगदी जीवच जडल्यासारखे झाले होते. अशा तऱ्हेने 'आपण योग्य ती काळजी घेत असल्यामुळे सर्व काही व्यवस्थित होईल आणि विपरीत असे काही घडणारच नाही' असा ठाम विश्वास राधा बाळगून होती. नेमका हाच तिचा जादा विश्वास तिला एक दिवस नडला.

*****

# अनयाला सापडली प्रेमपत्रे

**ए**कदा राधा स्वयंपाक घरामध्ये कामात मग्न असताना अनय त्यांच्या खोलीमध्ये काहीतरी स्वतःची वस्तू शोधत होता. बराच वेळ शोधूनही हवी असलेली वस्तू न मिळाल्यामुळे अस्वस्थ झालेल्या अनयाने राधेचे कपाट उघडून त्यामध्ये शोध घेण्यास सुरुवात केली. कपाटातील वस्तू वर खाली व खाली वर अशा उचकून बघत असताना अनयाच्या हाताचा धक्का लागून कपाटातील राधेच्या कपड्यांची पेटी अचानकपणे खाली पडली. अनय त्यामुळे अधिकच चिडचिडा झाला. खाली उघडून पडलेली पेटी घाईघाईने अनय वर उचलून घेत असतानाच त्यातील राधेचे सर्व कपडे बाहेर फेकले गेले आणि त्यातूनच राधेने अत्यंत काळजीपूर्वक ठेवलेली रेशमी वस्त्राची गुंडाळी बाहेर पडली. अनयाच्या ठिकाणचे कुतूहल व संशय दोन्ही एकदमच जागे झाले. त्याने गडबडीने ती गुंडाळी उघडून पाहिली, तर राधेने जपून ठेवलेल्या सर्व पत्रांचा जुडगा त्याच्या दृष्टीस आला. विस्मयाचा धक्का बसलेला अनय त्या जुडग्यातील एकेक पत्र हातात घेऊन त्यावर नजर टाकू लागला. त्या एकेक पत्रातील राधेच्या हस्ताक्षरातील मजकूर आणि त्या खाली कृष्णाच्या हस्ताक्षरातील मजकूर वाचता वाचताच अनयाचा चेहरा रागाने नुसता लाल बुंदच होत होता.

संतापाने थरथरणारा अनय राधेला हाक मारण्यासाठी म्हणून एकदम वळला, तर त्याच्या पाठीमागे राधा दारातच उभी होती. पेटी पडल्याचा आवाज तिने स्वयंपाकघरातच ऐकला होता आणि तेव्हाच तिच्या काळजाचा एक ठोका चुकला होता. धडधडत्या हृदयानेच राधा धावतच खोलीच्या दारात येऊन उभी राहिली होती. अनयाच्या हातातील पत्रांचा जुडगा तिने पाहिला तेव्हाच सर्व घडलेला प्रकार तिच्या लक्षात आला होता. अनयाची प्रतिक्रियाही तिला अपेक्षित अशीच होती. आता पुढे काय प्रसंगाला सामोरे जावे लागणार आहे याची कल्पना राधेला लगेचच आली. परंतु ती जराही डगमगली नाही किंवा घाबरलीही नाही. आपले नेत्र क्षणभरच मिटून तिने तिच्या हृदयस्थ कृष्णाचे मनःपूर्वक स्मरण केले आणि कृष्णाच्या शांत, गंभीर, निर्भय व धीरोदात्त अशा मूर्तीचे दर्शन घेतले. क्षणातच तिने आपले नेत्र उघडले आणि येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी धैर्याने अनयासमोर उभी राहिली.

रागाने लालीलाल झालेल्या डोळ्यांनी पाहणाऱ्या अनयाकडे राधा मात्र अतिशय शांतपणे पहात होती. त्यामुळे अनयाचा राग अधिकच भडकला आणि त्याने त्याच्या हातातील पत्रांचा जुडगा राधेच्या दिशेने फेकून मारला. इतस्ततः पडलेली ती पत्रे पाहून राधा अत्यंत व्यथित झाली. जणू कोणीतरी तिच्या काळजाचेच तुकडे करून सगळीकडे फेकले होते. राधेसाठी ती पत्रे केवळ भूर्जपत्रे नव्हती, तर तिच्या अंतरात फुललेल्या कृष्णप्रेमरूपी कमळाच्या पाकळ्याच होत्या. त्या भूर्जपत्रांना कृष्णाचा प्रेमस्पर्श झाल्यामुळे लागलेला सुगंध सर्वत्र दरवळल्यासारखा राधेला अजूनही जाणवत होता. त्या सुखद सुगंधाच्या धुंदीतच राधेने ती विखरून पडलेली पत्रे पुन्हा गोळा करून एकत्र करायला सुरुवात केली. त्या बरोबर अनयाचे पित्त अधिकच खवळले आणि त्याने पुढे येऊन ती पत्रे राधेच्या हातातून खेचूनच घेतली.

ती पत्रे हातात धरून अनय त्यांच्याकडे बराच वेळ पहात राहिला. ती पत्रे तेथल्या तेथे व लागलीच फाडून टाकावीत किंवा आगीत टाकून जाळून टाकावीत असा विचार क्षणभर अनयाच्या मनात आला खरा, पण क्षणार्धात त्याचा विचार बदलला. अनयाने मनाशी काहीतरी निश्चय केला. एका हातात पत्राचा तो जुडगा धरून आणि दुसऱ्या हाताने राधेला धरून तो घराबाहेर पडला. वाटेत इकडे तिकडे कोठेही न बघता वा न थांबता, अनय तडक नंदाच्या राजवाड्यावर जाऊन पोहोचला. राजवाड्यात प्रवेश करता करताच अनय नंदाच्या नावाने मोठमोठ्याने हाका मारत उच्चरवात ओरडू लागला. ''हे नंदराजा, मला न्याय हवा आहे. हे नंदराजा, माझ्यावरील अन्यायाचे निवारण करा आणि मला न्याय द्या.''

अनयाच्या मोठ्या आवाजातील आरडाओरडीने राजवाड्यातील सर्व माणसे चकित होऊन तेथे जमा झाली. त्यांच्या मागोमाग नंदही लगबगीने बाहेर आला. काय गडबड आहे ते बघण्यासाठी यशोदाही धावत पळत बाहेर आली. अनय जेव्हा राधेला हाताने धरून रस्त्यातून रागारागाने तिला चालवीत नेत होता, तेव्हा चकित मुद्रेने व कुतूहलाने बघणारे अनेक जणही अनयाच्या मागोमाग काय प्रकार आहे ते जाणून घेण्यासाठी नंदाच्या वाड्याच्या बाहेर येऊन पोहोचले होते. काही फुकटची मौज मजा बघायला व ऐकायला मिळाली तर त्या लोकांना हवीच होती.

अनयाचा एकंदरीत बाह्य अवतार व नूर बघून नंदाला नवल वाटले आणि अधिक काळजीच वाटू लागली. अनयाचा रागाने लालबुंद झालेला चेहरा, त्याचे रागाने थरथरणारे ओठ, त्याच्या रागाने फुगलेल्या नाकपुड्या, त्याचे रागाने गरगरणारे डोळे, त्याने रागाने घट्ट धरून ठेवलेला राधेचा हात हे सर्व बघून प्रसंगाचे गांभीर्य नंदाच्या लक्षात आले. थोडा वेळ त्याला काय करावे हे सुचेनाच. परंतु तरीही पुढे येऊन नंदाने अनयाच्या खांद्यावर हात ठेवून त्याला प्रेमाने थोपटले आणि शांत सुरात अनयाशी बोलू लागला.

''अरे अनया, शांत हो. आधी शांत हो. थोडेसे पाणी पी म्हणजे तुला जरा बरे वाटेल. आणि मोठमोठ्याने बोलून उगाचच स्वतःला त्रास करून घेऊ नकोस. अनया, ज्या अर्थी तुला एवढा त्रास होत आहे त्या अर्थी नक्कीच तुझ्यावर कठीण प्रसंग आलेला आहे, हे माझ्या लक्षात आले आहे. तुझ्यावर अन्याय झालेला आहे असे तुला वाटत आहे आणि न्याय मागण्यासाठी तू विश्वासाने माझ्याकडे आलेला आहेस. त्या तुझ्या माझ्यावरील विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही याची खात्री मी तुला देतो. तेव्हा जे काही तुझे दुःख आहे किंवा जी काही तुझी व्यथा आहे ती तू मला मोकळेपणाने सांग. मी तुझ्यावरील झालेला अन्याय दूर करून तुला योग्य तो न्याय देईन असे मी तुला सर्वांच्या समक्ष आश्वासन देत आहे. तेव्हा तुझ्यावर कोणी व काय अन्याय केला आहे हे तू मला त्वरित सांग म्हणजे मला त्याप्रमाणे लगेचच कारवाई करता येईल.''

नंदाने केलेले शांतपणाचे बोलणे ऐकून अनय काही शांत झाला नाही. उलट त्याचा राग अधिकच उफाळून आला आणि एकदम उसळून तो नंदाला म्हणाला,

साहित्य प्रतिष्ठान®

‘‘हे नंदराजा, तुमच्याकडूनच माझ्यावरती अन्याय होत आहे. तुमचा मुलगा कृष्ण याचे माझ्या बायकोशी म्हणजे राधेशी, प्रेमाचे चोरटे संबंध आहेत. खरे तर ही गोष्ट गोकुळातील सर्व लोकांनाच माहीत झालेली आहे. त्याची चर्चा कुत्सितपणे सर्वच जण करीत असतात. एवढेच नव्हे, तर हा अनुभव थोड्या फार प्रमाणात सर्वांनाच आलेला आहे. आधी या कृष्णाने गोकुळातील लहान मुलांना व तरुणांना आपल्या नादाला लावून बिघडवले. तेव्हाही सर्वांनी तुमच्याकडे तक्रारी केल्या होत्याच. परंतु त्यावेळेस जास्त काही कारवाई न करता तुम्ही त्याच्याकडे कानाडोळाच केलात. एवढेच नव्हे तर कृष्णाच्या गुणांचे कौतुक करून त्याला एक प्रकारचे प्रोत्साहनच दिलेत. त्यामुळे तर हे राजश्री आणखीनच सर्वांच्या डोक्यावर चढले. कृष्णाच्या शहाणपणाच्या बोलण्याला अवाजवी महत्त्व देण्यात येऊन प्रत्येक गोष्टीत त्याचाच सल्ला घेऊन तो प्रमाणही मानला जाऊ लागला. त्यामुळे या गोकुळात एक दुसरे सत्ता केंद्र निर्माण झाले आणि कृष्णापुढे कोणाचेच काही चालेनासे झाले. सर्वांनाच त्याच्यापुढे नमावे लागते आणि त्याचेच म्हणणे ऐकावे लागते. बरे, त्याच्याविरूद्ध तक्रारी तरी कोणाकडे करणार? कारण पुत्राच्या मोहाने तुम्हीच आंधळे झालेले असल्यामुळे तुम्हाला तर काही सांगायची सोयच नव्हती आणि सांगूनही तुमच्यावर काही परिणाम हा झाला नसताच.

हे नंदराज, हे सर्व आम्ही मुकाट्याने सहन करीत होतो. परंतु कुणाचाही काहीच अंकुश न राहिल्यामुळे कृष्ण आणखीनच मोकाट सुटला आणि त्याने गोकुळातील तरुण मुलींना व स्त्रियांनाही आपल्या नादाला लावण्यास सुरुवात केली. त्यांच्याशी गोड गोड बोलून, त्यांच्या दुःखांविषयी सहानुभूती दाखवून, त्यांना भूल पाडली आणि त्यांना आपल्या मोहजालात गुंतवून टाकले. त्याची परिणती एवढी झाली की मुली आपल्या आईवडिलांपेक्षा आणि विवाहित स्त्रिया आपल्या नवऱ्यांपेक्षा कृष्णाचेच सांगणे प्रमाण मानू लागल्या. प्रत्यक्ष आपल्या पतीच्या सहवासात असतानाही या स्त्रियांची मने मात्र कृष्णाचाच विचार करीत असत. परपुरुषांकडे पाहणे, एवढेच काय परपुरुषांचा विचार करणेही जेथे पाप आहे असे आपले शास्त्र व धर्म सांगतो, तेथे या गोकुळातील काही स्त्रिया बिनदिक्कतपणे व अगदी बिनधास्तपणे कृष्णाशी हसू खेळू लागल्या. खेळण्याचा बहाणा करून कृष्णाने या स्त्रियांशी अंगलगटपणा करण्यासही कमी केले नाही. बरे, याची त्या स्त्रियांना काही मनाची लाज व जनाची लज्जाही तर वाटली नाहीच, उलट कृष्णावर आमचे प्रेम आहे असे त्या खुशाल सांगू लागल्या.

अशा तऱ्हेने या गोकुळात धर्माची व कुटुंबाची सर्व बंधने झुगारून देऊन अधर्म व अनीती बोकाळत असताना हे नंदराज, आपण मात्र सोयीस्करपणे डोळ्यावर कातडे पांघरून स्वस्थच बसून राहिलात. तुमच्या संमतीनेच कृष्णाची ही सर्व दुष्कृत्ये घडत आहेत. एवढेच नव्हे, तर तुमची कृष्णाला आतून फुसच आहे याची खात्री मनोमन सर्वांनाच पटलेली आहे. परंतु नाईलाजाने व तुमच्या भीतीने असहाय्य होऊन सर्वजण हातावर हात ठेवून स्वस्थ बसून आहेत. आज त्या सर्वांच्या दुःखाला माझ्या निमित्ताने वाचा फोडली जात आहे म्हणून त्या सर्वांनाही निश्चितच हायसे व जरा मोकळे वाटत असेल याची मला पक्की खात्री आहे.

हे नंदराज, या आपल्या सर्व दुष्कर्मांवरती कृष्णाने कळस चढवला तो माझ्या पत्नीशी म्हणजे राधेशी प्रेमाचे विशेष व घनिष्ठ संबंध जुळवून. माझ्याशी लग्न होऊन आलेल्या राधेच्या अज्ञानाचा व निरागसतेचा गैर फायदा कृष्णाने घेतला. अगदी पहिल्या दिवसापासून थट्टा मस्करीचा आधार घेऊन कृष्णाने राधेच्या मनावर जी आपली पकड बसविली ती पुढे कायमची वाढवतच ठेवली. माझ्या आईचा असलेला थोडासा विचित्र स्वभाव आणि माझा असलेला रागीट स्वभाव यांचा कृष्णाने राधेला वश करून घेण्यासाठी गैर उपयोग करून घेतला आणि राधेला पूर्णपणे आपल्या कह्यात घेतले. किती विश्वासाने व श्रद्धेने आम्ही राधेला तुमच्या वाड्यावर पाठवत होतो. पण त्या आमच्या विश्वासाला पूर्णपणे तडा गेला. तुमच्या व यशोदेच्या डोळ्यादेखत अगदी राजरोसपणे कृष्ण राधेशी प्रेमसंबंध वाढवीतच राहिला. माझ्या हे जेव्हा लक्षात आले तेव्हा मी मग राधेच्या येथे येण्यावर बंधने घातली. कारण अधोगती पासून व अधर्मापासून राधेला वाचवणे हे पती म्हणून माझे कर्तव्यच होते. परंतु कृष्ण व राधा यांच्यावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. उलट बाहेर चोरून भेटणे व आमच्या घरी कोणाच्या नकळत येऊन जाणे या गोष्टी कृष्णाने सुरू केल्या आणि राधेचेही त्याला पूर्ण सहकार्य व प्रतिसाद होता. या सर्व गोष्टी माझ्या कानावर येत होत्या. परंतु त्या गोष्टी राधा कबूल करीत नव्हती अणि कृष्ण तर ते कबूल करणे शक्यच नव्हते. त्यामुळे मला स्वस्थ बसणे भाग पडत होते.

हे नंदराज, आज मात्र माझ्या हातात पुरावा सापडलेला आहे. अचानकपणे, म्हणजे केवळ योगायोगानेच, राधेने अगदी जपून व लपवून ठेवलेली ही पत्रे माझ्या हातात पडली. ही पत्रे साधी पत्रे नसून राधा व कृष्ण यांनी एकमेकांना लिहिलेली ही प्रेमपत्रे आहेत. या पत्रातून त्यांचे जे प्रेम पाघळले आहे त्याची जेवढी निंदा करावी तेवढी कमीच आहे. त्यामध्ये त्यांनी परस्परांवरील प्रेमाला अगदी उघड उघडपणे जाहीर केलेले आहे. त्यात कुठलीही लाजलज्जा त्यांनी बाळगलेली नाही. निर्लज्जपणाचा हा तर कळसच आहे. 'माझा आवडता कृष्ण' काय, 'तुझी प्रिय राधा' काय, 'माझा प्रिय कृष्ण' काय, 'तुझीच राधा' काय, 'गोड प्रेमाचा अनुभव' काय, 'भेटीचा आनंद' काय, सर्व काही निलाजरेपणाने लिहिताना राधेला ना कसली खंत आणि ना कोणाची भीती. कृष्णाने तर त्याच्यावरही कडी केलेली आहे. 'प्रिय प्रिय राधे' काय, 'पुष्कळ पुष्कळ प्रेम' काय, 'तुझाच प्रिय कृष्ण' काय, कृष्णानेही राधेचे कौतुक करण्यात व आपले राधेवरील प्रेम व्यक्त करण्यात काहीही कमी केलेले नाही. त्यांच्या प्रेमसंबंधाचा आनंद तर कृष्णाने वारंवार व्यक्त केलेला आहे. या संबंधात कृष्णाचाच पुढाकार होता आणि त्यानेच राधेला फूस लावली हे तर उघडच आहे. त्यामुळेच राधेचे मन माझ्यापासून दूर झाले आणि ती माझ्यापासून दुरावली हे अगदी खरे आहे. त्यामुळे माझे व राधेचे वैवाहिक संबंध पूर्णपणे तर बिघडलेच, पण त्याचबरोबर मला वैयक्तिकरीत्याही अत्यंत मनस्ताप व मानहानीसुद्धा सहन करावी लागलेली आहे. माझे व्यक्तिगत व माझ्या कुटुंबाचे जे कायमचे नुकसान झालेले आहे ते कधीही भरून येणे शक्य नाही.

हे नंदराजा, तेव्हा आपण मला काय व कसा न्याय देणार ते सांगा. तुमच्या निःपक्षपातीपणाची आता खरी कसोटी आहे. कारण तुमच्यासाठी हे नाजुक जागेचे दुखणे आहे. तुमचा लाडका मुलगा कृष्ण हाच यातील खरा व एकमेव आरोपी आहे आणि त्याचा न्याय तुम्हांसच करावयाचा आहे. खरा न्याय मला मिळेल याची मला तरी जराही अपेक्षा नाही. परंतु

तरीही तुम्हाला एक संधी द्यावी असे मला वाटले म्हणून मी तुमच्याकडे आलो. तुमच्या न्यायाने माझे जर समाधान झाले नाही तर मी पुढील काहीही कृती करायला मोकळा आहे. मग मथुराधिपती कंस महाराजांकडेच थेट जाऊन त्यांच्याकडेच न्याय मागायलाही मी कमी करणार नाही हे मी आताच सांगून ठेवतो. कारण तुम्ही फक्त या गोकुळवाड्याचे मुख्य आहात, तर कंसमहाराज हे मथुरेच्या सर्व राज्याचे सम्राट आहेत हे विसरू नका. आपले गोकुळ हे त्यांच्या विशाल साम्राज्याचा केवळ एक भागच आहे हे लक्षात ठेवा. या सर्व पार्श्वभूमीवर मी तुमच्याकडून माझ्या तक्रारीच्या न्यायनिवाड्याची अपेक्षा करीत आहे. तरी त्वरित तुमचा निवाडा द्या म्हणजे मग मला पुढील कारवाईचा विचार करता येईल.''

हे लक्ष्मी, एखाद्या वर्षानुवर्षे साचलेल्या घाण पाण्याने अचानक वाट फुटून जोरदारपणे वाहू लागावे, तसेच बोलणे अनयाचे होत होते. कित्येक दिवसांपासून त्याच्या ठिकाणी राधेचा संशय व राग, आणि त्यातून निर्माण झालेला कृष्णाविषयीचा द्वेष, मत्सर ही सर्व घाण मनात नुसती साचूनच नव्हे, तर कुजूनच राहिलेली होती. काही निमित्ताने संधी मिळताच आता ती सर्व बांध फोडून बाहेर वाहत होती. त्याच्या त्या बोलण्याने आधी चकीत झालेला नंद पुढे पुढे मात्र अधिकाधिक गंभीर होत चालला. सर्वात महत्त्वाची एक गोष्ट त्याच्या लक्षात आली, की तेथे जमलेल्या गोकुळवासीयांपैकी कोणीही अनयाच्या म्हणण्याला विरोध वा नाराजी व्यक्त केली नव्हती. त्या सर्वांची जणू अनयाला मूक संमतीच आहे हे नंदाच्या लक्षात आले आणि त्यामुळे त्याच्या मनात अधिकच काळजी निर्माण झाली.

या सर्वांच्या मनाचे समाधान करणारा निवाडा करणे अत्यंत आवश्यक होते. म्हणून त्याने सर्वप्रथम अनयाच्या हातातील भूर्जपत्रांचा जुडगा आपल्या हातात घेतला आणि त्यावर लिहिलेला मजकूर नंद सावकाशीने वाचू लागला. त्या भूर्जपत्रावरील राधेचे व कृष्णाचेही लिखाण वाचता वाचता नंदाच्या गंभीर चेहऱ्यावरील नाराजी अगदी स्पष्टपणे दिसत होती. सर्वांच्या नजरा एकीएक नंदावरतीच खिळलेल्या होत्या आणि नंद आता काय बोलतो याकडे सर्वांचेच कान आतुरतेने लागून राहिलेले होते. खरे तर, नंदाचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता. कृष्णाकडून असे काही घडेल असा विचारही त्याच्या मनाला कधी शिवला नव्हता. परंतु आता प्रत्यक्ष पुरावाच नंदाच्या हातात आल्यामुळे नंदही थोडासा हादरलाच. परंतु महत् प्रयासाने त्याने स्वतःला सावरले आणि सावकाश पण ठाम सुरात तो अनयाशी बोलू लागला.

''हे अनया, तुझे दुःख मी पूर्णपणे समजू शकतो. तुझ्या मनाची होणारी व्यथाही मला समजत आहे. तुझ्या पत्नीचे मन दुसऱ्या कोणातरी पुरुषावर आहे याचा तुला बसलेला जबरदस्त धक्का अगदी साहजिकच आहे. खरे तर माझ्या मनालाही केवढा तरी धक्का बसलेला आहे. कृष्णाकडून अशा वागण्याची कधीही मीच काय, परंतु कोणीच अपेक्षा केली नव्हती. कृष्ण व राधा यांचे मैत्रीचे संबंध आपण पहिल्यापासूनच बघत आलो आहोत. अशी मैत्री काही वेळा कोणीही न सांगताच व न ठरवताच जुळत असते हेही आपल्याला ठाऊक आहे. त्यालाच आपण 'पूर्वजन्मीचे हे काहीतरी ऋणानुबंध आहेत' असेच म्हणतो व तसेच समजतही असतो. सुरुवातीला कृष्ण लहान आहे आणि राधा त्याच्यापेक्षा वयाने मोठी आहे याच दृष्टीने आपण त्यांच्याकडे पाहत होतो. त्यामुळे आपल्याला काय, कोणालाही त्यात काही गैर असे दिसलेही नव्हते

आणि वाटलेही नव्हते. परंतु पुढे जेव्हा कृष्ण थोडा मोठा झाला आणि त्याहीपेक्षा जास्त मोठा दिसू लागला, तेव्हा मात्र काहीजणांच्या डोळ्यात राधा व कृष्ण यांचे मैत्रीचे प्रेम सलू लागले आणि त्यांना ते गैर वाटू लागले. माझ्यासुद्धा ही गोष्ट निश्चितच लक्षात आली.

पण अनया, तुला खरे सांगतो की मला त्यात गैर असे काही कधीच वाटले नाही. परंतु एक गोष्ट माझ्या हळुहळू लक्षात येऊ लागली की राधेच्या ठिकाणी कृष्णाविषयी काही तरी वेगळी भावना आहे. याला कारण एखादे वेळेस असेही असू शकेल की कृष्णालाच राधेविषयी काहीतरी वेगळे वाटत असले पाहिजे. सकृत्दर्शनी असे जरी दिसले तरी आपण एक गोष्ट नेहमीच पाहत आलेलो आहोत, की कृष्णाच्या ठिकाणी असे वेगळे वाटणे सर्वांविषयीच आहे. त्याच्या ठिकाणी नेहमीच सर्वांविषयी आपलेपणा व प्रेम आहे. कृष्णाच्या ठिकाणी असलेला हा प्रेमगुण दैवीच आहे आणि तो मी त्याच्या ठिकाणी अगदी त्याच्या लहानपणापासून पाहत आलेलो आहे. कृष्ण हा सर्वसामान्य मुलगा नाही ही गोष्ट मात्र अगदी खरी आहे. त्याचे हे असामान्यत्व आपण सर्वांनी अनेक वेळा अनेक प्रसंगात अनुभवलेले आहे आणि त्याचा आपल्याला नेहमीच उपयोग झालेला आहे. फरक फक्त एवढाच आहे की आपण कृष्णाचे हे असामान्यत्व प्रसंग घडून गेला की विसरून जातो आणि राधा मात्र ते कधीच विसरत नाही. तर तिच्या ते कायमचे स्मरणात राहते.



हे अनया, याचा अर्थ असा नव्हे की मी राधा व कृष्ण यांच्या या प्रेमपत्रांचे समर्थन करीत आहे. माझ्या बोलण्यावरून तुझा तसा गैरसमज नक्कीच होईल. कारण मीच कृष्णाला लाडावून ठेवलेले आहे असा तुझा समज अगदी पक्का झालेला आहे. पण तुला योग्य न्याय देण्याचे जे मी आश्वासन दिलेले आहे, त्याचे पालन मी कोणत्याही परिस्थितीत करीनच करीन. परंतु त्या आधी प्रत्यक्ष

कृष्णाशी बोलणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते.  कारण प्रत्येक गोष्टीला अनेक बाजू असतात.  त्यामुळे केवळ एक बाजूच ऐकून घेऊन काही निर्णय घेणे हे अयोग्यच आहे.  कारण तो निर्णयच एकांगी असल्यामुळे अन्यायकारक ठरेल. त्यासाठी कृष्णाचे म्हणणेही ऐकून घेणे अत्यंत जरुरीचे आहे.  तेव्हा कृष्णालाच येथे बोलावून घेणे आणि आपण प्रत्यक्ष त्याच्याशीच बोलणे करणे हेच अधिक योग्य होईल.'' असे म्हणून नंदाने निरोप पाठवून कृष्णाला तेथे बोलावून घेतले.

कृष्ण खरे तर, नेहमीप्रमाणे आपल्या सवंगड्यांसह गाईगुरांना चरण्यासाठी घेऊन गोवर्धन पर्वताच्या पायथ्याजवळ गेलेला होता.  नंदाच्या एका सेवकाने 'नंदाने ताबडतोब वाड्यावर बोलावले असल्याचा' निरोप जेव्हा कृष्णाला जाऊन सांगितला, तेव्हा कृष्णालाही नवलच वाटले.  त्याच बरोबर कृष्णाच्या ठिकाणी काळजीही निर्माण झाली.  वाड्यावर सर्व कुशल आहे ना?  नंद व यशोदा यांना प्रकृतिस्वास्थ्य आहे ना? याची कृष्णाने प्रथम चौकशी केली.  त्या सर्वांची खुशाली जाणून घेतल्यावरच कृष्णाच्या मनाला स्वस्थता आली आणि तो त्वरेने नंदाच्या वाड्यावर जाऊन पोहोचला.  त्यावेळेस तेथे नंद, यशोदा आणि विशेषतः राधा व अनय यांच्यासह अनेक मंडळी जमलेली आहेत याचे त्याला आश्चर्यच वाटले.  सर्व प्रथम नंद व यशोदा यांना प्रणाम करून कृष्ण सर्वांकडे बघून अत्यंत प्रेमाने हसला.  नंतर अनय व राधा यांच्याकडे वळून बघत कृष्ण त्यांना म्हणाला,

''अरे अनया, अगं राधे, आज तुम्ही इकडे अचानक आणि तेही दोघे मिळून एकदम कसे काय आलात बुवा?  काही विशेष गोष्ट घडली आहे, की काही खास बातमी सांगण्यासाठी म्हणून तुम्ही येथे आलेला आहात?  तुम्हा उभयतांचे चेहरेही जरा गंभीरच दिसत आहेत.  काळजी करण्यासारखे काही घडलेले नाही ना?  म्हाळसा काकूंची तब्येत तर ठीक आहे ना? आणि होय, अगं यशोदा माई, अनय व राधा यांना काही दिलेस की नाही?  आजच सकाळी आपल्याकडे ताजा खरवस केलेला होता.  सकाळी तू जेव्हा मला दिलास ना, तेव्हा मला राधेची एवढी आठवण आली होती म्हणून सांगू की 'आज राधा येथे येईल तर बरे' असेच मला वाटत होते.  अगं माई, आज तू पुरणपोळ्याही करण्याचे ठरवले होतेस, तेव्हाच मी ठरवले होते की त्या पुरणपोळ्या स्वतः अनयाच्या घरी घेऊन जाऊन त्यांना द्यायच्या म्हणून.  पण अचानक या दोघांचेच येथे येणे झाले हे मात्र चांगले झाले.  तेवढाच माझा त्यांच्या घरी जाण्याचा त्रास वाचला.  ही आपली गंमत हं!  कारण मला अनयाच्या घरी जाऊन राधेला भेटणे हे कधीच त्रासाचे वाटले नाही.  मला त्यात कधीही परकेपणा असा जाणवलाच नाही. बरे, ते असू दे.  नुसती खरवस व पुरणपोळी या पदार्थांची नावे घेऊन काय होणार आहे?  प्रत्यक्ष ते समोर यायला नकोत का?  आणि तो खरवस व ती पुरणपोळी आपणहून कशी काय येथे येणार बुवा?  त्यांना काय पाय थोडेच फुटणार आहेत की ते येथे चालत येतील.  कोणीतरी त्या पदार्थांना येथे आणले तर पाहिजे ना?  आणि तो कोणीतरी म्हणजे कोण? मीच!''

असे म्हणून हसत हसत कृष्ण आतमध्ये गेला.  थोड्याच वेळात एका ताटात काही पुरणपोळ्या त्याच्यावरील साजूक तुपासह आणि एका भांड्यात भरपूर खरवस घेऊन बाहेर आला.  कृष्णाने मोठ्या प्रेमाने आपल्या हातातील

पुरणपोळ्यांचे ताट राधेच्या हातात दिले आणि खरवसाचे भांडे अनयाच्या हातात ठेवले. एवढा वेळ मनातून अस्वस्थ व अशांत असलेल्या आणि बाहेरून प्रयत्नपूर्वक शांत बसलेल्या अनयाच्या रागाचा स्फोटच झाला. आपल्या हातातील खरवसाचे भांडे अनयाने रागाने भिरकावून फेकून दिले आणि कृष्णाकडे तुच्छतेने बघत नंदाला म्हणाला,

''हे नंदराज, मी येथे खरवस खाण्यासाठी किंवा कृष्णाची ही प्रेमाची नाटके बघण्यासाठी आलेलो नाही. माझ्यावरती अन्याय झालेला आहे आणि न्याय मिळावा म्हणूनच केवळ मी तुमच्याकडे येथे आलेलो आहे. मला तर वाटते कृष्णाला मी येथे कशासाठी आलेलो आहे याची कल्पना आलेली दिसते. म्हणूनच हा कृष्ण केवळ आपले वाईट कृत्य झाकण्यासाठीच हा सर्व प्रेमाचा देखावा करीत आहे. परंतु आता आम्ही या ढोंगबाजीला मुळीच भुलणार नाही हे कृष्णाने पक्के लक्षात ठेवावे. तेव्हा हे नंदराज, मला आपण न्याय देऊन माझ्यावरील अन्याय दूर करणार की नाही एवढेच त्वरित सांगावे. म्हणजे त्याप्रमाणे पुढील निर्णय घेण्यास मी मोकळा होईन. न्याय मिळेल अशी आशा खरे तर मला मुळीच वाटत नाही. परंतु केवळ एक संधी मी तुम्हाला देत आहे. तरीही आपला निर्णय व निवाडा ताबडतोब करावा.''

अनयाच्या बोलण्यातील वेगळा सूर हा विचित्र आहे हे कृष्णाच्या लक्षात आले आणि त्याने नंदाकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. नंदही थोडा वेळ कृष्णाशी काय व कसे बोलावे या संभ्रमात पडला. नंद काहीच बोलत नाही हे पाहून कृष्णाने स्वतःच अनयाशी बोलायला सुरुवात केली.

''अरे अनया, तू हे काय बोलत आहेस? माझे तात नंदराज, यांच्या सारखा राज्यप्रमुख असताना या गोकुळात कोणी कोणावर अन्याय करणे शक्य तरी आहे का? कोणावरही कदापिही अन्याय होणे शक्यच नाही. त्यातून तुझ्यावर जर कोणी अन्याय केला असेल, तर त्या व्यक्तीचे नाव व त्याने केलेली अन्यायकारक कृती खुशाल अगदी मोकळेपणाने नंद महाराजांना सांग. कुठल्याही परिस्थितीत तुला योग्य तो न्याय दिल्याशिवाय ते राहणार नाहीत याची निश्चितपणे खात्री बाळग. अनया, परंतु तुला एक गोष्ट मी अत्यंत प्रेमाने सांगतो की मी तुला प्रेमाने दिलेला खरवस तू रागाच्या भरात फेकून दिलास हे काही चांगले केले नाहीस. तुला जर काही कारणाने माझा राग आला असेल तरी सुद्धा तो राग त्या खरवसावर काढणे योग्य नाही. अरे, खरवस हा तर आपल्या गोकुळचा प्रसाद आहे. हे तू कसे विसरलास? त्या प्रसादाला तू झिडकारून फेकून दिलेस म्हणजे त्या खरवसावरतीच अन्याय झाल्यासारखे झाले नाही का?''

कृष्णाचे शेवटचे वाक्य संपायच्या आतच आणि कृष्णाचे बोलणे पूर्णपणे ऐकण्याच्या आधीच अनय रागाने उसळून कृष्णाला म्हणाला, ''अरे कृष्णा, न्याय व अन्याय या विषयी तुझ्याकडून काहीही ऐकण्याची माझी इच्छा नाही. कारण त्या विषयांवर बोलण्याचा तुला तर काहीच अधिकार नाही. नंद महाराजांच्या न्याय प्रियतेविषयी तू कितीही कौतुकाने जरी बोललास तरी ते सर्व बोलणे खोटे आहे. कारण त्यांच्याच नजरेखाली घडत असलेला अन्याय त्यांना मोहाने आंधळे केलेले असल्यामुळे दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच तर गोकुळातील स्त्रियांना तू तुझ्या नादी लावून अर्धमाला प्रवृत्त करीत होतास हे दिसत व माहीत असूनही, नंदराजाने तिकडे जाणुन बुजून डोळेझाक केली हे तर सर्वांनाच माहीत आहे.

इतरांशी माझे काही देणे घेणे नाही. त्यांच्याशी मला काहीच कर्तव्य नाही. परंतु जेव्हा ही गोष्ट माझ्या पत्नीच्या, राधेच्या बाबतीत घडली तेव्हा मात्र मी स्वस्थ बसू शकत नाही आणि बसणारही नाही हे लक्षात ठेव. तेव्हा माझ्यावर अन्याय करणारी व्यक्ती तूच आहेस. होय, कृष्णा, नंद व यशोदेने अत्यंत लाडाने डोक्यावर चढवून ठेवलेल्या आणि स्वतःला अत्यंत शहाणा समजणाऱ्या तूच माझ्यावर अन्याय केलेला आहेस. राधेने तुला व तू राधेला लिहिलेली ही प्रेमपत्रे हाच त्याचा धडधडीत पुरावा आहे.

अहो नंदराज, विवाह झाल्यानंतर राधेला प्रथम भेटीसाठी मी आपल्याकडे घेऊन आलो तेव्हाच या कृष्णाने राधेची छेडछाड काढली होती हे माझ्या अजूनही लक्षात आहे. परंतु त्यावेळेस कृष्ण लहान आहे आणि गंमत करण्याचा त्याचा स्वभाव आहे असे समजून मी त्याकडे दुर्लक्ष केले. त्या नंतरही मोठ्या विश्वासाने मी राधेला तुमच्या वाड्यावर पाठवीत आलो. त्या विश्वासाचाच नेमका गैरफायदा कृष्णाने घेतला आणि तो राधेशी सलगी वाढवीत राहिला. राधेला प्रेमाच्या मोठमोठ्या गप्पा सांगून फसवीत राहिला आणि राधाही वेड्यासारखी कृष्णाच्या त्या गप्पांना भुलत राहिली. आपण काही तरी जगावेगळी व दिव्य गोष्ट करीत आहोत अशा भ्रामक समजुतीने राधाही कृष्णाच्या मोहात पडली आणि कृष्णाला पूर्णपणे वश झाली. स्वतःचे मन व स्वतःची बुद्धी म्हणून तिला काहीही राहिलीच नाही. मग घरच्यांचे व दुसऱ्या कोणाचेही सांगणे ऐकणे हे राधेच्या बाबतीत शक्यच नव्हते.

हे नंदराज, या सर्व गोष्टी हळु हळू इतरांकडून माझ्या कानावर येत होत्या. परंतु मी त्याकडे 'कृष्ण अजून लहान आहे व थोडासा खोडकर आहे' अशा समजुतीने दुर्लक्ष केले. तीच माझी मोठी चूक झाली आणि तीच चूक मला आता भोवत आहे. त्यानंतर माझ्या आईने सुद्धा मला सावध करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचीही दखल तेवढ्या गंभीरतेने काही मी घेतली नाही आणि त्यामुळे राधा व कृष्ण यांच्यातील गैर प्रकार वाढतच राहिले. शेवटी मलाही ते जाणवू लागले तेव्हा मात्र मग मी राधेच्या जाण्यायेण्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा परिणाम मात्र अगदी उलटाच झाला. राधा व कृष्ण यांनी बाहेरच एकमेकांना भेटण्यास सुरुवात केली. प्रथम प्रथम ते चोरून भेटत असत. पण नंतर तर अगदी राजरोसपणे ते एकमेकांना भेटतच राहिले.

सर्वात नवलाईची गोष्ट म्हणजे नंदराज, तुम्ही तर या गोष्टींना आळा घालायचा कधी प्रयत्नच केला नाहीत. कृष्णाला आवर घालण्याची जबाबदारी केवळ तुमची आणि तुमचीच होती. ती जबाबदारी तर तुम्ही टाळलीतच, उलट कृष्णाचे नेहमी कौतुक करून त्याला प्रोत्साहनच देत आलात. त्याची परिणती म्हणजे कृष्णाचे आणि त्याच्यामुळे राधेचे साहस अधिकच वाढले. म्हणूनच तर राधा कृष्णाला ही अशी प्रेमपत्रे पाठवू शकली आणि त्यावर कृष्णही राधेला कौतुकाने प्रतिसाद देऊ शकला. हे धाडस करताना त्या उभयतांना ना आपल्या कुटुंबीयांची भीती वाटली, ना समाजाची भीड पडली. कृष्णाच्या या वागण्या बोलण्याला राधा तर एवढी फशी पडली की आमचा संसार अशाने विस्कटेल याचीही पर्वा वा भीती तिला वाटली नाही. परंतु माझा संसार मला सांभाळायचा आहे. त्याची अशी मोड तोड मी कधीही होऊ देणार नाही.

तेव्हा हे नंदराजा, माझ्यावर या कृष्णाने जाणुन बुजून अन्याय केलेला आहे. त्याला तो लहान व अज्ञानी आहे असे म्हणून संशयाचा फायदा अजिबात देता येणार नाही. कारण मुळात कृष्णच स्वतःला अत्यंत ज्ञानी व मोठा समजत असतो. त्यामुळे त्याच्याकडे भरपूर शहाणपणही आहे. ते त्याचे त्याला व तुम्हालाच लखलाभ होवो. मला त्याची काडीमात्र जरुरी नाही. मला फक्त तुमच्याकडून न्याय हवा आहे. बस्स्. दुसरे काहीही नको. अर्थात तो न्याय मिळण्याची शक्यताही मला मुळीच वाटत नाही.''

अनयाचा बोलण्याचा भर कधी ओसरेल असे वाटतच नव्हते. त्याचा बोलण्याचा वेग व आवेग एवढा होता की त्याचे शब्दोच्चार व वाक्यरचनाही वारंवार चुकत होत्या. एवढेच नव्हे, तर काही वेळेला तर तो आधी बोललेलाच विषय पुन्हा पुन्हा नवीन सांगितल्या सारखा बोलत होता. अनयाचे बोलणे सुरू असतानाच कृष्णाला अनयाच्या रागाचे कारण त्याच्या बोलण्यातूनच कळले होते. पत्रांचा उल्लेख आल्यावर त्याने प्रथम नंदाच्या हातातील पत्रांच्या जुडग्याकडे पाहिले आणि लगेचच नजरेचा दुसरा कटाक्ष राधेकडे टाकला. एवढा वेळ अधोमुख करून शांत बसलेल्या राधेनेही कृष्णाकडे नजर वर करून क्षणभरच पाहिले. त्या एका क्षणाच्या नजर भेटीतच राधा व कृष्ण यांना एकमेकांच्या अंतरीचे भाव लगेचच कळले.

कृष्णाने आधी सावध केलेले असूनही राधेने ती पत्रे भावनेच्या भरात सांभाळून ठेवली होती. कृष्णाचे न ऐकल्यामुळे हा कठीण प्रसंग ओढवलेला होता हे जाणून राधेच्या ठिकाणी असलेली अपराध भावना राधेच्या नजरेत तर सहजपणे होतीच. परंतु तरीही राधेच्या नजरेत भीती व घाबरटपणाचा लवलेशही नव्हता. तिच्याकडून अनवधानाने का होईना, पण घडलेल्या चुकीच्या परिणामांना तोंड देण्याचे धैर्य तिच्या ठिकाणी होते. म्हणून जराही न डगमगता ती शांत होती खरी, परंतु पुढील गोष्टी आता काय व कशा घडणार याची काळजीही तिच्या मनात निर्माण झालेली होतीच. परंतु कृष्णाविषयीचे अलोट प्रेम व अपार श्रद्धा जराही कमी न होता ती कायमच होती. कृष्णाच्या माहात्म्याविषयीचा राधेचा निश्चयही अत्यंत दृढ होता आणि कृष्णावरील तिचा विश्वासही अचल होता. त्यामुळे राधेचा तिच्या ठायीचा आत्मविश्वास पूर्णपणे होता.

इकडे कृष्णाचीही अवस्था राधेसारखीच झालेली होती. राधेची अगतिकता लक्षात आल्यामुळे कृष्णालाही अत्यंत वाईटच वाटत होते. अनयाच्या बोलण्यातून वारंवार राधेच्या वागण्यावर व चारित्र्यावर उडवले जात असलेले शिंतोडे कृष्णाच्या मनालाही व्यथित करीत होते. आलेल्या प्रसंगाला धैर्याने व थोड्याशा युक्तीनेच सामोरे जाणे आवश्यक आहे हे तर कृष्णाच्या लक्षात आलेच होते. पुढे काय व कसे घडणार आहे हे त्यालाही माहीत नव्हतेच. परंतु आपली भूमिका पक्केपणाने धरून ठेवूनच आलेल्या प्रसंगातून आपण योग्य मार्ग काढून पार पडणार याचीही त्याला खात्री होती. कृष्णाच्या नजरेतील तो विश्वासाचा व आत्मविश्वासाचा भाव राधेला कळला. कृष्णाच्या नजरेतूनच तो भाव राधेपर्यंत पोहोचला आणि तिचा आत्मविश्वास दुणावला. तिचे मन मोकळे झाले आणि तिच्या मनावर आलेला थोडासा ताणही पूर्णपणे दूर झाला.

अनयाचे बोलणे थांबून बराच वेळ झाला तरी कोणीही बोलतच नव्हते. नंद स्वस्थ राहून कृष्णाकडे अपेक्षेने पाहत होता. तर कृष्ण शांतपणाने स्वस्थ राहिला होता. पण अनय मात्र स्वस्थ बसूनही अस्वस्थच होता. कृष्णाच्या स्वस्थ

राहण्याने अनयाची अस्वस्थता अधिकच वाढली. शेवटी ती अस्वस्थता असह्य होऊन अनयच पुन्हा रागाने चिडून बोलू लागला.

''हे नंदराज, मला वाटते कृष्णाचे स्वस्थ राहणेच सर्व काही सांगून रहात आहे. आपल्या कृत्यांचे कोणतेही समर्थन कृष्णाकडे नसल्यामुळेच तो गप्प बसून राहिलेला आहे. कोणताही खुलासा व स्पष्टीकरण करणे कृष्णाला अशक्य होत आहे. कारण आपल्या दुष्कृत्यांची जाणीव कृष्णाला आतल्या आत पूर्णपणे असणारच. तेव्हा कृष्णाचे मौन ही त्याच्या अपराधाची कबुलीच आहे असेच आपण समजावयास हवे. तसे गृहीत धरूनच आपण आपला निवाडा त्वरित सांगावा. म्हणजे मीही त्याप्रमाणे पुढील कृती करण्यास मोकळा होईन.''

अनयाने जाणून बुजून केलेले हे लागट बोलणे ऐकून नंदराजही अस्वस्थ झाला. कृष्णाच्या न बोलण्याचे कारण नंदालाही कळेचना. म्हणून त्याने कृष्णाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले आणि तो कृष्णाला काही विचारणार एवढ्यात कृष्णानेच आपणहून बोलण्यास सुरुवात केली.

''हे तात, मला एक गोष्ट आपल्याला नम्रपणे व स्पष्टपणे सांगावयाची आहे. माझ्या स्वस्थ राहण्याचा कितीही विपरीत अर्थ अनयाने जाणून बुजून काढला तरी एक गोष्ट निश्चित आहे, की मला माझ्या कोणत्याही वागण्याचे व बोलण्याचे समर्थन करण्याचे कारणच नाही. तसा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. कारण मुळात माझ्याकडून कोणताही अपराधच घडलेला नाही. अनयाने या पत्रांच्या संबंधात जरी बराच कांगावा केलेला असला तरी तो पूर्णपणे पोकळ आहे. आणि जेथे पोकळपणा असतो तेथे साहजिकच आवाज हा जास्त मोठाच असतो. माझ्या स्वस्थ बसण्याचे कारण एवढेच होते, की माझ्या बोलण्याचा अनयावर काहीही परिणाम झालाच नसता. ज्याचे मन मोकळे असते त्यालाच समजावून सांगता येते. परंतु अनयासारखी ज्यांची मने पूर्वग्रहाने दूषित असतात त्यांना काही सांगणे म्हणजे एखाद्या दगडावर डोके आपटून घेण्यासारखेच आहे आणि मला तशी हौस अजिबात नाही. परंतु तात, तुमचे मन मोकळे आहे आणि तुम्ही विचारत आहात हे मी जाणून आहे. म्हणूनच आपल्याशी मोकळेपणाने व स्पष्टपणाने बोलण्याचे धाडस मी करीत आहे.

हे तात, मुळामध्ये या पत्र लिखाणाचा उगाचच जास्त बाऊ करण्यात येत आहे. पत्र हे एकमेकांविषयीच्या भावना व्यक्त करण्याचे केवळ माध्यम आहे. दोन व्यक्ती जेव्हा एकमेकांना भेटू शकत नाहीत किंवा भेटूनही एकमेकांशी बोलू शकत नाहीत, तेव्हाच परस्परांना काहीतरी सांगण्यासाठी व बोलण्यासाठी पत्र या माध्यमाचा उपयोग केला जातो. पत्र हे कोणत्याही नात्या संबंधात कोणालाही लिहिले जाऊ शकते. राधेने लिहिलेल्या पत्रांतील लिखाण किंवा त्या पत्रांवर मी केलेले लिखाण नीट व काळजीपूर्वक वाचले तरच एक गोष्ट कोणाच्याही सहजपणे लक्षात येईल, की त्या लिखाणात कोणताही गैर मजकूर लिहिलेला नाही. राधेने ना कोणाविषयी तक्रार केलेली आहे किंवा ना कोणाची निंदा तिच्या लिखाणात केलेली आहे. माझ्या लिखाणातही दुसऱ्या कोणाविषयी काहीही लिहिलेले नाही.

राधेने तिच्या मनातील माझ्याविषयीच्या व्यक्तिगत भावना आणि तिला जाणवणारे माझे माहात्म्य या पत्रांद्वारे मला कळीत केलेले आहे. बऱ्याच वेळा तर तिने आमच्या पूर्वी झालेल्या भेटीत मी तिला जे काही ईश्वराचे, त्याच्या प्रेमाचे व त्याच्या भक्तिचे माहात्म्य सांगितले आहे तेच तिच्या समजुतीनुसार व तिच्या शब्दांत लिहून मला कळविले आहे. त्या पत्रांवरील मी केलेल्या लिखाणातही राधेच्या लिखाणाचे, तिने प्रगट केलेल्या विचारांचे आणि तिच्या माझ्यावरील प्रेमाचे व श्रद्धेचे कौतुक केलेले आहे. काहीवेळा राधेच्या झालेल्या समजुती तिला अधिक योग्यप्रकारे समजावून सांगितलेल्या आहेत. तेव्हा या पत्रातील लिहिलेल्या मजकुराकडे दुर्लक्ष करून किंवा तो जाणून बुजून डावलून या पत्रांचा निषेध करणे हे अत्यंत चुकीचेच आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या पत्रांमध्ये कुठेही कोणत्याही प्रकारचे अश्लील लिखाण नाही की ज्यामुळे या पत्रांचा धिक्कार करावा. अर्थात केवळ प्रेम या शब्दाचा वारंवार उल्लेख आलेला आहे म्हणून त्या पत्रांना दोष द्यायचा असेल, तर खरा दोष ती पत्रे वाचणाऱ्यांच्या दूषित मनाचा आहे. ज्यांची स्वतःची मने शुद्ध व स्वच्छ आहेत त्या कोणालाही या पत्रांमध्ये काहीही गैर आढळणे केव्हाही शक्यच नाही. आता या पत्रांमध्ये राधेने माझा किंवा मी राधेचा उल्लेख करताना ‘माझा आवडता’, ‘माझी आवडती’ किंवा ‘माझी प्रिय’ असे उल्लेख केल्याबद्दल अनयाचा जो आक्षेप आहे तो त्याच्या कोत्या मनोवृत्तीचाच निदर्शक आहे. कोणत्याही नात्या संबंधात म्हणजे आई-मुलगा, बहीण-भाऊ, वडील-मुलगी अशा संबंधामध्ये एकमेकांच्यात असा पत्र व्यवहार घडू शकतो. अशा नात्यांत व अशा पत्रामध्ये ‘आवडता’ व ‘प्रिय’ अशासारखे उल्लेख सहजपणे येतात. त्या वेळेस कोणालाच त्यात काही चुकीचे व आक्षेपार्ह असे मुळीच वाटत नाही. कारण त्यामधून एकमेकांविषयीचा आपलेपणाच व्यक्त होत असतो. मग आमच्यामध्ये असा पत्र व्यवहार घडला आणि त्यामध्ये ‘आवडता’ व ‘प्रिय’ अशा सारखे उल्लेख आले तर त्यामध्ये एवढा गहजब करण्याचे काय कारण आहे?’’

कृष्णाचे बोलणे मध्येच थांबवीत अनय मोठ्या आवाजात ओरडून म्हणाला, ‘‘कारण आहे, कृष्णा, कारण आहे. तू ज्या ज्या नात्यांचा उल्लेख केलास ती नाती कौटुंबिक आहेत. त्यांचे संबंध व त्यांच्यामधील होणारा कोणताही व्यवहार हा नात्याच्या आपलेपणातून होत असतो. तो अत्यंत साहजिक व नैसर्गिक असतो. त्यांच्या संबंधातील आपलेपणा व प्रेम हे नात्यामुळे असते आणि म्हणूनच ते सर्वमान्य आहे. पण ज्यांचे आपापसात काही नातेच नाही, त्यांचे आपापसात काही संबंध हे तर केवळ चुकीचेच नव्हे, तर अत्यंत गैरच आहेत. कृष्णा, मगाच पासून तू अतिशय चातुर्याने बोलत आहेस ज्याच्यासाठी तू अगदी प्रसिद्ध आहेस. परंतु एक गोष्ट लक्षात ठेव, तुझ्या अशा बोलण्याने तू भोळ्या भाबड्या व्यक्तींना फसवू शकशील, जे तू नेहमीच करीत आला आहेस म्हणा, परंतु माझ्या सारख्यांना तुला कधीच फसवता येणार नाही.’’

अनयाचे बोलणे संपता संपताच कृष्ण शांतपणे म्हणाला, ‘‘अरे अनया, प्रश्न भोळे व भाबडेपणाचा किंवा शहाणपणाचा नाहीच आहे मुळी. प्रश्न आहे तो मनाच्या मोकळेपणाचा आणि दुसऱ्याचे म्हणणे नीटपणे ऐकून समजून घेण्याचा. परंतु जेथे मोकळेपणा नाही आणि मनाचा घट्टपणा आहे, तेथे केवळ आपल्यालाच सर्व काही समजले आणि

आपल्याला जे समजते तेच अंतिम आहे असा हट्टीपणा निर्माण होतो.  अश मनाच्या हट्टी व स्वतःला शहाणे समजणाऱ्यांना कोणी फसवावे लागतच नाही.  कारण ते स्वतः स्वतःमध्येच फसून राहिलेले असतात.

हे अनया, मगाशी तू अनेक कौटुंबिक नात्यांचा उल्लेख केलास.  आणखीनही अनेक कौटुंबिक नाती असू शकतील. परंतु तू एक गोष्ट विसरलास की ही नाती काही परमेश्वराने निर्माण केलेली नाहीत.  परमेश्वराने फक्त असंख्य जीव निर्माण केलेले आहेत आणि त्या प्रत्येक जिवाचे नाते मुळात परमेश्वराशी आहे.  सर्व जीव त्या परमेश्वराशी जोडलेले आहेत हे सत्य आहे.  आणि म्हणून त्या जीवांचेसुद्धा आपापसात जे नाते आहे ते केवळ परमेश्वरी आहे.  त्या परमेश्वरी नात्याचाच आपलेपणा सर्व जीवांच्यामध्ये सहजपणे आहे.  सर्व जीवांचा थेट संबंध त्या परमेश्वराशी आहे आणि म्हणून त्या जीवांचा संबंध आपापसातही त्याच परमेश्वरी नात्याने आहे.

मनुष्यांनी आपल्या सोयीसाठी भावनेने आई-वडील, भाऊ-बहीण, पती-पत्नी अशी अनेक कौटुंबिक नाती निर्माण केली.  कारण या नात्यांच्या आधाराने आपले जीवन जगणे सुसह्य व स्वास्थ्याचे व्हावे अशी अपेक्षा धरून ही व्यवस्था सर्व सामान्य जनांनी केली.  त्यातूनच मग कौटुंबिक व सामाजिक बंधनेही निर्माण झाली.  अर्थात ही नाती व बंधने अत्यंत आवश्यकच आहेत, नाहीतर सामान्य जीव अज्ञानाने, विषयसुखाने व मोहाने कुठेतरी भरकटत जाईल आणि त्याची अधोगती होईल.  परंतु या सर्वांमध्ये अज्ञानी जीव आपले परमेश्वराशी असलेले मूळ नातेसंबंध पूर्णपणाने विसरला आणि जगण्याच्या सोयीसाठी निर्माण केलेली कौटुंबिक नातीच खरी व अंतिम मानू लागला.  या नात्यांमध्ये जीव स्वतः तर अज्ञानाने जखडून राहिलाच, परंतु इतरांनाही त्याने या नात्यांमध्ये जबरदस्तीने अडकवून ठेवले.  असे जीव स्वतःही अनन्वित दुःखे अनुभवतात आणि दुसऱ्यांनाही दुःख द्यायला कारणीभूत होतात.

अरे अनया, तसे पाहिले तर तुझे नि आमचे तरी काय नाते आहे?  काहीच नाही ना?  पण तरीही तुझे नि आमचे आपलेपणाचे संबंध आहेतच की नाहीत?  का आहेत बरे ते?  याचा तू कधी विचार केलास काय?  किती प्रेमाने तू आमच्या वाड्यावर वर्षानुवर्षे येत आहेस?  केवळ नंदराजाकडे म्हणून किंवा फक्त कामासाठी म्हणून तू निश्चितच येथे येत नाहीस हे तर खरे आहे ना?  माझ्या अगदी लहानपणापासून मी तुला येथे पाहत आहे.  त्यावेळेस तू प्रेमाने केलेले लाड व माझे कौतुक मला तर अजूनही आठवत आहे.  माई व तात यांच्याशी तू ज्या घरोब्याच्या नात्याने वागत असतोस ते नाते कोणते बरे? कौटुंबिक तर नाहीच, मग कोणते?  तात व माईसुद्धा तुला अत्यंत आपलेपणाने अगदी घरच्या सारखे वागवीत असतात.  मग हे संबंध कुठल्या नात्यामुळे?  अरे अनया, या आपलेपणाला व याच प्रेमाला परमेश्वरी ऋणानुबंध असे म्हणतात.  याची जाणीव सर्वांनाच नसते हे खरे आहे.  परंतु ज्या एखाद्या भाग्यवंताला या संबंधाची जाणीव असते तोच या संबंधातील प्रेमाचा अनुभव घेत असतो.  माझ्या ठिकाणी या संबंधाची जाणीव आहे आणि तीच जाणीव मी सर्वांना करून देत असतो.

अनया, एक गोष्ट लक्षात ठेव की कौटुंबिक नात्यातील संबंध कमी पडतात.  त्यामध्ये दुरावा, गैरसमज वगैरे वारंवार निर्माण होतात.  परंतु परमेश्वराच्या अस्तित्वाच्या जाणिवेने निर्माण झालेले संबंध हेच नेहमी कायम असतात.  या जगांतील

कोणतीही गोष्ट वा व्यक्ती त्या संबंधांना बाधित करू शकत नाही.  कारण ते संबंध केवळ बाह्यांगाचे नसतात, तर आंतरिक असतात.  म्हणून त्यामध्ये बाह्य घडणाऱ्या गोष्टींचा अडथळा निर्माण होऊच शकत नाही.  आताच बघ ना.  तू माझ्यावर केवढातरी रागावलेला आहेस.  पण माझे तुझ्यावरील प्रेम कायमच आहे.  रागामुळे तुला जे मानसिक क्लेश होत आहेत ते बघून मला तर अत्यंत वाईटच वाटत आहे.  एवढेच नव्हे, तर मला पक्की खात्री आहे की थोड्या वेळाने तुला आलेला माझा रागही शांत होईल आणि पुन्हा तुझ्या ठिकाणचे माझ्याविषयीचे प्रेम जागे होईल.  पुन्हा तू माझ्याकडे बघून प्रेमाने हसशील आणि आपण दोघे मिळून 'गोकुळचा प्रसाद' असलेला हा खरवस सेवन करू.  अनया, त्या आधी तू थोडे जल प्राशन करशील तर बरे होईल.  कारण मगाच पासून मोठमोठ्याने बोलल्यामुळे तुझा घसा तर नक्कीच सुकलेला असणार. जोरजोराने बोलल्यामुळे तुला थकवाही आलेला मला दिसत आहे.  तेव्हा थोडे जल प्राशन कर आणि ताजातवाना हो बघू.''

कृष्णाचे बोलणे ऐकून अनयासह सर्वजण स्तब्धच झाले.  अनयाच्या चेहऱ्यावरील भाव बदलल्यासारखे दिसून थोडेसे सौम्य झाल्यासारखे वाटले.  परंतु क्षणातच अनयाचा चेहरा पुन्हा लाल झाला.  त्याच्या मनातील राग पुन्हा उफाळून वर आला आणि उच्च रवाने प्रगट होऊ लागला.

''कृष्णा, आता मला कळले की सर्वांना गोड गोड बोलून तू कसे भुलवतोस ते.  अरे, तुझ्या बोलण्याने माझ्याही मनाला थोडा वेळ भुरळच पडली.  परंतु सुदैवाने माझी बुद्धी शाबूत असल्यामुळे मी सावध झालो.  त्यामुळे मी काही तुझ्या अशा बोलण्याला फसणे शक्य नाही हे पुरते लक्षात ठेव.  आणखीन एक गोष्ट तुला मी सांगतो ती नीटपणे ध्यानात ठेव. मलाही सर्व ज्ञान आहे.  सर्वकाही तुलाच समजते असा आव तू आणू नकोस.  परमेश्वराचे अस्तित्व, त्याची सत्ता आणि त्याच्याशी असलेले नाते वगैरे गोष्टी मलाही ठाऊक आहेत.  परंतु हे सर्व तत्त्वज्ञान झाले.  प्रत्यक्ष जीवनाशी त्याचा काहीही संबंध नाही आणि प्रत्यक्ष जीवनात तर त्याचा काहीच उपयोग नाही.  असले ज्ञान फक्त बोलायला व वाचायलाच ठीक असते हे मी जाणून आहे.  तेव्हा हे तुझे ज्ञान तू तुझ्यापाशीच ठेव.  त्या ज्ञानाच्या कितीही गप्पा मारल्या तरी त्या काही कामाच्या नाहीत.

कृष्णा, तू जे आपलेपणा संबंधी सांगत होतास ते मात्र खरे आहे.  नंद व यशोदा यांनी मला अत्यंत आपलेपणाने वागवले आहे ही गोष्ट खरीच आहे.  त्यामुळे मीही त्यांच्याशी नेहमीच आपलेपणाने वागलो आहे.  परंतु त्यामध्ये आपलेपणा या नावाखाली मी कोणतीही मर्यादा कधी ओलांडलेली नाही.  त्या उभयतांचा मी नेहमीच मान राखीत आलेलो आहे. कृष्णा, तसा मला तुझ्या विषयीसुद्धा तू लहान असताना आपलेपणा होता.  तुझ्या खोडकर व खट्याळपणाचेही मला सुरुवातीला एक प्रकारचे कौतुकच वाटत असे.  परंतु पुढे पुढे जेव्हा तुझ्याकडून आपलेपणा व मोकळेपणा या नावाखाली स्त्रियांशी वाह्यातपणाचे वागणे सुरू झाले तेव्हाच मी सावध झालो.  आणि त्यानंतर तू माझ्या पत्नीला म्हणजे राधेलाच जेव्हा आपल्या या खोट्या प्रेमाच्या जाळ्यात पकडलेस तेव्हा मात्र मी निश्चितच त्याला खंबीरपणे विरोध करावयास सुरुवात

केली.  आम्हा पती-पत्नीमध्ये फूट पाडण्याचा तुझा डाव मी ओळखला आणि तो यशस्वी न होऊ देण्याचा निश्चय केला. परंतु दुर्दैवाने खुद्द राधेचीच तुला साथ असल्यामुळे माझा काही इलाजच चालेना.

कृष्णा, तुझ्या ठिकाणी माझ्याविषयी जर खरेच आपलेपणा असता तर तू तो माझ्या पुरताच मर्यादित ठेवायला हवा होतास.  माझ्या पत्नीविषयी तुला आपलेपणा असण्याचे काहीच कारण नाही.  तिची काळजी घेण्यासाठी मी पूर्ण समर्थ आहे.  राधेचा नवरा या नात्याने ते माझे कर्तव्यकर्मच आहे आणि ते मी नेहमीच चोखपणे पार पाडत असतो.  माझ्या घरात राधेला काहीही कमी नाही.  सर्व सुखे तिला अगदी सहजपणे उपलब्ध आहेत.  खरे सांगायचे तर राधा पूर्ण सुखातही होती. परंतु तू तुझी मर्यादा ओलांडलीस आणि राधेला तुझ्या सुखाची चटक लावून तिला असमाधानी केलेस.  त्या सुखालाच प्रेम हे नाव दिलेस आणि त्या प्रेमालाही 'ईश्वरी प्रेम' वगैरे असे मोठे ज्ञानाचे शब्द वापरलेस.  परंतु त्यामुळे तुमच्या प्रेमाची अनैतिकता काही लपली जात नाही.  त्यातला खोटेपणाही मुळीच झाकोळला जात नाही हे लक्षात ठेव.

मुळामध्ये परक्या स्त्रीशी प्रेमाचे संबंध या मध्ये कुठलीही नीतिमत्ता वा धर्म नाही.  ही तर चक्क अनीती व अधर्म आहे, एवढे ईश्वराच्या ज्ञानाच्या गप्पा मारणाऱ्याला तरी निश्चितच कळायला हवे होते.  तुमचे प्रेमाचे संबंध अगदी स्वच्छ व शुद्ध आहेत असे म्हणतोस.  मग कृष्णा, त्या संबंधामध्ये चोरटेपणा का?  लपून छपून कोणालाही न कळवता भेटण्याचे कारणच काय?  आणि अशी मग चोरून एकमेकांना पत्रे लिहिण्याचे कारण काय बरे?  हा तुमच्यातील जो चोरटेपणा आहे ना त्यावरूनच हे सिद्ध होते की तुमचे प्रेमाचे संबंध हे अधर्माचे आहेत.  अशा अधर्माला कोठेही स्थान नसताना येथे गोकुळात मात्र त्या अधर्माला मानाचे पान मिळत आहे असे दिसते.  अनीतीला व अधर्माला मिळणारा हा बहुमान नंदराजांनाही मान्य आहे की काय?  हाच निवाडा नंदराजांनी आता करून एकदाच काय तो सोक्ष मोक्ष लावायचा आहे.''

एवढा वेळ अनयाचे मुखातून ओकले जाणारे गरळ शांतपणे सहन करणाऱ्या कृष्णालाही मग सात्त्विक संताप आला आणि जराशा त्वेषानेच तो अनयाशी बोलू लागला,

''अरे अनया, विषयसुखाला व शरीरसुखालाच प्रेम म्हणणाऱ्यांनी धर्म व नीती यांनी भाषा बोलूच नये.  तो शब्दही उच्चारण्याची त्यांची लायकी नाही.  आपल्या पत्नीच्या ठिकाणी फक्त देहसुखाचाच अनुभव घेणाऱ्यांना तर प्रेम हा शब्द बोलण्याचाही अधिकार नाही.  विषयलंपट लोकांना स्त्री म्हटले की विषयसुखापेक्षा दुसरे काही दिसतच नाही.  स्त्रीच्या देहाच्या पलीकडे तिचे दुसरे काहीच अस्तित्व न मानणाऱ्यांना नीती काय ठाऊक असणार?  स्त्री ही सुद्धा एक मानव आहे, तीही एक सामान्य जीव आहे हेच ज्यांना कळत नाही त्यांना मानव तरी कसे म्हणायचे?  मग त्यांच्यामध्ये आणि जनावरांमध्ये काहीच फरक नाही.  विषयांध नजरेने पत्नीकडे पाहून तिला केवळ एक विषय भोगण्याचे साधन म्हणूनच पाहणाऱ्यांनी धर्माची भाषा बोलणे हा तर शुद्ध ढोंगीपणा आहे.  आपल्याला सर्व सुख देणारी, सेवा करणारी, त्याग करणारी अशी केवळ एक भोग्य वस्तूच म्हणजे स्त्री आहे आणि तीही माझ्या मालकीची वस्तू आहे असे मानणारे लोक तर केवळ पशूच होत.  ज्यांच्याकडे साधी माणुसकी नाही त्यांनी ज्ञानाच्या वल्गना करण्यात काहीच अर्थ नाही.  आपले कुटुंबातील

कर्तव्य करणे म्हणजे दुसऱ्यावर उपकार करणे मुळीच नाही. दुसऱ्याच्या हक्काच्या सुखाचे चार तुकडे त्याच्यासमोर फेकले म्हणजे आपली कर्तव्यपूर्ती झाली असे अजिबात नाही आणि तेवढ्याने कोणी कोणाचा कायमचा मिंधा झाला असेही होत नाही.

अरे अनया, तुझ्या सारख्या लोकांची हीच तर मुख्य मानसिक अडचण आहे. स्त्री, पुरुष व प्रेम असे शब्द आले रे आले की तुमच्या मनातील विषयसुखाची मूळ वासना जागृत होते आणि मग तुमचे डोकेच फिरल्यासारखे होते. विषयसुखाच्या सततच्या विचाराने तीच दृष्टी तुम्हाला प्राप्त झालेली असते आणि विषयसुखाचा अनुभव घेतल्यानंतरचाही उरलेला वासनेचा मळ मनात तसाच साचून राहिलेला असतो. त्यातूनच स्वार्थी व मतलबी शब्दज्ञानाची जोड मिळाली, की मग त्या मळाचे रूपांतर विषामध्ये होण्यास जराही वेळ लागत नाही. मनातील हे विष सर्व अंगात भिनून राहते आणि तेच तुमच्या वागण्यातून व बोलण्यातून सतत प्रगट होत राहते. काही तरी बाह्य कारणाने तुमच्या मनात शंका निर्माण झाली की ते विष उफाळून येते आणि समोरच्या व्यक्तीला डंख करते. संशयाचे भूत एकदा का तुमच्या मनाच्या मानगुटीवर बसले की त्याची भूतबाधा मात्र इतरांना होत राहते. तेव्हा अशा कोत्या व संकुचित वृत्तीच्या आणि संशयाने पछाडलेल्या लोकांशी बोलण्याचे मला काहीच कारण नाही. कारण त्यातून केवळ वादाशिवाय दुसरे काहीही निर्माण होणे शक्य नाही. परंतु मुळातील तुझ्याविषयी आपलेपणा आणि राधेवर विनाकारण होत असलेला अन्याय निवारण करण्यासाठीच हे अनया, मी तुझ्याशी हे सर्व बोलणे करीत आहे.

हे तात, माझे व राधेचे प्रेमाचे संबंध आहेत हे मी कबूल करायला तो काही मुळात गुन्हाच नव्हे. परंतु ते प्रेम म्हणजे अधर्म आहे असे मात्र मी कधीही मान्य करणार नाही. ईश्वराशी जोडलेल्या व्यक्ती व्यक्तींतील प्रेमाला जर अधर्म म्हणायचे असेल तर मग या जगात धर्म तो काय उरला? केवळ त्या व्यक्तींपैकी एक स्त्री आहे व दुसरा पुरुष आहे म्हणून ते ईश्वरी प्रेम मुळीच बाधीत होत नाही. त्या प्रेमाचे शुद्धत्व व निर्मळत्व हे अबाधित व कायम आहे. तात, तुम्ही जाणूनच आहात की केवळ याच प्रेमाने मी सर्वांशी म्हणजे अगदी सर्वांशी, पहिल्यापासूनच वागत आलेलो आहे. राधेशी मी मुद्दामहून काही वेगळेपणाने वागलो असे नाही. परंतु राधेचे वेगळपण असे की तिला माझ्या या प्रेमाचे मूळ कारण व वेगळेपण लक्षात आले. ते प्रेम अनुभवता अनुभवता तिच्या ठिकाणचेही त्या प्रेमाचे मूळ कारण जागृत झाले. त्यामुळे आम्हाला परस्परांच्या सहवासात त्या मूळ प्रेमाचा अनुभव येऊ लागला आणि तेच आमचे सख्यत्व जुळण्याचे कारण झाले.

या सर्वांमध्ये एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे की सर्व नात्यासंबंधाच्या पलीकडे असलेले प्रेम हे अत्यंत वैयक्तिक आहे. ती ज्याची त्याची खासगी बाब आहे. ते सामुदायिक किंवा सार्वजनिक असूच शकत नाही. त्यामुळे त्या प्रेमाचा अनुभव घेणे ही सुद्धा ज्याची त्याची वैयक्तिक व खासगी बाब आहे. म्हणून अशा प्रेमाचे संबंध हे सुद्धा खासगीच असतात. हीच तर त्याची खास बात आहे. या खासगी संबंधाला चोरटे संबंध म्हणून हिणवणे ही तर त्या प्रेमसंबंधाची अवहेलनाच आहे. म्हणूनच या प्रेमासाठी खासगीत भेटणे व खासगीत बोलणे हे अगदी सहज घडते. त्या भेटी अगदी उत्स्फूर्त असतात.

त्यामध्ये प्रत्येकवेळी काही पूर्व योजना असेलच असे सांगता येत नाही आणि तशी काही योजना नसेलच अशीही खात्री देता येत नाही. राधेने लिहिलेली पत्रे ही सुद्धा तिची वैयक्तिकच व खासगी बाब आहे. असे व्यक्तिगत व खासगी जीवन असण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. अगदी स्त्रियांनासुद्धा तो हक्क एक व्यक्ती म्हणून आहेच. मग राधेचा त्याला का अपवाद असावा बरे? हा व्यक्तिगत हक्कच अनुभवण्याची जेव्हा चोरी होते तेव्हा मग त्या हक्काचा अनुभव चोरून म्हणजे नकळत घेणे आवश्यक व अपरिहार्य ठरते.

हे तात, एक पती म्हणून आपल्या पत्नीच्या जीवनात तिचा पती हाच मुख्य व अंतिम असावा असे मत या अनयाचे असू शकेल. परंतु त्याचे हे अज्ञानामुळे व पुरुषी अहंकारातून निर्माण झालेले मत राधेचेही असावे असा हट्ट तो कसा काय धरू शकतो? आपले मत राधेवर लादण्याचा त्याला काहीच अधिकार नाही. मुळात आई, वडील, पती ही नाती म्हणजे अधिकारपद नव्हेच मुळी. संबंधिताचे रक्षण व पोषण करण्याची ही जबाबदारी ईश्वराने त्यांच्यावर सोपवलेली आहे. ते तर त्यांचे कर्तव्यकर्मच आहे आणि तीच तर त्यांची मर्यादा आहे. आपले कर्तव्यकर्म योग्य प्रकारे पार पाडून नंतर त्या संबंधितांना ईश्वरी सत्तेचे व ईश्वराशी असलेल्या त्यांच्या प्रेमाच्या नात्याचे स्मरण व जाणीव करून देणे हे तर त्याचे आद्य कर्तव्यकर्म आहे. परंतु अज्ञानाने व त्याहीपेक्षा अहंकाराने जर एखादी व्यक्ती आपल्या कर्तव्यकर्माचा टेंभा मिरवून नात्याचा खोटा हक्क हट्टाने गाजवीत राहील, तर ते निषेधार्हच आहे. अशा हट्टापुढे सामान्यजन नाइलाजास्तव नमतील व झुकतीलही. परंतु त्यापैकी एखाद्याला जरी आपल्या ईश्वराशी असलेल्या नात्याची जाणीव झाली आणि त्याला त्या ईश्वरी प्रेमाचा अनुभव घेण्याचे भाग्यही लाभले, तर तो मात्र कौटुंबिक व व्यावहारिक नात्यांमध्ये अडकून न राहता आपले नाते ईश्वराशी जुळवत राहणार.

माझे व राधेचे नाते हे त्या मूळ ईश्वराशी असलेल्या नात्यातूनच निर्माण झालेले आहे आणि आमचे प्रेमाचे संबंधसुद्धा त्या ईश्वरी प्रेमाच्या संबंधातूनच निर्माण झालेले आहेत, याची मला पूर्ण खात्री आहे आणि राधेचाही तोच निश्चय झालेला आहे. तेव्हा या प्रेमसंबंधाचा कोणताही कमीपणा वा लाज वाटण्याचे काहीच कारण नाही. उलट या संबंधाचा मला सार्थ अभिमानच आहे. राधेच्याही ठिकाणी या संबंधांची जाणीव निर्माण झाली याचे तर मला अत्यंत कौतुकच आहे. ज्यांना या प्रेमसंबंधाविषयी अज्ञान वा विपरीत ज्ञान आहे किंवा ज्यांची त्यावर श्रद्धा नाही त्यांनी खुशाल विहिरीतील बेडकाप्रमाणे आपल्या मनातील घनदाट अंधकारामध्ये पडून रहावे. परंतु ज्यांच्या मनामध्ये हे ईश्वराचे प्रेम निर्माण झाले आणि ज्यांच्या मनात या ईश्वरी प्रेमाची ज्योत लागली, त्यांच्यासाठी मात्र ते ईश्वरी प्रेम अनुभवण्यासाठी सारे आकाश मोकळे झालेले असते. त्या मोकळ्या आकाशात भरारी घेऊन विहार करण्याचा आनंदही फक्त तेच अनुभवू शकतात.''

कृष्णाच्या बोलण्यातील निश्चयात्मकतेने व प्रवाहीपणाने सर्वांनाच भारून गेल्यासारखे झाले. अनयसुद्धा जरी भारावला नाही, तरी थोडासा भांबावल्या सारखा झालाच. कृष्णाच्या बोलण्यावर काय बोलावे हे त्याला थोडा वेळ सुचेनाच. परंतु तरीही अनय आपल्या भूमिकेशी हटून व तटून राहिला. म्हणून कृष्णाशी तो उपहासात्मक बोलू लागला.

''वा, कृष्णा, वा! मोठे तत्त्वज्ञान सांगता सांगता तू तर आता काव्यात्मकही बोलू लागलास. परंतु लक्षात ठेव की काव्य म्हणजे केवळ स्वप्ने! आणि या स्वप्नाळू वृत्तीने मन अधिकच दुर्बल होते आणि मग ते मन वस्तुस्थितीला सामोरे जाण्याचे टाळू लागते. एवढे ते कमजोर झालेले असते. परंतु मी मनाने पूर्णपणे सबल आहे. त्यामुळे मला कोणाच्याही प्रेमाची जरुरीच नाही. कोणाच्याही सहाय्याची वा मदतीची मला काहीच व कधीच आवश्यकता वाटली नाही आणि वाटणारही नाही. ईश्वराला एक तत्त्व म्हणून मानणे ठीक आहे. परंतु ईश्वराचे प्रेम वगैरे या भाकडकथा किंवा शुद्ध थापाच आहेत. कारण प्रेमाचा अनुभव घ्यायला किंवा द्यायला ईश्वर हा काही व्यक्ती नाही. आणि ईश्वर व्यक्तिच्या रूपाने प्रगट होतो हे बोलणे तर बाष्कळच आहे. सामान्य मनुष्य हा सामान्य मनुष्यच आहे आणि ईश्वराचे अस्तित्व हे मनुष्यांच्याही पलीकडचे आहे. म्हणूनच तर त्याला आपण 'ईश्वर' म्हणतो ना? तो जर सामान्य मनुष्यासारखा प्रगट होऊ लागला तर मग त्याचे ईश्वरत्व ते काय राहिले आणि मग त्याला ईश्वर तरी कोण म्हणणार? तेव्हा उगाचच वारंवार ईश्वराचा उल्लेख करून आपल्या अडचणी दूर तर होणार नाहीतच, परंतु आणखीन वाढतीलच. येथे माझी तक्रार तुझ्या व राधेच्या संबंधाविषयी असताना कृष्णा, तू निष्कारण ईश्वराच्या नावावरती आपले दुष्कृत्य लपवीत आहेस आणि मूळ प्रश्नावरून सर्वांचे मन जाणून बुजून विचलित करून त्या प्रश्नाचा गुंता वाढवीत आहेस.

अरे कृष्णा, ईश्वर व्यक्तिच्या रूपाने प्रगट होतो असे मानणे व तसा प्रचार करणे हेच मुळात चुकीचे आहे आणि व्यक्तीलाच ईश्वर मानून त्याच्यावर प्रेम करणे किंवा त्याची भक्ती करणे हा तर निव्वळ अधर्मच आहे. अरे, ईश्वराची भक्ति करायची तर कितीतरी मूर्ती आहेतच की! आणि देवळे काय कमी आहेत? बरे कृष्णा, त्यातूनही 'ईश्वर सर्वांठायी आहे' हे तुझे म्हणणे जर खरे मानायचेच असेल तर मग तो ईश्वर काही फक्त तुझ्या ठिकाणीच नाही. तो माझ्याही ठिकाणी आहेच की! मग राधेने तुलाच ईश्वर मानून तुझ्यावरतीच का प्रेम करावे? तुझीच भक्ति का करावी? राधेने मलाच ईश्वर मानावे आणि माझीच भक्ति करावी! घरच्या घरी मी एवढा उपलब्ध असताना दुसरीकडे ईश्वराला शोधायचे मग कारणच काय? अरे, घरच्यांना दूर करायचे आणि बाहेरच्यांना जवळ करायचे हे कुठले प्रेम? ही कुठली भक्ति? आणि हे कुठले ज्ञान? याला तर केवळ जादा शहाणपण असेच म्हणावे लागेल.''

अनयाच्या उपरोधिक व कुत्सित बोलण्याने जराही विचलित न होता कृष्ण ठामपणे बोलू लागला, ''अरे अनया, ईश्वराचे अस्तित्व स्वतःठायी अनुभवणे म्हणजे काही पोरखेळ नाही किंवा तो केवळ शब्दांचाही खेळ नाही. एखादी गोष्ट शब्दाने कळली म्हणजे काही ती अनुभवाची झाली नाही. जेथे ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव आहे तेथे मन अत्यंत निर्मळ आहे आणि बुद्धीही अत्यंत शुद्ध आहे. तेथे कोणत्याही विकाराला व अहंकाराला जागाच नाही. तेथे स्वतःविषयी काहीही स्वार्थ तर शिल्लक राहिलेला नाहीच, पण सर्वांविषयी आपलेपणा व प्रेम आहे. तेथे दुसऱ्याच्या दुःखाने दुःखित आणि व्यथेने व्यथित होणे आहे. तेथे सर्वांविषयी कळवळा आहे आणि सर्वांना खरे सुख व स्वास्थ्य लाभावे म्हणून स्वतः केवढे तरी कष्ट सहन करणे आहे. तेव्हा ज्यांची मने विषयांमुळे मलिन झालेली आहेत, ज्यांच्या बुद्धीच्या ठिकाणी विकार आहेत, ज्यांचे चित्तच अशुद्ध आहे आणि ज्यांच्या श्वासाश्वासातून केवळ अहंकाराचा वास प्रगट होत आहे त्यांनी 'ईश्वरा विषयी'

बोलण्याचे धाडस करू नये किंवा त्यांनीच केवळ ईश्वराविषयी फक्त गप्पाच माराव्यात. त्या भूलथापांना कोणीही फसणार नाही. खुद्द स्वतःसुद्धा त्यांचा त्यांच्याच बोलण्यावर विश्वास नसतो. आतून आपल्या बोलण्यातील पोकळपणा व घमेंड यांची त्यांनाच पूर्णपणे जाणीव असते.

अनया, एक गोष्ट पुरतेपणे लक्षात ठेव की ज्यांच्या ठिकाणी ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव असते त्यांना त्या ईश्वराचे अस्तित्व सर्वत्र आणि सर्वांच्याच ठिकाणी जाणवत असते. म्हणून त्यांच्याकडून कधीही कोणाचा अनादर वा अवमान किंवा एखाद्याला कमी लेखून त्याला दुरुत्तरे करणे कधीच घडणार नाही. तर सर्वांविषयी नम्रता व आदरच त्यांच्या ठिकाणी असणार. तेव्हा एखाद्याच्या ठिकाणी ईश्वर तत्त्वतः असणे आणि तो ईश्वर त्याच्या अनुभवाचा असणे यात जमीन अस्मानाएवढा फरक आहे. ज्यांना ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव असते ते कधीच अहंकाराने 'माझ्या आणि माझ्याच ठिकाणी ईश्वर आहे' अशी वल्गना करीत नाहीत. तर सर्वांना व्यापक ईश्वराच्या सत्तेची जाणीव करून देतात आणि सर्वांना त्यांच्या ठिकाणच्या ईश्वराच्या अस्तित्वाची ओळख करून देतात. तेव्हा ईश्वराच्या अस्तित्वाविषयी बोलण्याचे तुला मुळी कारणच नाही आणि तुझा तो अधिकारही नाही. अर्थात बोलणाऱ्याचे तोंड बंद करता येत नाही हे खरे आहे, पण ऐकणारा आपले कान नक्कीच बंद करून ठेवू शकतो.

अनया, मला तुला आणखीन एक गोष्ट सांगायची आहे. ईश्वराचे अस्तित्व सर्वांच्या ठिकाणी आहे म्हणून ते तुझ्या ठिकाणी आहे असे जे तू म्हणतोस ते जर खरे आहे, तर मग त्या ईश्वराचे अस्तित्व राधेच्या ठिकाणीही असलेच पाहिजे हेही खरेच नाही का? मग तिने तरी तुझीच भक्ति का करावी? तुलाही तिची भक्ति करता येणे शक्य आहे, नाही का? पण तुझी एकच अडचण आहे, की तू पुरुष आहेस व तिचा पती आहेस आणि ती एक स्त्री आहे व त्यातून तुझी पत्नी आहे. तेव्हा भक्ति करायची की नाही आणि कोणाची करायची हे ठरवण्याचे स्वातंत्र्य ज्याला त्याला आहे. मीही राधेला कधी 'माझी भक्ति कर' असे सांगितलेले नाही. मुळात भक्ति ही कोणाचीही कोणावर सक्ती असूच शकत नाही. कारण प्रेम व श्रद्धा यातूनच हा भक्तिभाव निर्माण होत असतो. असा भाव जर राधेच्या ठिकाणी माझ्याविषयी निर्माण झालेला असेल, तर तो मी नाकारूही शकत नाही. त्या भावाचा स्वीकार करण्याचा आत्मविश्वास व मनोबळ माझ्या ठिकाणी निश्चितपणे आहे.

अनया, तू म्हणतोस त्याप्रमाणे देवळे व त्यातील देव देवतांच्या मूर्ती हे सुद्धा काहीजणांचे श्रद्धा स्थान असू शकेल. परंतु या मूर्ती तर ईश्वराच्या अस्तित्वाच्या केवळ प्रतीकात्मकच अशा आहेत. त्या मूर्ती जड असतात. त्यांच्या ठिकाणी चैतन्य असत नाही. त्यामुळे त्या मूर्ती ना कोणाशी बोलू शकतात, ना कोणी त्यांच्याशी बोलू शकते. पण बोलल्याशिवाय व सांगितल्याशिवाय सर्वसामान्यांचे दुःख निवारण कसे होणार आणि त्यांच्या अज्ञानाचे निवारण कोण करणार? कारण अज्ञान हेच तर सर्व दुःखाचे मूळ आहे. सामान्यांना प्रेमाने जवळ कोण करणार? त्यांच्या दुःखात आपलेपणाने सहभागी कोण होणार? त्यांना प्रत्यक्ष सुखी कोण करणार? आणि त्यांना प्रत्यक्ष भक्तिचा आनंद कोण अनुभवाला आणून देणार? हे तर जड मूर्तींकडून अपेक्षित करताच येत नाही. त्यासाठीच तर मानवरूपातील चैतन्य मूर्ती आहेत. त्या चैतन्य मूर्तींच्या ठिकाणी

ईश्वरी अनुभवाचे चैतन्य तर जागृत असतेच, पण त्याचबरोबर त्यांच्या ठिकाणी ईश्वरी प्रेमाचे चैतन्यही खेळत असते. म्हणूनच ते सर्वसामान्यांना त्या ईश्वरी प्रेमाचा अनुभव आणून देऊ शकतात आणि त्यातून ज्यांच्या ठिकाणी भाग्यवशात् ते ईश्वरी प्रेम निर्माण होते त्यांच्या प्रेमाचा स्वीकारही ते करू शकतात.  त्यामुळेच सामान्यांतील सामान्याकडूनही ईश्वराच्या या सगुण प्रेमाने ईश्वराची भक्ति घडू शकते आणि खऱ्या आनंदाचा अनुभव घेता येतो.  त्यांची जीवने खऱ्या अर्थाने सार्थ व धन्य होतात.''

*****



# कृष्णाने केलेला न्याय

**कृ**ष्ण जरी अनयाला उद्देशून बोलत होता, तरी त्याचा प्रभाव मात्र सर्वांवर आणि त्यामध्येही नंदावर विशेषत्वाने होत होता. कृष्णाचे बोलणे एवढे बिनतोड व तर्कशुद्ध होते, की अनयालाही त्याच्यापुढे काहीही बोलता येणे शक्य होत नव्हते. परंतु कृष्णावरच्या रागाने व द्वेष मत्सराने त्याच्या मनाचा पूर्ण ताबा घेतलेला असल्यामुळे अनयाची अस्वस्थता अधिकच वाढत होती. तरीही काय बोलावे हे निश्चितपणे सुचत नसल्यामुळे अनय केवळ जागच्या जागीच बसून चुळबुळ करीत राहिला होता. त्याच्या वादाच्या मुद्यांना कृष्णाने योग्य व चोख उत्तर दिल्यामुळे अनय निरुत्तर झालेला होता. परंतु आपली हार मानायला तयार नसलेला अनय वादाचे नवीन मुद्दे शोधून काढण्यासाठी विचारात मग्न झाला होता आणि थोडा वेळ बाह्यांगाने तरी मौन धरून बसला होता.

परंतु न राहवून नंदाने मात्र बोलावयास सुरुवात केली. कृष्णावरच्या प्रेमाने व कौतुकाने नंदाचे मन अगदी भरून आले होते आणि तेच त्याच्या शब्दाशब्दांतून वाहत होते.

''हे कृष्णा, तुझे बोलणे अगदी यथार्थ व संयुक्तिकच आहे. कोणाही प्रामाणिक व्यक्तीला तुझ्या बोलण्यातील सत्य हे मान्य करावेच लागेल. परंतु जो स्वतःच्याच बुद्धीला प्रमाण मानून चालतो आहे त्याला मात्र अर्थातच तुझे बोलणे रुचणार नाही आणि पटणारही नाही. मला एक गोष्ट निश्चितपणे माहीत आहे की तू जी ही सत्य व स्पष्ट ज्ञानवचने बोलत आहेस, ती काही तू कोठल्या ग्रंथवाचनाने किंवा कोणी शिकवल्यामुळे बोलत नाही आहेस. कारण हे ज्ञान कोणी शिकवून शिकल्याने किंवा केवळ अभ्यासाने प्राप्त होणारे असे नाहीच मुळी. परंतु तुझ्या ठिकाणी ही बुद्धीची प्रगल्भता व विचारांची सखोलता अगदी लहानपणापासूनच आहे. ती मी नेहमीच पहात आलेलो आहे आणि त्याचे रहस्यही मी जाणून आहे. तुझा जन्म झाल्यानंतर तुझे जातक वर्तवताना महामुनी व तपस्वी गर्गमुनींनीच हे मला सांगून ठेवले आहे.

तुझी मानसिकता, तुझी विचारसरणी, तुझी बुद्धिमत्ता ही सर्वसामान्यांपेक्षाही वरच्या स्तराची आहे. परंतु तरीही सर्वांना तू अत्यंत जवळचा व नेहमीच हवाहवासा वाटतोस. याला कारण म्हणजे तुझ्या ठिकाणी सर्वांविषयी असलेला आपलेपणा आणि म्हणून त्यांच्या दुःखाविषयी असलेला कळवळा हेच होय. तुझ्या या स्वभावामुळे, रूपगुणांमुळे आणि मुख्यतः तुझ्या व्यक्तिमत्त्वामुळेच सर्वजण तुझ्याकडे अगदी सहजपणे आकर्षिले जातात. तुझ्याशी अत्यंत मोकळेपणाने वागतात आणि तुझ्या प्रेमाचा अनुभव त्यांच्या त्यांच्या परीने घेतात. त्यामुळेच तुझ्या सहवासाचा प्रत्येकाला कमी जास्त लाभ होत असतो. अर्थात तू काही असा फरक मुद्दामहून करीत नाहीस. परंतु ज्याच्या त्याच्या स्वभावामुळे हा फरक पडत असतोच. मात्र त्याची जबाबदारी तुझ्यावर मुळीच येत नाही.

हे कृष्णा, प्रत्येक व्यक्तीचे अस्तित्व हे वेगळे व स्वतंत्र आहे हे जे तू सांगतोस ते तत्त्वतः अगदी बरोबरच आहे. आणि तीच जाणीव तू प्रत्येकाला करून देत असतोस. त्याचबरोबर तू प्रत्येकाला त्याच्या कौटुंबिक व सामाजिक बांधिलकीचीही जाणीव करून देत असतोस ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण व्यक्तिगत स्वातंत्र्याचा जरी तू पुरस्कर्ता असलास, तरी तुझा स्वैराचाराला मुळीच पाठिंबा नाही हेच यावरून सिद्ध होते. म्हणूनच व्यक्तिस्वातंत्र्य व कौटुंबिक बांधिलकी याचा समन्वय साधायला तू सांगत असतोस. प्रत्येकाच्या ईश्वराशी असलेल्या नात्याचे तू स्मरण करून देतोस आणि ते नाते अनुभवण्याचे प्राधान्य व स्वातंत्र्य याचा आग्रह तू धरीत असतोस. बाकी सर्व नाती ही दुय्यम व पूरक आहेत असे तुझे सांगणे असते. अशा ईश्वराच्या नात्याचे प्रत्येकाला स्मरण करून देण्याचा आणि त्या नात्याचा अनुभव घेण्याचे मनोबळ प्रत्येकाला प्राप्त करून देण्याचा तुझा प्रयत्न असतो. त्याच्यासाठीच तुझे जीवन आहे आणि तेच तुझ्या जीवनाचे कार्य आहे याची पूर्ण जाणीव माझ्या ठिकाणी गर्गमुनींच्या सांगण्यामुळे आहे. मलाही काही काही वेळा त्याचे विस्मरण होते हे खरे आहे. परंतु पुन्हा तुझे विशेषत्वाचे वागणे व बोलणे पाहिले की माझ्या ठिकाणची ती जाणीव पुन्हा जागी होते आणि तुझे माहात्म्य पुन्हा जाणवू लागते.

हे कृष्णा, परंतु मुख्य प्रश्न असा आहे की सामान्य विचारांच्या व सामान्य बुद्धीच्या लोकांना तुझे हे सांगणे कळावे कसे? त्यांच्या समजशक्तीच्या ते पलीकडे असल्यामुळे तुझे सांगणे व त्यामागील तुझी भूमिका त्यांना आकलन होणे हे कठीणच नव्हे, तर जवळ जवळ अशक्यच आहे. यात त्यांचा तरी काय दोष आहे बरे? तेव्हा मला तरी असेच वाटते, की तू त्यांचा नाद सोडून द्यावास हेच बरे. कारण त्यातूनही एखाद्याला तुझे सांगणे पटले व भावले तरी त्याला तसे वागता येणे हे तर अधिकच मानसिक क्लेशाचे आहे. राधेकडे पाहिले असता हीच गोष्ट सिद्ध होत नाही का? तुझ्याकडे ती अगदी वेगळ्या व विशेष दृष्टीने बघते हे तर स्पष्टपणे सर्वांना दिसतेच आहे. परंतु तिची ती दृष्टी ही तिच्या कुटुंबीयांना आणि विशेषतः तिच्या पतीला म्हणजे या अनयाला कळावी कशी, आणि मानवावी तरी कशी? त्याच्या काही मर्यादा पडत असतील हे खरे आहे. परंतु त्याच्या त्या मर्यादा आहेत हे आपण मान्यच करायला हवे. एक गोष्ट तर खरीच आहे ना, की राधेचे व तुझे कितीही प्रेमाचे व जवळीकतेचे संबंध असले तरी आज राधेच्या बाह्य जीवनाची सर्व जबाबादारी अनयावरतीच आहे. राधा तिच्या मनाने जरी कितीही स्वतंत्र असली तरी ती बाह्यांगाने पूर्णपणे अनयावरच अवलंबून आहे हे तर आपल्याला विसरता येत नाही. आणखीन एक गोष्टही स्पष्ट आहे की राधेची जबाबदारी तू काय, मी सुद्धा घेऊ शकत नाही. कारण ती काही अनाथ वा असहाय्य नाही, तर ती एक विवाहित स्त्री आहे.

तेव्हा कृष्णा, मला तरी असेच वाटते की राधेचे व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि तिची तिच्या पतीशी असलेली बांधीलकी याचा वस्तुनिष्ठ विचार करण्याची वेळ आलेली आहे. या एकमेकांना पूरक असलेल्या दोन्ही गोष्टींमधील आत्ताच्या परिस्थितीत कोणत्या गोष्टीला प्राधान्य देणे आवश्यक आहे याचाच निवाडा आता करायला हवा असे मला वाटते. मला खात्रीपूर्वक असे वाटते की हा निवाडा तूच अगदी योग्यपणे करू शकशील. कारण असा योग्य निवाडा करण्यासाठी आवश्यक असलेले शुद्ध मन व सम्यक बुद्धी केवळ तुझ्याच ठिकाणी आहे. मुख्य म्हणजे तुझ्या ठिकाणी अनय व राधा या

दोघांविषयी सारखाच आपलेपणा आहे आणि त्या उभयतांच्या असलेल्या अडचणी सुद्धा तूच यथार्थतेने जाणून आहेस. तेव्हा प्राप्त परिस्थितीतून काय मार्ग काढावा व काय निर्णय द्यावा याचा निवाडा तूच करावास असे मला अगदी मनःपूर्वक वाटते. कारण तुझा निर्णय हाच खऱ्या अर्थाने निःपक्षपाती, अचूक, सर्वांच्याच हिताचा व सर्वांनाच आचरणीय असेल असा मला पक्का विश्वास आहे.''

नंदाचे बोलणे ऐकून एवढा वेळ मनात अत्यंत अस्वस्थ असूनही स्वस्थ बसलेला अनय रागाने एकदम उसळून बोलू लागला. ''वा! नंदराज, वा!! आपल्या न्यायबुद्धीची तर अगदी कमालच झाली. अहो, माझ्या तक्रारीत जो मुख्य आरोपी आहे त्यालाच तर तुम्ही न्याय निवाडा करावयास सांगत आहात. आपल्या मुलाच्या बुद्धीवरील असलेला हा तुमचा विश्वास म्हणजे तर तुमच्या पुत्राच्याविषयी असलेल्या मोहाचा अगदी कळसच आहे. तुमच्या मुलाचे कौतुक तुम्ही जरूर करा आणि तुमचे कौतुक तो करील. परंतु तुमच्याकडून न्यायाची कोणतीही अपेक्षा मला तरी धरता येत नाही. असा न्याय करण्याचा व देण्याचा कृष्णाला तर काहीही अधिकार नाही. कारण तो त्यासाठी लायकच नाही. पुत्र मोहाने युक्त झाल्यामुळे तुम्हीही योग्य निवाडा करण्याच्या मनःस्थितीत आहात असे मला वाटत नाही. आता माझा मलाच निर्णय घेऊन काहीतरी ठरवावे लागणार असेच दिसते.

हे नंदराज, तसे पाहिले तर माझ्यासाठी तीनच मार्ग उपलब्ध आहेत. पहिला म्हणजे राधेला तिच्या माहेरी कायमचे नेऊन पोचवायचे. दुसरा मार्ग म्हणजे मीच गोकुळ सोडून कोठेतरी निघून जायचे आणि नाहीतर तिसरा मार्ग म्हणजे मी माझ्या सर्व कुटुंबासह या गोकुळाचा कायमचा त्याग करून, दुसऱ्या कुठल्या तरी नगरात जाऊन रहायचे, जेणेकरून राधा व कृष्ण यांचा संपर्क कायमचा सुटेल आणि त्यांचा एकमेकांशी काहीही संबंधच येणार नाही. परंतु मुख्य प्रश्न असा आहे की माझी काहीही चूक नसताना मी माझे कौटुंबिक स्वास्थ्य का बिघडवावे आणि का गमवावे? कारण एवढी वर्षे, म्हणजे अगदी माझ्या लहानपणापासूनच मी या गोकुळामध्ये राहिलो व वाढलो असताना, माझा या गोकुळातच सुखासमाधानाने राहण्याचा हक्क मी का म्हणून सोडून द्यावा? आता कृष्णाला गोकुळ सोडून जायला सांगणे तुम्हाला तर कधीच शक्य होणार नाही. मग मी करावे तरी काय? असेच गोकुळात खितपत पडत राहून अपमानित जीवन जगत रहावे काय? पण असे लाजिरवाणे जिणे जगण्यात काय अर्थ आहे? आणि तसे जीवन मी का म्हणून जगावे? मलाही माझा काहीतरी स्वाभिमान आहेच की! या सर्वांतून माझ्यासाठी एकच मार्ग मोकळा राहतो, तो म्हणजे मथुरेला जाऊन प्रत्यक्ष कंस महाराजांकडेच माझ्यावरील अन्यायाची दाद मागणे हा होय. तेव्हा आता मी त्वरित कंस महाराजांनाच जाऊन भेटतो. म्हणजेच सर्व प्रश्न मिटतील अशी मला खात्री वाटते.''

अनयाच्या बोलण्याने व्यथित झालेला कृष्ण थोड्याशा दुःखित स्वराने अनयाला म्हणाला, ''अरे अनया, असे काही करू नकोस रे. अरे, आपल्या घरगुती मतभेदांमध्ये एकदा का त्रयस्थाला मध्यस्थ म्हणून आणले, की तो त्याचा गैरफायदा घेतल्याशिवाय राहणार नाही. कारण अशा त्रयस्थ व्यक्तींना संबंधितांविषयी काहीच आस्था नसते. त्यातून कंसासारख्याला,

जो अतिशय दुष्ट व क्रूरकर्मा म्हणूनच प्रसिद्ध आहे, त्याला आपल्यामध्ये आपणहून बोलावून घेणे म्हणजे तर सैतानालाच आमंत्रण देण्यासारखे आहे. आधीच त्या कंसाची गोकुळावर वक्रदृष्टी आहे. गोकुळामध्ये असलेले सुख, स्वास्थ्य आणि समाधान कंसाच्या डोळ्यात सतत खुपत असते. गोकुळाची भरभराट तर त्याला पाहवतच नाही. म्हणून आपणा गोकुळवासीयांना तो या ना त्या प्रकारे नेहमीच त्रास देत असतो. गोकुळामधील दूध, दही, लोणी या सारखे पदार्थ मथुरेच्याच बाजारात आधी विकायला आले पाहिजेत असा त्याचा हट्ट असतो. त्याला जेव्हा आपण विरोध केला होता तेव्हा कंसाने आपल्याला केवढा त्रास दिला होता, हे अनया तू विसरलास काय? कंसाने आपल्यावर अनेक जाचक कर लादून आपले मनोबळ खच्ची करण्याचाही प्रयत्न केला होता. पण त्या वेळेस आपण सर्वजण एकोप्याने राहिलो होतो आणि एकदिलाने सर्वांनी विचार करून त्या संकटाला धैर्याने तोंड देऊन त्यातून सुखरूप पार पडलो होते ना? अनया, हे सर्व तू लक्षात ठेव आणि कंसाकडे जाण्याचा विचार ताबडतोब सोडून दे. सर्व गोकुळाच्या स्वास्थ्यासाठी तू असे करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या साठी तुझ्या मानसिक व कौटुंबिक स्वास्थ्याची हमी मी घेतो.

मी माझे मातापिता नंद व यशोदा यांच्या चरणांची शपथ घेऊन, येथे जमलेल्या सर्वांसमक्ष असे वचन देतो की 'या पुढे मी राधेला व राधा मला कधीही भेटणार नाही. आम्ही एकमेकांशी कुठल्याही प्रकारचा संबंध वा संपर्क ठेवणार नाही. परस्परांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सुद्धा बोलणार नाही.' माझ्या वचनावर विश्वास ठेव आणि कंसाकडे जाण्याचा अविचार मनातून काढून टाक अशी मी तुला सर्व गोकुळवासीयांच्या सुखासाठी व स्वास्थ्यासाठी प्रेमपूर्वक विनंती करतो.''

कृष्णाचे बोलणे ऐकून अनय थोडासा नरमल्यासारखा झाला खरा. परंतु त्याच्या मनातील कृष्णाविषयीचा राग काही कमी झाला नव्हता. तो तर कायमच होता. तो राग मनात तसाच धरून अनय बोलू लागला.

''कृष्णा, एक गोष्ट पक्केपणाने लक्षात ठेव की गोकुळाच्या हिताची काळजी तुझ्याप्रमाणे मलाही आहे. किंबहुना माझ्या ठिकाणी ती काळजी तुझ्याही पेक्षा जास्तच आहे हे तू समजून अस. एकीकडे तुला गोकुळाच्या स्वास्थ्याची काळजी आहे असे तू म्हणतोस खरा, परंतु गोकुळामधील अनेक जणांच्या ठिकाणी आणि अनेक कुटुंबांमध्ये मानसिक अस्वास्थ्य निर्माण करायला तूच तर कारणीभूत होत आहेस आणि हे तू सर्व जाणून बुजून करीत आहेस. प्रत्येक व्यक्तीचे अस्तित्व स्वतंत्र आहे असे अनेकांच्या मनात तूच तर भरवून दिले आहेस. त्यामुळे कुटुंबामध्ये मानसिक दुरावा निर्माण होऊन फूट पडण्यासच सुरुवात झाली. अर्थात तुझेच ते धोरण होते. कुटुंबातील व्यक्तींना वेगळे वेगळे करून त्यांच्या ठिकाणी तुझे महत्त्व तुला वाढवायचे होते. त्यात तुला बऱ्यापैकी यशही मिळाले आणि सर्वांत यशस्वी तू आमच्या कुटुंबात झालास हेही मान्य करायलाच हवे. तेव्हा माझ्या बोलण्याचा मुद्दा हाच आहे की गोकुळाच्या हितासंबंधी मला कोणीही काहीही सांगण्याची जरुरी नाही. तू तर त्या संबंधी मला काही शिकविण्याची गरजच नाही. माझ्या कुटुंबाच्या स्वास्थ्याबरोबर मी गोकुळाच्या सुरक्षिततेच्या विचारालाही तेवढेच प्राधान्य देणार हे तू नक्की समजून अस. मला काही कंसमहाराजांकडे जाऊन

तक्रार करण्याची हौस नाही. त्याचे होणारे संभाव्य दुष्परिणाम मलाही कळतात. परंतु मला जर गोकुळात न्याय मिळू शकला नाही तर मला नाईलाजानेच का होईना, पण कंसाकडे जावे लागेल, एवढेच माझे म्हणणे आहे.

कृष्णा, या पुढे तू व राधा एकमेकांना कधीच भेटणार नाही आणि एकमेकांशी कोणत्याही प्रकारे संबंध ठेवणार नाही, असे वचन तू मला देत आहेस. परंतु तुझा भरवसा तरी धरावा कसा? कारण दिलेले वचन मोडणे हा तर तुझा सहज स्वभाव आहे. तुझे काहीच खरे नसते. राधेवरील तुझे प्रेम तरी खरे आहे काय? एकीकडे तुमचे अत्यंत प्रेमाचे संबंध आहेत असे तुम्हीच म्हणता, तर आता यापुढे एकमेकांना कधीही भेटणारच नाही असेही तूच म्हणतोस. तुमचे जर खरे प्रेम असते तर एकमेकांपासून दूर राहण्याची अशी भाषा तू बोललाच नसतास. तेव्हा राधेवरचेही तुझे प्रेम खरे नाहीच. प्रेम या नावाखाली सुखाचाच अनुभव तू घेतला असणार आणि नंतर त्या सुखाचा कंटाळा आल्यामुळे आता राधेला तेवढ्याच सहजतेने सोडून द्यायलाही तू तयार झालेला आहेस. यावरून राधेच्या प्रेमाबाबतही तू किती प्रामाणिक व केवढा गंभीर आहेस हेच उघडकीस येत आहे. मला वाटते की राधेच्या आता तरी हे लक्षात येईल आणि तिचे डोळे पूर्णपणे उघडतील. कारण तुम्ही एकमेकांना भेटणार नाही हा निर्णय केवळ तुझाच आहे. राधेने तसे कुठे ठरवले आहे? तुझा निर्णय राधेने मान्य केला आहे का? अर्थात या बाबत तिला काही पर्यायच नाही म्हणा. कारण तू 'हो' म्हटलेस की 'हो' आणि तू 'नाही' म्हटलेस की 'नाही' असेच तिला म्हणावे लागणार. तुझ्या मनाच्या लहरीप्रमाणेच राधेला ठरवावे लागणार. आता तुलाही राधा नकोशी झालेली दिसते. एकंदरीत तुलाही तिचा कंटाळाच आलेला दिसतो. त्यामुळेच राधेला न भेटण्याचा निर्णय तू अगदी सहजपणे घेतलेला दिसतोस.''

अनयाचे असे उपहासात्मक व छद्मीपणाचे बोलणे आणखी किती तरी वेळ चालूच राहिले असते. पण त्याचे बोलणे मध्येच थांबवत कृष्ण थोड्याशा त्वेषानेच अनयाशी बोलू लागला, ''अरे अनया, थांब. यापुढे एक चकार शब्दही बोलू नकोस. कारण तू कितीही वेळ बोलत राहिलास तरी तुझ्या मनातील घाणीचा काही निचरा होणे शक्यच नाही. एखाद्या मद्य प्यायलेल्या मनुष्याला विंचवाने डंख करावा अशीच तुझी अवस्था झालेली आहे. तू नुसताच बरळत नाहीस, तर त्यातून तुझ्या मनातील गरळही ओकत आहेस. ते आणखीन कितीही जरी तू ओकलेस तरीही तुझे मन कधीच स्वच्छ होणार नाही. कारण तुझ्या अंगातच हे द्वेष मत्सराचे विष भिनलेले आहे. खरे तर, मला तुझी कीवच वाटते. पण त्याहीपेक्षा तुझ्या ठिकाणच्या या विषाचा त्रास येथे जमलेल्या लोकांना आणि विशेषतः राधेला, तुझे बोलणे ऐकताना होत आहे. त्यांची दया येऊनच मी तुझ्याशी हे बोलणे करीत आहे. नाही तर तुझे हे असंबद्ध बोलणे हे मुळी दखल घेण्याच्याही लायकीचे नाही हे लक्षात ठेव. मी तुझ्याशी बोलत आहे म्हणजे तुझ्या बोलण्याला मी काही महत्त्व देत आहे असे मुळीच नाही. परंतु एक मनोरुग्ण म्हणून जेव्हा मी तुझ्याकडे पाहतो तेव्हा तुझ्यावरील मूळच्या आपलेपणापोटी मला तुझी कणवच येते आणि केवळ म्हणूनच मी तुझ्याशी बोलण्याचे करीत आहे, याची जाणीव ठेव.

अनया, तुझी मुळात एकच अडचण आहे, ती म्हणजे शारीरिक विषय सुखालाच तू प्रेम समजत आहेस आणि ते सुख देणाऱ्या व्यक्तीला, म्हणजे पत्नीला केवळ एक उपभोग्य वस्तूच मानत आहेस. साहजिकच मग ती वस्तू आपल्याच मालकीची असावी असा तुझा प्रयत्न आहे. त्या साठीच मग तुला आपला मालकी हक्क वारंवार गाजवणे आवश्यक वाटते. परंतु एखाद्याला बाह्यांगाने एक वेळ बांधून ठेवता येईल, परंतु त्याच्या मनावर ताबा मिळवणे कसे शक्य होईल? दुसऱ्याच्या मनाला वश करणे केवळ त्याच्या प्रेमामुळेच शक्य असते. अन्यथा ती केवळ बाह्यांगाचीच बळजबरी ठरते. ती सुद्धा एखाद्यावर काही काळापुरतीच करता येणे शक्य आहे. कारण एखाद्याच्या सहनशक्तीचाच जर अंत झाला, तर तो मग विरोध करणारच आणि क्वचित प्रसंगी त्याच्याकडून बंडही घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्वच काही आपले नशिबाचे भोग समजून स्वस्थ बसतील आणि परिस्थितीला शरण जातील असे नव्हे. व्यक्तीला जर मानसिक व भावनिक स्वातंत्र्य नसेल तर मग मनुष्य व जनावर यात काही फरकच राहणार नाही. दुसऱ्याला जनावर समजणे आणि त्याला तसे वागवणे हे मनुष्याच्या ठिकाणचे अज्ञान नव्हे, तर ती त्याच्या ठिकाणची पशुवृत्तीच आहे.

अनया, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव. खरे प्रेम जेथे आहे तेथे केवळ सुखाचा भोग नसतो, तर तेथे दुसऱ्यासाठी केवढातरी त्यागही घडू शकतो. दुसऱ्याचे सुख, त्याचे स्वास्थ्य, त्याचे हित यासाठी असा त्याग अगदी सहजपणे घडतो, हेच तर खऱ्या प्रेमाचे लक्षण आहे. पण या गोष्टी तुला सांगणे म्हणजे केवळ पालथ्या घड्यावर पाणी ओतल्यासारखेच आहे. सांगूनही तुला या गोष्टी समजतील अशी अपेक्षा करणे म्हणजे एखाद्या भाकड गाईला पान्हा फुटेल अशीच अपेक्षा करण्यासारखे आहे. एक वेळ, सशाचे शिंग रानावनात शोधले असता सापडू शकेल, मृगजळाचे पाणी पिऊन तहान भागू शकेल, वाळूचे कण रगडून तेल मिळू शकेल, परंतु तुझ्यासारख्या वासनेच्या मळात रुतून बसलेल्यांच्या मनाचे समाधान कदापिही करता येणे शक्य नाही. कारण त्या घट्ट झालेल्या मनाने काहीही समजून घेण्याची द्वारे हट्टाने बंद करून ठेवलेली असतात. माझ्या रागावण्याचा तुला निश्चितच राग येईल याची मला खात्री आहे. परंतु हा राग तू माझ्यावर केलेल्या आरोपांमुळे मला आलेला नाही, तर तू राधेवर म्हणजे प्रत्यक्ष स्वतःच्या पत्नीच्या चारित्र्यावर जे शिंतोडे उडवीत आहेस त्याच्यावरती माझा आक्षेप आहे. त्याच्यासाठी हा माझा राग आहे.

आपल्या पत्नीच्या भावनांना जाणून घेऊन तिच्या अब्रूचे रक्षण करायचे तर राहिले बाजूलाच, उलट तिच्या शीलाची शंका घेऊन सर्वांसमक्ष तिचे चारित्र्य हनन करताना तुला मनाची तर नाहीच, पण जनाचीही लाज वाटली नाही, एवढा तू खालच्या पातळीवर गेलेला आहेस. राधेवरील केवळ आपले स्वामित्त्व गाजवण्यासाठीच तुझा हा आटापिटा आहे आणि त्यासाठी राधेचा अवमान झाला वा तिची बेअब्रू झाली तरी तुला त्याची तमा वा फिकीर नाही, एवढी तुझी अधोगती झालेली आहे. मला तर तुझी अत्यंत दयाच येते. परंतु अशी दयनीय अवस्था होणे ही काही कौतुकाची गोष्ट नव्हे, तर त्यासारखी लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणतीही नाही.

पण अनया, एक गोष्ट मला तुला तुझ्यावरील आपलेपणापोटी पुन्हा सांगावीशी वाटते, की अजूनही स्वतःला सावर. मनाचा हट्टीपणा बाजूला कर आणि पुन्हा मोकळ्या मनाने सर्व गोष्टींकडे पाहायला सुरुवात कर, तर तुलाही हे खरे प्रेम कळेल. तुलाही या खऱ्या प्रेमाचा अनुभव घेता येईल आणि मग तुलाही खरा आनंद प्राप्त होईल हे निश्चित. त्या परमेश्वराने तुला सुबुद्धी द्यावी हीच माझी त्या परमेश्वराकडे मनःपूर्वक प्रार्थना!

अनया, हे सर्व बोलणे आता राहू दे. कारण या विषयावर आपण कितीही बोललो तरी ते कमीच आहे. बरे, मन मोकळे असल्याशिवाय या बोलण्याचा काहीही उपयोग होणार नाही हेही खरेच आहे. मुख्य म्हणजे, तुझ्या मानसिक स्वास्थ्यासाठी व गोकुळाच्या हितासाठी आपण जो निर्णय घेतला आहे तोच मान्य करूया. त्यातच सर्वांचे स्वास्थ्य व हित आहे याची मला तरी खात्री आहे. तू जर नीट विचार केलास तर तुलाही माझे म्हणणे पटेल. त्यातूनही तुझ्या मनात शंका असली, तरी सुद्धा मला वाटते की आपण घेतलेला निर्णय प्रत्यक्ष अमलात आणून बघायला काहीच हरकत नाही. त्यातूनही तुला पुन्हा काही शंका आली किंवा घेतलेल्या निर्णयात आणखीन काही बदल करावा असे जर तुला वाटले, तर तसा बदल आपल्याला या निर्णयात केव्हाही करता येईल. हा निर्णय अंतिम नाही अशी मी तुला हमी देतो. कोणत्याही परिस्थितीत तुझ्या मनाचे पूर्ण समाधान होईल असाच निर्णय असेल असे मी तुला खात्रीपूर्वक सांगतो.

अनया, आणखीन एक गोष्ट पुन्हा तुला आपलेपणाने सांगावी सारखी वाटते, की तू किंवा राधा किंवा तुमचे कुटुंब यांनी गोकुळ सोडून दुसरीकडे कोठेतरी जाण्याचा जरासाही विचार मनात अजिबात आणू नकोस. अरे, त्याच्या नुसत्या कल्पनेनेच मलाच काय, आम्हा सर्वांनाच अत्यंत वाईट वाटते. माझे मन तर अत्यंत गलबलूनच आले. ईश्वराच्या नियतीनेच आपण सर्व एकत्र आलेलो आहोत, तर त्याच्या इच्छेनुसार आपणही सर्वजण आज तसेच एकत्र व एकोप्याने राहूया. अरे, ईश्वराच्या नियतीत पुढे काय होणार आहे हे तर कोणालाच माहीत नाही. काय सांगावे, त्याच्या नियतीत एखादे वेळेस मलाही हे गोकुळ सोडून जावे लागेल. कारण ईश्वरेच्छा हीच अंतिम असते. परंतु आपण स्वतःहून असे काही न करता सर्वांनी आपलेपणाने या गोकुळातच प्रेमाने नांदावे अशी माझ्यासह सर्वांचीच अगदी प्रामाणिक इच्छा आहे. मला खात्री आहे की तुझीही इच्छा तीच असणार आणि तुझा निर्णयही तोच असणार!''

कृष्णाच्या बोलण्याने अनय थोडासा वरमला आणि बाह्यांगाने का होईना, पण शांत झाल्यासारखा दिसत होता. त्याच्यातील झालेला हा बाह्य बदल नंदाच्याही लक्षात आला आणि त्याचा योग्य फायदा करून घेण्यासाठी नंद स्वतः अनयाशी शांत व समजुतीच्या सुरात बोलू लागला.

''अरे अनया, मला तरी कृष्णाचा निर्णय योग्य व रास्त वाटतो. तू कृष्णाविषयीचे तुझे व्यक्तिगत मत व राग थोडावेळ तुझ्या मनातून बाजूला कर. म्हणजे कृष्णाचे बोलणे किती संयुक्तिक आहे हे तुझ्याही लक्षात येईल. सर्व गोकुळच्या हिताचा व्यापक विचार करताना वैयक्तिक राग, लोभ हे बाजूलाच ठेवावयास हवेत. तेव्हा निर्णय केवळ कृष्णाने घेतलेला आहे म्हणून तो न नाकारता, तो निर्णय योग्य व रास्त आहे हे जाणून आपण त्याचा स्वीकार करूया. आता त्या

निर्णयाची अंमलबजावणी योग्य प्रकारे होईल की नाही याची जी तुला शंका आहे, ती दूर होण्यासाठी त्याची हमी मी स्वतः घेतो. या निर्णयाची पूर्ण जबाबदारी माझी आहे असे मी तुला खात्रीपूर्वक आश्वासन देतो. मग तर झाले? तेव्हा झाले गेले सर्व विसरून तू राधेला घेऊन शांत मनाने आपल्या घरी जा आणि पुन्हा आपले जीवन सुखाने जगण्यास तुम्ही उभयता सुरुवात करा.''

नंदाच्या विवेकयुक्त बोलण्याने तेथे जमलेल्या सर्वांचीच मने सुखावली आणि शांत झाली. अनयाच्या चेहऱ्यावरूनही त्याच्या मनातील राग पुष्कळसा निवळल्यासारखा दिसला. परंतु एवढ्या दीर्घ काळापर्यंत एका जागी मान खाली घालून शांतपणे उभी असलेली राधा अचानकपणे पुढे आली. नंदाला दोन्ही हात जोडून राधेने नमस्कार केला आणि ती तिच्या हळुवार आवाजात पण ठामपणे बोलू लागली.

''हे नंदराजा, प्रथम मी तुम्हाला आदरपूर्वक प्रणाम करते त्याचा स्वीकार करावा. येथे मगाच पासून बराच वेळ पुष्कळ बोलणे झाले आहे. माझे पती अनय हे बरेच बोलले, त्या नंतर कृष्णही बराच वेळ बरेच काही सांगत होता आणि नंदराज, शेवटी तुम्हीही तुमचे म्हणणे सांगितलेत. परंतु या सर्व बोलण्यातून ज्या माझ्याविषयी व माझ्यासंबंधी बोलणे झाले, त्या मला बोलायला काही संधीच मिळालेली नाही. तशी संधी मिळण्याची येथे शक्यताही दिसत नाही. मला तर त्या विषयी कोणीही काहीही विचारतच नाही. पण माझे विचार, माझ्या मनातील भावना आणि माझे म्हणणे ऐकून घेतल्याशिवायच घेतलेला निर्णय हा खरा न्याय करूच शकणार नाही. तेव्हा माझे म्हणणे सांगण्याची आणि माझे मन मोकळे करण्याची संधी मला आहे की नाही? त्यासाठी मला तशी परवानगी मिळणार आहे की नाही? तेवढा माझा हक्क या गोकुळाची एक नागरिक म्हणून आहे ना? या सर्व प्रसंगातील माझीही जी भूमिका आहे ती मांडण्याची मला परवानगी द्यावी अशी मी तुम्हाला आदरपूर्वक विनंती करते. त्या विनंतीचा स्वीकार व्हावा हीच प्रार्थना.''

राधेने असे अचानक व अकल्पितपणे केलेले बोलणे ऐकून सर्वच जण चकित झाले. जमलेले सर्वजण आपापसात आधी हळुहळू पण नंतर मोठ्याने कुजबुजू लागले. सर्वांच्या देखत राधेने असे उघडपणे बोलणे हेच अनेकांना त्यांच्या अवमानाचे वाटले आणि त्याच्या निषेधाचा सूर सर्वांच्या आवाजातून स्पष्टपणे जाणवू लागला. अनयाचा चेहरा तर पुन्हा रागाने लाल लाल होऊ लागला. यशोदाही राधेकडे चकित मुद्रेने व कुतूहलाने बघू लागली. कृष्णाच्या मुखावर मात्र गंभीरतेचे भाव पसरून राहिले. परंतु नंदाच्या मुद्रेवर मात्र कौतुकाचे भाव आले. इतर कोणाच्या काही प्रतिक्रिया व्यक्त होण्याच्या आधीच नंद राधेला उद्देशून हसून म्हणाला,

''राधे, जरूर, जरूर! तुला अशी संधी का बरे मिळणार नाही? नक्कीच मिळेल. खरे म्हणजे काहीही निर्णय घेण्याच्या आधीच तुझी बाजू ऐकून घेणे आवश्यकच होते. कारण त्या शिवाय घेतलेला निर्णय अपुराच राहिला असता आणि झालेला न्यायही अधुराच ठरला असता, हे तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. न्याय निवाडा करण्याच्या प्रक्रियेत माझ्याकडून केवढी तरी त्रुटी नकळतपणे का होईना पण राहून जात होती. परंतु राधे, त्याची पूर्ती तू आपलेपणाच्या हक्काने करून

घेतलीस याचे मला अत्यंत समाधान आहे. खरेच तुझे निश्चितपणे मला अतिशय कौतुकच वाटते. तेव्हा आता तू तुझे म्हणणे निःशंकपणे व मोकळेपणाने सर्वांसमोर प्रगट कर. माझे तुला पूर्णपणे अभय आहे. तू जराही न घाबरता व संकोच न बाळगता तुझे मन मोकळे कर. तुझे म्हणणे ऐकून घेतल्यावरच मी माझा अंतिम निर्णय सांगेन. तुलाही योग्य तो न्याय मिळेलच मिळेल असे मी तुला आश्वासन देतो.''

नंदाच्या या बोलण्याने अनयाच्या रागाचा पारा अधिकच वर चढला. परंतु काहीही बोलता येणे शक्य नसल्याने तो फक्त मनातल्या मनातच धुसफुसत राहिला. कृष्णाच्या मुखावरील राधेच्या कौतुकाचे व खात्रीचे भावही आता स्पष्टपणे दिसू लागले. बाकी जमलेल्यांची थोडीशी नाराजी जरी लपून राहिली नाही, तरी त्यांच्या ठिकाणची उत्सुकताही वाढल्याचे उघडपणे दिसू लागले. राधेच्या मनालाही धीर आला आणि आपले सर्व धैर्य एकवटून ती थोडीशी पुढे आली आणि सावकाश पण निश्चयात्मक सुरात बोलू लागली.

''हे नंदराज, सर्वांत प्रथम एक गोष्ट मी निःसंदिग्धपणे मान्य करते की माझे व कृष्णाचे प्रेमसंबंध आहेत ही गोष्ट अगदी खरी आहे. त्याविषयी माझ्या मनात कोणतीही अपराधाची भावना तर नाहीच. परंतु मला त्याचा सार्थ अभिमानच आहे. कृष्णाची व माझी भेट झाली हे तर मी माझे मोठे भाग्यच समजते. त्यातूनही त्याचे प्रेम मला अनुभवायला मिळाले ही तर माझ्यावर ईश्वराची कृपाच आहे असेच मी समजते. सर्वांविषयी असलेला आपलेपणा हा तर कृष्णाचा स्वभावच आहे. त्याच्या त्या स्वभावानुसार त्यानेच पुढाकार घेऊन माझ्याशी जवळीकता साधली हेही खरे आहे. माझ्याशी मैत्रीसुद्धा त्यानेच जुळवली. एक गोष्ट खरी आहे की माझ्यावर असलेल्या आधीच्या संस्कारामुळे मला सुद्धा कृष्णाचे हे मोकळेपणाचे वागणे मानवत नसे आणि म्हणूनच आवडतही नसे. परंतु कृष्णाचे प्रेम अनुभवता अनुभवता जेव्हा मला त्याच्या मनातील अत्यंत स्वच्छ व निर्मळ भाव दिसू लागले तेव्हा मग माझ्याही मनातील गैरसमज दूर होऊ लागले. माझ्या मनाचा संकुचित स्वभावही बदलू लागला आणि माझे मन अधिकाधिक मोकळे होऊ लागले. तसे तसे कृष्णाचे प्रेम मला अधिकाधिक मिळू लागले आणि कळू लागले. आत्तापर्यंत प्रेम या नावाखाली आपल्याकडून केवळ देहसुखच ओरबाडून घेतले जाते असा अनुभव असताना, आपल्यालाही सुखवणारे व आपल्या मनाच्या भावनांनाही जाणून त्यांचा आदर करणारे प्रेम असू शकते हे मला तर कृष्णाच्या सहवासातच प्रथम अनुभवाला आले.

हे नंदराज, आम्हा स्त्रियांकडे पाहण्याची पुरुषांची नजर कशी असते याचा अनुभव आम्हा स्त्रियांना, आपण स्त्री आहोत हे कळायला लागल्यापासूनच येऊ लागतो. सर्वांच्या नजरा आम्हाला एकच गोष्ट कळीत करीत असतात, की आम्ही नेहमी दुसऱ्यांच्या सुखासाठीच आहोत. आम्ही सदैव त्यागच करायचा असतो. आई वडिलांसाठी सुद्धा एका ठराविक वयानंतर आम्ही ओझेच होऊन राहतो. आम्ही 'परक्याचे धन' आहोत याच दृष्टीने ते आमच्याकडे पहात असतात आणि केव्हा एकदा आमचे लग्न करून आम्हाला दुसऱ्या घरात पाठवतो असेच त्या सर्वांना झालेले असते. सासरी आल्यावर सासरच्या माणसांची सेवा करण्यासाठीच आमचे जीवन आहे. पतीलाच परमेश्वर मानून तो म्हणेल तेव्हा त्याला देहसुख

देऊन त्याच्या वासनांची पूर्ती करायची आणि त्यातून जन्माला येणाऱ्या मुलाबाळांचे संगोपन करून त्यांना वाढवायचे, हेच आमचे जीवन असेच आम्हाला सांगण्यात येते. तसेच आम्हाला वागवले जाते आणि तसेच आम्हाला वाढवलेही जाते.

या पार्श्वभूमीवर मला आणि माझ्यासारख्या अनेकांना कृष्णाच्या सहवासात खऱ्या प्रेमाचा अनुभव आला आणि आम्ही खरेच धन्य झालो. मुख्य म्हणजे कृष्णाने आम्हाला आमच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव करून दिली. पण त्याचबरोबर आमच्या नैसर्गिक, भावनिक व कौटुंबिक जबाबदारीच्या मर्यादांची जाणीव करून देण्यासही कृष्ण विसरला नाही हे सर्वांत महत्त्वाचे आहे. त्यामुळेच आज आम्ही आमच्या कुटुंबात आदर्श पत्नी, आदर्श सून, आदर्श माता व एक आदर्श गृहिणी म्हणून वागत आहोत. आमची सर्व कर्तव्यकर्मे आम्ही अत्यंत योग्य प्रकारे व आपलेपणाने करीत आहोत आणि त्यात जराही काही कमतरता आमच्याकडून जाणून बुजून घडत नाही, याचे सर्व श्रेय कृष्णाच्या प्रेमाला आहे हे मी अगदी निःसंदिग्धपणे सांगते. कृष्णाच्या प्रेमामुळेच असे वागणे आम्हाला शक्य होते ही गोष्ट अगदी खरी आहे. मग जर कुणी कृष्णाच्या अशा प्रेमाला नावे ठेवू लागला आणि त्या प्रेमाच्या हेतूविषयी शंका घेऊ लागला, तर असा संशय ज्याच्या मनात आला त्याचेच मन अस्वच्छ व मलिन आहे याची अगदी नक्की खात्री बाळगावी.

हे नंदराज, कृष्णाने आम्हाला व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व सांगितले आणि त्यासाठी तो सतत आग्रह धरीत राहिला हेही खरे आहे. परंतु हे व्यक्तिस्वातंत्र्य केवळ ईश्वराच्या भक्तीसाठीच आहे याचे मात्र तो वारंवार स्मरण करून देत आला. खरे तर, ईश्वराचे अस्तित्व, ईश्वराची सत्ता, ईश्वराची भक्ती असे मोठे मोठे व कठीण शब्द मी तरी प्रथम कृष्णाच्याच मुखातून ऐकले. त्याचा शब्दार्थ माझ्या सारख्या अल्पमतीला केव्हाही कळणे शक्यच नव्हते. परंतु ईश्वर म्हणजे निर्भय, निर्मोही, निरपेक्ष असे ईश्वराचे वर्णन जेव्हा कृष्ण सांगत असे तेव्हा माझ्या नजरेसमोर फक्त कृष्णाचीच मूर्ती येत असे. कारण हे सर्व गुण मला तर कृष्णाच्या प्रत्यक्ष सहवासातच पाहायला मिळत होते. त्यातूनही कृष्ण जेव्हा ईश्वरी प्रेमाची महती सांगत असे तेव्हा तर माझी अगदी खात्रीच होई, की असे प्रेम तर प्रत्यक्ष कृष्णाचेच आहे. कारण ईश्वराच्या प्रेमाची असलेली लक्षणे म्हणजे 'सर्वांविषयी आत्यंतिक आपलेपणा, सर्वांच्या विषयी असलेला कळवळा, सर्वांच्या सुखदुःखाच्या भावनेशी समरसता आणि प्रत्यक्ष धावून जाऊन दुसऱ्याला प्रसंगात साथ व मदतीचा हात देणे' अशी जी लक्षणे कृष्ण वारंवार सांगत असे, ती सर्व लक्षणे मला तर नेहमी कृष्णाच्या ठिकाणीच दिसत असत.

कृष्णाचे तसे प्रेम त्याच्या सहवासात मी तर सदासर्वकाळच अनुभवत आले. ते प्रेम कळायला मला वेळ लागला तो माझ्या मनातील दोषांमुळे. परंतु जसे जसे हळुहळू ते प्रेम घेता घेता मला कळायला लागले, तेव्हा तर माझी खात्रीच झाली की ईश्वराचे प्रेम म्हणून जे काही म्हणतात ते म्हणजे कृष्णाचेच प्रेम होय. त्या भावाने मग कृष्णाकडे पहाता पहाता माझ्या ठिकाणी या कृष्णाविषयी कधी प्रेम निर्माण झाले ते माझे मलाही कळले नाही. परंतु ते प्रेम निर्माण झालेले आहे ही गोष्ट मात्र हजार हिश्शांनी खरी आहे आणि मी एक गोष्ट अगदी स्पष्टपणे सांगते की त्या प्रेमाचा मला सार्थ अभिमान आहे.

त्यात कोणताही कमीपणा, संकोच वा लाज वाटण्याचे काही कारणच नाही.  उलट माझे तर ते अत्यंत भाग्यच आहे. माझ्यावर तर त्या ईश्वराची कृपाच आहे असेच मी समजते.

हे नंदराज, मी जे कृष्णाविषयी बोलत आहे ते आपणच नक्की समजू शकाल याची मला खात्री आहे.  कारण कृष्ण हा सामान्य व्यक्ती नाही हे तुम्हालाही माहीत आहे.  मगाचपासून तुम्ही जे कृष्णाविषयी बोलत होतात त्यावरूनच माझ्या तरी हे लगेचच लक्षात आले.  कृष्णाची थोरवी आपण खऱ्या अर्थाने जाणून आहात.  खरे तर, कृष्णाचे हे असामान्य गुण आणि त्याचा पराक्रम हा आपण सर्वांनीच कित्येक वेळा अनुभवलेला आहे.  परंतु आपल्याला त्याचे स्मरण राहत नाही. कंसाने गोकुळावर वेळोवेळी पाठवलेल्या राक्षसांचा कृष्णाने ज्या पद्धतीने व ज्या सहजतेने आणि तेही एवढ्या लहान वयात वध केला, त्या पराक्रमाचे अनुकरण कोणत्याही वयाने मोठ्या असलेल्या मनुष्यालासुद्धा कधीही करता येणे शक्य नाही. नुकताच घडलेला मुसळधार पावसाचा घोर संकटाचा प्रसंग जर आपण आठवला, तर त्या निमित्ताने गोकुळच्या रक्षणासाठी कृष्णाने घेतलेल्या अपार कष्टांना तर तोडच नाही.  त्यावेळी प्रगटलेल्या कृष्णाच्या रूपाचे तर आपल्याला कधीच विस्मरण होऊ शकणार नाही.  त्यावेळची त्याची निर्भयता, निश्चयात्मकता आणि निर्णायकता ही तर त्याच्या ठिकाणी असलेल्या ईश्वरी शक्तीचीच लक्षणे आहेत असा माझा तरी ठाम विश्वास आहे.  यापेक्षा दुसरे कोणते त्या ईश्वराचे रूप असू शकेल असे मला तरी वाटत नाही.  कृष्णाची ही थोरवी जर कोणाला दिसत नसेल तर त्याला अंधच म्हणावे लागेल आणि कृष्णाची ही महती जर कोणाला कळत नसेल तर त्याला बुद्धी असूनही नसल्यासारखीच आहे.

हे नंदराज, अशा या थोर कृष्णाचे मनही तेवढेच थोर आहे.  त्याची कोणी निंदा केली किंवा त्याला दुरुत्तरे केली तरी त्याच्या ठिकाणी कोणाविषयीही राग नाही.  कोणाविषयी त्याच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची कटुता नाही.  किंबहुना कृष्णाच्या ठिकाणी काहीही वाईट गोष्टी नाहीत असे म्हणणे सुद्धा त्याला अवमानकारक आहे.  सर्वांच्या विषयी सदासर्वदा आपलेपणाची व प्रेमाचीच भावना त्याच्या ठिकाणी आहे एवढे त्याचे मन प्रेमळ व मोठे आहे.  म्हणूनच मी म्हणते की खरे तर कृष्णाचे माहात्म्य थोर आहे म्हणजेच त्याचे प्रेम थोर आहे.  कारण कृष्ण आणि त्याचे प्रेम हे एकच आहेत.  त्यांना वेगळेपणाने पाहता येणारच नाही आणि वेगळे करताही येणारच नाही.  कृष्णाची अशी थोरवी जाणल्यानंतर आणि प्रत्यक्ष अनुभवल्यानंतर त्या कृष्णाविषयी मनात प्रेम निर्माण न झाले तरच नवल आहे.  कृष्णाचे प्रेम अनुभवल्यानंतर त्याच्याविषयी प्रेम निर्माण होणे हे अगदी साहजिकच आहे आणि तसे प्रेम कृष्णाविषयी माझ्या ठिकाणी निर्माण झालेले आहे असे सांगताना मला कोणताही संकोच वा कोणाचीही भीड वाटत नाही.

माझ्यासाठी तरी कृष्ण हा माझा 'ईश्वरच' आहे.  बाकी ज्याला आपण पाहू शकत नाही, ज्याच्याशी आपण बोलू शकत नाही अशा त्या व्यापक ईश्वराचा मला काय उपयोग आणि माझा तरी त्याला काय उपयोग?  परंतु या कृष्णरूप ईश्वराशी मी बोलू शकते.  माझे सुखदुःख त्याला सांगू शकते.  त्याचे मार्गदर्शन घेऊन वागू शकते आणि माझ्यात योग्य ते बदलही करू शकते.  त्याच्या प्रेमामुळेच माझ्या मनातील दोष नाहीसे होत राहिले.  माझ्या ठिकाणी कोणाविषयी राग नाही,

द्वेष नाही, मत्सर नाही, आकस नाही. परंतु कृष्णाचे मन व प्रेम जे समजू शकत नाहीत त्यांच्याविषयी मला दया मात्र जरूर येते आणि केवढ्या मोठ्या संधीला ते मुकत आहेत याचे अत्यंत वाईटही वाटते. पती म्हणून माझे अनयांवरील प्रेम कायम आहे. सासूबाईंविषयीसुद्धा मला तेवढाच आदर व प्रेम आहे. खरे तर, कृष्णप्रेमामुळे मला खरे प्रेम मिळाले आणि खरे प्रेम म्हणजे काय हे कळाले आणि त्याच प्रेमाने माझे सर्वांशी वागणे नेहमी घडते आणि तसेच ते घडत राहणार. परंतु या सर्वांहून माझ्या ठिकाणी असलेले कृष्णप्रेम अत्यंत वेगळे आहे आणि ते तसेच नेहमी वेगळे राहणार याला माझाही ईलाज नाही. अर्थात ईलाजाची आवश्यकता असायला कृष्णप्रेम हा काही रोग नाही. खरे तर कृष्णप्रेम हे मनाच्या सर्व रोगांवरील अत्यंत परिणामकारक असे औषध आहे. अत्यंत गोड असे ते रसायन आहे. त्याच्या सेवनाने मन नित्य शांत व तृप्त रहाते. त्यामुळे कोणत्याही वाईट गोष्टींना त्या मनात वाव आणि थाराच रहात नाही.

हे नंदराज, मला ठाऊक आहे की मी पुष्कळच बोलले आहे. परंतु केव्हातरी हे सर्व सांगणे मला आवश्यकच होते. बराच वेळ सर्व सहन करून किंवा त्याकडे दुर्लक्ष करून मी स्वस्थच राहिले होते. परंतु आपण मला संधी अगदी योग्य वेळी दिलीत म्हणूनच मी एवढे बोलू शकले. केवळ आपणच मला समजून घ्याल या खात्रीनेच मी बोलण्याचे एवढे स्वातंत्र्य घेऊ शकले आणि एवढे धैर्यही दाखवू शकले.

सर्वांत शेवटी मला एकच महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे, की ज्या कृष्णाच्या प्रेमामुळे माझ्या ठिकाणी कृष्णाविषयी प्रेम निर्माण झाले ते तेवढ्याच सहजतेने कृष्णासाठी म्हणून कृष्णाकडेच वाहत राहते. त्यासाठी मग ते कृष्णप्रेम वेगवेगळया माध्यमांचा स्वतःहूनच शोध घेत राहते. कृष्णाचा सहवास करणे, त्याच्याशी बोलणे, त्याची भेट घेणे, त्याच्या प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे वगैरे गोष्टी मग अगदी सहजपणे घडत राहतात. कृष्णाला लिहिलेली पत्रे हे सुद्धा एक असेच माध्यम आहे. त्याद्वारेच माझे कृष्णावरील प्रेम मोकळे होऊन वाहते आणि कृष्णापर्यंत पोहोचून मला आनंदित करते. तेव्हा बाह्यांगाने त्या प्रेमावर जरी मर्यादा आल्या किंवा कोणी त्या घातल्या तरी त्या प्रेमाच्या आंतरिक प्रवाहाला कोणीही थांबवू शकणार नाही. अगदी कृष्णसुद्धा माझ्या ठिकाणच्या त्या प्रेमप्रवाहाला आवर घालू शकणार नाही. हे अगदी सत्य आहे.

म्हणून एक गोष्ट मी अगदी स्पष्टपणे सांगते की 'यापुढे आम्ही कधीही एकमेकांना भेटणार नाही, एकमेकांशी कोणताही संपर्क ठेवणार नाही' असा जो निर्णय कृष्णाने घेतला आहे तो सर्वस्वी त्याचा निर्णय आहे. मला तो मान्य होणे कधीही शक्य होणार नाही. कारण माझ्यासाठी तर ती मोठी शिक्षाच आहे. माझा जर काही गुन्हाच झालेला नाही तर मग मला ही शिक्षा का व कशाबद्दल? कृष्णाचा निर्णय मान्य करणे म्हणजे तर माझा गुन्हा मी कबूल करण्यासारखे आहे आणि माझ्याकडून तर काहीही अपराध वा गुन्हा घडलेलाच नाही याची मला पूर्ण खात्री आहे. तेव्हा मी कृष्णाला भेटत राहणार. त्याने फार तर मला भेटू नये.

अर्थात कृष्णावरील प्रेमामुळे मी त्याचा निर्णय बाह्यांगाने सुद्धा एक वेळ अंमलात आणीन. कारण मला ठाऊक आहे, की कृष्णाच्या ठिकाणी सर्व गोकुळच्या हिताचा विचार आहे. त्यामुळेच माझ्या बाबतीत कृष्ण असा निर्णय घेऊ

शकला. कारण मला माहीत आहे, कृष्ण कोणाच्या म्हणजे कोणाच्याही, अगदी माझ्याही मोहात नाही. कृष्णाचे हेच तर विशेषत्व आहे. तो स्वतः कोणाच्या मोहात नसतो आणि दुसऱ्या कोणालाही त्याच्या मोहात ठेवत नाही. त्यामुळे केवळ कृष्णप्रेमाच्या बळावरच मी जरी कृष्णाचा निर्णय आचरणात आणला, तरी त्याच बरोबर ही गोष्टही खरी आहे की कृष्णप्रेमाने भरलेले माझे मन कसे बरे स्वस्थ बसेल? तसे स्वस्थ बसणे माझ्या मनाला तर शक्यच होणार नाही. कृष्णाचे स्मरण व त्याच्या भेटीचा ध्यास हा माझ्या मनाच्या ठिकाणी राहणारच आणि त्या ध्यासाची पूर्तता करण्याचे प्रयत्नही माझ्याकडून अगदी सहजपणे घडत राहणारच. तेव्हा कृष्णाने जे वचन दिलेले आहे ते त्याने त्याच्या वतीने दिलेले आहे. त्याचे पालन करण्याचे मनोबळ त्याच्यापाशी निश्चित आहे. मी सुद्धा तसा प्रयत्न नक्की करीन. परंतु तसे आश्वासन मात्र मी देऊ शकत नाही. आपणच मला समजून घ्याल असा विश्वास मी बाळगते. केवळ आपलीच खात्री मी धरून आहे.''

राधेचे बोलणे जेवढ्या उत्स्फूर्तपणे सुरू झाले होते तेवढ्याच सहजतेने ते थांबलेही. किती वेळ राधा थोड्याशा आवेगाने व आवेशाने बोलत होती याचे भान तिलाही नव्हते आणि इतरांनाही नव्हते. गोकुळामध्ये असा प्रसंग प्रथमच घडत होता. एक स्त्री सर्वांसमक्ष जाहीररीत्या एवढा वेळ बोलत होती ही साधी गोष्ट तर नव्हतीच. एवढा वेळ राधा बोलत राहील असे कोणालाच काय, तिलाही वाटले नव्हते. सर्वांत नवलाईची व कौतुकाची गोष्ट म्हणजे राधेचे बोलणे केवळ भावनेचे, तेवढ्या वेळेपुरतेचेच नव्हते. त्यात केवळ भावनाविवशता नव्हती, तर राधेचे बोलणे अत्यंत निःसंदिग्ध आणि अगदी मुद्देसूद होते. तो केवळ तिच्या भावनांचा उद्रेक नव्हता, तर राधेच्या बोलण्यात भावपूर्णता होती. त्यामुळे राधेच्या बोलण्यातून तिच्या विचारांची स्पष्टता आणि सखोलता जाणवत होती. विषयांची मांडणी सुसूत्रपणे आपसूकच होत होती आणि त्याचाच परिणाम म्हणून राधेच्या बोलण्यात प्रवाहीपणा व प्रभावीपणा हे वक्तृत्वाचे गुण अगदी सहजपणे आलेले होते.

राधेचे बोलणे ऐकता ऐकता सर्वजण अगदी मंत्रमुग्ध झाल्यासारखे झाले होते. बराच वेळ सगळीकडे एक प्रकारची नीरव शांतता पसरून राहिली होती. तरी सर्वांच्या मनात निरनिराळे विचार येतच होते. कुणाला राधेने ज्या निर्भीडपणे आपली बाजू मांडली त्याचे कौतुक वाटत होते. कुणाला एक स्त्री असूनही राधा ज्या आत्मविश्वासाने बोलत होती त्याचे नवल वाटत होते. तर कुणाला राधेने असे चार चौघात आणि ते सुद्धा एवढ्या स्पष्टपणे बोलावे हे गैरच वाटत होते. तर कुणाला राधेने तिचे कृष्णावरचे प्रेम सरळ सरळ कबूल करावे हा निर्लज्जपणाच वाटत होता. परंतु सर्वजण अशा भिन्न भिन्न प्रतिक्रिया त्यांच्या मनातच धरून बसले होते. बाह्यांगाने कोणीही काहीच बोलत नव्हते. कारण तसे धैर्यच त्यांना होत नव्हते.

राधेच्या बोलण्याचे खरे कौतुक वाटत होते ते नंदाला. कृष्णाचे वेगळेपण जाणून असल्यामुळे राधेचे म्हणणे नंदाला समजत होते आणि पटतही होते. पण त्याचबरोबर त्याला हेही ठाऊक होते की राधेचे म्हणणे अनयाला कधीच मानवणार नाही आणि मान्यही होणार नाही. अनयापुढे नंदाचाही नाईलाजच होता. कारण अनयाच्या विचारांची पातळीच अगदी

खालच्या स्तरावरची होती. त्यामुळे राधेचे बोलणे जरी नंदाला योग्य वाटत होते, तरी सर्व गोकुळाच्या हिताच्या दृष्टीने कृष्णाने घेतलेला निर्णयच स्वीकारणे नंदाला आवश्यक होते. त्यासाठी राधेचे बोलणे ऐकत असताना वारंवार कौतुकाने व संमतीदर्शक माना डोलवणारा नंद प्रत्यक्षात मात्र काहीही न बोलता स्वस्थच बसून राहिला होता. परंतु त्याच्या मनातील राधेच्या कौतुकाचे भाव मात्र स्पष्टपणे त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतेच.

परंतु खरा आनंद झाला होता तो कृष्णाला! राधेच्या ठिकाणी कृष्णप्रेम किती सखोल आहे हेच तिच्या बोलण्यातून प्रगट होत होते. कृष्ण स्वतः आत्मविश्वासाने जाणून होता की त्याचे प्रेम हे ईश्वरी प्रेम आहे. त्यामुळे जरी राधा सारखे 'कृष्णप्रेम, कृष्णप्रेम' असे म्हणत असली तरी तिच्या ठिकाणी खरेतर ईश्वराचेच प्रेम निर्माण झालेले आहे याची पूर्ण खात्री कृष्णाच्या ठिकाणी होती. त्याचेच त्याला अत्यंत समाधान वाटत होते. कारण त्या ईश्वरी प्रेमाचे सर्व गुणधर्म राधेच्या ठिकाणी अगदी सहजपणे प्रतीत होत होते. तिच्या बोलण्यातील आत्मविश्वास, प्रवाहीपणा, मोकळेपणा, सखोलता, निर्भयता, निःसंदिग्धता हे सर्व अनुभवून कृष्णाचे मन अत्यंत प्रसन्न झाले. त्याने ओळखले की कृष्णाचे ईश्वरी प्रेम अनुभवण्यासाठी राधेला आता कृष्णावरही अवलंबून राहण्याची वेळ येणार नाही. अर्थात राधा अजूनही त्या ईश्वरी प्रेमाने परिपूर्ण झालेली नाही आणि म्हणून तिला कृष्णाच्या प्रत्यक्ष भेटीची ओढ ही साहजिकच कायम राहणारच, हेही कृष्ण जाणून होता. परंतु सद्य परिस्थितीत त्याने घेतलेला निर्णय हाच अधिक योग्य आहे याचीही खात्री त्याला असल्यामुळे कृष्णही न बोलता स्वस्थच बसून राहिला. तरीही राधेकडे बघून कृष्णाने प्रेमाने स्मित हास्य केले आणि कौतुकाने आपली मान डोलवली.

या स्तब्धतेचा भंग झाला तो अनयाच्या पुन्हा उच्चरवाच्या बोलण्यामुळे. नंद व कृष्ण यांच्या न बोलताही प्रगटलेल्या प्रतिक्रिया समजण्याएवढी समज अनयाच्या ठिकाणी नक्कीच होती. राधेच्या बोलण्याचा प्रतिवाद करणे वा त्याला प्रत्युत्तर देणे हे तर अनयाला जमलेच नसते. एकतर तेवढी बुद्धी त्याला नव्हती आणि दुसरे म्हणजे मनाचा असलेला हटवादीपणा. त्यामुळेच स्वतःच्या भूमिकेलाच चिकटून राहण्यापलीकडे अनयाला दुसरे काहीच करता येणे शक्य नव्हते. राधेचे बोलणे ऐकतानाच खरे तर अनयाचा संताप वाढत होता. त्यातूनच राधेच्या बोलण्याचे नंदाला कौतुकच वाटत आहे हे लक्षात आल्यावर तर अनय अधिकच चिडला आणि त्याच्या मनाची सर्व चिडचिड साहजिकच त्याच्या शब्दा शब्दांतून व्यक्त होऊ लागली.

''वा, नंदराज, तुमची सुद्धा अगदी कमाल आहे. येथे राधेच्या निर्लज्जपणाचा कळस होत आहे आणि तुम्ही अगदी स्वस्थ बसून त्याला उलट वरती दादच देत आहात. एक विवाहित स्त्री आपल्या पतीपेक्षा दुसऱ्या पुरुषावर आपले प्रेम आहे असे स्पष्टपणे कबूल करते आणि तेही सर्व लोकांच्या साक्षीने. तिचे बोलणे ऐकताना खरे तर आम्हा सर्वांच्याच माना शरमेने खाली जात होत्या. कृष्णाच्या प्रेमाशिवाय आणि त्याला भेटल्याशिवाय मी जगू शकत नाही असे ही बाई अगदी राजरोसपणे सांगते आणि तुम्ही शांत राहून उलट तिचे कौतुक करता याला काय म्हणावे बरे? कृष्णाला तर मनातून आनंदाच्या

उकळ्याच फुटत असाव्यात हे तर त्याच्या चेहऱ्यावरूनच दिसत आहे. त्याचेही बरोबरच आहे म्हणा! कारण राधेने तर त्याला अगदी देवच करून ठेवला आहे. काय तर म्हणे कृष्ण हा ईश्वरस्वरूप आहे! मग हे ऐकून कृष्णाला खुशी वाटली तर त्यात नवल ते काय?



परंतु माझ्या दृष्टीने तर राधेचे बोलणे केवळ तिच्या दुर्बल मनाचे आणि त्यातून तिच्या ठिकाणी निर्माण झालेल्या विपरीत व दूषित भावनेचेच द्योतक आहे. कारण राधेच्या मनातून काही झाले तरी कृष्णाचे प्रेम नाहीसे होणारच नाही हे तर ती स्वतःच अगदी निर्लज्जपणे सांगत होती. याचाच अर्थ अगदी स्पष्ट आहे की राधा भले बाह्यांगाने माझ्या जवळ असेल, पण तरी मनाने मात्र ती सतत कृष्णाच्याच जवळ असणार आहे. अहो, ती माझी लग्नाची बायको आहे ना? देवा

ब्राम्हणासमक्ष मी तिचा हात हातात घेतलेला आहे ना? काया, वाचा आणि मनेही 'नातीचरामी, नातीचरामी' अशी शपथ मी घेतलेली आहे. पण झाले आहे काय? ती शपथ केवळ मीच घेतलेली आहे. राधेने काही तशी शपथ घेतलेली नाही. त्यामुळे स्वैराचार करायला ती पूर्ण मोकळी आहे. यापेक्षा व्यभिचार म्हणून काही वेगळा असेल असे मला तरी वाटत नाही.

हे नंदराज, तेव्हा कृष्णाच्या वचनाला किंवा त्याच्या शपथेला आता काहीही अर्थ उरलेला नाही. अर्थात तसा तो कधीही नव्हताच म्हणा. केवळ माझी खोटी खोटी समजूत घालण्यासाठी कृष्णाचे ते वरपांगी बोलणे होते आणि तुम्हीही त्याला अगदी मनापासून व सर्व जाणून बुजून साथ देत होतात. 'उंदराला मांजर साक्षी' असे जे म्हणतात त्यातलाच हा प्रकार आहे. परंतु लग्न हे माझ्या माहितीप्रमाणे बाह्याचरणाचे व मनाचेही बंधन आहे. तो काही लहान मुलांचा खेळ नाही की केव्हाही व कसाही खेळावा आणि कधीही बंद करावा. परंतु येथे तर राधेने कृष्णाच्या नादाने आमच्या लग्नाचा सर्व पोरखेळच करून ठेवलेला आहे. काय तर म्हणे, राहणार माझ्याकडे पण मनाने नेहमी कृष्णाच्या जवळ असणार! अरे वा, मी काय भातुकलीच्या खेळातील नवरा आहे की काय? एकदा चट्टा मट्टा झाला की सर्व काही संपले. मग कोणी कोणाचा नाही आणि कोणाचे कोणाशी काहीही नाते नाही.

तेव्हा असा केवळ देखाव्याचा संसार करण्यात काय अर्थ आहे? मला तरी असा संसार करण्यात मुळीच स्वारस्य नाही. परंतु मी स्वस्थ बसणार नाही एवढे लक्षात ठेवा आणि गोकुळ सोडून तर अजिबात जाणार नाही. मी का म्हणून गोकुळ सोडून जावे? आणि तेही माझी काहीच चूक नसताना? ते शक्यच नाही. मी तरी या गोकुळातून अजिबात हलणार नाही. एवढेच नव्हे, तर या प्रसंगात जो खरा अपराधी आहे त्या कृष्णाला आणि तुमच्यासारखे जे त्याला सहाय्यभूत आहेत त्यांना योग्य ती शिक्षा देवविल्याशिवाय मला चैन पडणारच नाही. त्यासाठी मला आता कंस महाराजांकडे जाणे अटळ आहे. बाकी या राधेचे काय करायचे ते तुम्हीच ठरवा. मनाने काय, शरीरानेसुद्धा ती येथे कृष्णाजवळ राहणार असेल तरी माझी काहीच हरकत नाही. कारण राधा व्यक्तिस्वातंत्र्य घेणार आणि तुम्ही ते तिला घेऊ देणार. मग माझ्या म्हणण्याला कोण विचारणार? अर्थात तिला जेवूखाऊ घालणे व राहायला जागा देणे हे माझेच कर्तव्यकर्म आहे असे तुम्ही म्हणाल, तर मग ते मला तुमची आज्ञा म्हणून करावेच लागेल. नाही तर तो अधर्म होईल ना? तुमच्या सारख्या धर्मशील लोकांना माझा अधर्म कसा मानवणार? अथवा तुम्ही स्वतःच राधेला तुमच्या घरी ठेवून घेणार असलात तर मग सर्वच प्रश्न मिटले. ते तुमचे तुम्हीच ठरवा आणि तुमचे तुम्हीच बघा. मी हा चाललो.''


*****

# राधेची व्याकुळता व निश्चयात्मकता

**अ**नयाचे बोलणे थांबले केव्हा आणि तो रागारागाने निघूनही गेला केव्हा हे लोकांच्या लक्षात यायलाही जरा वेळ लागला. अनयाला थांबवावे असा विचार कोणाच्या मनात येण्याच्या आतच अनय दिसेनासाही झाला होता. अनयाच्या बोलण्याने आणि त्याहीपेक्षा त्याच्या रागाच्या हातवाऱ्यांनी सर्वच जण अगदी स्तंभित झाले होते. बोलताना अनयाचे गरागरा फिरणारे डोळे आणि त्याच्या चेहऱ्यावरील आविर्भाव पाहून सर्वांच्या मनात तर एक प्रकारचे भीतीचे भावच निर्माण झाले होते. रागाच्या भरात अनयाकडून काही अनुचित कृती तर घडणार नाही ना या काळजीनेही सर्वांनाच घेरून टाकले होते. त्यामुळे अनय निघून गेल्यावर सर्वांनाच जरा हायसे वाटले. परंतु मूळ प्रश्न काही सुटला तर नव्हताच, उलट त्या प्रश्नाचा तिढा अधिकच वाढला होता. सर्वचजण दिग्मूढ झाल्यासारखे दिसत होते. कृष्ण स्वस्थ होता आणि राधाही स्तब्धच होती. आता काय करावे हे नंदालाही सुचत नव्हते. तो एकदा कृष्णाकडे पहात होता तर एकदा राधेकडे पहात होता.

कृष्ण राधेकडे एकटक नजरेने आणि अतिशय प्रेमाने पहात होता. राधा मात्र खाली नजर ठेवून जागच्या जागीच उभी होती. तिच्या डोळ्यांतील अश्रुधार मात्र जराही थांबत नव्हती. शेवटी कृष्णच राधेच्या जवळ येऊन उभा राहिला. आपल्या एका हाताने त्याने राधेची हनुवटी धरून तिचे मुख वरती उचलले आणि दुसऱ्या हाताने तिच्या डोळ्यातील अश्रुधारा अत्यंत हळुवारपणे पुसून थांबवू लागला. त्याने तर राधेला अधिकच भरून येऊ लागले. तिच्या डोक्यावर हाताने हलकेच थोपटून कृष्ण तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होता. बराच वेळ असाच गेला. शेवटी राधेने हळुहळू स्वतःला सावरले आणि कृष्णाला उद्देशून ती बोलू लागली.

‘‘हे कृष्णा, मला ठाऊक आहे की माझ्यामुळे तुला अतिशय त्रास होत आहे. तुलाच काय, पण सर्वांनाच माझ्याकडून त्रास दिला जात आहे हे मला माहीत आहे. परंतु माझाही नाईलाजच झाला होता. आपले प्रेमाचे संबंध कोणालाही कळणे शक्य नाही हे मलाही ठाऊकच आहे. त्यामुळे लोक आपल्यावर टीका करणार हेही मी जाणून आहे. त्यासाठी माझ्या मनाची अगदी तयारी झालेली आहे. लोकांच्या निंदेचेही मला काही विशेष वाटत नाही. परंतु तुझ्यावर जेव्हा हेत्वारोप केले जातात तेव्हा मात्र स्वस्थ बसणे मला शक्य होत नाही. माझे तुझ्यावरील प्रेम मला स्वस्थ बसूच देत नाही.



सामान्य लोक तुझे माहात्म्य जाणत नाहीत म्हणूनच ते तुझा अवमान करतात, तुझी निंदा नालस्ती करतात, हेही मी जाणून आहे. परंतु तुझे माहात्म्य मी जाणून आहे ना? मग हे लोकांचे बोलणे मला कसे बरे ऐकवेल? आणि मी कशी काय स्वस्थ बसू शकेन? तसे घडणे शक्यच नाही. तुझ्या प्रेमाचा व माहात्म्याचा जो अनुभव माझा आहे, तुझ्या प्रेमातील शुद्धत्व व सचोटी जी माझ्या अनुभवाची आहे, ती प्रगट केल्याशिवाय मला कसे बरे चैन पडेल? माझ्या समक्ष कोणी तुझी हेटाळणी करीत आहे, तुला वाटेल तशी दुरुत्तरे करीत आहे हे मला कदापिही सहन होणे शक्यच नाही. आपले प्रेमाचे संबंध हे

परस्परांतील आहेत आणि आपण प्रेमाचा अनुभव दोघांनी मिळून अनुभवलेला आहे, ही गोष्ट तर खरीच आहे ना? मग केवळ तुझ्यावरतीच जर दोषारोप होत असतील तर मी तुला अशी एकाकी कशी बरे पडू देईन? त्यामुळेच मला स्वस्थ बसवेना आणि माझ्याकडून एवढे बोलणे घडू शकले. माझे बोलणे वा माझ्या बोलण्यामागील भाव काही चुकीचा होता का?

माझे बोलणे वा बोलण्याची पद्धत एकवेळ चुकीची असेल, माझ्या मनाचा संयमही थोडा वेळ सुटला असेल. परंतु हे सर्व तुझ्यावरील आत्यंतिक प्रेमामुळे आणि तुझ्या थोरवीच्या जाणिवेमुळेच झालेले आहे. त्याचाच मला सार्थ अभिमान आहे आणि आनंदही आहे. अर्थात माझ्या या वागण्या बोलण्याचे संभाव्य दुष्परिणाम माझ्याही लक्षात आलेले आहेत आणि त्या परिणामांचे फळ सेवन करण्याचे मनोबळ मला तुझ्यामुळेच प्राप्त झालेले आहे याची पक्की खात्री बाळग. तू माझी कोणतीही काळजी करू नकोस. आता मी माझ्या घरी जात आहे. तेथे माझ्यासाठी पुढे काय ताट वाढून ठेवलेले आहे याची मलाही कल्पना नाही. परंतु जे काही समोर येईल त्याला मी धैर्याने सामोरी जाईन आणि कोणालाही दोष न देता, जे काही आता ईश्वराच्या सत्तेत घडेल त्याचा आनंदाने स्वीकार करीन. तुझी व माझी भेट यापुढे घडेल की नाही हे मला माहीत नाही. परंतु माझ्या ठिकाणचे तुझे प्रेम व माहात्म्य हे नेहमीच कायम राहील आणि तुझ्या प्रत्यक्ष भेटीचा व प्रेमाचा अनुभव घेण्याचा ध्यासही माझ्या ठिकाणी सततचा राहील. तेच माझ्या जीवनाचे बळ आहे आणि तोच माझ्या जीवनातील आनंद आहे.''

राधेच्या भावपूर्ण बोलण्याने कृष्णाचे मनही राधेच्या प्रेमाने भरून आले. राधेचे दोन्ही हात आपल्या दोन्ही हातात घेऊन कृष्ण राधेशी बोलू लागला,

''अगं राधे, तू जे काही बोललीस ते तुझ्या भावानुसार अगदी बरोबरच होते. त्यात काहीही चुकीचे नव्हते. तो काही तुझा निव्वळ भावनेचा आवेग नव्हता. तर तो तुझ्या स्वानुभवातून निर्माण झालेला तुझा स्वतःचा भाव होता. म्हणूनच तर तुझ्या बोलण्यात निश्चयात्मकता व सखोलता होती. तुझे बोलणे हे माझ्यावरील आत्यंतिक प्रेमाने व माझ्या माहात्म्याच्या पूर्ण जाणिवेने घडत होते याची मला अगदी पक्की खात्री आहे. म्हणूनच तर मला तुझ्या बोलण्याचा अतिशय आनंद होत होता. तुझ्याकडून प्रगट झालेले धैर्यबळ खरेच अगदी कौतुकास्पद होते. तुझ्या ठिकाणी निर्माण झालेल्या भावबळाचेच ते लक्षण होते. त्या भावबळाच्या पहिल्या कसोटीला तू पूर्णपणे व यशस्वीपणे उतरलीस. आता त्या भावबळाची दुसरी कसोटी आहे, ती म्हणजे वस्तुस्थितीला सामोरे जाणे आणि तिचा आनंदाने स्वीकार करणे.

हे राधे, एक गोष्ट नीटपणे लक्षात घे, की तुझे जीवन व माझे जीवन ही मुळातच बाह्यांगाने वेगवेगळी आहेत. ईश्वराच्या नियतीत त्याच्याच संकेतानुसार आपण एकत्र आलो हे तर खरेच आहे. त्याहीपेक्षा आपले प्रेमाचे सूर जुळले आणि त्यामुळे मनेही जुळली ही सुद्धा एक अत्यंत नवलाईचीच गोष्ट म्हणावी लागेल. त्यातूनही ज्या ईश्वराच्या थोरवीची जाणीव माझ्या ठिकाणी नित्य असते, त्या ईश्वराची थोरवी तुलाही कळू लागली हे अत्यंत महत्त्वाचे. त्या ईश्वराचे अस्तित्वही तुझ्या लक्षात आले आणि त्या ईश्वरासंबंधी तुझ्या ठिकाणी प्रेमही निर्माण झाले ही तर खरी आनंदाची गोष्ट

साहित्य प्रतिष्ठान®

आहे. त्या ईश्वराच्या भक्तीनेच तुला आनंदाचा लाभ होणार आहे हे सत्यच आहे. आता या सर्वांसाठी मी निमित्त व बाह्यांगाने कारणीभूत झालो आहे हे खरेच आहे. परंतु त्या ईश्वराविषयीचा प्रेमभक्तिभाव तुझ्या ठिकाणी निर्माण झालेला आहे हे सत्य आहे. या गोष्टीचा कधीही विसर पडू देऊ नकोस. त्याचेच स्मरण ठेव आणि त्याचाच ध्यासही धरून ठेव. म्हणजे मग तुझ्या जीवनात कितीही जरी संकटे आली तरी तुझे धैर्यबळ तर कायम राहीलच, परंतु तुझ्या मनाची शांती व समाधानही तुला कायमचे प्राप्त होऊन राहील. तेव्हा प्राप्त परिस्थितीत आता तुझ्याच घरी जाणे तुला क्रमप्राप्त आहे. कारण ईश्वराच्या नियतीनुसार तेच तुझे बाह्य जीवन आहे. त्याच जीवनात तुला तुझ्या अंतरातील भावाचा अनुभव घ्यायचा आहे आणि तसा तू निश्चितपणे घेशील याची मला पूर्ण खात्री आहे.

हे राधे, आता बाह्यांगाने आपण एकमेकांची भेट घ्यायची नाही असा जो निर्णय मी घेतला आहे, तो व्यापक विचारांतीच घेतलेला आहे. त्यातच सर्वांचे हित आहे. मला निश्चितपणे माहीत आहे की त्या निर्णयानुसार वागण्याचे बळ माझ्याप्रमाणे तुझ्याही ठिकाणी आहे. वेळप्रसंगी बाह्यांगाने वेगळे राहूनही आपण एकमेकांची जवळीकता अनुभवू शकतो हे जे आपल्या प्रेमसंबंधाचे सत्यत्व आहे, त्याचाच अनुभव आता आपल्याला घ्यायचा आहे. त्यासाठी मनाने तू सुद्धा आतून पूर्णपणे तयार झालेली आहेस हे आता तुझ्याच अनुभवाने तुलाही कळेल. आता काय घडले याचा विचार व काळजी न करता, ईश्वराच्या नियतीत पुढे काय घडते ते पाहूया, ते अनुभवूया आणि त्याचा आनंद घेऊया. पुढे काय घडणार आहे या विषयी सर्वचजण अंधःकारात असतात. परंतु ज्यांच्या ठिकाणी ईश्वर प्रेमाची ज्योत तेवत असते, त्यांना त्या प्रेमाच्या प्रकाशात पुढील जीवनाचा मार्ग स्पष्टपणे दिसतो. त्या मार्गाने जाण्याचे धैर्यबळ त्यांच्याठायी अगदी सहजपणे असते. त्यामुळे जीवनातील कुठल्याही परिस्थितीत ईश्वरी प्रेमाचा अनुभव घेणे त्यांना सहज शक्य होते आणि त्यांचेच जीवन खऱ्या अर्थाने आनंदाचे होते. राधे, हेच व असेच ईश्वरी प्रेम तुझ्या ठिकाणी निर्माण झालेले आहे याची जाणीव व खात्री ठेव आणि तुझे जीवन सबळतेने व आनंदाने जगत रहा.''

कृष्ण बोलत होता आणि राधा सर्व जिवाचे कान करून ऐकत होती. तिच्या नेत्रातून जरी अश्रुधारा वाहत होत्या, तरी तिच्या मुखावर मात्र निश्चिंततेचे व प्रसन्नतेचे भाव होते. कृष्णाने धरलेले हात तर सोडवून घेणे तिला शक्यच होत नव्हते. परंतु शेवटी कृष्णानेच प्रयत्नपूर्वक आपले हात राधेच्या हातातून सोडवून घेतले. कृष्णाचा हेतू राधेच्या लगेचच लक्षात आला. ती कृष्णाकडे बघून थोडीशीच, पण मोकळेपणाने हसली. कृष्णाकडे बघत बघतच ती एकेक पाऊल अगदी सावकाशपणे मागे टाकीत राहिली आणि एकदम वळून जी चालू लागली, ते तिने मग मागे वळून पाहिलेच नाही. कृष्ण मात्र भावपूर्ण नजरेने व भरल्या डोळ्यांनी तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे किती तरी वेळ पाहत उभाच राहिला होता. राधा अगदी दिसेनाशी झाली तरी कृष्ण मात्र तसाच जागच्या जागीच बराच वेळ उभाच होता.

झालेल्या प्रसंगाने आश्चर्य चकित झालेले जनही हळुहळू घरी परतले. ज्याने त्याने ज्याच्या त्याच्या मनाच्या अवस्थेनुसार व कुवतीनुसार घडलेल्या प्रसंगाचा अर्थ काढला आणि स्वस्थ बसले. यशोदा स्फुंदत स्फुंदत वाड्याच्या आतील

भागात मोठ्या कष्टपूर्वक चालत निघून गेली. कृष्ण व नंद दोघेच तेथे राहिले. थोड्या वेळाने नंद एकेक पाऊल सावकाश टाकीत कृष्णाच्या जवळ आला. एक हात कृष्णाच्या खांद्यावर ठेवून दुसऱ्या हाताने त्याने कृष्णाचे मस्तक कुरवाळले. कृष्णाने वळून नंदाकडे पाहिले आणि नंदाच्या डोळ्यातील अश्रू पाहून कृष्णाला पुन्हा एकदा भरून आले आणि नंदाच्या कुशीतच शिरून त्याने आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. नंदानेही कृष्णाला प्रेमाने आपल्या मिठीत घेतले आणि कृष्णाचे मस्तक व पाठ प्रेमाने व कौतुकाने तो थोपटीत राहिला. त्या तशाच अवस्थेतील कृष्णाला हळुहळू आपल्या हाताने धरून चालवीत चालवीत नंद राजवाड्याच्या आत घेऊन गेला.''

एवढा वेळ अखंडपणे बोलत असलेल्या नारदाचे बोलणे एकदम थांबले, ते काही नारद बोलून बोलून दमल्यामुळे नव्हे, तर त्याच्याकडून प्रगट होत असलेल्या विषयातील गांभीर्यामुळे नारद गंभीर झाला होता आणि त्याचबरोबर प्रगटणाऱ्या विषयातील भावाशी तादात्म्य पावल्यामुळे अधिक भावपूर्णही झाला होता. बोलता बोलता नारद एवढा अंतर्मुख झाला, की त्याचा बोलण्याचा प्रवाह आपसूकच हळुहळू कमी होत कधी पूर्णपणे थांबला हे त्याचे त्यालाच कळले नाही. नारदाच्या अंतःकरणातील भावाठायी शब्दरूप होण्याची ऊर्मीच जणू शमल्यासारखी दिसत होती.

परंतु लक्ष्मीची अवस्था मात्र अगदी वेगळी होती. राधा व कृष्ण यांच्या प्रेमसंबंधाविषयी श्रवण करता करता लक्ष्मीच्याच मनाठायी ताण निर्माण झालेला होता आणि तो ताण आता एवढा ताणला गेला होता, की तिला तो अगदी असह्य झाला होता. लक्ष्मीला पूर्णपणे ठाऊक होते की तिचा हा मानसिक ताण कमी झाल्याशिवाय तिच्या मनाला अजिबात हलकेसे वाटले नसते आणि पुढील कथाभाग पूर्ण ऐकल्याशिवाय तिच्या मनावरचा ताण कमी होणेही शक्य नव्हते. लक्ष्मीचे मन पूर्णपणे मोकळे झाल्याशिवाय तिला तर श्रवणाचा आनंद होणार नव्हताच. परंतु प्रत्यक्ष राधा व कृष्ण यांच्याच जीवनात एवढा कठीण व ताण तणावाचा प्रसंग आला होता, की त्या प्रसंगातील पूर्ण ताण लक्ष्मीच्या मनावरती आलेला होता.

या सर्वांवरती एकच उपाय होता की नारदालाच बोलते करणे. कारण नारद बोलला तरच नारदाचे अंतःकरण पुन्हा मोकळेपणाने वाहू लागले असते आणि कृष्णचरित्रातील हा कठीण व नाजूक प्रसंग नारद मोकळेपणाने वर्णन करू शकला असता. त्यामुळे मग लक्ष्मीचेही मन सर्व तणावातून मोकळे होऊन पुन्हा सगुण प्रेमाने भरून राहिले असते. लक्ष्मीची अडचण जशी तिला कळली होती, तसा त्यावरील इलाजही तिला निश्चितपणे माहीत होता. त्यामुळे अंतर्मुखावस्थेतील नारदाला पुढील कथाप्रसंग सांगावयास उद्युक्त करण्यासाठी लक्ष्मीने स्वतःहूनच नारदाशी बोलण्यास सुरुवात केली.

''हे नारदा, सगुण प्रेमभक्तिचे माहात्म्य सांगताना खरे तर तुझ्या रसाळ वाणीचा ओघ कधी थांबत नाही. त्यातूनही राधा व कृष्ण यांचे प्रेमसंबंध हा तर तुझ्या अंतःकरणातील एक अत्यंत नाजूक व खास विषय आहे. त्यांच्या प्रेमसंबंधातील भावपूर्णता ही खरे तर तुझ्या अंतःकरणाला पूर्णपणे व्यापून राहिलेली आहे. त्यामुळेच तर राधेच्या कृष्णप्रेमाविषयीचे वर्णन तुझ्याकडून अत्यंत आत्मीयतेने घडत आहे. त्यातूनही सगुण प्रेमभक्तिचा भाव हा तुझ्या स्वानुभवाचा असल्यामुळे तुझ्या वर्णनातील सखोलता मला तर अगदी सहजपणे जाणवते आणि मलाही या नारायणाच्या सगुण प्रेमामध्ये बुडायला भागच

पाडते.  अर्थात तू जसा अगदी त्या सगुण प्रेमात नित्य व पूर्णपणे बुडून राहिलेला असतोस तेवढा जरी माझा अनुभव नसला, तरी माझ्या ठिकाणचा सगुण प्रेमाचा प्रवाह सतत वाहत राहतो आणि माझ्या मनाला पूर्णपणे भिजवीत असतो.  त्यामुळे सगुण प्रेमभक्तिचे रहस्य अधिकाधिक जाणून घेण्याच्या आतुरतेचे रूपांतर आर्ततेतच होऊन राहते.

हे नारदा, एक गोष्ट मात्र खरी आहे की राधा व कृष्ण यांच्या प्रेमसंबंधाचे गुह्य जेवढे म्हणून तू प्रगट करीत आहेस, तेवढे ते गुह्य अधिकच वाढत आहे.  कारण मला जी मनातून सारखी भीती वाटत होती तीच शेवटी खरी ठरली.  राधा व कृष्ण यांच्या संबंधाची परिणती त्या दोघांनी एकमेकांना न भेटण्याचा निर्णय घेण्यात व्हावी, ही तर अत्यंत वाईटच गोष्ट आहे.  परंतु तेवढीच ती गोष्ट अटळही दिसत होती.  कारण ज्या पद्धतीने कौटुंबिक व सामाजिक बंधनेही बाजूला करून राधा व कृष्ण परस्परांना भेटून त्यांचे प्रेमसंबंध अनुभवीत होते, त्यानुसार असे काही घडले नसते तरच नवलाईचे ठरले असते.  त्यासाठी राधेला बरेचसे जबाबदार धरायलाच हवे.  मुळात आधी तिने कृष्णाला पत्र लिहिण्याचे धाडस केले आणि नंतर कृष्णाने सांगितले असतानाही ती पत्रे फाडून न टाकता जपून ठेवली.  अशी पत्रे सांभाळून ठेवणे म्हणजे तर पदरात निखारे सांभाळण्यासारखेच होते.  एवढा विवेक राधेकडून तरी अपेक्षित होताच.  मला वाटते की तीही जरा भावनेच्या आहारीच गेली.  पण त्याची फळे तिलाच भोगावी लागली ना?  कृष्णाशी कायमची ताटातूट होण्याचा प्रसंग तिच्यावरच आला ना? मला खात्री आहे की आलेल्या प्रसंगाला राधेने निश्चितपणे धैर्यानेच तोंड दिले असणार.  परंतु प्रत्यक्ष भेट नाही ती नाहीच ना?  आणि प्रत्यक्ष सहवासाला व भेटीला दुसरा पर्यायही नाही हेही खरेच आहे ना?

हे नारदा, परंतु राधा व कृष्ण यांचे एवढे प्रेमाचे संबंध होते की मला तर अगदी खात्रीपूर्वक असे वाटते, की आलेल्या या बाह्य संकटातूनही ते नक्कीच पार पडले असणार.  फक्त ते आलेले संकट कसे दूर झाले हे ऐकण्याचीच मला अत्यंत तीव्र इच्छा आहे.  कारण राधा व कृष्ण एकमेकांपासून असे कायमचे दूर होणे शक्यच नाही असे माझी मनोदेवता मला सांगते. मी तर तशी कल्पनाही करू शकत नाही.  तेव्हा प्रत्यक्ष पुढे काय व कसे घडले हे मला त्वरित सांगून माझ्या मनाची तळमळ शांत करावीस अशी मी तुला अगदी मनःपूर्वक प्रार्थना करते.''

लक्ष्मीच्या बोलण्याने स्वतःच्या अंतरातच बुडालेला नारद हळुहळू बाहेर आला खरा, परंतु तोही थोडासाच. स्वतःच्या अवस्थेतून पूर्णपणे बाहेर येणे नारदालाही शक्य होत नव्हतेच.  परंतु लक्ष्मीची आर्त अवस्थाही त्याला पाहवेना. लक्ष्मीविषयीच्या कळवळ्याने नारदाच्या शांत व निश्चल अंतःकरणात पुन्हा प्रेमाच्या ऊर्मी निर्माण होऊन त्या मनापर्यंत येऊ लागल्या.  त्यामुळे मग नारदालाही त्या प्रेम ऊर्मी बोलायला भाग पाडू लागल्या.  अंतःकरणात नित्य स्फुरणारे नारायणाविषयीचे निरपेक्ष, निराकार प्रेम पुन्हा सापेक्षतेने शब्दरूप घेऊन साकार होऊ लागले.

``हे लक्ष्मी, एक मुख्य गोष्ट लक्षात ठेव, की राधा व कृष्ण यांच्या प्रेमसंबंधातून राधेच्या ठिकाणी कृष्णाविषयी जो भक्तिभाव निर्माण झाला हीच महत्त्वाची गोष्ट होती.  एखाद्या व्यक्तीविषयी असा कमालीचा भक्तिभाव निर्माण होणे हीच मुळात साधी गोष्ट नसून, या सृष्टीमधील ती एक दुर्मिळ व क्वचित घडणारी गोष्ट आहे.  कृष्णाविषयी राधेच्या ठिकाणी

असलेले एवढे पराकोटीचे प्रेम व श्रद्धा हे कृष्णाचे अलौकिक माहात्म्य जाणून झालेले होते.  कृष्ण हा त्या ईश्वराचेच सगुण रूप आहे हा तिचा भाव काही भोळेपणाचा वा भाबडेपणाचा नव्हता.  तर कृष्णाच्या व्यक्तिगत प्रेमाने केलेल्या सहवासात कृष्णाच्या मुखातून वारंवार ईश्वराचे माहात्म्य ऐकता ऐकताच राधेला ही दृष्टी प्राप्त झाली होती.  तिची पूर्ण खात्री पटली होती, की कृष्ण म्हणजेच ईश्वराचे रूप आणि त्या ईश्वराची भक्ती करायची म्हणजे कृष्णाचीच भक्ती करायची.  सगुण प्रेमभक्तिविषयी राधेची जी ही निश्चयात्मक भूमिका झालेली होती त्यामुळेच तिच्या ठिकाणी ईश्वरभक्तिची मुहूर्तमेढ दृढपणे व अगदी खोलवर रोवली गेली होती.  हेच तर कृष्णचरित्रातील अवतार कार्याचे रहस्य होते आणि हाच तर त्याचा मूळ व मुख्य हेतू होता.  राधेच्या बाबतीत हा हेतू साध्य झाला होता, कारण ईश्वरभक्तिचे सगुण प्रेममूळ तिच्या ठिकाणी पक्केपणाने रूजले होते.  बाह्य अडचणींमुळे राधेची ही भूमिका बदलणे तर दूरच राहिले, पण ती जरासुद्धा हललीही नाही. हाच तिच्या ठिकाणच्या कृष्णप्रेमाचा विजय होता आणि त्या विजयाचा आनंद कृष्णाला होत होता.

हे लक्ष्मी, तसे पाहिले तर हा अडचणीचा प्रसंग किंवा संकटकाळ निर्माण होण्यासाठी राधाच कारणीभूत ठरली होती. कारण सगुण प्रेमाने भक्तीचा भाव अर्पण करण्यासाठी अनेक साधने ही माध्यम म्हणून उपयोगाला येतात.  त्या त्या वेळेस जे जे साधन उपलब्ध असेल, त्याचा सहजपणे उपयोग करून घेतल्यावर ती साधने मग निरुपयोगी होऊन आपसूकच बाजूला होतात.  म्हणूनच प्रत्येक वेळेस भिन्न भिन्न साधनांचा वापर होऊ शकतो.  परंतु भक्तिभाव अर्पण केल्यानंतर ती साधने जर बाजूला केली नाहीत, तर काहीवेळा तीच साधने अडचणी निर्माण करू शकतात.  पण काही वेळा ती साधनेसुद्धा बाह्यांगाने एवढी आकर्षक असतात, की त्यांचाही मनाला मोहच निर्माण होतो.  काही वेळा त्या साधनांमध्ये भावनेने मनही गुंतून राहते आणि मग त्यातून काहीतरी गुंतागुंत निर्माण होऊ शकते.  आता राधेचेच बघ ना, नेमके असेच नाही का झाले?

कृष्णाविषयी तिच्या ठिकाणी दाटून असलेले प्रेम कृष्णाला अर्पण करावे या हेतूने तिने पत्रलिखाणाचे एक नवीनच माध्यम शोधून काढले.  कारण ती राधेची केवळ आंतरिक गरज नव्हती, तर तिची ती मजबुरीच होती.  त्याप्रमाणे राधा कृष्णाला पत्र लिहून तिचा प्रेमभाव अर्पण करीत राहिली.  कृष्णानेही राधेचे प्रेम पावल्याचा आनंद त्याच पत्रावर लिहून राधेला कळवला.  तेव्हाच राधेच्या प्रेमभावाची पूर्ती झाली आणि तिलाही आनंद झाला.  परंतु त्याचवेळेस कृष्णाने राधेला एक गोष्ट आवर्जून सांगितली होती की ती पत्रे जपून ठेवू नकोस.  कारण त्या पत्रांचा कार्यभाग पुरा झाला होता.  त्यामुळे त्या पत्रांचे महत्त्व आता संपले होते.  एवढेच नव्हे, तर ती पत्रे पुढे मागे धोकादायकही ठरू शकली असती.  कोणाच्या हातात जर ती पत्रे पडली तर त्या पत्रांचा दुरुपयोग होण्याचीच शक्यता अगदी शंभर टक्के होती.  कारण ती पत्रे व त्या पत्रांतील मजकूर दुसऱ्या कोणालाही मानवणे व मान्य होणे शक्यच नव्हते हे तर काळ्या दगडावरील रेघेप्रमाणे अगदी स्पष्ट होते.

हे लक्ष्मी, पण काय झाले बघ.  राधा त्या पत्रांमध्ये भावनेने अडकून राहिली.  तिने लिहिलेल्या पत्रांपेक्षा त्या पत्रांवर कृष्णाने स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेला मजकूर तिच्या मनाला अत्यंत भावला.  त्या लिखाणातून कृष्णाचे जे मोकळे

अंतःकरण व जो त्याचा आनंद प्रगट झाला होता, त्याने तर राधेच्या अंतःकरणाचा ठावच घेतला होता. त्यामुळे ती पत्रे म्हणजे तिला कृष्णप्रेमाचे जणू प्रतीकच वाटू लागली आणि तिचा त्या पत्रांवरही जीव जडला. एक प्रकारे ती त्या पत्रांच्या मोहातच पडली असे म्हणावे लागेल. कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे ती पत्रे नष्ट करण्याचा विचार वारंवार मनात येऊनही प्रत्यक्ष तशी कृती करायला मात्र राधा धजावतच नसे. ती पत्रेच तिला जीव की प्राण वाटू लागली. संधी मिळाली रे मिळाली की एकांतात पुन्हा पुन्हा ती पत्रे बाहेर काढणे, त्यातील कृष्णाने लिहिलेला मजकूर वाचणे, त्या पत्रांना आपल्या हृदयाशी धरणे, ती पत्रे आपल्या मिटलेल्या डोळ्यांवर धरणे किंवा त्या पत्रांवरती वारंवार आपले नाजूक ओठ टेकणे अशा गोष्टींमध्येच राधा रमत असे आणि कृष्णाचे प्रत्यक्ष प्रेम अनुभवल्याचा आनंद पुरेपूर घेत असे.

अर्थात यात जरी काही गैर नसले तरी ते आवश्यक नव्हतेच. खरे तर ते अनावश्यकच होते. परंतु तरीही राधा त्या पत्रांबद्दल थोडीशी भावनात्मक राहिलीच आणि भावनात्मकता ही नाही म्हटले तरी मनाला थोडीशी दुर्बल करतेच. त्यामुळेच ती पत्रे नाहीशी करण्याचे धैर्य राधेच्या मनाला झाले नाही आणि तीच पत्रे पुढील संकटाला कारणीभूत ठरली. परंतु राधेची कृष्णप्रेमाविषयीची मनातील मूळ भूमिका अगदी पक्की असल्यामुळे आलेल्या संकटाला सामोरे जाण्यास ती अजिबात कचरली नाही. तेवढे धैर्यबळ तिच्या मनाच्या ठिकाणी तिला निश्चितपणे प्राप्त झालेले होते. कारण तिचे मन अत्यंत मोकळे व निर्मळ होते. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची अपराधभावना वा कमीपणाची भावना नव्हती. कृष्णाचे माहात्म्य जाणून त्याच्यावरती घडलेल्या प्रेमाचे आणि त्यातून निर्माण झालेल्या भक्तिभावाचेच हे फळ होते.

हे लक्ष्मी, 'राधा व कृष्ण यांनी यापुढे एकमेकांना कधीही भेटायचे नाही, एवढेच नव्हे तर परस्परांशी कोणताही संपर्क ठेवायचा नाही' असा कृष्णाने घेतलेला निर्णय राधेला एकदम न मानवणे हे तर अगदी साहजिकच होते. कृष्णाच्या सगुण प्रेमाच्या अनुभवाचा ध्यास व छंद लागलेल्या राधेला अशी कल्पनाही करता न येणे हे बरोबरच होते. परंतु कृष्णाचा निर्णय तिने शेवटी शांत मनाने मान्य केलाच. कृष्णाच्या सांगण्यापुढे तिच्या मनाचा मग काहीच हट्ट राहिला नाही. अगदी प्रेमाचाही हट्ट तिने ठेवला नाही. कृष्णावरील आत्यंतिक भक्तिभावामुळेच राधेला हे शक्य होऊ शकले. कारण कृष्णापासून दूर जाणे व दूर राहणे यापेक्षा दुसरे कोणतेही संकट राधेसाठी संभवतच नव्हते. परंतु कृष्णाच्या एवढ्या काळच्या सहवासात एक महत्त्वाची गोष्ट तिच्या पूर्णपणे लक्षात आली होती, की प्रेमभक्तिभावाचे संबंध म्हणजे राधा व कृष्ण यांनी केवळ एकत्र राहणे नव्हे, तर राधा व कृष्ण यांनी 'एक होऊन राहणे' हेच खऱ्या भक्तीचे फळ आणि हाच भक्तीचा खरा आनंद होय.

अर्थात हे 'एक होऊन राहणे' म्हणजेच 'ऐक्य पावणे' आहे आणि 'ऐक्य पावणे, म्हणजे उभयतांची भूमिका एकच होणे' हे होय. त्यासाठी आधी एवढा काळ राधा व कृष्ण एकत्र राहिले, एकत्र सहवास केला, एकत्र प्रेमाचा अनुभव घेतला. त्यातून राधेचे मन कृष्णाशी जुळले. उभयतांच्या मनाचा एकच सूर झाला. आता एकाच भूमिकेने जीवन जगण्याचा अनुभव घेण्याची वेळ राधेवर आली होती हे तिच्या पूर्णपणे लक्षात आले. अशी एकरूपता व असा ऐक्यभाव यांचा अनुभव घेण्यास राधा मनापासून सज्ज झाली. राधा व कृष्ण यांची बाह्य जीवने वेगवेगळी आहेत हे कृष्णाचे सांगणे खरेच होते. त्याचे

सत्यत्व राधेलाही उमजले आणि मग वेगळे राहूनही एकरूप असल्याचा अनुभव घेण्याचा राधेचा निश्चयच झाला. ईश्वराच्या नियतीत पुढे काय व कसे घडणार आहे या विचारांचा मनावर कोणताही ताण न घेता, कृष्णप्रेमाने युक्त झालेली राधा अत्यंत मोकळेपणाने आपल्या घरी परत आली.

राधेच्या आधीच घरी येऊन पोहोचलेला अनय रागाने आतल्या आत धुसफुसतच घरात येरझारा घालत होता. त्याच्या मनाची अस्वस्थता कमी होण्याची जराही चिन्हे दिसत नव्हती. तशाच अवस्थेत असताना घरी परत आलेल्या राधेकडे बघून अनय आधी छद्मीपणाने हसला आणि नंतर उपहासाने म्हणाला,

''या, बाईसाहेब या, शेवटी आपण घराकडे परतलात तर? म्हटले येता का नाही? कारण हे घर तर तुझ्यासाठी एक धर्मशाळाच आहे. केव्हाही बाहेर जावे, कुठेही जावे, कोणालाही भेटावे आणि केव्हाही परत यावे. ना कोणाविषयी आस्था, ना कोणाविषयी आपलेपणा. तुझ्यासारख्यांना तर घराची जरुरी केवळ राहण्यासाठी व बाह्य लौकिकासाठीच आहे. कायमचे दुसऱ्या कोणाच्या घरी केवळ राहता येत नाही म्हणूनच मग हे माझे घर सोयीचे होते. बाकी देहाची काय व मनाची काय, दोन्ही प्रकारच्या भुका भागवण्याची सोय ही बाहेर कुठेही होऊ शकते. खरे तर, मीसुद्धा तुला घरात परत घेणारच नव्हतो. परंतु केवळ नंदाची आज्ञा म्हणूनच या घराचा दरवाजा तुझ्यासाठी मी उघडला होता. तशी माझ्यावर आता तुझी काहीही जबाबदारी राहिलेलीच नाही. कारण आपले पतीपत्नीचे संबंध तू केव्हाच संपवले होतेस आणि जे काही थोडेफार आपले पतीपत्नीचे नाते राहिले होते, ते आता मी तोडून टाकीत आहे. त्या नात्याची मलाही काही जरुरी नाही. बाह्य लौकिक तरी किती दिवस आणि का सांभाळायचा? ते ओझे तरी डोक्यावरती का म्हणून वहायचे? तसे काही कारण आता उरलेलेच नाही. परंतु एक गोष्ट पक्केपणाने लक्षात ठेव, की ही व्यवस्था केवळ तात्पुरतीच आहे. लवकरच मी कंस महाराजांना जाऊन भेटणार आहे. तेच मला योग्य न्याय देतील आणि तुला व तुझ्या लाडक्या कृष्णाला चांगला धडा शिकवतील याची मला पूर्ण खात्री आहे.

आणखीन एक गोष्ट लक्षात ठेव, की यापुढे तुझ्या हातचे काहीही मी सेवन करणार नाही. मी फक्त आईच्या हातचेच जेवण जेवीन. आई आम्हा दोघांसाठीचा स्वयंपाक करील. बाकी तू काय करायचे ते तुझे तू पहा. यापुढे आपण एका खोलीतही राहणार नाही. तू तुझी वेगळ्या खोलीत राहा. परंतु एक गोष्ट नीट लक्षात ठेव की कोणत्याही परिस्थितीत माझ्या नजरेसमोर येऊ नकोस. हे मी तुला अगदी शेवटचे व निक्षून सांगत आहे. नाही तर त्याचे परिणाम फार भयंकर होतील असे मी तुला बजावून ठेवतो.''

अनयाच्या या बोलण्यावर राधा काही बोलण्याचा प्रयत्न करण्याच्या आतच अनय तेथून तरातरा निघून गेला सुद्धा. राधा मात्र शांतच राहिली आणि आपल्या खोलीत निघून गेली. आपल्या खोलीत आल्यावर राधा तिच्या देव्हाऱ्यातील देवाच्या प्रतिमेसमोर बसली. तिने निरांजन लावले. विझू पाहणाऱ्या समईमध्ये तेल घालून समईची वात जरा मोठी केली. देवाच्या प्रतिमेसमोर राधेने आपले दोन्ही हात जोडले आणि नेत्र मिटून घेतले, तर तिच्या मनातील कृष्णाच्या प्रतिमेचेच दर्शन

तिला झाले. कृष्णाची ती प्रेमळ नजर, त्याचे ते स्मितहास्य, त्याच्या मुखावरील ते निर्भयतेचे आणि आश्वासनात्मक भाव या सर्वांचे दर्शन राधेला कृष्णरूपात झाले. राधेच्या मुखावरही तसेच निर्भय व शांत भाव उमटले. कृष्णप्रेमाने भक्तिभावपूर्ण झालेले तिचे अंतःकरण भरून येऊन नेत्रातून वाहू लागले. समईच्या त्या मंद व मंगल प्रकाशात देव्हाऱ्यातील देवाची मूर्ती व राधा दोन्हीही पूर्णपणे उजळून निघाली होती आणि दोघेही अतिशय तेजस्वी व रम्य दिसत होती.''

नारदाचे बोलणे ऐकताना तन्मय झालेली लक्ष्मी अत्यंत भावपूर्ण आवाजात एकदम उद्गारली, ''शाब्बास, शाब्बास! राधेची खरेच शाबास आहे. तिच्या भावाचे व मनोबळाचे कौतुक करायला खरे तर माझ्यापाशी काही शब्दच नाहीत. प्रत्यक्ष आपला नवराच आपल्या चारित्र्यावर शंका घेत आहे आणि त्याच्या मनातील सर्व घाण अत्यंत विखारी शब्दात व्यक्त करीत आहे, तरीही राधा मात्र शांत आहे. तिचे मन कृष्णप्रेमाने युक्त असल्यामुळे अगदी मोकळे व शुद्ध आहे आणि कृष्णमाहात्म्याच्या पूर्ण जाणिवेने कृष्णभक्तिविषयीचा तिचा निश्चयही कायम आहे. खरेच राधेची अगदी कमाल आहे. एखाद्याच्या भक्तिभावाची एवढी कठीण कसोटी कधी कोणाची लागली असेल असे मला तरी वाटत नाही. त्यातून आता कृष्णाची भेटही राधेला शक्य होणार नव्हती. एवढे दिवस निदान कृष्णाला भेटून तरी किंवा त्याला पत्र लिहून तरी राधेला तिच्या मनाला तात्पुरता का होईना, पण झालेला मानसिक त्रास वा दुःख मोकळे करण्याची सोय होती. परंतु तेही आता शक्य होणार नव्हते. मला वाटते एका अर्थी ही गोष्ट राधेच्या दृष्टीने चांगलीच झाली होती. कारण आता तिला स्वावलंबी होणे आवश्यकच झाले होते. सर्व जीवन स्वबळावरतीच जगणे क्रमप्राप्त झाले होते. त्यात राधा पूर्णपणे यशस्वी झाली असणार याची मला अगदी खात्री आहे.

तरीसुद्धा राधा व कृष्ण यांचे असे वेगळे राहणे हे माझ्या मनाला अजिबात सहन होत नाही. मी तर त्याची कल्पनाही करू शकत नाही. 'भक्तिभावाचे आंतरिक ऐक्य' ही भाषा बोलायला वगैरे ठीक आहे. परंतु प्रत्यक्ष एकत्र राहणे हेच खरे आनंददायी नाही का? त्यातूनही राधा व कृष्ण यांचे असे वेगळे राहणे काही योग्य व चांगल्या कारणाने झाले असते तर एवढे वाईट वाटले नसते. परंतु ज्या पार्श्वभूमीवर राधा व कृष्ण यांच्यात हा विरह झाला त्याचेच तर मला जास्त दुःख होत आहे.''

*****

# कालिया मर्दन व अनयाचे रक्षण

**''हे** नारदा, अरे खरेच का तो अनय त्या कंसाकडे गेला? तसे जर झाले असेल तर मग बघायलाच नको. कारण, म्हणजे मोठ्या संकटाला स्वतःहूनच आमंत्रण देण्यासारखे आहे. एखाद्याने व्यक्तिगत राग व द्वेषापोटी सर्वांनाच संकटात टाकावे म्हणजे तर त्या व्यक्तिची ही मानसिक व नैतिक अधोगतीच म्हणायची. एखादा एवढ्या खालच्या पातळीवर जाऊ शकतो याचे नवल वाटण्यापेक्षा त्याचा रागच जास्त येतो. परंतु शेवटी यातून काय निष्पन्न झाले बरे? खरेच गोकुळावर काही संकट ओढवले का? मग कृष्णाने त्यावर काय उपाय योजना केली? त्याने नक्कीच त्यातून काही तरी मार्ग काढला असणार याची मला अगदी खात्री आहे. माझ्या मनात एक वेगळ्याच प्रकारची हुरहूर निर्माण झाली आहे. आणि त्यामुळे मनाची बेचैनी वाढून राहिलेली आहे. तरी लवकरात लवकर पुढील कथाभाग सांगून माझ्या मनाला मोकळे व शांत कर बघू.''

लक्ष्मीच्या मनोभूमिकेचे व मनोभावाचे नारदाला अत्यंत कौतुक वाटले. पुढील कथाभाग स्वतःच गायन करून स्वतःच ऐकण्याची आतुरता नारदाच्या ठिकाणी तर लक्ष्मीपेक्षाही जास्त होती. त्याचे वर्णन केल्याशिवाय नारदालाच चैन पडणे शक्य नव्हते. म्हणूनच नारदानेही लगेचच बोलण्यास सुरुवात केली.

''हे लक्ष्मी, एक गोष्ट तू पूर्णपणे लक्षात ठेव, की मानवाने कितीही व काहीही करायचे ठरवले तरी तसे होण्याच्या मध्ये परमेश्वराची नियती असते. सामान्य मनुष्य स्वतःच्या विचारांच्या व प्रयत्नांच्या भरात नेमकी हीच गोष्ट विसरतो. परंतु म्हणून काही परमेश्वराच्या नियतीत घडणारी गोष्ट टळू शकत नाही. अनयाच्या बाबतीतही नेमके तसेच झाले. रागाच्या भरात कंसाकडे जाण्यासाठी म्हणून निघालेला अनय सैरभैर होऊनच चालत होता. मथुरेला लवकरात लवकर जाऊन पोचण्यासाठी बेचैन झालेल्या अनयाने यमुनानदी पार करून जाण्याचे ठरवले. खरे तर, नुकताच मुसळधार पाऊस पडून गेला होता आणि यमुनेला पूरही आलेला असल्यामुळे प्रवाहाला जोरही होता. कुणीही नावाडी आपली होडी यमुनेच्या पाण्यात उतरवण्यास धजावेचना. सर्वांनी त्या प्रवाहात होडी चालवण्याची असमर्थता तर व्यक्त केलीच, परंतु अनयालाही परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण मनाचा संपूर्ण तोल गेलेला अनय कोणाचेही काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीतच नव्हता. सर्वजण 'नको, नको' म्हणत असतानाही त्याने स्वतः एकट्यानेच होडी चालवण्याचा निर्णय हट्टाने घेतला आणि त्या प्रमाणे त्याने त्याची होडी प्रवाहात घातली सुद्धा.

परंतु जोरदार प्रवाहाला भेदून होडी पलीकडच्या तीराला नेणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. थोडेसे पुढे गेल्यावरतीच होडी डगमगू लागली. तिला सावरण्याचा अनयाने जेवढा म्हणून प्रयत्न केला, तेवढी ती होडी अधिकच एका बाजूला कलंडू लागली. प्रसंगाचे गांभीर्य अनयाच्या लक्षात आले मात्र, अनयाची भीतीने गाळणच उडाली. असहाय्य नजरेने तो मदतीच्या अपेक्षेने किनाऱ्यावरील लोकांकडे पाहू लागला. परंतु अनयाच्या मदतीला जाण्याचे धैर्यबळ कोणाच्याच ठिकाणी नव्हते.

स्वतःचा जीव धोक्यात घालावयास कोणीच तयार नव्हते. कारण कोणालाही स्वतःचाच जीव अधिक प्रिय असतो. कोणीही व्यक्ती कोणाच्याही कितीही आवडीची असली, तरी स्वतःच्या प्राणापेक्षा जास्त प्रिय असू शकतच नाही. दुसऱ्यासाठी स्वतःचे प्राण पणाला लावण्यास कोणीच राजी होणार नाही.

अनयाची अवस्था मात्र अत्यंत केविलवाणी झाली. समोर मृत्यूच दिसू लागल्यामुळे भीतीने तर त्याचा अगदी थरकाप होत होता. प्राणांवरच गुदरलेल्या या संकटातून वाचण्याची त्याची आशा कमी होऊ लागली. 'वाचवा, वाचवा' असा टाहो फोडणारा अनयाचा आवाजही थकून क्षीण होऊ लागला आणि व्याकुळतेने त्याने मनातल्या मनात परमेश्वराचा धावाच सुरू केला. आतापर्यंतच्या आपल्या सर्व वागण्याचे त्याला स्मरण होऊ लागले. आपल्या हातून कळत नकळत घडलेली सर्व दुष्कृत्ये त्याला आठवू लागली. प्रिय पत्नी राधेवरती घेतलेला संशय, तिच्यावर जाणून बुजून केलेले दोषारोप, तिच्या चारित्र्यावर उडवलेले शिंतोडे हे सारे प्रसंग त्याच्या दृष्टीसमोर येऊन उभे राहू लागले आणि त्याला त्या सर्व गोष्टींचा अत्यंत पश्चात्ताप होऊ लागला. राधेचा आपल्याकडून अत्यंत छळ झाला या जाणिवेने त्याला अत्यंत वाईट वाटून रडूच कोसळले. पण त्याच्या हेही लक्षात आले, की आता सर्वालाच उशीर झाला आहे. सर्व संपतच आलेले आहे या खात्रीने अनय फक्त परमेश्वराचेच स्मरण करून त्यालाच आळवू लागला.

एवढ्यामध्ये काठावरील काही मुले धावत धावत नगरात गेली होती. त्यांनी अनय यमुना नदीच्या प्रवाहात सापडून बुडत आहे ही बातमी प्रथम त्यांच्या घरात सांगितली आणि नंतर सर्व गोकुळात पसरवली. राधा व म्हाळसा होत्या त्याच अवस्थेत धावत धावत यमुनाकाठी आल्या आणि त्या मागोमाग गोकुळातील अनेक जणही तेथे जमले. सर्वच जण अगदी हवालदिल झाले होते. काठावरून अनयाला वाचवण्याचे काहीजणांनी प्रयत्न सुरू केले. गुरांचे कासरे एकमेकाला जोडून घट्ट बांधले गेले आणि तो दोर अनयाच्या दिशेने फेकण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला. परंतु प्रवाहाच्या जोरामुळे त्या प्रयत्नांना यश येणे शक्यच होत नव्हते. तेवढ्यात नंदही स्वतः तेथे येऊन पोहोचला. परंतु त्याचाही काही इलाज चालेना आणि काय करावे हे त्याला सुचेनाच. म्हाळसा तर अनयाच्या नावाचा टाहो फोडत होती. 'माझ्या अनयाला वाचवा हो, कोणीतरी वाचवा हो' असे सर्वांना विनवीत म्हाळसा अगदी धाय मोकलून रडत होती.

राधा मात्र जरी शांत होती किंवा घाबरली नव्हती, तरी अनयाची असहाय्य अवस्था बघून तिलाही अत्यंत वाईट वाटतच होते. परंतु तिला प्रत्यक्ष काहीच करता येणे शक्य नव्हते म्हणून राधाही व्याकूळच झाली होती. तिचा भरवसा होता तो फक्त ईश्वरावर म्हणजेच कृष्णावर आणि नेमका तोच कसा काय कोण जाणे, पण त्यावेळेस तेथे नव्हता. कृष्ण तर त्याच्या घरीही नव्हता आणि कुठे होता हेही निश्चितपणे कोणालाच ठाऊक नव्हते. परंतु राधेने धीर सोडला नाही आणि अत्यंत आर्तभावाने ईश्वराची आळवणी सुरू केली. तिने हात जोडले व नेत्र मिटले आणि कृष्णरूपाचे ध्यान धरून तिने ईश्वराची प्रार्थना करण्यास सुरुवात केली. ईश्वराची नियती श्रेष्ठ आहे हे राधेला सुद्धा माहीत होते. परंतु ती हेही जाणून होती की सर्वभावाने जर त्या ईश्वराची करुणा भाकली, तर त्या ईश्वरी सत्तेत प्रतिकूल परिस्थितीतही अनुकूलता निर्माण होऊ

शकते आणि सर्व संकटेही दूर होतात. ईश्वर कोणाच्या ना कोणाच्या तरी रूपाने येऊन रक्षण व आधार देतोच आणि हे रूप म्हणजे कृष्णाचेच असणार याची खात्री राधेला होती. या एकाच दृढ विश्वासाने व श्रद्धेने अचल राहून राधा ईश्वराच्या सत्तेला आवाहन करीत होती.

हे लक्ष्मी, या सर्वांमध्ये एक गोष्ट आणखीन धोकादायक होती. ती म्हणजे यमुना नदीमध्ये असलेल्या एका डोहामध्ये 'कालिया' नावाचा एक मोठा विषारी साप अनेक वर्षांपासून वास्तव्य करून होता. ही गोष्ट गोकुळातील वयोवृद्ध मंडळी जाणून होती. त्याच्या विषामुळे त्या डोहातील पाणी अत्यंत विषारी झालेले असे. म्हणून त्या बाजूला जाण्यापासून सर्वांना नेहमीच परावृत्त केले जाई. चुकून जरी कोणी त्या बाजूला गेला आणि तेथील थोडेसे जरी पाणी प्यायला तर तो त्वरितच मृत्यूमुखी पडत असे. लोकांना कितीही सावध केले तरी मधून मधून असे अपघाताने मृत्यू घडत असत. या जाणकार मंडळींना हीच भीती वाटत होती, की अनयाची होडी वाहत वाहत जर त्या डोहात जाऊन बुडाली तर अनय त्या कालियाच्याच तावडीत सापडला असता आणि मग अनय वाचण्याची काहीच शक्यता नव्हती. त्यामुळे सर्वच जण आपला जीव अगदी मुठीत धरून बसले होते. आता फक्त एखादा ईश्वरी चमत्कारच अनयाला वाचवू शकेल असे स्पष्टपणे दिसत होते. कारण जवळ जवळ सर्व मानवी प्रयत्न संपत आलेले होते. एखाद्या अमानवी म्हणजे दैवी प्रयत्नांचीच आता जरुरी होती. त्याचीच सर्वजण मोठ्या आशेने वाट पाहत असतानाच अचानक कृष्णाचे आगमन तेथे झाले आणि सर्वांनाच मोठा आधार मिळाल्यासारखे वाटले. निराशेने भरलेल्या वातावरणात आशेचा किरणच दिसल्यासारखे झाले. काळ्याकुट्ट अंधारात अचानक एखादा दीप उजळावा तसेच कृष्णाच्या आगमनाने सर्वांना जाणवले.

यमुना नदीच्या प्रवाहात अनय बुडत असल्याची बातमी कुठून तरी कृष्णाच्या कानावर आली होती आणि तो होता तसा तिकडून धावतच सुटला होता. यमुनाकाठी जमलेली गर्दी आणि त्या मध्येही शोकाकुल झालेली म्हाळसा व व्याकुळ झालेली राधा यांना पाहिल्यावर प्रसंगाचे गांभीर्य कृष्णाच्या लगेचच लक्षात आले. गर्दीतून पुढे येऊन कृष्ण अगदी यमुनेच्या तीराजवळ येऊन उभा राहिला, तो यमुनेच्या प्रवाहात गोते खात असलेल्या होडीत बसलेला अनय त्याच्या दृष्टीला पडला. अनयाला पाहताच कृष्णाने आपले दोन्ही हात वर करून त्याला मोठ्याने हाक मारली आणि म्हणाला, ''अरे अनया, घाबरू नकोस. मी आता आलोय. तुला मी नक्कीच वाचवणार आहे. मुळीच घाबरू नकोस.''

कृष्णाचे हे शब्द कानावर पडल्यावर त्याही परिस्थितीत अनयाने वळून कृष्णाकडे पाहिले आणि त्याला एकदम धीर आल्यासारखे वाटले. कृष्णाचा शब्द ऐकताच एवढा वेळ ईश्वराला आळवणाऱ्या राधेने सुद्धा आपले डोळे उघडले आणि तिला तिच्या प्रिय कृष्णाचे दर्शन घडले. त्याबरोबर राधेच्या ठिकाणी आधीच असलेला आत्मविश्वास दुणावलाच. म्हाळसेने सुद्धा रडत रडत कृष्णाला हात जोडून अनयाला वाचविण्याची विनंती केली. कृष्णाने आपल्या नजरेने व हाताने सर्वांनाच आश्वासित केले. अनयापर्यंत कसे पोहोचावे असा विचार कृष्ण करीत असतानाच अनयाची होडी पूर्णपणे कलंडली. अनय त्या होडीतून बाहेर फेकला गेला आणि जेथे कालिया सर्प वास करून होता, त्या यमुनेतील डोहात जाऊन होडीसह बुडाला.

क्षणार्धात अनय दिसेनासा झाला आणि काठावरील लोकांकडून दुःखाचा एकच आवाज निनादला. सर्वत्र शोक व दुःख याचे वातावरण पसरले.

परंतु तेवढ्यातच, काय होते आहे हे कळण्याच्या आतच कृष्ण पुढे सरसावला आणि त्याने सुर मारून यमुनेच्या प्रवाहात उडी मारली. कृष्णाच्या या अनपेक्षित कृतीने काठावरील सर्वजण चकित झालेच, पण त्याहीपेक्षा घाबरलेच अधिक. कारण सर्वांची काळजी आता आणखीनच वाढली. सर्वजण श्वास रोखून बघत होते. कोणाच्याही डोळ्यांची पापणी तर मिटतच नव्हती. एवढेच नव्हे, तर कोणाच्याही मुखातून दुःखाचा उद्गारही निघूच शकत नव्हता. एवढे सर्व जण भीतीने अवाक व गारठल्यासारखे झाले होते. मोठ्या कष्टाने पोहत पोहत कृष्ण कसाबसा त्या डोहापर्यंत जाऊन पोहोचला. क्षणार्धात त्याने त्या ठिकाणी बुडी मारली आणि तो एकदम दिसेनासा झाला. क्षणभर काय झाले हे कोणाच्याही लक्षात आलेच नाही आणि जेव्हा ते लक्षात आले तेव्हा तर सर्वत्र दुःखाचा एकच हाहाकार उडाला.

हे लक्ष्मी, सूर्य अस्तास गेल्यावरती जसे सर्वत्र काळोखाचे साम्राज्य पसरावे तसे यमुनाकाठी नैराश्याचे व शोकाचे वातावरण पसरून राहिले. अनय यमुना नदीतील डोहात बुडाला आणि त्याला वाचविण्यासाठी गेलेला कृष्णही यमुनेच्या जलप्रवाहात बुडाला ही बातमी वाऱ्यासारखी गोकुळात सर्वत्र पसरली आणि गोकुळात बाकी राहिलेले सर्व जनही यमुनेच्या तीरावर धावत आले. यशोदेने तर रडून रडून नुसता आकांत मांडला होता. दुःखाच्या आवेगाने तिला वारंवार भोवळही येऊ लागली. तिचे सांत्वन करता करता नंदाला स्वतःचे कोसळलेले रडू आवरणेही कठीण जात होते. बलरामही बिचारा यशोदा मातेला घट्ट धरून ढसाढसा रडत होता. अशा तऱ्हेने सर्वच जण हताश व हतबल झाले असताना राधा मात्र धैर्य बाळगून होती. खरे तर, तिची अवस्था जास्त शोकाकुल झालेली होती. कारण एकीकडे तिचा पती अनय आणि दुसरीकडे तिचा सर्वस्वी असलेला कृष्ण असे दोघेही एकदमच प्राणसंकटात सापडलेले होते. परंतु राधेच्या मनात एक खात्री अगदी पूर्णपणे होती की कृष्णाला काहीही होणे शक्य नाही आणि कृष्णही अनयाला काहीही होऊ देणार नाही. परंतु प्रत्यक्ष कृष्ण व अनय सुखरूप दिसेपर्यंत राधेच्या ठिकाणीही अत्यंत अस्वस्थताच निर्माण झालेली होती.

क्षणाक्षणाने जाणारा काळ युगासारखा वाटत होता आणि राधेच्या मनोबळाचीही कसोटीच लागत होती. परंतु कृष्णावरील अचल श्रद्धेने व निष्ठेने राधेने तिच्या ठिकाणचे सर्व भावबळ प्रयत्नपूर्वक एकवटून निश्चयपूर्वक धरून ठेवले होते. कृष्णप्रेमाने पूर्ण भरलेल्या मनाने राधा अंतःकरणात ठसलेल्या कृष्णरूपालाच आळवीत होती. नेत्र मिटलेले परंतु मनःचक्षूसमोर कृष्णाची प्रेमळ व धैर्यवान मूर्ती पाहणाऱ्या राधेच्या मुखातून कृष्णाचे माहात्म्य व थोरवी वर्णन करणारे शब्द स्वरांच्या आधाराने प्रगट होऊ लागले. उत्कट भावातून स्फुरलेले सूर, सुरातून उमललेले शब्द आणि त्यातून फुललेले संगीत भावपूर्णतेचा कळसच गाठीत होते. निराशेच्या वातावरणात आशेचा सूर निर्माण करणारा, गडद अंधःकारात प्रकाशाचा किरण दाखवणारा आणि उष्णतेने तापलेल्या भूमीवर शीतल जलधार वर्षवणारा राधेचा सूर सर्वांच्याच मनाला शांत करणारा व आधार देणारा ठरला. राधेच्या सुरात एकेक जण हळुहळू आपलाही सूर केव्हा व कसा मिळवू लागला हे कोणालाच कळले

नाही.  परंतु हळुहळू सर्व सूर जुळून एक होऊ लागले आणि सर्व वातावरणच एकदम भावपूर्ण झाले.  सर्वांच्याच मनातील भाव त्या सुरांच्या माध्यमाने एकवटले आणि जणू त्याचीच फलनिष्पत्ती की काय, परंतु एकदम एखादा मोठा चमत्कारच घडल्यासारखे झाले.

अचानकपणे यमुनानदीच्या त्या डोहातून कृष्णाचे मस्तक वरती आलेले दिसू लागले.  क्षणभर कोणाचाही आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना.  परंतु सर्वजण जे पहात होते ते अगदी खरेच होते.  कृष्ण हळुहळू त्या जलप्रवाहातून वर येत होता.  एवढेच नव्हे, तर त्याने आपल्या एका हाताने अनयाला अगदी घट्टपणाने धरून ठेवले होते आणि त्याच अवस्थेत तो अनयाला यमुनेच्या काठाकडे ओढून आणीत होता.  त्याहीपेक्षा आश्चर्याची गोष्ट म्हणजे कृष्णाने दुसऱ्या हाताने कालिया सर्पाचे तोंड घट्ट दाबून धरले होते आणि त्या सर्पालाही तो आपल्या बरोबर खेचीत होता.  ते दृश्य पाहून तीरावरील सर्वच गोकुळवासी एकाचवेळी चकितही झाले आणि भयभीतही झाले.  पुढे काय होणार हे सर्वजण अगदी श्वास रोखून पाहत होते.  काही जण मदतीसाठी पुढे धावले खरे, परंतु प्रवाहात उतरण्याचे धाडस मात्र कोणालाही झाले नाही.


खरे तर कृष्णाची प्रत्यक्ष मृत्यूशीच झुंज चालू असल्यासारखे दिसत होते.  परंतु कृष्ण तर त्या वेळी काळाचाही कर्दन काळ भासत होता.  त्याच्या अंगातील सर्व बळ एकवटून तो एकाच वेळी अनय व कालिया या दोघांनाही धरून काठाकडे ओढीत आणीत होता.  एकीकडे यमुना नदीच्या प्रवाहाचाही जोर अजिबात कमी झालेला नव्हता.  त्यामुळे कृष्णाचे काम अधिकच कठीण होऊन राहिले होते.  कृष्णाची ही चाललेली धडपड न पाहवून काठावरील अनेकांनी मोठ्याने ओरडून, कृष्णाला त्या सर्पाला सोडून देण्यासाठी विनविले.  त्यामुळे मग कृष्णाचे सर्व बळ अनयाला वाचविण्यासच उपयोगी झाले असते.  परंतु नेहमीप्रमाणेच कृष्णाची जिद्द कायम होती.  कोणाच्याही म्हणण्याकडे अजिबात लक्ष न देता कृष्णाने आपले प्रयत्न चालूच ठेवले.  अनय व कालिया यांना एकाच वेळी काठावर आणण्याचा त्याचा निर्धार अगदी ठाम होता.

शेवटी आपल्या आत्मबळाने व स्वसामर्थ्याने कृष्णाने आपला निश्चय तडीस नेलाच आणि अघटित असलेली गोष्ट घडून आली.  अनय व कालिया या दोघांसह कृष्ण यमुनेच्या प्रवाहातून बाहेर येऊन काठावर आला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.  थोडा वेळ काय करावे हे कोणालाच सुचेना.  परंतु कृष्णानेच आधी आपल्या हातातील कालियाला काठावर सोडले, तर तो सर्प तसाच निश्चेष्ट होऊन तेथेच पडून राहिला.  काही हालचाल करण्याचे त्राणही त्या सर्पाच्याठायी राहिले नव्हते.  त्याच्याकडे लक्षच न देता कृष्णाने त्या सर्पाला तेथेच व तसेच सोडले आणि सर्व प्रथम अनयाला घेऊन तो पुढे आला.  आता सर्वजण एकदम सावध झाले आणि पुढे सरसावले.

सर्वात आधी राधा पुढे धावली आणि तिच्या मागोमाग नंद व बलरामही पुढे आले.  बाकी सर्व भीतीग्रस्त होऊन अजूनही मागेच उभे होते.  पुढे येण्याचे धाडस त्यांना होतच नव्हते.  मग कृष्णानेच पुढाकार घेतला.  एकीकडे राधेला हाताच्या व नजरेच्या खुणेने आश्वासन दिले आणि दुसरीकडे सवंगड्यांच्या मदतीने अनयाला त्या काठावरच पालथे केले.  कृष्णाने स्वहस्ताने अनयाची पाठ व कंबर दाबून त्याच्या पोटात शिरलेले पाणी बाहेर काढण्यास सुरुवात केली.  बऱ्याच

वेळाने व बऱ्याच प्रयत्नांती अनयाच्या पोटातील सर्व पाणी त्याच्या तोंडाद्वारे बाहेर पडले आणि अनयाच्या ठिकाणी पुन्हा चेतना दिसू लागली. सर्वांच्या चेहऱ्यावरील आशा पुन्हा पल्लवित झाल्या खऱ्या, परंतु अजूनही कोणाला पुरा भरवसा वाटत नव्हता. कारण अनयाच्या अंगावर ठिकठिकाणी कालियाने केलेल्या विषारी डंखाच्या खुणा दिसत होत्या. कालियाचे विष त्याच्या अंगात शिरल्यामुळे अनय अजूनही मूर्च्छित अवस्थेत होता.

त्याच वेळी एकीकडे कृष्णाने हातात धरून आणलेला कालिया सर्पही काठावरती अर्धमेल्या अवस्थेत पडलेला होता. कृष्णाचे सवंगडी त्या सर्पाला मारण्यासाठी म्हणून अतिशय रागाने आपल्या हातातील काठ्या घेऊन पुढे सरसावले. खरे तर कृष्णाला अत्यंत दमल्यामुळे ग्लानीच आल्यासारखे होत होते. परंतु त्याही स्थितीत कृष्णाने आपल्या सवंगड्यांना आवरले



आणि कालियाला न मारण्याविषयी बजावून सांगितले. तो म्हणाला, ''त्या सर्पाचे तोंड मी दाबून धरल्यामुळे त्याच्यातील सर्व गरळ बाहेर आलेले आहे आणि तो पूर्ण निर्विष झालेला आहे. तेव्हा त्याला तसाच सोडून द्या.'' केवळ कृष्णाने सांगितले म्हणूनच त्या सवंगड्यांनी कालियाला मोकळा सोडला. कालियाही थोड्या वेळाने तेथून हळू हळू सरपटत दूर निघून गेला.

तेवढ्यात राधाही पुढे आली. तिने अनयाचे डोके आपल्या मांडीवर घेतले आणि त्याच्या सर्वांगावरून हात फिरवून त्याला सावध करण्याचा प्रयत्न राधा करू लागली. अनयाची ती असहाय्य व दयनीय अवस्था पाहून राधेलाही रडूच कोसळले. तिने अश्रुपूर्ण नेत्रांनी व व्याकुळ नजरेने कृष्णाकडे पाहिले. तिच्यासाठी तर कृष्ण हाच एक त्राता होता. त्या आधीच काही जण औषधी जडीबुटी आणण्यासाठी धावतच गेलेले होते. परंतु कृष्ण जाणून होता की तेवढा वेळ थांबणे हेही धोक्याचेच होते. कारण अनयाच्या शरीरात हळुहळू विष पसरायला सुरुवात झालेली होती आणि जर विष शरीरात पूर्णपणे भिनले असते, तर मग अनयाचा जीव वाचण्याची जराही शक्यता नव्हती. तेव्हा अत्यंत थोडाच वेळ हाताशी होता. त्याच्या आतच उपाय योजना करणे अत्यावश्यकच होते.

परिस्थितीचे गांभीर्य जाणून असलेल्या कृष्णाने क्षणाचाही विचार न करता आपले तोंड अनयाच्या शरीरावर कालियाने डंख मारलेल्या जखमेवर लावले आणि भराभर अनयाच्या अंगावर शिरलेले कालियाचे विष आपल्या तोंडात ओढून घेऊ लागला. तोंडात विष आले रे आले की कृष्ण त्या विषाची चूळ लगेच बाजूला टाकून देत असे आणि पुन्हा आपल्या तोंडाने अनयाचे विष चोखून घेण्याची क्रिया चालू करी. कृष्णाच्या या कृतीतील जोखीम सर्वांच्याच लक्षात आली आणि ते अधिकच भयभीत झाले. कारण आता कृष्णाच्याही जीवाला धोका निर्माण झाला होता. राधा तर अधिकच व्याकुळ झाली. एकीकडे तिच्या जीवनातील मुख्य असलेला तिचा पती अनय आणि दुसरीकडे तिच्या हृदयातील मुख्य असलेला तिचा ईश्वर कृष्ण. परंतु तिच्या मनाची दोलायमान अवस्था मात्र मुळीच झालेली नव्हती. तिला अगदी पक्की खात्री होती की तिचा पती नक्की वाचणार होता आणि त्याला फक्त कृष्णच वाचवणार होता. आपल्या पुत्रावरील स्नेहाने यशोदेने पुढे येऊन कृष्णाला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु कृष्णाचा दृढ निश्चय कायम होता आणि त्याने अनयाचे विष चोखून बाहेर काढण्याची कृती चालूच ठेवली. मग नंदानेच स्वतः पुढे येऊन यशोदेला सावरून मागे घेतले आणि तिला आपल्याजवळ प्रेमाने धरून ठेवले. असा बराच वेळ गेला. जसे जसे अनयाच्या अंगातील भिनलेले विष उतरू लागले तसा तसा अनय हळुहळू सावध होऊ लागला. आणि काय चमत्कार! थोड्या वेळाने अनयाने आपले डोळे सुद्धा उघडले. सर्वांनाच सुखद आश्चर्याचा धक्काच बसला आणि सर्वांचेच नेत्र पाणावले. अनेकांनी आपले दोन्ही हात जोडून ईश्वराचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले.

अनयाने डोळे उघडले खरे, परंतु त्याला एवढा शीण आला होता की त्याला जास्त वेळ डोळे उघडेही ठेवता येत नव्हते. डोळे उघडल्यावरही परिस्थितीचे भान यायला त्याला बराच वेळ लागला. आपण कोठे आहोत, येथे काय करीत आहोत हे त्याला किती तरी वेळ कळेचना. थोड्या वेळाने जेव्हा अनयाच्या लक्षात आले की त्याचे डोके राधेच्या मांडीवर आहे आणि राधा अश्रुपूर्ण नेत्रांनी त्याच्याकडे पाहत त्याच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवीत आहे, तेव्हा तर तो केवढा तरी चकितच झाला. त्याचा त्याच्याच डोळ्यावरती विश्वास बसेना आणि म्हणून पुन्हा त्याने आपले डोळे मिटून घेतले. डोळे मिटलेल्या अवस्थेत असतानाच तो काय घडले हे आठवण्याचा प्रयत्न करू लागला आणि हळुहळू त्याला सर्व आठवू लागले.

एकेक प्रसंग त्याच्या डोळ्यासमोर चित्रमालिकेसारखे येऊ लागले. अनयाची स्मृती थोडी थोडी जागू लागली. घरातून रागारागाने निघाल्यापासून ते त्याची होडी डोहात बुडून तो कालियाच्या विळख्यात सापडेपर्यंतचे एकेक चित्र अनयच्या डोळ्यासमोर क्रमाक्रमाने येऊ लागले. जीव वाचवण्यासाठी त्याने केलेला ईश्वराचा धावा आणि अगदी बुडण्याच्या आधी कृष्णाने दोन्ही हात वर करून व मोठ्या आवाजात त्याला वाचवण्याचे दिलेले आश्वासन हे अनयाला आठवले मात्र, अनय एकदम सावध झाला. आपले डोळे पुन्हा उघडून तो आजूबाजूला शोधक नजरेने पाहू लागला, तो त्याची दृष्टी जवळच उभ्या असलेल्या कृष्णावर पडली आणि कृष्णाकडे तो बराच वेळ एकटक नजरेने पहातच राहिला. पहाता पहाता अनयाला गहिवर आला आणि त्याच्या नेत्रातून अश्रुधारा केव्हा वहायला लागल्या हे त्याचे त्यालाही कळले नाही.

अनयाची भावपूर्ण अवस्था बघून राधेलाही मग राहवले नाही. तिने आपल्या हातांनी अनयाच्या डोळ्यातून सतत ओघळणारे अश्रू पुसून ते थांबवण्याचा आणि अनयाला सावरण्याचा प्रयत्न केला. परंतु तिच्या स्वतःच्या डोळ्यातील अश्रुधारा मात्र चालूच होत्या. राधेची ती अवस्था व तिचे प्रेम पाहून अनयाला अधिकच भरून येऊ लागले. शेवटी अनयाने हळुहळू स्वतःला सावरले आणि त्याने हाताच्या खुणेनेच राधेला काय घडले म्हणून विचारले. राधेनेही मग अनयाला घडलेल्या सर्व गोष्टी समजावून सांगितल्या. कालियाच्या विळख्यातून कृष्णानेच अनयाला सोडवून आणले हे सांगून राधेने त्याच्या अंगावरील कालियाच्या विषारी डंखाच्या खुणा दाखवल्या. त्याहीपेक्षा अनयाच्या अंगात विष पूर्णपणे भिनण्याच्या आतच कृष्णाने स्वतः ते विष आपल्या तोंडाने चोखून घेऊन कसे बाहेर काढले आणि त्यामुळेच अनयाचे प्राण कसे वाचले हे सांगताना तर राधा स्फुंदून स्फुंदून रडूच लागली. ते सर्व ऐकत असताना अनयाच्या मनाची अवस्था मात्र अधिकाधिक भावनाविवश होत होती. त्याला त्याचा भावनावेग आवरणे शक्यच होत नव्हते. परंतु शरीराच्या अत्यंत थकलेल्या अशा दुर्बल अवस्थेत अनय काही करूही शकत नव्हता. तरीही त्याच अवस्थेत अत्यंत प्रयत्नपूर्वक अनयाने जागच्या जागीच थोडेसे उठल्यासारखे केले आणि कृष्णाकडे अर्धोन्मिलित डोळ्यांनी पाहून आपले दोन्ही हात जोडले. परंतु एवढेही श्रम अनयाला सहन होऊ शकले नाहीत आणि तो पुन्हा राधेच्या मांडीवर ग्लानी येऊन पडला.

एव्हाना जमलेले अनेक जण सावध होऊन कार्यरत झालेच होते. नंदाने सर्व प्रथम कृष्णाच्या जवळ जाऊन त्याला आपल्याजवळ घेतले. खरे तर, कृष्णालाही थोडी ग्लानीच येत होती. आपले उत्तरीय नंदाने कृष्णाच्या अंगावर पूर्णपणे लपेटून त्याला उबेत घेतले. त्यानंतर नंदाने विषामुळे काळे निळे झालेले कृष्णाचे ओठ पाण्याच्या सहाय्याने स्वतःच्या हाताने धुतले. कृष्णाला थोडे थोडे पाणी पाजून नंदाने त्याला गुळण्या करायला लावल्या आणि वमन करून पाणी बाहेरही ओकायला लावले. तेवढ्यामध्ये काही जणांनी कृष्णाच्या व अनयाच्या घरी धावत जाऊन त्यांचे कपडे आणले, तर काही जणांनी गरम गरम दूध आणले. काही जणांनी अनयाचे हात पाय चोळून त्यामध्ये ऊब आणण्यास सुरुवात केली. राधेच्या मांडीवर डोके ठेवून पडलेल्या अनयाला राधा प्रयत्नपूर्वक थोडे थोडे दूध पाजू लागली.

म्हाळसेचेही अवसान आता परत आले होते. पुढे येऊन तीही राधेला मदत करू लागली होती. दुःखाने व शोकाने म्लान झालेल्या म्हाळसेच्याही चेहऱ्यावर आता जराशी तकतकी आली होती. मधून मधून ती बसल्या जागेवरूनच कृष्णाकडेही डोळे भरून पाहत होती. परंतु कृष्णाजवळ जाण्याचे धाडसच तिला होत नव्हते. ज्या कृष्णाचा संशय घेऊन एवढे दिवस म्हाळसा त्याचा राग व दुस्वास करीत होती, त्याच कृष्णाने आज तिच्या मुलाचे प्राण वाचवले होते, असा विचार मनात वारंवार येऊन म्हाळसा मनातल्या मनात खजील झाली होती. तिला अगदी ओशाळल्यासारखे होत होते. परंतु म्हाळसेला शेवटी राहवलेच नाही. बसल्या जागेवरून मोठ्या प्रयत्नाने ती उठली आणि हळुहळू चालत कृष्णाच्या जवळ आली. आपल्या हातातील गरम दुधाचा प्याला तिने कृष्णाच्या समोर धरला. त्याही परिस्थितीत कृष्णाने मंद स्मित केले आणि वाकून आपले तोंड पुढे केले. म्हाळसाही प्रयत्नपूर्वक हसली आणि स्वतःच्या हाताने कृष्णाला दूध पाजू लागली. त्यामुळे तिलाच अधिक बरे वाटले.

थोड्या वेळाने अनयाच्या अंगातही बरेचसे त्राण आले आणि त्याला जरा हुशारीही वाटू लागली. परंतु त्याला आलेला थकवा कायम होता. तरीही अनय हळुहळू राधेच्या आधाराने उठून बसला. खुणेनेच त्याने राधेला 'कृष्ण कुठे आहे' असा प्रश्न विचारला. राधाही लगेच कृष्ण कुठे आहे ते बघू लागली. पण कृष्ण तिला कुठेच दिसेना. तिने तेथील प्रत्येकाला 'कृष्ण कुठे आहे' असे विचारून पाहिले. परंतु कुणालाच तो कोठे दिसेना. सर्वांनाच नवल वाटले. नंदही चकितच झाला. तेवढ्यात सर्वांच्या लक्षात आले की कृष्ण सर्वांच्या मागे असलेल्या यशोदेच्या जवळ गेला होता आणि तिच्या मांडीवर आपले डोके ठेवून व डोळे मिटून शांतपणे पहुडला होता. यशोदाही अत्यंत प्रेमाने एका हाताने कृष्णाच्या सर्व अंगावर हात फिरवून ते चेपीत हेती आणि दुसऱ्या हाताने कृष्णाचे मस्तक थोपटीत होती. तिच्या नेत्रातून वाहणारे प्रेम वात्सल्य कृष्णाच्या अंगावरती बरसत होते आणि कृष्णाच्या श्रांत झालेल्या देहाला खरी विश्रांती मिळत होती. सर्वांनीच ते दृश्य पाहिले आणि सर्वांचीच मने भरून आली.

एवढा मोठा पराक्रम करूनही कृष्ण एखाद्या लहान बालकासारखा अत्यंत निरागस भावाने आपल्या मातेच्या कुशीत विसावला होता. पुढे येऊन त्याला उठविण्याचा विचारही कोणाच्या मनात आला नाही. परंतु शेवटी नंदच पुढे झाला आणि त्याने कृष्णाला एखाद्या लहान मुलासारखे उचलून आपल्या खांद्यावर घेतले आणि एका हाताने त्याला पाठीवर थोपटीत नंद त्याच्या राजवाड्याच्या दिशेने हळुहळू चालू लागला. यशोदाही नंदाचा एक हात धरून त्याच्या पाठोपाठ चालू लागली आणि चालता चालता एका हाताने कृष्णाला मस्तकावर थोपटीत राहिली. त्यांच्याकडे पहाता पहाता सर्वांचीच मने गहिवरून आली आणि आलेला गहिवर सर्वांनी निःसंकोचपणे डोळ्यांच्या द्वारे मोकळा केला. अनयालाही भावनेचा आवेग सहन होईना आणि तो मुसमुसून रडू लागला. राधाही अत्यंत भावपूर्णच झाली होती. तिने मनातल्या मनात तिच्या पराक्रमी व तिला अत्यंत प्रिय असलेल्या कृष्णाचे भक्तिभावाने दर्शन घेतले. अनयाची समजूत घालून राधेने त्यालाही सावरले. तेवढ्यात काही जणांनी अनयाला उचलून घेतले आणि राधा व म्हाळसा यांच्यासह सर्वजण अनयाच्या घराकडे हळुहळू चालू लागले.

हे लक्ष्मी, कालियाच्या मर्दनाच्या निमित्ताने घडलेली आणखीन एक महत्त्वाची गोष्ट तुझ्या लक्षात आली का? कालियाच्या विषामुळे यमुनेच्या डोहातील पाणी विषारी होई आणि ते सर्वांसाठी प्राणघातकच ठरत असे. पाणी, ज्याला जीवनदायी असे म्हटले जाते तेच जीवन संपवणारे ठरत होते. परंतु कृष्णाने त्या डोहातून विषारी कालियाला बाहेर काढून तेथून हाकलून लावल्यामुळे यमुनेचे पाणी निर्मळ झाले आणि पुन्हा सर्वांसाठी उपयुक्त असे जीवन झाले. त्या प्रसंगातूनच जणु काही कृष्णाच्या कार्याचे सूत्रच प्रगट झाले. अनेक गुणवान व कर्तृत्ववान व्यक्तिंच्या मनाच्या ठिकाणी साचलेल्या मळातून विषच निर्माण झालेले असते. त्यामुळे सामान्यांना त्या व्यक्ती उपयोगी न ठरता घातकच ठरतात. परंतु ईश्वरी प्रेमामुळेच जर त्यांची मने निर्मळ व निर्विष झाली तर त्या व्यक्तीच सामान्यांच्या केवढ्या तरी उपयोगाच्या होऊन राहतात. खरे की नाही? असो.

घरी आल्यावरही अनयावरती औषधोपचार चालूच होते. राधा अतिशय आपलेपणाने त्याची शुश्रूषा करीत होती. त्याच्या जखमांना रोज धुवून औषध लावणे, त्याला वेळच्या वेळी औषध सेवन करावयास देणे, त्याचे अंग पुसणे, वेळप्रसंगी त्याला आपल्या हाताने जेवण भरवणे, त्याला लवकर ताकद यावी म्हणून अनेक पौष्टिक पदार्थ तयार करून अनयाला देणे इत्यादी गोष्टी राधा अगदी सहजपणे व सेवाभावाने अनयासाठी करीत होती. राधेचे हे वागणे बघून अनयाला मनातल्या मनात अधिकच शरमल्यासारखे होत होते. त्याने राधेला पूर्वी ज्या वाईट पद्धतीने वागवले होते ते सर्व अनयाला स्मरत होते. परंतु राधेच्या वागण्या बोलण्यात त्या गोष्टींची आठवण अगदी अस्पष्टपणेही दिसत नव्हती. राधेचे मन अगदी निर्मळ होते, पूर्ण स्वच्छ होते. हाच तर कृष्णप्रेमाचा गुण होता.

अनयाला हे सर्व जाणवत होते आणि त्यामुळे तो अधिकच अंतर्मुख झाला होता. तो जास्त कोणाशीही बोलतच नसे. सदासर्वकाळ स्वतःच्या विचारात मग्न असे. विचार करता करता त्याला कृष्णाचे मोठेपण जाणवू लागले होते. राधा व कृष्णावरती आपण वाटेल ते आरोप करून त्यांच्याशी वैरच धरले होते. परंतु कृष्णाने मात्र या कशाचाही विचार मनात अजिबात न आणता स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता अनयाचा जीव वाचविला होता. त्यासाठी कृष्णाने स्वतःच्या मृत्यूचाही धोका पत्करला होता. कोणत्याही सामान्य मनुष्याकडून अशा तऱ्हेचे वागणे घडणे शक्यच नव्हते याची खात्री अनयाला पूर्णपणे होती.

हळुहळू कृष्णासंबंधीचे विचार अनयाच्या मनात अधिकाधिक येऊ लागले आणि त्याच्या मनाला त्यामुळे बरेही वाटू लागले. राधेचेही कौतुक करता करता एक गोष्ट अनयाला निश्चितपणे माहीत होती, की राधेच्या या प्रेमळ वागण्याचे मूळ कारणही कृष्णच आहे. कृष्णाच्या प्रेमामुळेच राधेचा हा स्वभाव झालेला आहे याची अनयाला खात्री होती. परंतु राधा व कृष्ण यांच्या मोठेपणाचे स्मरण करताना जेव्हा अनयाला मध्येच स्वतःचे घाणेरडे मन व स्वतःच्या दुष्कृत्यांची आठवण होत असे, तेव्हा मात्र अनयाच्या ठिकाणी स्वतःच्या कमीपणाचा भाव जागृत होऊन त्याच्या मनाला ग्रस्त करून टाकीत असे. मग अनयाचे मन अगदी निराशेच्या गर्तेत जाऊन पडत असे. पुन्हा राधेच्या प्रेमळ वागण्या व बोलण्यामुळे अनयाला धीर येई आणि त्याचे मन पुन्हा उभारी घेई. असा काळ जाता जाता अनयाची तब्येत सुधारत चालली. त्याला थोडी ताकद येऊ लागली. थोड्या थोड्या हालचाली व हळुहळू हिंडणे फिरणेही त्याचे सुरू झाले. पण त्याचे मन मात्र अजूनही कमकुवतच होते.

काही दिवस गेल्यावर, कृष्णाची भेट घेऊन त्याच्या विषयीची कमीत कमी कृतज्ञता तरी प्रगट करावी असा विचार अनयाच्या मनात आला आणि तो विचार हळुहळू बळावू लागला. असे आपण जर नाही केले तर 'आपल्या सारखे कृतघ्न आपणच ठरू' असे वाटून अनय अगदी बेचैन झाला. परंतु तसे बोलण्याचे सुद्धा अनयाला धैर्य होत नसे. कृष्ण तर स्वतःहून येण्याची शक्यता नव्हतीच, परंतु राधाही कृष्णाचे नाव सुद्धा काढीत नव्हती आणि आपण कृष्णाचा विषय कसा काढावा हे अनयाला सुचतच नव्हते. पण शेवटी अनयालाच राहवेना. त्यानेच मनाचा हिय्या केला आणि त्याने नंदाच्या राजवाड्यात

जाण्याचे ठरवले. त्या प्रमाणे त्याने राधेला सांगितले आणि तिलाही त्याच्या बरोबर येण्यास सांगितले. परंतु राधेने अनयाला स्पष्टपणे सांगितले की कृष्णाने तिची भेट न घेण्याची शपथ घेतलेली आहे. त्यामुळे कृष्णाने स्वतःहून बोलावल्याशिवाय राधेने कृष्णाच्या भेटीला जाण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. राधेचे म्हणणे खरे असल्यामुळे अनयही तिच्यापुढे काही बोलू शकला नाही. परंतु अनयाची अस्वस्थता मात्र वाढतच चालली. त्याला नक्की ठाऊक होते की कृष्णाला भेटल्याशिवाय त्याच्या मनाला अजिबात स्वस्थता लाभणार नाही. मग अनयाचाही नाईलाजच झाला आणि एक दिवस तो नंदाच्या राजवाड्यात जाऊन पोहोचला.

अनयाला आलेला पाहून नंदाला आनंद झाला. अत्यंत आपलेपणाने त्याने अनयाच्या तब्येतीची चौकशी केली आणि त्याची ख्याली खुशाली विचारली. अनयानेही नंदाला दोन्ही हात जोडून नमस्कार केला आणि तो तेथेच स्वस्थ बसून राहिला. पण तरीही त्याची नजर मात्र इकडे तिकडे कृष्णाला शोधीत होती. पण कृष्ण कोठेही जवळपास दिसेना. शेवटी न राहवून अनयाने नंदाकडे कृष्णाच्या तब्येतीविषयी चौकशी केली. 'कृष्णाला आता बरे आहे ना?' असेही अनयाने अत्यंत काळजीने नंदाला विचारले. तरीही अनयाच्या मनाचे काही समाधान होईना. म्हणून त्याने अगदी अजिजीच्या सुरात नंदाकडे कृष्णाला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. नंदानेही हसून मान डोलावली आणि कृष्णाला बोलावणे पाठवले. कृष्ण लागलीच तेथे आला आणि अनयाला पाहताच कृष्णाने स्मित हास्य करून अनयाचे स्वागत केले. पुढे येऊन कृष्णाने अनयाला विचारले,

''अरे अनया, बरा आहेस ना? तुझ्या चेहऱ्यावरून तरी तुला अजूनही अशक्तता आहे असे स्पष्टपणे दिसत आहे. औषध-पाणी व पौष्टिक आहार वगैरे व्यवस्थित चालू आहे ना? मुख्य म्हणजे तुझ्या घरी सर्व ठीक आहे ना? सर्व अगदी खुशाल आहेत ना?''

कृष्णाच्या बोलण्यातील आपलेपणा व आस्था जाणून अनयाचे मन भरून आले. त्या गहिवरलेल्या स्थितीतच अनय कृष्णाला उद्देशून बोलू लागला.

''अरे कृष्णा, तुझ्या ठिकाणी सर्वांविषयी आपलेपणा व प्रेम अगदी सहज आहे हे मला माहीत आहे. परंतु मी खरेच सांगतो की मी त्यासाठी मुळीच पात्र नाही. माझी ती लायकीच नाही. खरे तर मी नालायकच आहे. एवढेच नाही, तर मी तुझा अनंत अपराधी आहे. मी तुझ्यावर वाट्टेल ते खोटे नाटे आरोप केले. तुझा व राधेचा संशय घेतला. कारण अशा तऱ्हेचे शुद्ध प्रेम असू शकते हे मला माहीतच नव्हते आणि ते मला तरी कसे ठाऊक असणार? कारण एक स्त्री म्हटली व एक पुरुष म्हटला की त्यांच्यात विषय वासनेपेक्षा दुसरे काही संबंध असू शकतात याची मला कल्पनाच करता येणे शक्य नव्हते. विषयवासनेने नित्य युक्त असलेल्या माझ्या मनाला तीच एक दृष्टी होती आणि तसेच माझ्या दृष्टीला येत होते.

विषयसुखालाच प्रेम समजणारा मी तुझ्या शुद्ध प्रेमालाही विषयच समजत होतो आणि म्हणून खरे तर माझेच मन शुद्ध नव्हते. एवढ्या काळामध्ये भोगलेल्या विषय सुखाचा सर्व मळ माझ्या मनात साचून राहिला होता आणि त्याचे रूपांतर विषातच झाले होते. माझी पत्नी ही मला विषयसुख देणारी, एक मालकीची व भोग्य वस्तू आहे या कोत्या विचाराने माझे मन अगदी संकुचित झालेले होते. त्यामुळे माझी पत्नी कोणा दुसऱ्या पुरुषाचा विचार करते आणि भावनिक आधारासाठी कोणा परक्या पुरुषावर अवलंबून राहते हा विचारच माझ्या मनाला सहन होत नव्हता. त्याचेच रूपांतर मग राधेचा व तुझा राग येण्यात झाले. त्या रागाच्या भरात मी तुझी अतिशय निंदा नालस्ती केली आणि राधेचा तर अत्यंत मानसिक छळच केला. केवळ अज्ञानाने म्हणण्यापेक्षा अहंकाराने युक्त झाल्यामुळे खरे तर माझ्याकडून केवढे तरी पापच घडले आणि त्या माझ्या दुष्कृत्याची शिक्षा मला परमेश्वराने दिलीच होती.

हे कृष्णा, तू व नंदराजाने माझी समजूत काढण्याचा केवढा तरी प्रयत्न केलात. पण केवळ हट्टाने व दुराग्रहानेच मी कंसाकडे जाण्याचे ठरवले आणि त्या यमुना नदीच्या प्रवाहात सापडलो. तेव्हा तर मी निश्चितपणे बुडून मरणारच होतो. काठावरील अनेकजण मला धीर देण्याचा प्रयत्न करीत होते खरे, परंतु प्रत्यक्ष मला मदत करणे कोणालाच शक्य होत नव्हते. तेवढ्यात कृष्णा, तू तेथे धावून आलास आणि मला वाचविण्याचे आश्वासन दिलेस. माझे सर्व अपराध व माझी सर्व दुष्कृत्ये तू विसरलास. तुझ्या ठिकाणी तर माझ्या विषयीच्या रागाचा अगदी मागमूसही दिसला नाही. तुझ्या नुसत्या येण्यानेच व तुझ्या केवळ शब्दानेच मला एकदम केवढा तरी धीर आला. त्यातूनही पुढे मी प्रवाहात पडून कालिया सर्पाच्या तडाख्यात सापडलो तेव्हा मात्र मी माझ्या जिवाची आशा पूर्णपणे सोडून दिली होती. त्या मरणोन्मुख स्थितीत असतानाही तू स्वतः पाण्यात बुडी मारून माझ्याजवळ आलास ते तुझे रूप मला अजूनही स्मरत आहे. कालियाने त्याच्या विळख्यात मला घट्ट धरून माझ्या अंगावर अनेक विषारी डंख मारून चावे घेतले होते आणि मी मूर्च्छित होतच होतो. तेवढ्यात तू कालियाला शेपटापासून धरून पिरगळून काढलेस आणि मला कालियाच्या विळख्यातून सोडवलेस. कालियाच्या मस्तकावर तुझ्या मुष्टीने अनेक जोरदार प्रहार करून तू कालियाला जर्जर करीत होतास हेही मला थोडेसे आठवते. परंतु त्या नंतर तू एका हाताने मला धरून तुझ्याजवळ ओढलेस तेव्हा मात्र माझी शुद्ध पूर्ण हरपली.

त्यानंतर जेव्हा मी शुद्धीवर आलो तेव्हा माझे डोके राधेच्या मांडीवर ठेवून मी आडवा पडलेलो होतो आणि सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे राधेच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या. राधा स्वतःच्या हातांनी माझे सर्व अंग चोळून माझ्या शरीराब ऊब आणण्याचा प्रयत्न करीत होती. नंतर तिने मला गरम दूधही पाजले. घरी आल्यानंतर तर गेले कित्येक दिवस राधा जी माझी शुश्रूषा व सेवा करीत आहे त्याला तर तोडच नाही. केवळ तिने घेतलेल्या अशा काळजीमुळेच मी पूर्णपणे बरा होऊन आज तुमच्यापुढे उभा आहे.

अरे कृष्णा, हेच तर मला अजूनही कळत नाही, की तू माझे प्राण का वाचविलेस आणि राधेने एवढे प्राणापलीकडे मला जपून मला का बरे केले? माझ्या सारख्या सामान्य बुद्धीच्या व्यक्तिच्या कळण्याच्या हे पलीकडचे आहे. कारण मुळात

तुम्हा उभयतांचे हे वागणेच सामान्य नाही. तुमचे प्रेमाचे संबंधही सामान्य नाहीत हेच यावरून सिद्ध होते. कारण नाहीतर तुमच्या जागी कोणी वैषयिक प्रेमाच्या व्यक्ति असत्या तर त्यांना माझ्या मरणाचा आनंदच वाटला असता. त्यांच्या विषय सुखातील माझा अडथळा आयताच दूर होत आहे या विचाराने ते खूशच झाले असते आणि मला वाचविण्याचा जराही प्रयत्न न करता उलट त्यांनी मला मरणाच्या द्वारात आणखीनच ढकलून दिले असते. परंतु तुमच्या जागी दुसरे कोणी असणे शक्यच नाही. तुमची जागा दुसऱ्या कोणालाही घेता येणारच नाही. तुमच्या जागी तुम्हीच योग्य आहात आणि त्या जागी तुम्हीच सर्वार्थाने शोभूनही दिसता. कृष्णा, खऱ्या व शुद्ध प्रेमाच्या संबंधाचा तू व राधा खरेच एक आदर्श आहे. खरे तर, मी ईश्वराची सत्ता किंवा ईश्वराचे प्रेम वगैरे मानतच नव्हतो. परंतु आता मात्र माझी अगदी पुरेपूर खात्री पटली की ईश्वराची सत्ता आहे आणि ईश्वराचे प्रेमही आहे. ईश्वराची सत्ता सर्वत्र असते असे म्हणतात ते सत्यच असेल, परंतु त्या ईश्वराचे प्रेम मात्र तुझ्याच ठिकाणी आहे हे अगदी खरे आहे. नाहीतर माझ्या सारख्या मानसिक अधोगतीला गेलेल्या पापी माणसावर तुझ्याशिवाय दुसरे कोणाला प्रेम करणे शक्य आहे बरे?

हे कृष्णा, तू जसे त्या विषारी कालियाचे मर्दन करून त्याला निर्विष केलेस, त्याचबरोबर माझे विषयुक्त मनही निर्विष केलेस. तुझा हा पराक्रम मोठा आहे व तोच खरा आहे. म्हणूनच त्यासाठी आज एक गोष्ट मी तुझ्यापाशी मोकळेपणाने व प्रामाणिकपणे कबूल करतो, की माझ्या मनामध्ये खरा संशय तुझ्यापेक्षा राधेविषयीच जास्त होता. कारण तुझ्याकडे मी पहिल्यापासूनच एक लहान, निरागस व लडिवाळ मुलगा म्हणून पाहत होतो. परंतु राधेचे तुझ्याकडे तुझ्या प्रेमाने आकर्षित होणे माझ्या मनाला जास्त त्रासदायक वाटू लागले. कारण एक पती म्हणून माझा तो पराभवच आहे असे माझ्या मनाने घेतले. आधीच माझ्या ठिकाणी एक प्रकारचा न्यूनगंड होताच. त्यातूनच राधेसारखी सुंदर, आकर्षक व्यक्तिमत्त्वाची अशी सुरेख स्त्री मला पत्नी म्हणून भाग्याने लाभली याने माझा तो न्यूनगंड अधिकच वाढला. मी दिसण्यात वा कर्तृत्वाने किंवा इतर कोणत्याही अंगाने राधेला साजेसा नाही याची मला पक्की खात्री होती. माझे मित्र तर 'माकडाच्या हाती माणिक मिळाले' अशा शब्दात माझी अगदी उघड उघड चेष्टा करीत. त्यामुळे मला राधेचाच राग येई. सर्वचजण राधेकडे वाईट दृष्टीने पाहतात अशी माझी खात्री झाली होती. राधा जरी अज्ञानी व निरागस होती, तरी लोकांचे 'असे पाहणे' राधेला आवडते आणि तिला त्यात सुख वाटते असे मला उगाचच वाटू लागले. एवढेच नव्हे, तर राधा जेव्हा कधी एकटी बाजारात किंवा इतर काही कामासाठी जात असे तेव्हा लोकांच्या अशा वाईट दृष्टीचे सुख अनुभवण्यासाठीच जाते असा मला विनाकारण संशय वाटू लागला. अशा तऱ्हेने माझ्या मनातील मळ साचत चालला होता आणि माझे मन अधिकाधिक कलुषित होत होते.

या पार्श्वभूमीवरती राधा तुझ्या सुंदर व गुणवान रूपाकडे आकर्षित होत आहे हे माझ्या मनाला रूचेना. माझ्याकडून राधेला तिला अपेक्षित असे सुख मिळत नाही, म्हणून केवळ त्याची पूर्ती करण्यासाठीच ती तुझा सहवास करीत आहे, अशी माझी कल्पना होऊ लागली. तरीही मी माझ्या मनाला बळेबळे आवरीत असे, कारण माझा तुझ्यावरती भरवसा होता. परंतु जेव्हा तूही राधेला प्रोत्साहन देत आहेस, एवढेच नव्हे तर तूही तिला तेवढाच प्रतिसाद देत आहेस असे माझ्या लक्षात आले,

तेव्हा मात्र मी आधी निराश झालो आणि मग मात्र चिडलोच. पुढे पुढे तर माझ्या मनाचा पूर्णच तोल गेला आणि माझ्या असहाय्यतेचा राग येऊन तर मी अधिकच चवताळल्यासारखा झालो. त्या नंतर मी राधेला प्रत्यक्ष व मानसिक किती त्रास दिला याची गणतीच न केलेली बरी. राधेचा मानसिक छळ करण्यात, तिला सारखे घालून पाडून बोलण्यात आणि तिला सारखे तुझ्यावरून उपहासाने टोमणे मारण्यात मला अधिकाधिक सुखच वाटू लागले. राधेला माझ्यापासून मनाने व बाह्यांगाने दूर करण्यास तूच कारणीभूत व सहाय्यभूत होत आहेस असे वाटून मग मी तुझाच दुस्वास करू लागलो आणि तुझ्याशीही शत्रुत्वच धरले. कारण नसतानाही, पण संशयाने तुझी निंदा करणे आणि तुझा वारंवार अवमान करणे यातच मला एक प्रकारचे सुख व पुरुषार्थ वाटू लागला.

पण असे असूनही तुझ्याकडून मात्र मला नेहमीच आपलेपणाची व प्रेमाची वागणूक मिळत आली. परंतु माझ्यावरती मात्र तुझ्या या वागण्याचा उलटाच परिणाम होत असे. तापलेल्या तव्यावरती थंड पाणी टाकल्यावर जसा मोठा आवाज होऊन वाफच वरती येते, अगदी तसेच तुझ्या शांत व प्रेमळ वागण्यामुळे माझ्या मनातील राग अधिकच उफाळून वर येत असे. त्यातच ही राधेच्या पत्रांची घटना घडली आणि माझ्या ठिकाणी साठून राहिलेल्या रागावर ठिणगी पडल्यासारखे झाले. त्याचा स्फोट एवढा झाला की त्यातील आगीची झळ माझ्याही मनाला अत्यंत दाह देऊ लागली. माझ्या हाती तर कोलीतच मिळाल्यासारखे झाले आणि तुला व राधेला चांगली अद्दल घडविण्याचा माझ्या मनातील विचार अधिकच बळावला. केवळ सूड भावनेनेच मी कंसाकडे जाण्यास निघालेलो होतो. परंतु खरा सूड माझ्यावरती काळानेच उगवला आणि मीच त्या कालियाच्या तडाख्यात सापडलो. केवळ तुझ्यामुळेच आज मी जिवंत आहे ही गोष्ट खरी आहे.

अरे कृष्णा, एवढे सर्व असूनही तुझे माझ्यावरील प्रेम मात्र कधीच कमी झाले नाही. तुझा माझ्यावरील आपलेपणा नेहमीच कायम राहिला. राधाही नेहमी न रागावता व न चिडता माझा राग शांतपणे सहन करीत राही. तिने कधीही माझ्याशी वाद घातला नाही किंवा मला उलट उत्तरे केली नाहीत. तुझ्याच प्रेमाचा हा राधेवर झालेला परिणाम होता हे नक्की. कारण तुझे प्रेमच तसे असले पाहिजे. म्हणूनच तुझे माझ्यावरील प्रेमही फुकट गेले नाही असे आज मला पहिल्यांदाच जाणवत आहे. त्यामुळेच तर मी मघापासून एवढ्या मोकळेपणाने बोलून माझ्या मनातील सर्व घाणच बाहेर ओकून टाकीत आहे. तसे करण्याचे बळ व धैर्य मला तुझ्या माझ्यावरील प्रेमामुळेच मिळू शकले. तूही माझे हे असले मलिन बोलणे अगदी शांतपणे ऐकून घेत आहेस. खरे तर, मी जो तुझा घोर अपराध केला आहे त्याला कोणतीही क्षमा नाहीच आणि असली तरी तू मला मुळीच क्षमा करू नकोस. कारण मी त्याला अजिबात लायक नाही. उलट, तू मला जास्तीत जास्त शिक्षाच कर. त्यामुळे माझ्या दुष्कृत्यांचे पूर्ण जरी नाही, तरी काही प्रमाणात का होईना पण परिमार्जन होईल. माझ्या मनाला त्याने थोडे तरी हलके व बरे वाटेल. त्यासाठी कृष्णा, तू नंदराजाला सांगून मला जास्तीत जास्त शिक्षा देण्याचे कर अशी मी तुला विनवणीच करतो.''

अशा तऱ्हेने अनय कितीतरी वेळ आर्ततेने व काकुळतीने बोलत होता. कृष्णानेही अनयाला मध्येच न थांबवता त्याला मोकळेपणाने व पूर्णपणाने बोलू दिले. कारण त्यामुळेच अनयाच्या मनाला बरे वाटणार होते हे कृष्ण जाणून होता आणि झालेही अगदी तसेच. बोलता बोलताच अनयाला रडू कोसळायला लागले होते आणि त्या अश्रूंच्या द्वारे जणु त्याच्या ठिकाणचा घट्ट झालेला सर्व मळ फुटून बाहेर वाहू लागला होता. त्याचा अनयाला एकीकडे त्रासही होत होता. वारंवार त्याच्या तोंडातून शब्दही बाहेर पडू न शकल्यामुळे त्याचा आवाज कापरा होई आणि त्याचे अंगही थरथरू लागे. परंतु त्याचबरोबर त्याच्या मनावरील ताणही कमी होऊन त्याला हलके वाटू लागले होते हेही खरेच होते. परंतु अनयाच्या अश्रुधारा मात्र अजिबात थांबायला तयार नव्हत्या. त्यांना आवर घालण्याच्या प्रयत्नांत अनयाला अधिकच भरून येत होते आणि खाली बसून तो सारखा स्फुंदून स्फुंदून रडतच राहिला होता. अनयाची अशी दयनीय अवस्था नंद शांतपणे पाहत होता. पण काय करावे हे मात्र त्याला सुचेचना. परंतु कृष्ण मात्र शांत व स्वस्थ बसूच शकला नाही.

कृष्ण एकदम अनयाच्या जवळ गेला आणि त्याच्या मस्तकावर थोपटीत त्याला शांत करण्याचा प्रयत्न करू लागला. कृष्णाच्या प्रेमळ स्पर्शाने अनयाला अधिकच रडू येऊ लागले आणि त्याच्या डोळ्यातील अश्रुधारा अधिक वेगाने वाहू लागल्या. कृष्णाने अनयाला अधिकच आपल्याजवळ घेतले. तेव्हा मात्र न राहवून अनयाने कृष्णाला अत्यंत घट्ट मिठीच मारली आणि अत्यंत मोकळेपणाने तो रडू लागला. कृष्णानेही अत्यंत प्रेमाने अनयाला तसेच धरून ठेवले आणि मोकळेपणाने त्याला तसेच रडूही दिले. बऱ्याच वेळानंतर अनयाने प्रयत्नपूर्वक स्वतःला सावरले. त्याचे मन आता पूर्णपणे मोकळे झाले होते. स्वतःच्या खांद्यावरील उपवस्त्राने आपले डोळे पुसत पुसत तो कृष्णापासून दूर होऊ लागला. परंतु कृष्णाने मात्र अनयाचे दोन्ही हात तसेच आपल्या हातात धरून ठेवले आणि तो अनयाशी अत्यंत प्रेमाने बोलू लागला.

''अरे अनया, आता आपला शोक आवर बघू. असे दुःख करीत आपल्या मनाला असा किती वेळ तू त्रास देत राहणार? आता शांत हो आणि मी काय सांगतो ते नीट ऐक. माझ्या व राधेच्या संबंधाविषयी तुझ्या ठिकाणी शंका आली यात काही नवल घडले किंवा काही मोठी चूक झाली असे मुळीच नाही. सर्वसाधारण पुरुषाला आपल्या पत्नीविषयीच्या जास्त काळजीने असे वाटणे अगदी शक्य आहे. त्याच वेळी जर तू मला मोकळेपणाने विचारले असतेस तर मीही तुझी योग्य ती समजूत त्याचवेळी घातली असती. म्हणजे गोष्टी या थराला गेल्याच नसत्या. खरे तर, तुझा व माझा आपलेपणाचा संबंध आधीपासूनचाच आहे. राधेचे येणे हे तर नंतर झालेले आहे. तेव्हा तुझ्या ठिकाणी असा परकेपणा वाटण्याचे काहीच कारण नव्हते. पण झाले काय, तर माझ्यावरील शंकेमुळे तुझ्या ठिकाणी माझ्याविषयी आधी दुरावा निर्माण झाला आणि मग तुझ्या व माझ्या मध्ये राधा येत आहे असे तुला जाणवू लागले. राधेच्या बाबतीतही तुझे अगदी तसेच झाले. राधेवरील संशयाने आधी तुझ्या ठिकाणी राधेविषयी दुरावा निर्माण झाला आणि मग तुझ्या व राधेच्या मध्ये मी आड येत आहे असे तुला उगीचच वाटू लागले. मग तुझी माझ्याकडे व राधेकडे पाहण्याची दृष्टीच नुसती बदलत चालली असे नाही, तर ती दृष्टी बिघडत चालली आणि अधिकाधिक दूषित होऊ लागली.

जशी दृष्टी तशी सृष्टी या न्यायाने मग तुला सर्वच विपरीत दिसू लागले. कावीळ झालेल्या माणसाला जसे सगळीकडे व सर्वच पिवळे दिसते तसेच तुलाही मग आमच्या संबंधी सर्व दोषास्पदच दिसले. त्यातूनच मग राधेला तुझ्याकडून त्रास दिला जाऊ लागला. खरे तर, तुझ्या मनातील तुला होणारा सर्व त्रासच त्या निमित्ताने बाहेर येत होता. तुला त्या वेळेस मनातल्या मनात किती तरी त्रास होत असेल याची मला पूर्ण कल्पना आहे. तुझ्या मनाचा होणारा कोंडमाराही मी समजू शकत होतो. म्हणूनच मी कधीही तुझा राग न करता तुझ्याकडे नेहमी सहानुभूतीनेच पाहत आलो. तुझ्याविषयीच्या आपलेपणापोटी मला तुझी दयाच येत असे. त्यासाठीच मी तुझ्याशी आपणहून जवळीकता साधून व तुझ्याशी मोकळेपणाने बोलून तुझे मन मोकळे करण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु माझ्या प्रयत्नाला जराही प्रोत्साहन न देता तू मुद्दामहून दूरच राहिलास आणि मग आपल्यातील दुरावाही वाढतच राहिला.

अनया, एक गोष्ट पक्केपणाने लक्षात ठेव की माझ्या ठिकाणी तुझ्याविषयी कधीही कोणत्याही प्रकारचा राग वा दुरावा नव्हता. माझ्या ठिकाणी तुझ्याविषयी तेवढेच प्रेम व तेवढाच आपलेपणा अगदी पहिल्यापासून आहे जेवढा राधेविषयीचा आहे. खरे तर, माझ्या ठिकाणी हे प्रेम व हा आपलेपणा सर्वांविषयी अगदी स्वभावतःच आहे. त्यांच्यात माझ्याकडून तरी काहीही फरक कधीच केला जात नाही. पण असा फरक बाकीचे लोक करतात आणि तसे तसे ते माझ्या जवळ येतात किंवा माझ्या पासून दूर राहतात. काही तर आधी जवळ येऊन मग दूर होतात. तर काहीजण आधी दूर राहून मग जवळ येतात. जसे आता तुझ्या बाबतीत घडले आहे.

परंतु राधेच्या बाबतीत मात्र वेगळेच घडले ही गोष्ट अगदी खरी आहे. राधा माझ्या जवळ आली. अधिकाधिक जवळ येत राहिली आणि माझ्या जवळच येऊन राहिली. मग आमच्यात दुसरे कोणीच येऊ शकले नाही. कारण माझ्या प्रेमाचे वेगळेपण व वैशिष्ट्य राधेच्या लक्षात आले. त्या प्रेमाचे महत्त्व जीवनात काय आहे हे तिला जाणवले. हे प्रेमच खरे आहे हा राधेचा निश्चय झाला आणि त्या प्रेमाचाच अनुभव घेण्याचा तिला ध्यासही लागला. त्या ध्यासापोटी हर प्रयत्नाने ती माझे प्रेम अनुभवीत राहिली आणि त्यातूनच ती माझ्या प्रेमाने कायमची युक्त होऊन राहिली. तिच्या वागण्या बोलण्यातून आता तर तेच प्रेम अत्यंत सहजपणे प्रगट होत असते. त्यामुळेच तर राधा तुझा सर्व राग, द्वेष व मत्सर अगदी सहजपणे सहन करू शकली आणि तरीही तुझ्याशी अत्यंत प्रेमाने वागत राहिली. तुझ्याकडून प्रगटणारे सर्व विष तिने सहजपणे पचवले आणि तिच्याकडे मात्र तुला देण्यासाठी सदैव प्रेमामृतच शिल्लक राहिले.

हे अनया, मला राधेविषयी आणखीन एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट तुला सांगायची आहे ती अगदी नीटपणे व कायमची लक्षात ठेव. त्याचा कधीही विसर पडू देऊ नकोस. राधेचे मन माझ्यावरील प्रेमाने व श्रद्धेने युक्त आहे. माझ्या प्रेमाने ती तृप्त आहे. त्यामुळे तिचे मन अत्यंत निर्मळ व शुद्ध आहे. तेथे विषयवासनेचा स्पर्श वा लवलेशही नाही. ते मन दुसऱ्या कोणत्याही परक्या व्यक्तीवरती कधीही जाणे शक्यच नाही. पती या नात्याने ती केवळ तुझ्याशीच एकनिष्ठ आहे, एवढेच नव्हे तर तुझ्याविषयी व्यक्ती म्हणूनही तिच्या ठिकाणी आत्यंतिक प्रेमच आहे. तुझीच काळजी तिला नित्य वाटत

असते. या माझ्या सांगण्यावर पूर्ण श्रद्धा ठेव. आताच्या या प्रसंगातून तुझी नक्की तशी खात्री पटलीच असणार असा माझा पूर्ण विश्वास आहे. तेव्हा यापुढे राधेविषयी कधीही व चुकूनही मनात शंका येऊ देऊ नकोस आणि तिच्याविषयी संशय घेऊ नकोस. आता अगदी निःशंक मनाने व राधेच्या तुझ्यावरील प्रेमाचे स्मरण ठेवून तू तुझ्या घरी जा. राधाही तुझी अत्यंत प्रेमाने कधीपासूनची वाट पाहत राहिली असेल. तू अगदी मोकळ्या मनाने राधेला जाऊन भेट. तीही तेवढ्याच प्रेमाने तुझे स्वागत करील बघ.

अनया, सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे तुला तुझ्याकडून घडलेल्या चुकीची जाणीव झालेली आहे. एवढेच नव्हे, तर तुला त्याचा पश्चात्तापही होत आहे. पश्चात्तापानेच मनाची शुद्धी होते हे जरी खरे असले, तरी आता जास्त वेळ त्या मनाला पश्चात्तापाची धग उगाचच लावू देऊ नकोस. मनाला शांत कर आणि शांत ठेवही. त्याचप्रमाणे पश्चात्ताप हीच मनाला खरी शिक्षा असल्यामुळे तुला दुसऱ्या कोणत्याही शिक्षेची आता आवश्यकता उरलेली नाही. मी तर तुला काही शिक्षा करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तसे काही कारणच नाही आणि मी तर कोणालाही कधीही शिक्षा करतच नाही. व्यक्ती ही त्याच्या दुष्कृत्यांमुळे व त्याच्या दुष्ट प्रवृत्तीमुळे दूषित होते आणि म्हणून दोषी ठरते. म्हणून मी दुष्कृत्यांना आळा घालतो आणि दुष्प्रवृत्तींचे निर्दालन करतो. सत्कृत्यांना सहाय्य करतो आणि सत्प्रवृत्तींना रक्षण व आधार देतो. अनया, तुझे मन आता शुद्ध झालेले आहे. प्रेमाच्या मोकळेपणाने तसेच ते नेहमी शुद्ध ठेव. राधेसारखी प्रेमळ व निर्मळ पत्नी तुला लाभलेली आहे. तिच्या साथीने व सोबतीने तुमचा संसार तुम्ही सुखाचा करा आणि दोघेही आपापले जीवन आनंदाने जगा. आता तू त्वरित आपल्या घरी जाण्यासाठी निघावेस हेच बरे. तू माझाच होतास, माझाच आहेस आणि नेहमी माझाच राहशील याची खात्री बाळग.''

कृष्णाचे सांगणे लक्षपूर्वक ऐकता ऐकता अनयाचे मन पूर्णपणे शांत व स्थिर झाले. त्याच्या मनाने पुन्हा उभारी घेतली. पण त्याच बरोबर कृष्णाच्या प्रेमाने मन भरून आल्यामुळे अनयाच्या मनाची अवस्थाही अत्यंत भारावल्यासारखी झाली हेती. त्याच अवस्थेतून तो कृष्णाशी बोलू लागला.

''कृष्णा, जेथे आपलेपणा आहे तेथे उपकाराची भाषाही करणे अत्यंत चुकीचे आहे हे अगदी खरे आहे. तरीही माझा जीव वाचवल्याबद्दल मी जेवढा तुझा उपकृत आहे, त्यापेक्षाही तू मला खऱ्या प्रेमाची जी ओळख करून दिलीस त्याचा मी अधिक ऋणी आहे. कारण जीव आहे म्हणून आपण जिवंत असलो तरी जगणे हेच आपले जीवन असते हे तुझे सांगणे अगदी खरेच आहे. आणि जीवन प्रेमाने जगणे हेच खरे आनंदाचे जीवन आहे. अशी प्रेमाची अवस्था तुझ्या ठिकाणी अगदी सहज आहे. राधेची ती अवस्था तुझ्या प्रेमामुळे झालेली आहे. परंतु माझी तशी अवस्था व्हायची तर मला तुझ्या प्रेमाची सततची जरुरी आहे. त्यासाठी मला तुझा नेहमीचा सहवास हवा आणि तुझे व्यक्तिगत प्रेम व मार्गदर्शनही हवे.

कृष्णा, मगाशी बोलताना तू एक गोष्ट अगदी सहजपणे सांगितलीस, की संसार माझा व राधेचा असा दोघांचा मिळून आहे, परंतु आमचे जीवन मात्र वेगळे वेगळे व ज्याचे त्याचे स्वतंत्र आहे. तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. हे न

कळल्यामुळेच मी एवढे दिवस चुकीने गल्लत करीत होतो. राधेचे व माझे जीवनही एकच आहे असा माझा समज व हट्टच होता आणि तोच मी राधेवरती अक्षरशः लादत होतो. म्हणूनच सर्व घोटाळा झाला आणि त्याचा त्रास आम्हा उभयतांना झाला. आता माझ्या लक्षात एक मुलभूत गोष्ट तू आणून दिलीस की संसार आम्हा दोघांचा आहे, परंतु आमचे जीवन मात्र वेगवेगळे आहे. म्हणूनच आम्ही संसारात एकमेकांना सहाय्यभूत होऊन तो सुखासमाधानाने करायचा आहे आणि आपापले जीवन आनंदाने जगाचे आहे. संसारामध्ये मला तुझ्या प्रेमाने युक्त असलेल्या राधेची साथ लाभली आहे हे माझे भाग्यच आहे. परंतु माझे जीवन आनंदाने जगण्यासाठी मला जे प्रेम हवे ते मात्र मला तुझ्याकडूनच मिळणार आहे हे सत्यच आहे. कृष्णा, त्यासाठीच माझी तुझ्याशीच सांगड जुळायला हवी. तेव्हा माझ्या जीवनात यापुढे तू मला सदैव हवास. मी तुला सोडून जाणार नाही आणि तुलाही माझ्यापासून कधीही दूर जाऊ देणार नाही. माझा संसार हा माझ्या जीवनाचा एक अविभाज्य भागच आहे ना? मग तू मला माझ्या संसारातही माझ्या बरोबरच हवास. मला तरी माझा संसार व माझे जीवन हे सध्या तरी वेगळे समजता येणार नाही आणि तसे वेगळे करणेही मला शक्य होणार नाही.

कृष्णा, माझी तुला आता एकच विनंती आहे की तू आता माझ्याबरोबर माझ्या घरी चल. नाही तर तुझा माझ्यावरचा राग अजून गेला नाही असेच मी समजेन. मला नक्की खात्री आहे की राधासुद्धा तुला भेटण्यासाठी केवढी तरी आतुर झालेली असणार. खरे तर, तिला मी माझ्या बरोबरच येण्यास सांगत होतो. परंतु तिने मला तू घेतलेल्या शपथेची आठवण करून दिली आणि माझ्याबरोबर येण्यास नकारच दिला. कृष्णा, हे सर्व माझ्यामुळे घडले आहे याची माझ्या मनाला केवढी तरी खंत लागून राहिलेली आहे. तू आमच्या घरी आल्याशिवाय व राधेला भेटल्याशिवाय माझ्या मनाची ती खंत दूर होणारच नाही आणि माझ्या मनाला त्याशिवाय बरेही वाटणार नाही. माझी आई सुद्धा तुझी केव्हापासूनची वाट पहात आहे. तिच्या मुलाचे तू प्राण वाचविलेस हे तिला कधीतरी विसरता येणे शक्य आहे का? तिलाही केवढातरी पश्चात्ताप झालेला आहे आणि तुला भेटल्याशिवाय माझ्या आईचेही मन मोकळे होणार नाही. तेव्हा आपण दोघे मिळून आता माझ्या घरी गेलो तर आईलाही बरे वाटेल आणि राधेलाही केवढा तरी आनंद होईल. खरे सांगायचे तर खरा आनंद राधेलाच होणार आहे. कारण तुझ्या वाटेकडे ती अगदी डोळे लावून बसलेली आहे. तेव्हा आपण उभयता निघूया ना?''

अनयाचे प्रेमाचे बोलणे ऐकून कृष्णाला आनंदच झाला. तो आनंद कृष्णाने मोकळेपणाने हसून व्यक्तही केला आणि अनयाशी हळुवार शब्दात बोलू लागला.

''अनया, तुझ्या भावना मी समजू शकतो. त्या योग्यच आहेत आणि मला त्या भावनांचे कौतुकही आहे. परंतु आज तरी तू एकटाच घरी जा. तेच योग्य आहे. माझ्याशी बोलून जसे तुझे मन तू मोकळे केलेस तसेच राधेशीही बोल आणि तुझे मन मोकळे करून घे. राधेचे मन अगदी मोकळे आहे याची खात्री बाळग. काहीही काळजी करू नकोस. आपले प्रेमाचे संबंध तर यापुढे राहणारच आहेत. तेव्हा सहजपणे जसे जसे घडेल तसे पाहू. मुद्दामहून काही करण्याची आवश्यकता नाही. तुझे व राधेचे प्रेमाचे नाते जुळले की मग मला तुमच्या संसाराची मुळीच काळजी नाही. बाकी संसारात

साहित्य प्रतिष्ठान®

थोड्या फार कुरबुरी चालणारच. स्वभाव भिन्नतेमुळे किरकोळ मतभेदही होतीलच. परंतु या गोष्टींचा बाऊ न करता प्रेमाचे नाते सांभाळा आणि मनाचा मोकळेपणा कायम राखा. त्यातून काही विशेष अडचणी निर्माण झाल्या तर मी आहेच ना. जराही संकोच न बाळगता माझ्याकडे या किंवा मला बोलवा. मी तुमच्या मदतीसाठी नेहमीच उपलब्ध व तत्पर आहे याची खात्री बाळगा.

अनया, सध्या माझे पूर्वीसारखे विशेष बाहेर जाणे घडतच नाही. बराच वेळ मी घरच्या घरीच असतो. पेंद्या व माझे इतर सवंगडी मला नेहमीच बाहेर चलण्याचा आग्रह करीत असतात. परंतु तरीही मी त्यांना नकारच देतो. माझ्या मनात कोणत्याही प्रकारची उदासीनता किंवा नैराश्य मात्र अजिबात नाही. परंतु घरी राहण्यात व माझा मी एकटा असण्यात हल्ली मला अत्यंत बरे वाटते हे मात्र खरे आहे. पण तू मात्र जमेल तसे माझ्या भेटीला येत राहा. शक्य होईल तेव्हा राधेलाही बरोबर घेऊन ये. तिलाही माझा निरोप सांग की मी तुम्हा दोघांना मला भेटण्यासाठी म्हणून बोलावले आहे. तिला म्हणावं की तिला न भेटण्याची मी घेतलेली शपथ आता राहिलेली नाही. त्याची आता गरजच उरलेली नाही. अनया, माझ्या वतीने तूच तिची समजूत काढ आणि तिला भेटावयास घेऊन ये.

आणखीन एक गोष्ट, मी आता तुझ्या घरी आलो नाही याचा अर्थ माझा तुझ्यावरती राग आहे असा समज मात्र करून घेऊ नकोस. अरे मला जर तुझा रागच आला नव्हता तर मग तो राग जाण्याचा प्रश्न येतोच कोठे? आता मी जे काही तुला सांगत आहे ते तुझ्यावरच्या अत्यंत प्रेमानेच सांगत आहे याची खात्री बाळग आणि मनात दुसरा कोणताही विचार न आणता अत्यंत खुशीने स्वतःच्या घरी जा. अरे होय, अनया, एक गोष्ट मगाच पासून तुला सांगायची सारखी राहूनच जात आहे. आपल्या गोकुळचा खास प्रसाद म्हणजे खरवस हा तू घे आणि बरोबर घरीही घेऊन जा. माझ्या वतीने राधेला व म्हाळसाकाकूंना आठवणीने दे आणि मी त्यांची खुशाली विचारली आहे म्हणून सांग'' असे म्हणून कृष्ण अगदी मोकळेपणाने हसला आणि स्वतः घरात जाऊन अनयासाठी खरवस घेऊन आला. अनयाने थोडा खरवस कृष्णाला दिला आणि थोडा आपण सेवन केला. बाकीचा बांधून बरोबर घेतला.

कृष्णाचे बोलणे एवढे स्पष्ट व निःसंदिग्ध होते की मग अनयाचाही काही इलाज चालेना. अनयाचे मन थोडेसे नाराज झाले खरे, परंतु तरीही कृष्णाच्या सांगण्यावर पूर्ण विश्वास ठेवून तो घरी जावयास निघाला. निघण्यापूर्वी अनयाने कृष्णाचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन प्रेमाने दाबून थोपटले आणि मोकळेपणाने हसून त्याने कृष्णाचा निरोप घेतला. अनयाच्या पाठमोऱ्या मूर्तीकडे कृष्ण अत्यंत प्रेमाने व समाधानाने पाहत होता.

अनय अत्यंत उत्साहाने भराभर चालत आपल्या घरी आला. त्याचा हसरा चेहरा पाहून काय घडले असेल हे राधेने लागलीच ओळखले. प्रत्यक्ष काय घडले हे तर राधेला माहीतच नव्हते आणि माहिती करून घेण्याची तिला तशी आवश्यकताही वाटत नव्हती. अनयाने काही सांगण्याच्या आतच राधेने जाणले की अनयात झालेला हा बदल कृष्णाच्या प्रेमाचा परिणाम आहे. अनयाच्या ठिकाणी कृष्णाविषयी आता काहीही गैरसमज शिल्लक न राहता त्याचे मनात पुन्हा

कृष्णाचे प्रेम निर्माण झाले आहे हे तिच्या अगदी सहजच लक्षात आले आणि तिलाही समाधान वाटले. तिलाही अगदी मोकळे झाल्यासारखे वाटले. अनयाच्या विचित्र वागण्याचा त्रास जरी राधेच्या मनाला होत नसला तरी त्याचा ताण मात्र तिला जरूर येत असे. तो तिच्या मनावरील ताण आता पूर्णपणे नाहीसा झाला आणि राधेला एकदम हलके वाटू लागले. तिनेही अत्यंत मोकळेपणाने हसून अनयाचे प्रेमाने स्वागत केले.

राधेने कृष्णाकडे गेल्यावर काय घडले ते अनयाला आपणहून काही विचारलेच नाही. पण अनयानेच घडलेले सर्व काही राधेला समग्र वर्णन करून सांगितले. सांगताना त्याचा स्वर प्रसंगानुसार व त्यातील भावानुसार वेगवेगळा होत असे. कधी आर्तभाव, कधी प्रेमाचा भाव, कधी उत्साह तर कधी उत्कटता असे अनेक भाव अनयाच्या शब्दातून सहजपणे प्रगट होत होते. सर्व वर्णन अनय अगदी तन्मयतेने करीत होता आणि त्या सर्व भावांचा आनंद राधाही अनुभवीत होती. तिचा आनंद तर एवढा होता की जणू तीच कृष्णाची प्रत्यक्ष भेट घेऊन आलेली आहे. शेवटी अनयाने राधेला 'कृष्णाने आपल्या उभयतांना आग्रहपूर्वक त्याच्या घरी बोलावले आहे' हा कृष्णाचा निरोपही आठवणीने सांगितला. त्यावर मात्र राधा काहीच बोलली नाही. तिने फक्त मंद हास्य केले आणि ती स्वस्थच राहिली. राधेच्या अशा स्वस्थ राहण्याचे अनयाला मात्र नवलच वाटले. खरे तर, अनयाची राधेकडून अशी प्रतिक्रिया अपेक्षित होती की 'कृष्णाच्या भेटीस जाऊया' असे म्हटल्याबरोबर राधा आनंदाने अगदी वेडी होईल आणि जशी असेल तशी कृष्णाच्या भेटीस ताबडतोब निघेल.

परंतु प्रत्यक्षात मात्र वेगळेच घडत होते. 'जाऊ या ना, आपण दोघे मिळून कधी तरी सवडीनुसार कृष्णाच्या भेटीस नक्की जाऊ या' असे म्हणण्या पलीकडे काही राधेचा उत्साह जास्त दिसतच नव्हता. अनयाच्या मनात मग एक असाही विचार येऊन गेला की 'अरे माझा जेव्हा विरोध होता तेव्हा राधा कृष्णाला भेटण्यासाठी केवढी तरी बेचैन असे आणि हर प्रयत्नाने माझा रोष पत्करूनही कृष्णाची एकट्यानेही भेट घेतच असे. परंतु आता माझ्यात झालेल्या बदलामुळे राधेला अनुकूलता प्राप्त झाली आहे, तर राधेच्याच ठिकाणी तेवढा उत्साह तर दिसत नाहीच आणि उलट 'आपण दोघे मिळून कधी तरी कृष्णाला भेटायला जाऊ या' असे म्हणते.' या विचाराने थोडासा चकित झालेला अनयही जास्त काही विचार न करता मग स्वस्थच बसून राहिला. मधून मधून तो राधेला कृष्णाला भेटण्यासंबंधी आठवणही करून देत असे. राधा 'हो, हो' असे म्हणत असे, पण प्रत्यक्ष भेटीला काही जातच नसे आणि कृष्णही अनयाला 'हो, हो' असे म्हणत असे खरा, पण प्रत्यक्ष काही अनयाच्या घरी राधेला भेटण्यास तो कधी गेलाच नाही. अनय मात्र आता रोज कृष्णाची भेट आवर्जून घेत असे आणि मन मोकळेपणाने कृष्णाशी बोलून व वागून कृष्णाच्या प्रेमाचा अनुभव घेत असे. कृष्णभेटीचा होणारा आनंद तो नेहमी राधेला सांगत असे. ते ऐकून राधेलाही अत्यंत आनंद होत असेच आणि मोकळेपणाने हसून राधा तिचा आनंद व्यक्तही करीत असे.''

राधा व कृष्ण यांच्या संबंधात घडलेल्या अभूतपूर्व व अत्यंत रोमांचकारी प्रसंगाचे वर्णन नारदाच्या मुखातून ऐकताना लक्ष्मीचे देहभान हरवले होते यात काहीच नवल नव्हते. कारण खुद्द नारदाचे देहभान पूर्णपणे हरपले होते. परंतु वर्णन

करताना शेवटी शेवटी जेव्हा राधेच्या अवस्थेचे वर्णन नारद करू लागला, तेव्हा मात्र लक्ष्मीच्या मनातील विचार हळुहळू जागे होऊ लागले. त्या विचारांनी एवढी उचल घेतली की श्रवणामध्ये लक्ष्मीचे मन पूर्णपणे रमेनासे झाले. त्यामुळे पुढील भागाचे वर्णन खरे तर लक्ष्मीच्या मनाला मानवेना आणि तिच्या मनात ते शिरेनासेच झाले. तरीही लक्ष्मी प्रयत्नपूर्वक मनाला स्थिर ठेवून सर्व काही ऐकून घेत होती. पण शेवटी राधेविषयी जेव्हा अनयाच्या झालेल्या प्रतिक्रिया तिने ऐकल्या तेव्हा मात्र स्वस्थ बसणे तिच्या मनाला जमेना. त्यामुळे नारदाच्या कथनाचा ओघ व वेग थोडासा कमी झाला आहे असे लक्ष्मीच्या लक्षात आल्याबरोबर तिने नारद बोलत असतानाही मध्येच बोलण्यास सुरुवात केली.

''अरे नारदा, अनय चकित झाला यात काहीच नवल नाही. राधेच्या वागण्याने मीही अगदी चकितच होऊन राहिले आहे. कृष्णाच्या वागण्याचेही खरे तर मला गूढच वाटत आहे. परंतु खरी कमाल मला राधेचीच वाटत आहे. तिच्या या वागण्याचा मला तरी काही अर्थच लागत नाही. केवढ्या तरी प्रदीर्घ काळानंतर आणि राधा व कृष्ण यांच्या संबंधातील सर्व अडथळे दूर झाल्यानंतर खरे तर राधेने कृष्णाला सतत भेटत रहायचे. पण त्या ऐवजी राधा तर आता कृष्णाच्या भेटीस जायला तयारच नाही असे दिसते. नारदा, राधेच्या ठिकाणीही कृष्णाच्या प्रेमभक्तिचा सूक्ष्म अहंकार निर्माण झाल्याचे तर हे लक्षण नाही ना? खरे तर, राधेविषयी अशी शंका येणेच योग्य नव्हे. पण कोणाचा काही नेम सांगताच येत नाही. केव्हा, कधी, काय होईल काही सांगता येत नाही. नाही तर मग राधेच्या या वागण्याचा अर्थ तरी काय लावायचा? मला तरी काही समजत नाही बुवा! हे नारदा, तूच मला सर्व नीट समजावून सांग आणि माझ्या मनाची भ्रांती दूर कर बघू! त्या शिवाय कृष्णाकडून जो कालियाच्या मर्दनाचा व स्वतःचे प्राण पणाला लावून अनयाचे प्राण वाचविण्याचा केवढा तरी अद्‌भूत पराक्रम घडला किंवा स्वतःच्या जिवाचा धोका पत्करूनही कृष्णाने अनयाच्या अंगात भिनलेले विष बाहेर काढले आणि राधेचेही अनयावरील केवढे तरी प्रेम अगदी सहजपणे प्रगट झाले, या सर्व गोष्टींचा मला केवढा तरी झालेला आनंद मला पूर्णपणे अनुभवता येणार नाही. तेव्हा लवकरात लवकर माझे मन पुन्हा पूर्वीसारखे मोकळे कर म्हणजे मलाही तुझ्यासारखा आनंद पूर्णपणे अनुभवता येईल.''

*****

साहित्य प्रतिष्ठान®

## राधेची अंतर्मुखता

**ल**क्ष्मीच्या बोलण्याने नारद थोडासा गंभीर झाला आणि विचारमग्नही झाला.  आपले नेत्र नारदाने मिटून घेतले आणि किंचित काळ तो स्वस्थच बसून राहिला.  तो थोड्यावेळचा स्तब्धतेचा काळही लक्ष्मीला जास्त वाटू लागला.  आपण विचारलेला प्रश्न योग्य आहे की नाही असा विचार लक्ष्मीच्या मनात येऊ लागला न लागला तोच नारदाने बोलावयास सुरुवात केली.

''हे लक्ष्मी, राधेचे कृष्णाशी असलेले संबंध केवळ प्रेमाचे राहिलेले नसून त्याचे रूपांतर भक्तिभावाच्या संबंधात झालेले होते.  त्या संबंधाची सुरुवात नक्कीच कृष्णाच्या व्यक्तिगत प्रेमातून झालेली होती.  परंतु त्याची परिणती राधेच्या ठिकाणी कृष्णाविषयी भक्तिभाव निर्माण होण्यात झालेली होती हे अत्यंत महत्त्वाचे आहे.  हे भक्तिभावाचे संबंध कसे असतात या विषयी अनेकांच्या अनेक कल्पना असतात.  परंतु भक्तिभावामध्ये कल्पनेला अस्तित्वच नसते, कारण तो भाव हा ज्याच्या त्याच्या अनुभवाचा असतो.  तरीही 'भक्तिभावाचे फळ सर्व विभक्तता दूर होऊन ऐक्य पावणे हेच आहे' हा मुलभूत सिद्धांत सत्य आहे.  म्हणूनच तो बदलू शकत नाही.  अर्थात हे बाह्यांगाने पूर्णपणे होऊच शकत नाही.  कारण तो ऐक्यतेचा अनुभव हा अंतःकरणाच्या अवस्थेचा आहे.  बाह्यांगाचा सहवास, भेटी, संबंध वा प्रेमाचा अनुभव याच्यातूनच हा भक्तिभाव निर्माण होतो हे मात्र अगदी खरे आहे.  परंतु या सर्वाला मर्यादा असतात आणि कधी ना कधी तरी या मर्यादा जाणवतातच.  त्या मर्यादेपर्यंत आल्यानंतरच खऱ्या भक्तिभावाला, म्हणजे सर्व विभक्तता दूर होऊन ऐक्यत्वाचा अनुभव आणून देणाऱ्या अवस्थेला सुरुवात होते.  कृष्णाच्या प्रेमाने राधा या अवस्थेपर्यंत आली हे महत्त्वाचे आणि म्हणून राधेचे एवढे कौतुक.  अर्थात माहात्म्य कृष्णाचे म्हणजे सगुण प्रेमभक्तिचेच आहे.

तेव्हा सुरुवातीला कृष्णाच्या अंतरातील प्रेमाचा अनुभव राधा बाह्यांगानेच घेत होती.  त्यातूनच जेव्हा राधेच्याच ठिकाणी कृष्णाविषयी प्रेम निर्माण झाले, तेव्हा मात्र त्या कृष्णावरील प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी राधेला कृष्णभेट प्रत्यक्ष घेण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.  मग साहजिकच कृष्णाचा सहवास करण्यासाठी, त्याची एकांतात भेट घेण्यासाठी, त्याच्याशी संवाद करण्यासाठी आणि अनेक प्रकारे त्याचे प्रेम प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी राधा नेहमीच भुकेली राही.  तशी भेट होऊ शकली नाही की मग साहजिकच राधेला अत्यंत व्याकुळता येत असे आणि प्रेमाची भूक भागविण्यासाठी राधा अनेक परीने प्रयत्न करीत राही.  एवढेच नव्हे, तर कृष्णही राधेची ही व्यक्तिगत प्रेमाची भूक भागविण्यासाठी तिला अनेक परी करून सहाय्यभूत होई.  कारण तेच त्याचे ब्रीद होते आणि तेच त्याचे अवतारकार्य होते.  बरे, असे कितीदाही व कितीही वेळ भेटले तरी राधेचे समाधान काही होत नसे ते नसेच.  पण या सर्व बाह्यांगाला असलेल्या मर्यादा कृष्ण जाणून होता आणि त्या मर्यादा राधेला जेव्हा जाणवत, तेव्हा त्या तिला मुळीच मानवत नसत.  परंतु कृष्ण मात्र त्याच्या धर्माला जागून

राधेला ईश्वरी प्रेमाचे माहात्म्य सांगत असे, जे अमर्याद आहे. कारण त्या प्रेमाचा अनुभव हा अंतःकरणाच्याठायी नित्यपणे येत असतो.

हे कृष्णाचे सांगणे सुरुवातीला राधेला कळतही नसे आणि मानवतही नसे. पण हळुहळू जेव्हा तिच्या लक्षात आले की अशी अंतःकरणाची अवस्था तर कृष्णाचीच आहे, तेव्हा मग तिची खात्री पटली. कारण म्हणूनच तर कृष्णाचे सर्वांवर सदैव प्रेम आहे आणि ते प्रेम निःस्वार्थी, निरपेक्ष व निर्विकार आहे हे राधेने पूर्णपणे जाणले. हेच खरे कृष्णाचे माहात्म्य आहे असा तिचा निश्चय झाला आणि कृष्णाकडे पाहण्याची तिची दृष्टीच बदलली. कृष्णाकडे अधिकाधिक व्यापक नजरेने ती पाहू लागली, तर तिला कृष्णाचे माहात्म्य अधिकाधिक जाणवू लागले. कृष्ण काय व कसा नाही यापेक्षा, कृष्ण काय व कसा आहे हे तिच्या लक्षात येऊ लागले. कृष्णाची सबलता व निर्भयता, कृष्णाची सहृदयता, कृष्णाची प्रेमळता हे कृष्णाचे गुण तिच्या ठिकाणी अधिकाधिक ठसू लागले आणि हे कृष्णाचे रूप त्याच्या गुणांसह राधेला प्रिय होऊ लागले. कृष्णरूपाच्या स्मरणाबरोबर कृष्णगुणांचाही ध्यास राधेला लागून राहिला आणि राधेचे कृष्णावरचे प्रेम अधिकच व्यापक होऊ लागले. हेच राधेच्या ठिकाणी निर्माण झालेल्या भक्तिभावाचे लक्षण होते.

राधा अंतर्मुख होऊन तिच्यातील गुणदोषांचा विचार करू लागली, तर तिच्या ठिकाणचे कितीतरी दोष तिला जाणवू लागले. कृष्णाच्या अंतःकरणाची अवस्था व आपल्या अंतःकरणाची अवस्था यामध्ये केवढा तरी असलेला फरक राधेच्या लक्षात येऊ लागला आणि मग मात्र राधा सावध झाली. कृष्णाच्या व्यक्तिगत प्रेमाच्या धुंदीतून ती भानावर आली. कृष्णाच्या व तिच्या अंतःकरणाच्या अवस्थेतील फरक हीच खरी विभक्तता आहे हे तिने जाणले आणि मग मात्र राधेला ती विभक्तता सहन होईना. कृष्णाचे प्रेम आपल्याला भाग्याने मिळाले खरे, परंतु कृष्णाच्या अंतःकरणासारखे आपले अंतःकरण झाल्याशिवाय कृष्णप्रेम आपल्याला फळणार नाही आणि कृष्णप्रेमाला आपण खऱ्या अर्थाने पात्र ठरणार नाही हे राधेला सतत जाणवू लागले. तशी अवस्था प्राप्त व्हावी असा ध्यासही राधेला लागला. मग मात्र राधेने कृष्णप्रेमाचे बळ घेऊन आपल्या मनातील दोष प्रयत्नपूर्वक घालवायला सुरुवात केली.

राधेने आपल्या वागण्यात, बोलण्यात, विचार करण्याच्या पद्धतीत जाणीवपूर्वक बदल करावयास सुरुवात केली. एक गोष्ट तिच्या लक्षात आली, की कृष्णाला भेटून त्याच्याशी प्रेमाने बोलणे वा वागणे सोपे आहे. परंतु घरी पती व सासूबाई यांच्याशी तसे प्रेमाने वागणे कठीणच आहे. आपले प्रेम त्यांना समजत नाही म्हणून त्यांना दोष द्यावा तर आपल्याला तरी सुरुवातीला कृष्णाचे प्रेम कुठे कळत होते? पण तरीही कृष्ण मात्र नेहमीच आपल्याशी प्रेमाने वागत होताच ना? असा विचार करून राधा प्रयत्नपूर्वक घरात सर्वांशी प्रेमाने वागतच राही. तेव्हाच तिला कृष्णाच्या प्रेमस्वरूप अवस्थेचे केवढेतरी माहात्म्य लक्षात आले. अर्थात कृष्णाची अवस्था सहज होती आणि राधेची अवस्था मात्र प्रयत्नपूर्वक होत होती हा फरकही राधा जाणून होती. परंतु तिला खात्री होती की प्रयत्नपूर्वक करता करताच सहजावस्था येणार आहे. साहजिकच काही वेळा राधेचे प्रयत्न कमी पडत किंवा ती प्रयत्नांत कमी पडत असे. पूर्ण निरपेक्षता किंवा निर्विकारता तिला जमत नसे.

घरातल्या व्यक्तींकडून थोड्या तरी अपेक्षा रहातच आणि त्या अपेक्षांची पूर्ती झाली नाही की मग राग, चिडचिड, नैराश्य, उदासीनता असे विकार तिच्या मनात थोडा वेळ व थोडे तरी का होईना, पण निर्माण होतच असत. त्याचा राधेच्या मनाला अधिकच त्रास होई आणि मग खऱ्या प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी व्याकुळ होऊन राधा कृष्णाची भेट घेण्यासाठी धावतच जाई. त्या वेळेस मग ती कसलीच व कोणाचीच पर्वा करीत नसे. कृष्णाच्या प्रत्यक्ष भेटीतच व प्रेमाच्या अनुभवानेच तिचे मन शांत होई आणि पुन्हा उत्साहाने व नव्या उमेदीने राधा घरी परतत असे.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने आधी केवळ कृष्णरूपावर प्रेम करून त्याचे स्मरण करणाऱ्या राधेच्या ठिकाणी कृष्णाच्या प्रेमस्वरूप अंतःकरणाचे माहात्म्यही ठसत राहिले आणि त्याचाच अनुभव घेण्याचा ध्यासही राधेला तिच्या नकळत केव्हा लागला हे तिचे तिलाही कळले नाही. परंतु एक गोष्ट मात्र निश्चितपणे घडली, की या प्रेमध्यासामुळे राधेच्या ठिकाणी कृष्णप्रेमाची जागृती सतत व सहजपणे राहू लागली. त्यामुळे इतरांच्या वागण्याचा व स्वभावाचा राधेला होणारा त्रासही कमी होऊ लागला. त्यातूनही जर कधी मनाला थोडाफार त्रास झाला तरी तो थोडा वेळच असे आणि राधा त्यातून स्वतःची स्वतःच लगेचच सावरत असे. त्यासाठी राधेला मग कृष्णभेटीसाठी धावत जाण्याची आवश्यकता रहात नसे. पुन्हा राधा कृष्णप्रेमाने युक्त होऊन राही आणि त्या कृष्णप्रेमाचे सर्व गुणधर्म तिच्या ठिकाणी प्रगट होत. तिच्या मनाला शांती व समाधान तर लाभत असेच, पण इतरांविषयी दया, क्षमा, सहानुभूती व प्रेम असे सात्विक भाव तिच्या ठिकाणी जागृत होत.

या तिच्या अवस्थेचा आनंद तिचा तिलाच केवढा तरी होत असे. हा अनुभव तिच्या अंतःकरणात ठसलेल्या कृष्णरूपाच्या स्वरूपाचा आहे याचीही तिला निश्चित जाणीव असे. त्यामुळे राधेला अंतःकरणात कृष्णभेटी झाल्याचा आनंद अनुभवाला येत असे आणि राधा एका आगळ्या वेगळ्या तृप्त अवस्थेचा अनुभव घेत असे. कृष्णाचे अस्तित्व त्याच्या रूपगुणांसह आपल्या अंतःकरणात आहे याची खात्री राधेच्या ठिकाणी तिच्या स्वानुभवातून होत राहिली. तरीही तिच्या ठिकाणी कृष्णाच्या सगुणप्रेमाचे मूळ कायमच होते. राधेची अवस्था हे तर सगुण कृष्णप्रेमाचेच फळ होते. त्यामुळे आता राधेला जरी तिचे दुःख व क्लेश निवारण करण्यासाठी किंवा तिच्या ठिकाणच्या आर्ततेची पूर्तता करण्यासाठी कृष्णाची बाह्यांगाने आवश्यकता राहिली नाही, तरी कृष्णावरच्या प्रेमभक्तिमुळे आपण नेहमी कृष्णाच्याच आहोत व कृष्णासाठीच आहोत हा भाव अत्यंत दृढपणाने कायम राहिला.

हे लक्ष्मी, मुख्य म्हणजे राधेला तिच्या बाह्य जीवनाच्या आवश्यकता व त्याच्या मर्यादा हे दोन्ही लक्षात आले. आपले कर्तव्यकर्म व मोह यातील फरक तिच्या लक्षात आला आणि आपले कर्तव्यकर्म योग्य प्रकारे व आपलेपणाने करण्याचे मनोबळ तिला आले. हे सर्व तिच्या ठिकाणी असलेल्या कृष्णप्रेमाचेच लक्षण होते हे निःसंशय! त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे कृष्णाच्या प्रेमभक्तिचा आनंद राधेला तिच्या अंतःकरणात अनुभवता येऊ लागला. कारण तिचे अंतःकरणच मुळी कृष्णमय होऊन राहिले होते. राधेच्या ध्यानी, मनी, चित्ती व अनुचित्ती एकीएक कृष्ण आणि कृष्णच भरून राहिला होता. राधेची हीच अवस्था अनयाच्या बाबतीत अगदी सहजपणे प्रगट झाली. अनयाच्या संबंधी कोणताही राग वा कटुता यांचा

लवलेशही राधेच्या ठिकाणी तर नव्हताच, परंतु अत्यंत आपुलकीने व प्रेमाने तिने अनयाची सर्व सेवा व शुश्रूषा करून अनयाला पूर्ण बरे केले.

लक्ष्मी, आता राधा अनयाबरोबर कृष्णाकडे का गेली नाही असे विचारशील, तर राधा जाणून होती की अनयाच्या



मनाच्या अवस्थेप्रमाणे त्याने एकट्यानेच कृष्णाला भेटायला जाणे आवश्यक होते. अनयाच्या ठिकाणी निर्माण झालेली अपराधाची भावना व त्यातून निर्माण झालेला एक प्रकारचा न्यूनगंड राधेच्या लक्षात आलेला होताच. अशा परिस्थितीत राधा जर अनयाबरोबर गेली असती तर तिच्या उपस्थितीत अनय व कृष्ण यांना परस्परांशी मोकळेपणाने बोलता आलेच नसते आणि अनयाच्या दृष्टीने त्याचे मन पूर्णपणे मोकळे होणे अत्यंत आवश्यकच होते. राधा त्यावेळी जर तेथे हजर राहिली असती तर अनयाच्या मनात राधा व तो अशी सतत तुलना होत राहिली असती आणि त्याच्या ठिकाणचा न्यूनगंड व अपराध भावना ही दोन्ही वाढतच राहिली असती. त्यामुळे कृष्णाचे सांगणे व त्यातील प्रेम अनयाच्या मनात शिरूही शकले नसते.

आता अनयाने ‘कृष्णाने आपल्या दोघांना भेटीस बोलावले आहे’ हा निरोप राधेला सांगितल्यावरही राधा स्वस्थच राहिली. कारण त्या निरोपातील कृष्णाच्या अंतःकरणाची खूण राधेच्या लगेचच लक्षात आली. ‘दोघांनी भेटावयास या’ म्हणजेच ‘तू एकटीने भेटावयास येऊ नकोस’ हे कृष्णाचे सांगणे राधेने ओळखले. त्यामागील कृष्णाचा हेतूही राधेच्या लक्षात आला.

घडलेल्या प्रसंगातून अनय आताच सावरत आहे खरा, परंतु पूर्णपणे सावरायला व त्या प्रसंगातून बाहेर यायला अनयाला वेळ लागणारच आहे आणि तो वेळ आपणच त्याला द्यायला हवा. उगाचच घाई व गडबड करून वागणे उपयोगाचे नव्हते. त्याचा परिणाम उलटच होण्याची शक्यता अधिक होती. प्रसंगामुळे व कारणामुळे अनयाला झालेला पश्चात्ताप हा किती काळ टिकून राहतो हे पाहणेही महत्त्वाचे होते. त्यासाठी काही काळ जाऊ देणे आवश्यक होते. अनयाबद्दल शंका घेणे योग्यच नव्हते, पण त्याच्या मनाची काळजी घेणे मात्र आवश्यकच होते. ज्याप्रमाणे एखाद्या मोठ्या आजारातून बरा झालेल्याचा आहार हळुहळू वाढवत न्यावा लागतो, म्हणजेच त्याची ताकद हळुहळू वाढते. त्याच्या हालचालीही हळुहळू वाढत राहतात आणि एक दिवस तो शारीरिक व मानसिक दृष्ट्या पूर्ण सक्षम होऊन राहतो. त्याचप्रमाणे अनयालाही मनाने पूर्णपणे बरे होण्यासाठी काही काळाचा अवधी जाऊ देणे आवश्यक होते आणि तो काळ कृष्णाच्या व्यक्तिगत सहवासातच जाणे आवश्यक होते. कृष्णाचा हा हेतू राधेने जाणला हे सर्वात महत्त्वाचे. म्हणून राधा कृष्णाला अपेक्षित असल्याप्रमाणे स्वस्थच बसून राहिली. राधा स्वतः मात्र अंतरात कृष्णप्रेमाने युक्त असल्यामुळे अत्यंत शांत, समाधानी व अतिशय आनंदात होती.

हे लक्ष्मी, अनयाने त्याच्याबरोबर घरी चलण्याचा आग्रह केल्यानंतरही कृष्ण स्वस्थच राहिला, त्यामागील त्याचा हेतूही नेमका तोच होता. अनयाच्या झालेल्या मतपरिवर्तनाचा कृष्णालाही नक्कीच आनंद झाला. पण तरीही सावधपणाने राहून कृष्ण अनयाला संधी देत राहिला. अनयाच्या ठिकाणीसुद्धा कृष्णसहवासाची आवडी निर्माण झाली. कृष्णाच्या प्रेमाची गोडी त्यालाही लागली आणि त्या प्रेमाचे वेगळेपण व श्रेष्ठत्व त्याच्याही लक्षात आले. प्रेमाचा मोकळेपणा अनयाच्या मनातही निर्माण झाला आणि मनाच्या शांती व समाधानाचा अनुभव त्यालाही येऊ लागला. कृष्णाचे कौतुक तो वारंवार राधेला सांगत असे. ते ऐकून राधेलाही आनंद होत असे आणि हे सर्व कृष्णाचेच माहात्म्य आहे या तिच्या अनुभवाची प्रचितीच तिला अनयाच्या निमित्ताने येऊ लागली. त्यातून कृष्णाची अधिकाधिक थोरवी राधेला जाणवत असे आणि ती स्वतःलाही अत्यंत धन्य समजत असे.



अशा तऱ्हेने कृष्णप्रेमाने अनय व राधा यांचीही जोडी जमू लागली आणि त्यांचा संसार अत्यंत सुखाचा व गोडीचा झाला. ते पाहून कृष्णालाही अतिशय समाधान वाटले आणि अत्यंत आनंद झाला. राधेच्या बाबतीतले आपले कार्य पूर्ण व यशस्वी झाले याची कृतकृत्यता कृष्णालाही जाणवली. अनयाचे कौतुक जरी कृष्णाला वाटत होते, तरी राधेच्या अवस्थेचे वेगळेपण व श्रेष्ठत्व कृष्ण जाणून होता. अनयाच्या ठिकाणी कृष्णाविषयी केवढीतरी व्यक्तिगत श्रद्धा व प्रेम निर्माण झालेले होते हे जरी खरे असले तरी राधेच्या ठिकाणी मात्र कृष्णाच्या 'ईश्वरत्त्वाची' पूर्ण ओळख पटलेली होती आणि कृष्णाविषयी अत्यंत उत्कट असा भक्तिभाव निर्माण झालेला होता. राधेच्या या भक्तिभावाची जाणीव कृष्णाला पूर्णपणे होती आणि या उत्कट भक्तिभावानेच राधा तिच्या अंतःकरणात कृष्णाशी ऐक्य पावलेली आहे याची पूर्ण खात्री कृष्णाला होती. अनयाच्या बाबतीत घडलेल्या प्रसंगातील राधेच्या समर्थ वागण्यातूनच त्याच ऐक्याची प्रगट झालेली लक्षणे कृष्णाच्या लक्षात आलेली होती. अनयावर कोणताही राग वा आकस नसलेल्या राधेने ज्या सहजप्रेमाने अनयाची सेवा शुश्रूषा करून अनयाला पूर्ण बरे केले होते, त्यातूनच राधेच्या शुद्ध अंतःकरणाचे दर्शन कृष्णाला झाले होते. तिच्या ठिकाणची सबळता, प्रेमळता व निर्मळता हेच दर्शवीत होती की राधेचे अंतःकरण शुद्ध व निरपेक्ष प्रेमाने भरलेले आहे आणि हीच ती राधेची प्रेमस्वरूप अवस्था होती. त्याची प्रचिती कृष्णाला आली होती खरी, परंतु तशी जाणीव व खात्री राधेची होणे आवश्यक होते हेही कृष्ण जाणून होता. त्यासाठी त्या ऐक्यभावाकडे राधेला निर्देश करणे अत्यंत आवश्यक होते.

*****

## कुंजवनातील राधाकृष्ण भेट

**हे** लक्ष्मी, आणखीन एक महत्त्वाची गोष्ट अशी होती की पुढे घडणाऱ्या घटनांची चाहूल कृष्णाला त्याच्या ठिकाणी जाणवू लागलेली होती. एक गोष्ट कृष्ण आधीपासूनच जाणून होता, की गोकुळातील त्याचे वास्तव्य हे कायमचे नव्हतेच. आपले पुढील जीवन वेगळे आहे आणि ते वेगळ्या ठिकाणी आहे ही जाणीव कृष्णाच्या ठिकाणी अगदी लहानपणापासूनच होती. नक्की काय काय घडणार आहे व कसे घडणार आहे हे जरी त्याला माहीत नव्हते, तरी आपल्या जीवनातील हा संक्रमणाचा काळ आता जवळ आलेला आहे असे त्याला अचानकपणे जाणवू लागले होते. त्या आधी राधेची एकदा भेट घेणे अत्यंत आवश्यक होते. कारण केवळ राधेपाशीच कृष्ण आपले अंतःकरण मोकळे करू शकला असता आणि फक्त राधाच त्याचे अंतःकरण यथार्थपणे जाणू शकली असती याची त्याला पूर्ण खात्री होती. त्यामुळे राधा भेटीची आतुरता कृष्णाच्या ठिकाणी वाढत राहिली होती. एकदा मनात आल्यावर मात्र कृष्ण स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. त्यासाठी मग योग्य संधीची वाट पहात न राहता तशी संधी मुद्दामहून निर्माण करणे हा तर कृष्णाचा सहज स्वभावच होता. त्या प्रमाणे त्याने एक दिवस अनय भेटल्यावर त्याला सांगितले.

''अरे अनया, बरेच दिवस झाले तू मला सारखा तुझ्या घरी बोलावत आहेस. परंतु काही ना काही कारणांमुळे ते राहूनच गेले. राधेचेही येथे येणे तिच्या काही अडचणींमुळे घडत नाही असे दिसते. तेव्हा आपण आता असे करूया, की माझ्याही घरी नको आणि तुझ्याही घरी नको, तर आपण कुठेतरी बाहेरच भेटण्याचे करूया. अगदी ठरवूनच भेटूया म्हणजे मग नक्कीच आपले भेटणे होईल. मग त्यासाठी आपण उद्याच सकाळी कुंजवनात भेटण्याचे निश्चित ठरवूया. मी इकडून येईन आणि तू राधेला घेऊन परस्पर तिकडेच ये. म्हणजे आपल्याला अगदी निवांतपणे व मोकळेपणाने पुष्कळ वेळ बोलता येईल. नाहीतरी बऱ्याच दिवसांचे पुष्कळ बोलणे आपले तिघांचे मिळून शिल्लक राहिलेले आहे. अगदी सहलीला गेल्यासारखे जाऊया. मनसोक्त बोलू, ऐकू व खाऊ सुद्धा. राधा निश्चितच नवीन नवीन पदार्थ करून आणील. तिला मुद्दामहून तसे सांगण्याची काही आवश्यकताच नाही. तेव्हा उद्या आपण नक्की नक्की भेटूया, चालेल ना?''

अनयाला एकदम सुखद आश्चर्याचा धक्काच बसला. खरे तर 'चालेल ना?' हा कृष्णाने विचारलेला प्रश्न नव्हताच, तर त्याचे ते निक्षून सांगणेच होते. ते अनयाने ओळखले आणि त्याला अत्यंत आनंदच झाला. ही आनंदाची बातमी केव्हा एकदा राधेला सांगतो असे अनयाला झाले आणि तो धावतच घराकडे निघाला.

धावत धावत आलेल्या अनयाच्या चेहऱ्यावरील ओसंडून वाहणारा उत्साह व आनंद पाहताक्षणीच राधेने ओळखले की अनय हा कृष्णाकडूनच आलेला आहे आणि काही तरी खास आनंदाची बातमी घेऊन आलेला आहे. ती आनंदाची बातमी काय असावी याचा अंदाजही राधेला अगदी सहज आला आणि तिचा तो अंदाज खराही ठरला, जेव्हा अनयाने 'आपल्या दोघांना कृष्णाने उद्या सकाळीच भेटण्यासाठी कुंजवनात बोलावले आहे' हा कृष्णाचा निरोप राधेला सांगितला. या

आधी जेव्हा अनय कृष्णाचा निरोप राधेला सांगे की 'जमेल तेव्हा व तसे भेटावयास बोलावले आहे' तेव्हा राधा स्वस्थच राही. परंतु या वेळेस कृष्णाचा आलेला निरोप निश्चित स्वरूपाचा होता. त्यामुळे राधेचा जाण्याचा निश्चयही लगेचच झाला. एवढेच नव्हे तर कृष्णभेटीचा ध्यासही तिला लागला. लगेचच राधेने दुसऱ्या दिवशी बरोबर नेण्यासाठी कृष्णाच्या आवडीचे अनेक पदार्थही तयार करावयास सुरुवात केली. त्या निमित्ताने कृष्णाच्या अनेक आवडी नावडी राधेला आठवू लागल्या आणि त्या आठवणीने तिला सारखे हसूच येऊ लागले.

दुसऱ्या दिवशी सकाळी राधा नेहमीपेक्षा लवकरच उठली असे म्हणण्यापेक्षा खरे तर ती रात्रभर जागीच होती. परंतु सकाळी मात्र ती अत्यंत उत्साहात होती. स्वतःची सर्व नित्य कर्मे आवरून तिने मग अनयाला उठवले. जागे होताक्षणीच समोर राधेची प्रसन्न मुद्रा पाहून अनयालाही अत्यंत प्रसन्न वाटले आणि तोही उत्साहाने त्याची नित्य कर्मे करू लागला. एकीकडे राधाही तिच्या मनात सतत विचार करीत होती की 'काय बरे असे विशेष घडले असावे, की कृष्णाने आम्हाला दोघांना ताबडतोब भेटीस बोलावले आहे. त्याला आम्हाला काय बरे सांगायचे असावे की जे एवढे महत्त्वाचे आहे. कारण सहज म्हणून कृष्ण बोलावणे शक्यच नाही. काहीतरी निश्चित कारण असणार हे नक्कीच. त्यातूनही कृष्णाने कुंजवनातच येण्यास का सांगितले असावे बरे?' असा विचार मनातल्या मनात राधा करीत असताना 'कुंजवन, कुंजवन' असा नाद तिच्या मनात गुंजू लागला आणि राधा एकदम थबकली. तिचे मन विचार करता करता 'कुंजवन' या शब्दांपाशी थांबले. 'कुंजवन' म्हटल्याबरोबर त्या कुंजवनात केवढ्या तरी घेतलेल्या कृष्णाच्या एकांतातील भेटी तिला आठवल्या. त्या भेटीत कृष्णाशी झालेला संवाद आणि त्याचे अनुभवलेले अपरंपार प्रेम राधेला स्मरले. त्या स्मरणानेच राधेचे मन अत्यंत भावपूर्ण झाले आणि 'कुंजवन' या शब्दाद्वारे कृष्णाने पाठवलेला संकेत राधेच्या चटकन लक्षात आला. आपण कृष्णाची एकट्यानेच भेट घेणे आवश्यक आहे आणि तीच कृष्णाची अपेक्षा आहे हे तिच्या ध्यानात आले. मग राधेच्याही मनात तोच ध्यास लागला. काहीही करून कृष्णाची एकांतात भेट घेतलीच पाहिजे असा तिचा निश्चय झाला.

राधेने घरच्या परिस्थितीचा अंदाज घेतला, तर तिने पाहिले की अनय अजूनही स्नानाला जाण्याच्या तयारीतच होता आणि सासूबाई नुकत्याच उठल्या होत्या. हीच संधी साधता येणे शक्य आहे हे राधेच्या लक्षात आले. स्नानाला जाणाऱ्या अनयाला राधेने हाक मारून थांबवले आणि हसून त्याला म्हणाली, ''अहो, मी काय म्हणत होते की, तुमची आता आंघोळ होऊन मग तुम्हाला देवपूजाही करावयाची आहे. तेव्हा तुम्हाला अजून वेळच लागणार. तोपर्यंत मी पुढे जाते आणि वाटेत फुले व माळा घेऊन परस्पर कुंजवनातच येते. आता सासूबाईसुद्धा जाग्या झालेल्या आहेतच आणि घरातील सर्व कामे मी आधीच उरकून ठेवली आहेत. चुलीवरती दूधही गरम करून ठेवलेले आहे. तुमची आंघोळ व पूजा झाल्यावर तेवढे दूध पिऊन घ्या आणि मग कुंजवनाकडे या, चालेल ना?''

राधा एवढ्या उत्साहाने व घाईघाईने बोलत होती की अनयाने काय व कसे करायचे याबद्दल विचार करायला तिने अनयाला संधीच ठेवली नव्हती. सर्व काही राधेने ठरविलेलेच होते. अनयाच्याही ते लक्षात आले आणि त्याला हसूच आले.

राधेच्या मनातील कृष्णभेटीची आतुरता अनयाने ओळखली आणि अनयाला राधेचे कौतुकच वाटले. 'किती तरी दिवस झाले पण राधा व कृष्ण यांची अजून भेट झालेलीच नव्हती. दोघे कशी काय व मुख्यतः का अशी एकमेकांना भेटल्याशिवाय रहात होती' अशा विचारांचे एक कोडेच अनयाच्या मनात नेहमी असे. कारण त्याला स्वतःला तर कृष्णाला भेटल्याशिवाय एक दिवसही चैन पडत नसे. पण शेवटी कृष्णाने राधेला बोलावणे पाठवले आणि राधाही आता कृष्णभेटीसाठी अत्यंत आतुर झालेली आहे हे पाहून अनयालाच अतिशय बरे वाटले. कृष्णाला एकट्याने आधी जाऊन भेटण्याचा राधेचा हेतू अनयाच्या लक्षात आला. पण तसे काहीही न बोलता किंवा दर्शविता अनयाने राधेकडे पाहून हसून मान डोलवली आणि खुणेनेच संमती दाखवून राधेला लवकरात लवकर पुढे जाण्यास सांगितले.

अनयाच्या संमतीची नुसती वाटच पहात असलेली राधा मग धावतच घराच्या बाहेर पडली. वाटेत कुठेही आजूबाजूला न पाहताच राधा रस्त्यातून कधी धावत धावत चालत होती, तर कधी चालत चालत धावत होती. कुंजवनात आल्यावर राधा क्षणभरच थांबली. तिच्या आगमनाची चाहूल पाठमोऱ्या बसलेल्या कृष्णाला आधीच लागली होती. कृष्णही लागलीच उठून उभा राहिला आणि वळून राधेकडे पहातच राहिला. दोघांच्या नजरा एकमेकांना मिळाल्या आणि ज्यांची अंतःकरणे आधीच एकमेकांना मिळालेली आहेत असे कृष्ण व राधा यांची मने आधी एकमेकांकडे झेपावली आणि त्यांचे देह मागाहून पुढे धावले. एकमेकांच्या मिठीत दोघेजण केव्हा विसावले हे त्यांनाही कळलेच नाही. अशा प्रेमाने राधा व कृष्ण काही पहिल्यांदाच भेटत होते असे नव्हे. परंतु राधेला असे जाणवू लागले की आजची भेट काहीतरी वेगळीच आहे. काय वेगळेपण आहे ते तिलाही सांगता आले नसते. परंतु तसे वेगळेपण तिला जाणवत होते एवढे मात्र नक्की.

थोड्या वेळाने कृष्ण स्वतःला राधेपासून अलग करू लागला असता राधा त्याला अधिकच बिलगू लागली. जणु काही कृष्ण तिला याच्यापुढे कधीच भेटणार नव्हता आणि म्हणून राधा कृष्णाला सोडतच नव्हती. परंतु कृष्णाने प्रयत्नपूर्वक राधेला हाताने धरून एका मोठ्या वृक्षाखाली नेले आणि तो स्वतः एका मोठ्या शिळेवर बसला. कृष्णाच्या चरणाशी बसू पाहणाऱ्या राधेला कृष्णाने प्रेमाने आपल्या जवळ बसवून घेतले. राधेच्या खांद्यावर आपला एक हात ठेवून व दुसऱ्या हाताने राधेचा हात आपल्या हातात धरून कृष्ण राधेकडे एकटक नजरेने किती तरी वेळ पहात राहिला. कृष्णाच्या नजरेतून राधेविषयीचे केवढे तरी प्रेम व कौतुक ओसंडून वाहत होते. राधेकडे पाहून कृष्णाच्या मुखावर अगदी कृतकृत्यतेचे भावच दाटून आले होते. कृष्णाच्या दृष्टीतील प्रेम प्राशून तृप्त होत असलेली राधा शेवटी न राहवून कृष्णाशी आपणहूनच बोलू लागली.

''ए कृष्णा, तू तर माझ्याकडे असा पाहतो आहेस की जणू काही आपण पहिल्यांदाच भेटत आहोत. बरे, असा नुसता पहात राहणार आहेस, की माझ्याशी काही बोलणार आहेस? माझ्यात पहाण्यासारखे एवढे आहे तरी काय? पण ज्या अर्थी एवढे प्रेमाने मला या कुंजवनात बोलवून घेतलेस त्या अर्थी तुला मला काही तरी विशेष सांगायचे आहे हे निश्चितच. तुझा संकेत ओळखून मी एकटीच तुला भेटण्यासाठी धावत धावत पुढेच आले. अनय मागून सावकाशपणे येत आहेत. मीच

त्यांना तसे सांगितले आणि त्यांनीही माझ्या मनातील हेतू ओळखून मला लागलीच अनुमती दिली.  खरे तर, मी तुला एकट्याने येऊन भेटावे असे त्यांच्याच मनात जास्त होते.  त्यांचाच उत्साह अधिक होता.  ही सर्व किमया कृष्णा, तुझ्याच मुळे झालेली आहे हे निश्चित.  तुझ्या प्रेमाचीच ही थोरवी आहे.  तुझ्या प्रेमामुळे अगदी दुष्टातील दुष्ट सुद्धा आपले दुष्टपण बाजूला करून तुला वश होईल.  मग अनयांच्यात एवढा बदल झाला त्यात नवल ते काय?  आता सासूबाई सुद्धा शांत झाल्या आहेत आणि नेहमी तुझी आठवणही काढत असतात.  तुला आवडतो म्हणून त्यांनी खरवस करून ठेवला आहे.  तू घरी आल्यावर तुला त्या खरवस देणार आहेत.  तुझ्यासाठी त्यांनी तो खास राखून ठेवला आहे.  तुला दिल्याशिवाय तो खरवस आम्हालाही देणार नाहीत असे त्या नेहमी म्हणतात.  ए कृष्णा, तुला देण्यासाठी मी सुद्धा आज कितीतरी पदार्थ केले होते.  दहीपोहे, मोदक, पुरणपोळ्या आणि आपल्या दोघांच्याही अत्यंत आवडीचे बेसनाचे लाडू.  पण झाले काय, तुला भेटायला येण्याच्या धावपळीत सर्व घरीच राहिले.  आता यांच्या काही लक्षात येते का पाहूया. नाहीतर मग आपल्याला 'थंडा फराळच' करावा लागणार.''



असे कितीतरी वेळ राधा एकटीच भराभर बोलत होती.  परंतु कृष्ण मात्र काहीही न बोलता किंवा कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न करता शांतच राहिला होता.  हे राधेच्या लक्षात आले मात्र, तीही बोलायची एकदम थांबलीच.  मग राधाही जरा गंभीरच झाली आणि गंभीरपणे कृष्णाला म्हणाली,

''ए कृष्णा, तू असा गंभीर का?  काही महत्त्वाची गोष्ट घडली आहे किंवा घडणार आहे का? नक्कीच तुझ्या मनात काहीतरी आहे आणि तू ते मला सांगत नाही आहेस.  अरे, ते सांगण्यासाठीच तर तू मला येथे बोलावलेस ना? मग? लवकरात लवकर तुझ्या मनात काय आहे ते सांग बरे.  तुझ्या न बोलण्यामुळे माझी बेचैनी वाढत आहे.  मी एवढे दिवस भेटायला आले नाही म्हणून तू नाराज तर नाहीस ना? पण या वेळेस मी सुद्धा अगदी ठरवलेच होते की तू मला निश्चितपणे बोलावल्याशिवाय तुझ्या भेटीला यायचेच नाही.  बाकी

तुझे अनयांच्या बरोबर पाठवलेले निरोप मला मिळत होतेच की. 'केव्हा तरी येऊन जा, जमेल तसे येऊन जा, वेळ मिळाला की येऊन भेट' वगैरे वगैरे. पण मी ओळखले की मी तुझी सध्या भेट घ्यावी असे तुला मनापासूनच वाटत नाही आहे. म्हणून मग मीही जाणून बुजून स्वस्थच राहिले. पण माझ्या मनात एक प्रकारची हुरहूर मात्र कायमची लागलेल होती.

ए कृष्णा, एक गोष्ट मात्र मी तुला निश्चितपणे सांगते की तुझ्या प्रेमाने मी अगदी तृप्त आहे. त्या प्रेमाची जागृती माझ्या ठिकाणी सदैव असते. तुझेच प्रेम माझ्या अंतरात नित्य खेळत असते व रंगत असते. त्याचा केवढा तरी आनंदाचा अनुभव मला येत असतो आणि त्याच आनंदाने मी माझे नित्याचे जीवन सहजपणे जगत असते. अगदी सहजपणे बोलते, वागते आणि वावरते. मनाला कोणताही ताण नाही. कोणाकडूनही कसलीही अपेक्षा नाही. आपल्याला जमेल तेवढे आपण आपलेपणाने करावे आणि नंतर सर्व विसरून जावे, म्हणजे काय तर नित्य तुलाच आठवावे. त्यासाठी तुला आता मला वेगळेपणाने आठवावेही लागत नाही. तुझे रूप, गुण, स्वभाव व व्यक्तिमत्त्व माझ्या अंतरात एवढे खोलवर ठसले आहे की मी काही तुझ्यापासून वेगळी आहे असे मला कधी वाटतच नाही. काही वेळा तर मला असेच जाणवते की माझ्या रूपाने तूच वावरत आहेस. कृती माझी आहे पण त्यामागील भाव तुझा आहे. नजर माझी आहे पण त्यातील पाहणे तुझे आहे. कान माझे आहेत पण ऐकणारा तूच आहेस. पाय माझे आहेत पण चालणारा तूच आहेस. अंग माझे आहे पण त्याद्वारे होणारा स्पर्श अनुभवणारा तू आहेस. ही तुझ्याशी ऐक्यता अनुभवणे खरेच अद्भूत व रोमांचकारी आहे. 'सर्वांबरोबर असूनही मी कोणाचीही नाही आणि कृष्णा, तुझ्याबरोबर मी प्रत्यक्ष नसूनही मी केवळ तुझीच आहे' या भावाने युक्त राहून मी अगदी हलकी फुलकी होऊन सगळीकडे विहारच करीत असते.

आता यजमान व सासूबाई माझ्याशी अगदी चांगले वागत असतात. अर्थातच त्याचा मला आनंदच होतो. पण मी काही त्यामुळे हुरळून जात नाही. कारण मला एक निश्चितपणे माहीत आहे, की चांगले वागण्याचा खरा आनंद तसे वागणाऱ्यालाच होत असतो. हे मी माझ्या अनुभवाने सांगत आहे. आपल्याला आवश्यक आहे असे जे वाटते ते मिळाले नाही की मनाला फारच त्रास होतो. परंतु आता आपल्याला या कशाची आवश्यकताच राहिली नाही आणि जर ते मिळाले तर मात्र त्याचा आपण आनंदाने स्वीकार करू शकतो. पण आपला आनंद मुळात आपल्यापाशीच असायला हवा आणि कृष्णा, माझ्यापाशी तो आनंद निश्चितपणे तुझ्या रूपानेच आहे. मला तर ध्यानी, मनी एवढेच काय, स्वप्नीसुद्धा तुझ्यावाचून दुसरे काही दिसतच नाही. ए कृष्णा, माझ्या अंतःकरणाची अवस्था तू एवढी सुंदर करून ठेवली आहेस ना, की बस् रे बस! कशाचे सुखही नाही आणि दुःखही नाही. केवळ एकीएक आनंदाचाच अनुभव येत राहतो.

ए कृष्णा, मगापासून मी आपली एकटीच मोकळेपणाने व भरभरून बोलत आहे. पण तू मात्र अगदी स्वस्थच बसून आहेस. काहीच कसा बोलत नाहीस? एवढ्या दिवसांचे माझ्या मनात दाटून राहिलेले तुझे प्रेम, तुझ्याविषयीचा भक्तिभाव, त्याचा मला होणारा आनंद आणि मुख्य म्हणजे या सर्वाच्या मुळाशी असलेली तुझ्याविषयीची कृतज्ञता हे सर्व तुला पाहता क्षणीच माझ्या बोलण्यातून वाहू लागले. माझे सर्व भाव तुझ्या अंतःकरणापर्यंत पोहोचल्याचा आनंद तुझ्या मुखावर पाहिला

आणि मला सर्व सर्व पावले. माझे अंतःकरण पूर्णपणे मोकळे झाले तरी तुझ्या प्रेमाने संपूर्णपणे भरलेलेच आहे. कारण माझ्या अंतःकरणात एकीएक तूच आहेस. मला खात्रीने माहीत आहे की तुझ्या अंतःकरणात मलाही निश्चितच स्थान आहे, पण त्याच बरोबर मी हे सुद्धा जाणून आहे, की तुझ्या अंतःकरणात इतरही अनेकांची अनेक व्यवधाने आहेत. अशाच कुठल्यातरी एखाद्या व्यवधानाने सध्या तुझे अंतःकरण प्रामुख्याने व्यापलेले आहे हे मला अगदी स्पष्टपणे दिसत आहे. ए कृष्णा, तेव्हा तुझे मनही तू अगदी मोकळेपणाने प्रगट कर म्हणजे तुला आणि मला दोघांनाही बरे वाटेल. कारण त्याचसाठी तू मला येथे म्हणजे खास कुंजवनात बोलावले आहेस हे तर मी आधीपासूनच ओळखले आहे. आता लवकरात लवकर सर्व काही मला सांग पाहू.''

राधेच्या भावपूर्ण बोलण्याने आनंदीत झालेला कृष्णही भावपूर्ण झाला. त्याने राधेचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन आपल्या हृदयाशी धरले आणि राधेकडे, तिच्या नजरेत आपली नजर मिळवून पहात राहिला. पाहता पाहता कृष्णाचे नेत्र भरून आले आणि त्याच भारलेल्या अवस्थेत तो राधेशी बोलू लागला.

''अगं राधे, मला भरून येत आहे ते तुझ्या अंतःकरणाची अवस्था पाहून. मला तर माझ्या अंतःकरणाचे प्रतिबिंबच तुझ्या अंतःकरणात दिसत आहे. तुझ्या माझ्यावरील अलोट प्रेमाचे व अखंड भक्तिभावाचेच हे फळ आहे हे निश्चित. तुझी अशीच प्रतिमा पहिल्यापासूनच माझ्या अंतःकरणात उमटली होती आणि आज तुझ्या त्या प्रतिमेला प्रत्यक्ष साकार झालेले बघून माझे अंतःकरण मगापासूनच भरून येत आहे. तुझ्याविषयीचे सुरुवातीपासून घेतलेले व्यवधान आज तुझ्या रूपाने पूर्ण झालेले पाहून मला जो अतिशय आनंद होत आहे, त्याला कोठलेच मोजमाप नाही. तुझ्या मूळच्या प्रेमळ व भावनाप्रधान व्यक्तिमत्त्वाला आता सबळ व समर्थ अशा अंतःकरणाची जोड मिळाली. जणू व्यक्तिमत्त्व तुझे आणि त्यातील अंतःकरण माझे अशी सुरेख सांगड तुझ्याठायी जमली आहे. माझ्या ठिकाणी आता तुझ्याविषयी कोणतीही काळजी तर अजिबात नाहीच, परंतु तुझे जीवन तू अतिशय आनंदाने जगशील याची मला अगदी खात्री झाली. एवढेच नव्हे, तर अनेकांचे जीवन आनंदाचे करण्यासाठी तू त्यांना निश्चितपणे सहाय्यभूतही होशील.

अनयावरील संकटाच्या वेळी तुझ्याकडून प्रगटलेले धैर्यबळ आणि त्याहीपेक्षा तू अनयाची अत्यंत प्रेमाने केलेली सेवा शुश्रूषा या सर्व गोष्टी कौतुकाच्याही पलिकडीलच आहेत. कारण त्या गोष्टी सामान्य नाहीतच. त्यांचे असामान्यत्व तुला माहीत नसेल, पण मी ते जाणून आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व तुझ्याकडून अगदी सहजपणे घडत होते. त्यामध्ये कोणतेही उसने अवसान किंवा खोटा आवेश नव्हता. तुझ्या मनात निर्माण झालेले अपार ईश्वरी प्रेम, तुझ्या बुद्धीच्याठायी असलेली ईश्वराविषयीची अविचल निष्ठा आणि तुझ्या चित्ताठायी जडलेला ईश्वराविषयीचा अखंड ध्यास या सर्वांचे मिळूनच साधलेले हे फलित आहे. त्या फळाच्या रससेवनाचा मला होणारा आनंद हा पराकोटीचाच आहे. राधे, तुला देण्यासाठी व सांगण्यासाठी माझ्याकडे आता काहीही उरलेले नाही याचाच मला अतिशय आनंद होत आहे. माझे जे जे म्हणून काही आहे ते तर आता सर्व तुझेच झालेले आहे, कारण मलाच तू पूर्णपणे आपलेसे केलेले आहेस. तुझे म्हणून जे जे

होते ते तर तू मला कधीच अर्पण केलेले आहेस. त्यामुळे 'मी'च 'तू' आणि 'तू'च 'मी' अशीच आपली अवस्था झालेली आहे. हा ऐक्याचा येणारा आनंदाचा अनुभव म्हणजेच तो 'परमानंद' होय याची जाणीव ठेव. बस्, या आनंदाखेरीज आणखीन दुसरे ते काय माझ्या अंतःकरणात असणार बरे?''

कृष्णाचे बोलणे ऐकता ऐकता राधेला खरे तर अधिकच भरून येऊ लागले होते. परंतु तिने स्वतःला लगेचच सावरले आणि हसून ती कृष्णाला म्हणाली,

''ए कृष्णा, माझे एवढे कौतुक करणे आता पुरे झाले. कौतुकाची खीरही तूच करावीस आणि त्याची गोडी चाखून त्याचा रसास्वादही तूच घ्यावास. तुझ्या प्रेमाने दुसऱ्याला गोड करण्याचा छंदही तुझाच आणि त्या गोडीचा आनंदही तुलाच. परंतु ए कृष्णा, एक गोष्ट तू विसरतो आहेस, की जेवढी म्हणून तू माझी तारीफ करीत आहेस, तेवढी ती तारीफ तर सर्व तुझीच होत आहे. कारण तुझ्या म्हणण्याप्रमाणेच प्रतिबिंबाचे वर्णन केलेले सौंदर्य हे तर मुळात त्या बिंबाच्या सौंदर्याचे वर्णन आहे. खरे की नाही? कारण आज मी जी व जशी काही आहे ती सर्व व फक्त तुझ्यामुळेच आहे हेच खरे आहे. यात तीळमात्रही अतिशयोक्ती नाही. कारण माझ्या रोमारोमात तुझेच प्रेम भरलेले आहे आणि माझ्या श्वासाश्वासातूनही तुझेच अस्तित्व स्फुरत असते. या माझ्या अवस्थेचे मूळही तूच आहेस आणि त्यातून जे काही फळ आले असेल ते तर केवळ तुझ्यासाठीच आहे. कारण त्या फळाची गोडी व आवडी फक्त तुलाच आहे. तू तर आवडीने सर्व गोड करून घेतोस आणि तुझ्या प्रेमाने सर्वच गोड करून ठेवतोसही. माझा भाव गोड मानून घेता घेता गोड करून घेतलास आणि तो अगदी गोड करून ठेवलास. तोच माझा भाव तू आवडीने सेवन करून तृप्त होतोस आणि वर कौतुक मात्र माझेच करतोस. पण अशा कौतुकाची मला जराही भुरळ पडणार नाही. कारण मी पूर्णपणे जाणून आहे की हे सर्व तुझे माहात्म्य आहे आणि म्हणून सर्व कौतुकही खरे तर फक्त तुझेच आहे.

ए कृष्णा, परंतु हे सर्व सर्व आता राहू दे. मला खात्री आहे की हे सर्व सांगण्यासाठी व माझे कौतुक करण्यासाठी काही तू मला येथे बोलावलेले नाहीस. मला भेटल्यावर तुझ्याकडून अगदी उत्स्फूर्तपणे तुझे मन माझ्यावरील प्रेमाने भरून आले आणि तू मोकळे केलेस एवढेच. परंतु माझी भेट घेण्यामागील तुझा खरा हेतू अगदी वेगळाच आहे हे मला नक्की माहीत आहे. तेव्हा माझी भेट घेण्यामागील खरे कारण काय आहे ते मला लवकरात लवकर सांग बघू. अनय आता केव्हाही येथे येऊन पोहोचतील. ते येण्याच्या आत मोकळेपणाने मला सर्व सांगून तुझे मन मोकळे कर. ते ऐकण्याची व जाणून घेण्याची माझी आतुरता आता फारच वाढली आहे.''

*****

साहित्य प्रतिष्ठान®

# राधाकृष्ण ऐक्यभाव

**रा**धेचे बोलणे ऐकता ऐकता कृष्ण मात्र अत्यंत गंभीर होत राहिला आणि थोडा वेळ काही न बोलता स्वस्थच बसून राहिला. परंतु थोड्या वेळानंतर गंभीर सुरातच कृष्ण सावकाशपणे राधेशी बोलू लागला.

''अगं राधे, अगदी पहिल्या भेटीपासूनच मी तुला माझ्या अत्यंत जवळ पहात आलो. माझे अंतःकरण केवळ तुझ्यापाशीच मोकळे करावे असे मला नेहमीच वाटत असे आणि ते तसे तुझ्याजवळच मोकळेही होत असे. तुझ्या लक्षातही असेल, की मी तुला बऱ्याच वेळा असे म्हणत असे की 'माझ्या आंतरिक प्रेरणेतून मला नेहमीच असे खात्रीपूर्वक वाटत आले आहे, की माझे गोकुळातील वास्तव्य हे कायमचे नाही. माझे पुढील सर्व जीवन व कार्य हे गोकुळाच्या बाहेरच घडणार आहे.' राधे, गोकुळ सोडून जाण्याची ती वेळ आता अगदी नजीक येऊन ठेपली आहे असे मला हल्ली प्रकर्षाने जाणवू लागले आहे. लवकरच असे काहीतरी घडेल की मला कारणपरत्वे गोकुळ सोडून जाणे क्रमप्राप्तच होईल आणि पुन्हा गोकुळात परत येणेही बहुधा घडणारच नाही. हे काय व केव्हा घडेल हे मलाही सांगता येणार नाही.

जीवन हा एक अखंड प्रवास आहे. परंतु त्या प्रवासातील वाटेत वारंवार वळणेही येतात. त्या वळणावर वळण घ्यावेच लागते आणि पुढे जावेच लागते. ते कोणालाही चुकलेले नाही. सर्वांनाच ते अटळ आहे. फक्त ते वळण केव्हा येईल व काय असेल ते निश्चितपणे आधी कोणालाच सांगता येत नाही. अशी वळणे घेत घेतच टप्प्या टप्प्याने पुढे जावयाचे असते. आपल्या जवळ असलेल्यांपासून काही वेळा दूरही जावे लागते, तर काही वेळा दूर असलेल्यांच्या जवळ जाऊन त्यांना आपलेसे करावे लागते. जशी एखादी स्त्री विवाहानंतर आपल्या माहेरच्या माणसांना दूर करून सासरी येते आणि सासरच्या माणसांना आपलीशी करते, अगदी तसेच बऱ्याचदा सर्वांच्याच जीवनात घडत असते.

राधे, हा माझा दृष्टांत तुलाच अधिक समजेल. पण तुझे वैशिष्ट्य म्हणजे विवाहानंतर गोकुळात आल्यावर जरी तू माहेर सोडून सासरच्यांच्या जवळ आलीस, तरी आपलेसे मात्र मला केलेस. खरे तर, मी ना तुझ्या माहेरचा नातलग, ना तुझ्या सासरचा नातलग. परंतु आपले असे काही प्रेमाचे नाते जुळले, की जे सर्व नात्यांच्या पलीकडचे आहे, असेच म्हणावे लागेल. परंतु सत्य हे आहे की आपले प्रेमाचे नाते हे सर्व नात्यांच्या मूळाचे आहे. कारण ईश्वराशी असलेले प्रत्येकाचे नाते हेच सर्व नात्यांचे मूळ आहे. त्याची जाणीव आपल्याला आपण ईश्वरी नात्याचे प्रेमाचे संबंध अनुभवल्यावरतीच झाली आणि आपले संबंध कायमचे दृढ होऊन राहिले. आपले प्रेमाचे संबंध एवढ्या खोलवरचे आहेत म्हणूनच आपले नाते हे अखंड, अभंग व मुख्य म्हणजे अत्यंत आनंददायी आहे.

राधे, या गोकुळातच मी जन्माला आलो आणि येथेच वाढलोही. येथेच मी माझ्या सवंगड्यांसह बागडलो आणि खेळलोही. या गोकुळावरती व गोकुळवासीयांवरती अगदी पहिल्यापासूनच माझा जीव जडून राहिला. येथील भोळ्या, भाबड्या व साध्या माणसांनी माझ्या मनाला प्रथमपासूनच आकर्षित करून घेतले. त्यामुळे या गोकुळाच्या स्वास्थ्यासाठी व हितासाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहिलो. गोकुळाची सेवा करण्यातच मला नेहमी धन्यता वाटत राहिली. सर्व गोकुळवासीयांवरती मी अगदी जिवापाड प्रेम केले. त्यांच्यावरती माझा फारच लोभ जडला. अर्थात माझे हे प्रेम व त्यामागील माझा हेतू सर्वांनाच कळला असे नाही. अनेकांना माझे प्रेम मानवलेही नाही. त्यांनी माझा राग धरला आणि माझी निंदाही केली. पण मला त्यांचा कधीच राग आला नाही आणि माझे त्यांच्यावरील प्रेम जराही कमी झाले नाही. क्वचित प्रसंगी मलाही थोडीशी उदासीनता व नैराश्यता आली. अगदीच नाही असे नाही. परंतु माझ्या मनाची ती अवस्था फार काळ टिकूच शकली नाही. सर्वांना समजून घेणे आणि त्यांच्याविषयीचा आपलेपणा कायम ठेवणे हा तर माझा स्वभावच होऊन राहिला. तरीही मलाही कोणीतरी समजून घ्यावे, माझे प्रेम जाणावे आणि माझ्या प्रेमाचा अनुभव घेऊन माझ्या प्रेमाला प्रतिसाद द्यावा असे मात्र मला अंतरात नेहमीच वाटत असे. प्रेमाचा अनुभव घेण्याची माझ्या अंतरातील भूक कायमपणे वाढतच असे. पण ते कधीच कोणाच्या लक्षात आले नाही आणि काय सांगू राधे, अचानकपणे व अनाहूतपणे तूच माझ्या जीवनात आलीस.

राधे, आपल्या प्रथम भेटीपासूनच मला जाणवत राहिले की, आपले ऋणानुबंध काही वेगळेच आहेत. खरे तर, आपण प्रथमच भेटत होतो. परंतु मला तर वाटले की जणू आपण बऱ्याच काळापासून एकमेकांना भेटत आहोत. तुझी जवळीकता साधण्यासाठी सुरुवातीला मी तुझी चेष्टा व थट्टा-मस्करी करीत असे आणि तुला ती न मानवल्यामुळे त्याची परिणती तुझ्या रागावण्यात व चिडण्यात होत असे. परंतु हळुहळू तुला माझ्या मनातील प्रेम कळायला लागले आणि आवडायलाही लागले. मग मात्र मला माझ्या तुझ्यावरील प्रेमाचा अनुभव मोकळेपणाने घेता येऊ लागला. त्यामुळेच पहिल्याप्रथमच प्रेमाचा अनुभव घेण्याची माझी भूक शमन होऊ लागली आणि तितकीच ती वाढूही लागली. या प्रेमाच्या देवघेवीत काही वेळा तू कमीही पडत होतीस, नाही असे नाही. परंतु तरीही श्रद्धेने या प्रेमाच्या अनुभवात तू मला साथ देत राहिलीस आणि जेव्हा तुझ्याच ठिकाणी हे प्रेम निर्माण झाले, तेव्हा मात्र माझी तुझ्या विषयीची काळजी संपली. पण मग तुझ्या ठिकाणी जे प्रेम निर्माण झाले त्या प्रेमाचीच काळजी मला वाटू लागली. कारण मी जाणून होतो, की हे प्रेम सुरुवातीच्या अवस्थेत असल्यामुळे भावनात्मक जास्त होते. भेटीची आतुरता, विरहाची व्याकुळता, कधी निराशता, तर कधी भेट होऊ शकत नाही म्हणून माझ्याच वरती राग अशा भावनांच्या अनेक आंदोलनातून तुला जावे लागले. पण तू श्रद्धेने हे प्रेमाचे सूत्र धरून ठेवलेस. त्यासाठी तुला केवढीतरी किंमतही द्यावी लागली. घरातून व समाजातून साहजिकच अगदी टोकाचा विरोध झाला आणि निंदा नालस्तीही झाली. परंतु माझ्यावरील प्रेमाने सर्व सहन करीत राहिलीस. त्यामुळे तुझे मनोबळ तर वाढलेच, पण तुझ्या ठिकाणी केवढे तरी धैर्यबळही निर्माण झाले. म्हणूनच सर्व संकटांवर मात करून आणि सर्व अडचणींतून मार्ग काढून तू मला भेटतच राहिलीस.

राधे, अशा आपल्या अनेक प्रेमाच्या भेटी झाल्या, प्रेमाने बोलणे घडले, प्रेमाचे संवाद रंगले आणि तुझ्या ठिकाणी हळुहळू आपल्या या प्रेमसंबंधाचे असलेले मूळ दृढ होऊन खोलवर जाऊ लागले. ते मूळ म्हणजेच ईश्वराचे अस्तित्व. ईश्वराचे अस्तित्व, त्याचे प्रेम, त्याची भक्ति याची जाणीव व माहात्म्य तुला जाणवू लागले आणि त्याचा ध्यासच तुझ्या ठिकाणी निर्माण झाला. त्यासाठी माझे प्रेम हे निमित्त झाले. परंतु तुझ्या नकळत तुझ्या ठिकाणी ध्यास मात्र ईश्वराचाच लागला. कारण मुळात माझ्याठायीचे प्रेम हेच ईश्वरी होते. त्याची जाणीव मला होतीच. पण तुझ्याही ठिकाणी ती जाणीव निर्माण झाली तेव्हाच मला अत्यंत आनंद झाला आणि म्हणूनच मला तुझे अतिशय कौतुकही वाटत असते. त्याचे श्रेय तू मला देशीलही. पण ते पूर्ण सत्य नाही. कारण माझ्याकडून ते ईश्वरी प्रेम सूर्याच्या प्रकाशाप्रमाणे सर्वांसाठी सारखेच प्रगट होत असते. माझ्याकडून त्यांच्यात काहीही भेदभाव कधीच घडत नसतो. परंतु त्या ईश्वरी प्रेमाने मूळ मात्र फक्त तुझ्याच ठिकाणी धरले. तुझ्याच ठिकाणी ते ईश्वरी प्रेम फुलत राहिले आणि आता तर फळलेही. तुझ्या अंतःकरणाची अवस्थाच मुळी प्रेमरसाने पूर्णपणे भरून ओथंबणाऱ्या फळासारखी झाली आहे. त्यातून नित्य व सहज गळणाऱ्या प्रेमरसाच्या गोडीच्या सेवनानेच माझी ती खात्री झाली आहे. त्या प्रेमरसाच्या सेवनाने मी अगदी तृप्त झालो आहे.

राधे, पावसाचा वर्षाव हा सर्वत्र सारखाच होत असतो. त्याच्यातून काही ओढे व नालेही निर्माण होतात. परंतु त्यातून एखादीच सरिता होऊन वाहत जाऊन सागराला मिळते आणि सागराशी ऐक्य पावते, तेव्हाच ती सरिता मग 'सागरीका' ठरते. अगदी तसेच माझ्याकडून झालेल्या प्रेमवर्षावातून तुझ्या मनात प्रेमाची अखंड धारच निर्माण झाली आणि माझ्या निमित्ताने माझ्यासाठी वाहताना, वाहत मात्र तुझ्या मनातच राहिली. वाहता वाहता त्या प्रेमधारेची सरिता झाली आणि तुझ्या अंतःकरणात जेथे माझी प्रेममूर्ती ठसलेली होती, त्या दिशेने ती सरिता वाहतच राहिली. वाहण्याच्या या प्रक्रियेत तुझे अंतःकरण व्यापक व सखोल होत राहिले आणि स्वतःच प्रेमसागर होऊन राहिले. त्या प्रेमसागरात तुझ्या अंतःकरणात असलेली तुझ्या प्रिय कृष्णाची मूर्तीसुद्धा पार बुडून गेली आणि आता ती वेगळेपणाने दाखवायलाही शिल्लक राहिली नाही. 'मी' व 'तू' हे द्वैतही त्या प्रेमसागरात पूर्णपणे विरघळले आणि तरीही प्रेमाच्या गोडीरूपाने शिल्लक राहिले.

तुझ्या अंतःकरणात 'मी'च आहे असा तुझा अनुभव झाला आणि तुझ्या रूपाने 'मी'च आहे हा माझा अनुभव झाला. भक्तिभावाच्या या ऐक्यतेचा आनंददायी व श्रेष्ठ अनुभव मला आणून देण्यास तू निमित्त झालीस, तर तो अनुभव तुला आणून देण्यास मी निमित्त झालो. पण हे सर्व त्या ईश्वरी सत्तेतच घडले हे मात्र सत्य आहे. म्हणूनच 'त्या ईश्वराची सत्ता, त्याचे प्रेम, त्याची भक्ति अणि त्याच्याशी ऐक्य हेच सर्वश्रेष्ठ आहे' हा मूळ सिद्धांतच खऱ्या अर्थाने सिद्ध झाला. तुझे जीवन जसे धन्य झाले, तशीच मलाही जीवनात कृतकृत्यता लाभल्याचा आनंद होत आहे. त्यामुळे गोकुळ सोडून जाण्याची जेव्हा वेळ येईल तेव्हा माझे अंतःकरण निश्चितच व्यथित होईल. परंतु त्याच वेळी माझे अंतःकरण तुझ्या रूपाने या गोकुळात राहणार आहे याचाच आनंद माझ्या बरोबर मी घेऊन जाणार आहे आणि त्याच आनंदामुळे माझे अंतःकरण सदैव तृप्त राहील.

राधे, माझे पुढील जीवन काय आहे आणि पुढे काय कार्य माझ्याकडून घडणार आहे हे मलाही माहीत नाही. परंतु पुढे कितीही कार्य माझ्याकडून घडले तरी त्याचे मूळ निश्चितच या गोकुळामध्ये आणि तेही तुझ्या प्रेमामध्येच असणार आहे. या प्रेममूळाची माझ्या ठिकाणी केवळ स्मृतीच असणार नाही, तर त्याची अनुभूतीच माझ्या ठिकाणी सदैव राहणार आहे. या प्रेममुळापासून येणारा प्रेमरसच माझ्या अंतःकरणात नित्य भरलेला असणार आणि तुझ्या सहज झालेल्या स्मरणाने तो भरून वाहील इतकेच. आतापर्यंत मी तुझ्याशी तुझ्याविषयी एवढे कधीच बोललेलो नाही. परंतु माझ्या अंतःकरणात तुझ्याविषयी दाटून राहिलेले हे सर्व भाव मला तुझ्यापाशी मोकळे करायचे होते. पुन्हा केव्हा संधी मिळेल किंवा वेळ येईल याची आता खात्री देता येणे शक्य नाही. म्हणूनच आज मुद्दामच मी आपली भेट ठरवली. माझा संकेत ओळखून तू पुढे एकटीच आलीस म्हणून बरे झाले. त्यामुळे मला माझे अंतःकरण पूर्णपणे मोकळे करता आले.

नाही तरी, आपले बाह्यांगाचे जीवन वेगळे वेगळे आहे असे मी तुला नेहमीच सांगत असे आणि तरीही माझ्याशी एकरूप असल्याचा अनुभव तुला घ्यायचा आहे. तशी वेळ आता जवळ येत चाललेली आहे आणि तो अनुभव घेण्याची तुझी अवस्थाही झालेलीच आहे. त्यामुळे मला तुझ्या जीवनाची अजिबात काळजी नाही. तुझी काळजी घेण्यास तू पूर्ण समर्थ आहेस आणि माझी काळजी तू मुळीच करू नकोस. माझ्या प्रेमाने युक्त होऊन तुझे सर्व जीवन तर आनंदाचे होईलच, परंतु तुझ्या सहवासात येणाऱ्यांनाही या तुझ्या प्रेमावस्थेचा सहज लाभ होत राहील याचा आनंद मला जास्त होत आहे.''

राधेच्या प्रेमभक्तिभावाने आनंदित व कृतकृत्य झालेले कृष्णाचे अंतःकरण असे किती तरी वेळ प्रगटच होत राहिले असते. त्याला कोणीही कशानेही थांबवूच शकला नसता. परंतु कृष्णाच्याच ठिकाणी एवढा गहिवर आला, की त्याचा कंठ सद्‌गदित झाला आणि त्याच्या मुखातून शब्दच बाहेर येईनासे झाले. राधेचे दोन्ही हात आपल्या हातात घट्टपणे दाबून धरून तो राधेकडे प्रेमाश्रूंनी भरलेल्या नेत्रांनी पहात राहिला होता. त्या द्वारे जणू त्याच्या अंतःकरणातील भाव अजूनही भरून मोकळा होतच होता आणि तो फक्त राधेलाच जाणवत होता. कारण तिची अवस्थाही अगदी कृष्णासारखीच निःशब्द व भावपूर्ण झालेली होती आणि म्हणूनच राधा व कृष्ण दोघेही एकाच वेळी एकाच आनंदाचा अनुभव घेत होते. त्यांच्या तशा भावपूर्ण व निःशब्द अवस्थेत किती काळ गेला माहीत नाही. परंतु तेवढ्यात तेथे अनयाचे आगमन झाले आणि राधा व कृष्ण दोघेही देहभानावर आले.

अनयाला पाहताच राधेने कृष्णाच्या हातातील आपले हात सोडवून घेतले आणि ती उभी राहिली. कृष्णापासून दूर जाऊ पाहणाऱ्या राधेला अनयाने थांबवले आणि तिला तो म्हणाला,

''राधे, थांब, आहेस तिथेच आणि तशीच बस. तुझे स्थान कृष्णाच्या शेजारीच व त्याच्या जवळच आहे. तुमच्या दोघांच्या रूपानेच खरे प्रेम व खरी भक्ति प्रगट आहे याची माझी अगदी खात्री झालेली आहे. त्यामुळेच तुम्हा दोघांना असे एकत्र बसलेले बघताना माझ्या मनाला अत्यंत समाधान व संतोष होत आहे. ज्यांनी मने शुद्ध प्रेमाने एकरूप झालेली आहेत

त्यांचेच असे एकत्र बसणे मनाला आनंद देते आणि त्यांचीच जोडी शोभूनही दिसते. राधे, तुझ्या ठिकाणी कृष्णाविषयी जो भक्तिभाव निर्माण झाला आहे त्याचे मूळ कृष्णाच्या अंतःकरणातील प्रेमात आहे हे मी जाणून आहे आणि कृष्णाचे अंतःकरण किती शुद्ध आहे याचा तर मी अनुभवच घेतला आहे. कृष्णाच्या त्या शुद्ध प्रेमाचा अनुभव तर सध्या मी नित्यच घेत असतो. जसे मूळ तसे फळ या न्यायाने तुझ्या ठिकाणी निर्माण झालेले कृष्णाविषयीचे प्रेमही शुद्धच आहे याची मला पूर्ण खात्री आहे.

एक गोष्ट खरी आहे की जरी मला कृष्णाचे प्रेम सहजपणे भाग्याने मिळत असले, तरी कृष्णाची थोरवी काय व किती आहे हे मात्र मी काहीच जाणत नाही. पण राधे, तू मात्र या कृष्णाची थोरवी पूर्णपणे जाणून आहेस. म्हणूनच तुला तो तुझा 'देव' वाटतो आणि त्याच्याविषयीचा केवढा तरी भक्तिभाव तुझ्या ठिकाणी निर्माण झालेला आहे. त्यामुळेच मला तुझे अतिशय कौतुक वाटत आहे. कारण माझ्यासाठी कृष्ण ही अजूनही एक अत्यंत प्रेमाची अशी व्यक्तिच आहे. माझ्या मनात कृष्णाला प्रेमाचे प्रथम स्थान आहे, हे निश्चित. परंतु माझा तो सर्वस्वी झाला आहे असे मला तरी वाटत नाही. मग मी त्याचा सर्वस्वी होऊन राहणे ही तर अगदी दूरचीच गोष्ट आहे. परंतु तुझ्यासाठी मात्र कृष्ण तुझा सर्वस्वी आहे आणि तूही कृष्णाची सर्वस्वी होऊन राहिली आहेस. हाच तुझ्या ठिकाणचा कृष्णाविषयीचा असलेला भक्तिभाव माझ्या मनाला आकर्षित करीत आहे. माझ्यासाठी तर भक्तिभावाचा आदर्श तूच आहेस. म्हणूनच राधे, 'कृष्ण व राधा' या देव व भक्तांच्या आदर्श जोडीला मी मनःपूर्वक प्रणाम करतो.''

अनयाच्या अशा भावनात्मक बोलण्याने राधाही थोडीशी बावरलीच. परंतु काहीही न बोलता ती जागच्या जागीच उभी राहिली. कृष्णाने मात्र प्रेमाने हसून अनयाचे स्वागत केले आणि बसल्या जागेवरून उठून तो अनयाच्या जवळ आला. अनयाचा हात धरून कृष्ण पुन्हा आपल्या बसल्या जागी आला. अनयाला त्याने आपल्या शेजारी बसवून घेतले आणि राधेलाही आपल्या शेजारी बसण्याची खूण केली. परंतु अनय मात्र लगेचच तेथून उठला आणि खाली कृष्णाच्या पायाजवळच बसून राहिला. राधाही मग अनयाच्या शेजारी व कृष्णाच्या पायाजवळ बसून राहिली. कृष्ण त्या दोघांकडे बराच वेळ प्रेमभऱ्या नजरेने एकटक बघत राहिला. थोड्या वेळाने कृष्ण आपल्या मृदू व मधुर वाणीने बोलू लागला.

''हे अनया, हे राधे, तुम्हा उभयतांना असे प्रेमाने एकत्र बसलेले पाहून मला तर अतिशय आनंद होत आहे. तुमची अशी जमलेली जोडी फारच छान व शोभून दिसत आहे. असाच जोडीने संसार तुम्हा दोघांना करायचा आहे आणि आपापले जीवन आनंदाने जगायचे आहे. प्रेमाची गोडी व प्रेमाचा गुलाबासारखा नित्य ताजेपणा राखून तुमचा संसार प्रेमाच्या गोडीगुलाबीने करा आणि गुलकंदासारखा आनंद अनुभवा. परस्परांवरील प्रेमाने व एकजुटीने तुम्ही तसे कराल याची मला पूर्ण खात्री आहे. तसा आत्मविश्वास तुम्हीही धराल, तर संसारात कितीही अडचणी आल्या तरी त्यावर मात करून तुम्ही तुमचा संसार निश्चितपणे सुखाने कराल. संसार करताना जे दैवाने मिळेल त्यात समाधान मानीत रहा आणि काहीही घडले तरी मनाची शांती कायम राखा. परस्परांशी वागताना समभावाने वागा. लहान-मोठा, स्त्री-पुरुष, श्रेष्ठ-कनिष्ठ असा कोणताही भेद मनामध्ये येऊ देऊ नका. ईश्वरच सर्वश्रेष्ठ आहे आणि आपण सर्व केवळ निमित्तमात्र आहोत यावर श्रद्धा ठेवून त्या

ईश्वराचेच प्रेमाने स्मरण करीत रहा.  सर्वात आधी आपण ईश्वराचे लागतो याची जाणीव ठेवून ईश्वरालाच नित्य आळवीत रहा.  ईश्वराच्याच भक्तिने खऱ्या आनंदाची प्राप्ती तुम्हाला होईल आणि ईश्वराच्याच कृपेने जीवन समर्थपणे जगण्याचे बळ तुम्हाला प्राप्त होईल.  ईश्वराचे शुभाशीर्वाद तुम्हाला निश्चितच आहेत आणि माझ्या सर्व शुभेच्छा सदैव तुमच्या पाठीशी आहेत.

अनया, मला तुला आणखीन एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे.  आपण नेहमी आपल्या भावाने असावे आणि आपल्या भावाशी प्रामाणिक रहावे.  इतरांशी कधीही आपली तुलना करून, आपण आपल्याकडे कोणताही कमीपणा घेऊ नये किंवा आपल्याठायी वृथा अहंकारही बाळगू नये.  मगाशी तू राधेच्या भावाचे कौतुक करताना उगाचच स्वतःकडे कमीपणा घेत होतास हे योग्यच नव्हे.  अरे, तू व राधा दोघेही माझ्या सारख्याच प्रेमाचे आहात आणि मला सारखेच प्रिय आहात.  मी तरी तुमच्यात कधीही भेदभाव केलेला नाही.  कारण तसा भेदभाव माझ्या ठिकाणी मुळातच नाही.  परंतु जो काही बाह्यांगाचा फरक दिसतो तो माझ्याविषयी असलेल्या कोणाच्या भावातील फरकामुळे दिसतो.  राधेला माझे प्रेम व त्या प्रेमाचे कारण लवकर लक्षात आले असेल आणि त्या प्रेमाचे महत्त्वही तिने आधी जाणले असेल.  परंतु तिलाही सुरुवातीला हे सर्व कळायला वेळ हा लागलाच.  परंतु केव्हा श्रद्धेचा आधार घेऊन, तर केव्हा माझ्या प्रेमाची खात्री बाळगून ती तिच्या मानसिक अवस्थेतून पुढे पुढे येत राहिली आणि आज माझ्या प्रेमाने सर्वस्वी युक्त होऊन राहिलेली आहे.

अनया, तुला माझ्या प्रेमाची जाणीव काही प्रसंगामुळे नंतर झाली असेल किंवा त्या प्रेमाचे महत्त्व समजायलाही वेळ लागला असेल.  परंतु एकदा तुझ्या ठिकाणीही हे प्रेम निर्माण होऊन वाढायला लागले मात्र, मग तुझा भावही राधेसारखाच होऊन राहिला.  तेव्हा ही गोष्ट निश्चितपणे लक्षात ठेव की ईश्वराची भक्ति करण्याचा व ईश्वराचा भक्त होऊन राहण्याचा हक्क हा प्रत्येकाचा आहे आणि त्याचा त्याचा स्वतंत्र आहे.  तेथे ईश्वर व आपण या शिवाय कोणीही तिसरा म्हणून जर नाहीच, तर मग तुलना कोणाशी करायची आणि का करायची?  अरे, मी सुद्धा तुझ्या व ईश्वराच्या जो मध्ये आहे ना, तो सुद्धा निमित्त मात्रच आहे आणि काही काळापुरताच आहे हे ध्यानात ठेव.  तेव्हा तुझ्या भावाशी प्रामाणिक रहा आणि तुझ्या भावाने युक्त होऊन रहा एवढेच मी तुला सांगतो.  त्यावर पूर्ण श्रद्धा ठेव आणि तुझ्या भावाने पुढे पुढे येत रहा.''

कृष्णाच्या अशा बोलण्याने अनय थोडासा चकित झाला खरा, परंतु कृष्णाच्या बोलण्यातील सांगणे त्याच्या लक्षात आले.  त्यामुळे समाधानाने हसून अनय कृष्णाला म्हणाला, ''कृष्णा, तुझे हे सर्व बोलणे हे तुझ्या माझ्यावरील आत्यंतिक प्रेमानेच घडत आहे.  त्या प्रेमाचेच ते प्रतीक व द्योतक आहे याची मला अगदी खात्री आहे.  माझ्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा कमीपणा नसावा हाच तुझा हेतू आहे आणि तो माझ्या लक्षातही आलेला आहे.  परंतु भाग्याने प्राप्त झालेल्या तुझ्या प्रेमाला अजूनही मी पूर्णपणे पात्र झालेलो नाही हेही मला ठाऊक आहे.  दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुझे माहात्म्य काय व किती आहे हेही अजून मला पूर्णपणे कळले नाही.  राधा तुझे माहात्म्य निश्चितच अधिक जाणून आहे ही गोष्ट मान्य

करायलाच हवी. मलाही तुझे माहात्म्य हळुहळू सर्व कळेल याची मला खात्री आहे. परंतु त्याला काही काळ हा जावा लागणारच आहे. म्हणूनच माझ्याकडे कोणताही कमीपणा न घेता मी नेहमी सावध व तत्पर हे असायलाच हवे.

कृष्णा, मगाशी तुझ्या बोलण्यात मला जरा एक वेगळाच सूर जाणवला आणि त्यामुळे मी थोडासा बेचैनही झालो आहे. मी व राधेने पुढील जीवन कसे आनंदाने जगावे आणि संसार कसा सुखाने करावा याविषयी सांगताना तू अशा तऱ्हेने बोलत होतास, की जणू त्यामध्ये तुझा सहभाग असणारच नाही. परंतु तुझे नित्य मार्गदर्शन व प्रेम यामुळेच तर आम्हाला तसे वागता येणार आहे हे तर खरेच आहे. त्यामुळे आमच्या जीवनातील तुझे स्थान कायमचेच आहे. ते स्थान दुसऱ्या कोणालाही आम्ही देऊच शकणार नाही आणि ते स्थान दुसरा कोणी घेऊही शकणार नाही. आमच्या जीवनाची सर्व सूत्रे नेहमी तुझ्याच हातात असणार आहेत. कारण तूच आमच्या जीवनाचा सूत्रधार होऊन राहिलेलाच आहेस. त्यासाठी तुझा सहवासही आम्हाला नित्य मिळावयास हवा आणि आम्हीच तो करावयास हवा. तुझ्याशिवायचे वेगळे जीवन जगण्याची आम्ही तर कल्पनाही करू शकत नाही आणि कृष्णा, तू मात्र 'तुम्ही असे वागा, तुम्ही असे जगा' अशी दुराव्याची भाषा बोलत आहेस. मला तरी त्याचे काही कारण समजू शकत नाही. पण तुझे ते बोलणे ऐकून माझ्या मनात मात्र एक प्रकारची हुरहूर निर्माण झाली. म्हणूनच मी तुला निक्षून सांगत आहे की आपले हे प्रेमाचे संबंध असेच नेहमी कायम राहणार. त्यामध्ये आता कोणीही बाधा आणू शकणार नाही. तसा कोणी जरी प्रयत्न केला तरी मी तो प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊ देणार नाही. मी तरी तुला रोज भेटून तुझा सहवास करणार आणि तुझ्या प्रेमाचा अनुभव घेणार. राधेने काय व कसे करायचे हे आता तीच ठरवील. त्यासाठी ती पूर्ण मोकळी आहे.''

अनय हा जरी थोडासा आवेशाने बोलताना दिसत होता, तरी खरे तर त्याला भावनेचा आवेगच आलेला होता. कृष्णावरच्या अत्यंत प्रेमापोटीच हा भावनावेग त्याच्या ठिकाणी निर्माण झालेला होता. कृष्णाने हे ओळखले आणि त्याचा कृष्णाला आनंदच झाला. अनयाच्या ठिकाणी निर्माण झालेल्या कृष्णप्रेमाचेच ते लक्षण होते. अनयाची ही प्रेमावस्था जाणून कृष्ण अनयाशी बोलू लागला.

''अरे अनया, तू तर फारच भावनाविवश झालेला दिसतोस. माझ्यावरील प्रेमामुळेच तुला असे वाटत आहे हे मला माहीत आहे. अरे, पण मगाशी मी जे बोलत होतो ते सर्वसाधारणपणे सांगत होतो. बाह्य जीवनात कधीही काहीही घडू शकते आणि म्हणूनच बाह्यांगाने कोणीही कोणाच्या जीवनात कायमचे स्थान घेऊ शकत नाही. म्हणजे तसे शक्यही होऊ शकत नाही. त्यात कोणाचाही दोष नाही किंवा कोणाला कमीपणाही नाही. कारण तोच जगाचा नियम आहे आणि तीच खरी वस्तुस्थिती आहे. परंतु जीवनात दिलेल्या स्थानाद्वारे ज्यांनी आपल्या मनात कायमचे स्थान घेतले, तेच आपल्या जीवनातील अनुभवात नेहमी आपल्याबरोबर असतात. त्यांचे अस्तित्व आपल्याला आपल्या ठिकाणी सदैव जाणवत असते. म्हणूनच तुमच्या मनात असलेले माझे स्थान हेच खरे आहे. कारण त्याचा अनुभव तुम्ही नित्य घेऊ शकता. मग मी बाह्यांगाने तुमच्या बरोबर असेनही किंवा नसेनही. ते केवळ बाह्य परिस्थितीनुसार घडणार आहे. पण अनया, तू उगाचच

काळजी करीत बसू नकोस. सध्या तरी आपल्यापैकी कोणीही कुठेही जात नाहीये हे तर खरे आहे ना? पुढचे पुढे. त्याची चिंता आता कशाला करीत बसायचे?

आता आपल्याला एक महत्त्वाची गोष्ट करायची आहे ती विसरू नकोस. राधेने जे पदार्थ येथे आणण्यासाठी केले होते ते तर ती सर्व घरीच विसरून आली. तू तरी ते आठवणीने आणले असशील अशी मी आशा करतो. नाहीतर आता आपले बोलणे झालेच आहे त्यातच समाधान मानावे लागेल. थोडेसे येथील पाणी प्राशन करू आणि आपापल्या घराचा रस्ता धरू. फक्त राधेने कोणते पदार्थ केले होते त्यांची नावे तिच्या मुखातून ऐकू आणि त्या पदार्थांची चव जिभेवर आणून खुशी अनुभवू.''

असे म्हणून कृष्ण अत्यंत मोकळेपणाने व मोठ्याने हसला. अनयानेही हसून कृष्णाला प्रतिसाद दिला आणि म्हणाला, ''अरे कृष्णा, ही राधा तर सर्व पदार्थ घरीच विसरून आली होती. परंतु मी मात्र आठवणीने सर्व काही घेऊन आलो आहे. तुझी भेट घेण्याच्या नादात मग दुसऱ्या कशाचेही भान राधेला राहणे शक्य तरी आहे का? येताना वाटेत तुझ्यासाठी ती फुले व माळाही घेणार होती. त्याही तिने आणल्या असतील असे मला वाटत नाही. कृष्णा, यात मी तरी तिला दोष देणार नाही. तुझे प्रेमच असे आहे की सर्वांचे भान हरणे हे सहजच घडते. परंतु आता आपण सर्वजण भानावर आहोत. आपले बोलणे खूप झालेले आहे. तुझ्या प्रेमाने मनाची भूक थोडीशी शमन पावली खरी, पण पोटातील भूक मात्र वाढलेली आहे. तेव्हा आपण आता फराळ करूया आणि राधेने तुझ्या प्रेमाने तुझ्यासाठी केलेल्या पदार्थांचे सेवन करूया.''

असे बोलून अनयाने आपल्याबरोबर आणलेले पदार्थ राधेसमोर ठेवले. राधा मगाच पासून काहीही न बोलता शांत व गंभीरच होती. कृष्णाच्या व अनयाच्या बोलण्यात सहभागी न होता आणि त्यांच्यातील विनोदाच्या बोलण्यालाही हसून प्रतिसाद न देता राधा स्वस्थच बसलेली होती. परंतु अनयाने तिच्या पुढ्यात सर्व पदार्थ ठेवल्यावर मात्र राधा उठून उभी राहिली आणि एकेक पदार्थ बाहेर काढून सर्वांना वाढू लागली. कृष्णाच्या आग्रहानुसार राधा, कृष्ण व अनय एकत्र बसले आणि पदार्थांचे सेवन करू लागले. कृष्ण व अनय एकेका पदार्थाची तारीफ करून राधेचे कौतुक करीत होते. कृष्ण आपल्या हाताने राधेला व अनयाला पदार्थ प्रेमाच्या आग्रहाने वाढत होता. अनयही कृष्णाला व राधेला आपल्या हाताने प्रेमाने वाढत होता. परंतु राधेचे मात्र खाण्याकडे तेवढेसे लक्ष नव्हते. कृष्ण व अनय यांच्यात हसून सामील होण्याचा ती प्रयत्न करीत होती खरी, पण तिला ते तेवढेसे जमत नव्हते. खाण्यात तिचे मनच लागत नव्हते. 'बस्स्, पुरे, मला भूक नाही' असे सारखे म्हणून खरे तर ती काही खाण्याचे टाळीतच होती. तिच्या या उदासीनतेचे व अलिप्तपणाचे कारण कृष्णाला अर्थातच माहीत होते. कृष्णाचे अनय येण्याच्या आधी जे राधेशी बोलणे झाले होते त्याचाच हा परिणाम होता हे कृष्णाने ओळखले. परंतु अनयाला मात्र राधेच्या वागण्याचे नवलच वाटत होते. पण त्याला त्याचे कारण विचार करूनही कळतच नव्हते. म्हणून तोही राधेला काही न विचारता पदार्थांचे सेवन करण्यात मग्न होऊन राहिला होता.

थोड्या वेळाने सर्वांचा फराळ आटोपला. राधेने सर्व आवरून घेतले. कृष्ण व अनय पुन्हा एकत्र बोलत बसले होते. पण राधा मात्र तेथे न थांबता घरी चलण्याविषयी अनयाला आग्रह करू लागली. अनयाने तिला पुन्हा पुन्हा सांगून पाहिले. एवढेच काय, कृष्णानेही राधेला थांबण्याचा आग्रह केला. पण काही केल्या राधेचे मनच तेथे आता लागत नव्हते. पण तसे न सांगता 'मला जरा बरे वाटत नाही' असेच ती सारखे म्हणू लागली. मग अनय व कृष्ण यांचाही नाइलाज झाला. आणि त्यांनीही घरी चलण्याची तयारी सुरू केली. आता ते एकमेकांचा निरोप घेऊन घरी जाण्यास निघणार तोच राधा कृष्णाला म्हणाली,

''कृष्णा, आज तू माझ्याशी तुझे सर्व अंतःकरण मोकळे केलेस त्याने मला अत्यंत बरे वाटले. तुझ्याशी बोलण्याने पुढील जीवन जगण्याचे केवढे तरी धैर्यबळ मला प्राप्त झाले आहे. सर्व गोष्टींच्या बाह्यांगाच्या मर्यादा आज तू मला अगदी स्पष्ट करून सांगितल्यास आणि माझ्या पुढील जीवनाची वाटचालही मला दाखवलीस त्यामुळेच मला हे बळ प्राप्त झालेले आहे. तुझीच मूर्ती माझ्या अंतःकरणात ठसलेली आहेच. त्याच्या नित्य आनंदाचा अनुभव मला अगदी सहजपणे येत राहील. मला त्यासाठी मुद्दाम म्हणून वेगळे काही असे करावे लागणारच नाही. परंतु माझी प्रतिमा तुझ्याही अंतःकरणात तू प्रेमाने ठेवलेली आहेस याचा मला विशेष आनंद आहे. तुझ्या ठिकाणी माझ्याविषयीची जी ही प्रतिमा आहे त्यानुसारच माझे पुढील सर्व जीवन जगणे घडेल याची मी तुला अगदी खात्री देते. मला तू जीवनात तुझ्या प्रेमाने पूर्ण तृप्त करून ठेवलेस म्हणून मी तुझी जन्मभर ऋणी राहीन. तुझ्या प्रेमाचे व भक्तिचे माहात्म्य नित्य गाऊन मी त्या तुझ्या माझ्यावरील ऋणांचा नित्य आनंद अनुभवीत राहीन.

कृष्णा, आज माझ्यासाठी आणखीन एक शेवटची गोष्ट कर आणि तुझ्या माझ्यावरील ऋणात आणखीन थोडीशी भर टाक. आता निघण्यापूर्वी तुझे मुरलीवादन ऐकावे अशी माझ्या मनात अत्यंत तीव्र इच्छा निर्माण झालेली आहे. तुझे अंतःकरण ज्यामध्ये पूर्णपणे मोकळे होते ते मुरलीवादन श्रवण करण्याची अत्यंत आर्तता माझ्या मनाला लागली आहे. तेवढी तू पूर्ण करावीस अशी मी तुला प्रेमाच्या हक्काने विनंती करते. याच्यापुढे मी तुला असा आग्रह कधीही करणार नाही असे मी तुला आश्वासन देते, मग तर झाले?''

अशी करूणापर वचने बोलत असताना राधेच्या नेत्रातून अश्रू पाझरू लागले. त्या अवस्थेतील राधेला बघून कृष्णाचेही अंतःकरण भरून त्याच्या नेत्रात आले. अनयही एकदम भांबावल्यासारखा झाला आणि बावरलेल्या नजरेने एकदा राधेकडे व एकदा कृष्णाकडे असे पहात राहिला. अंतःकरणाच्या त्या भावपूर्ण अवस्थेतच कृष्णाने कमरेला खोवलेली आपली प्रिय मुरली आपल्या हातात घेतली. बाजूच्याच एका मोठ्या शिळेवर कृष्ण बसला असता राधा व अनय सुद्धा अगदी सहजपणे त्याच्या पायाजवळ बसले. कृष्णाने हातातील मुरली अलगदपणे ओठावर धरली. कृष्णाने राधेकडे एकदा प्रेमपूर्ण दृष्टीने पाहिले आणि आपले नेत्र मिटून घेतले. क्षणभरातच मुरलीतून हळुवार सूर बाहेर येऊ लागले आणि वातावरणात

मुरलीचा नाद घुमू लागला. कृष्णाच्या अंतःकरणापासून सहजपणे येणारे ते सूर म्हणजे सनातन म्हणून वर्णिलेला असा तो ब्रह्मनादच होता.

सर्व आसमंतात भरत असलेला तो मुरलीचा नाद राधेच्याही अंतःकरणाचा ठाव घेत होता आणि त्याचे निनाद राधेच्या अंतःकरणातच स्फुरू लागले. राधेला तर असेच जाणवू लागले की तिच्या अंतःकरणातील नादाचे निनादच कृष्णाच्या मुरलीतून प्रतिध्वनीत होत आहेत. कृष्ण जणू तिच्या अंतरातूनच मुरलीवादन करीत होता. त्या मधुर व मंजूळ स्वरसागरात राधा पूर्णपणे विरघळली आणि कृष्णमयच होऊन राहिली. आपल्या अंतःकरणातील सूरनादात पूर्णपणे रंगलेल्या व दंगलेल्या अशा राधा व कृष्ण यांची देहभान विरहीत अवस्था पहाता पहाता अनयाच्या डोळ्यांचेही पारणे फिटल्यासारखे झाले. त्याचेही देहभान हरवले आणि एका वेगळ्याच सुखाचा अनुभव अनयाला येऊ लागला.

अशा अवस्थेत किती काळ लोटला याचे मोजमाप करणे शक्यच नव्हते. कारण जणू काळच थांबल्यासारखा झाला होता. परंतु हळुहळू कृष्णाचे मुरलीवादन जेवढ्या सहजपणे सुरू झाले होते तेवढ्याच सहजपणे ते थांबलेही. अनय लगेचच देहभानावर आला. परंतु कृष्ण अजूनही त्या नादातच रममाण झालेला होता आणि राधाही तिच्या तिच्यातच रमलेली होती. थोड्या वेळाने कृष्णाने आपले प्रेमाश्रूंनी डबडबून वाहणारे नेत्र हळुच उघडले. समोर भावपूर्ण झालेल्या राधेला पाहून कृष्णाला अतिशय आनंद झाला. राधेचे ते प्रेमरूप कृष्णाच्या मनाला अत्यंत मुदीत करते झाले. कृष्ण आपल्या बसल्या जागेवरून उठून राधेच्या जवळ गेला आणि आपल्या हाताने त्याने राधेच्या मस्तकाला स्पर्श केला. कृष्णाच्या त्या दैवी प्रेमाच्या स्पर्शाने राधेचे तन मन पूर्णपणे सुखावले. राधेच्या सर्वांगावरती मोहरच आल्यासारखे तिला जाणवले आणि ती हळुहळू भानावर आली. राधेने नेत्र उघडले आणि सन्मुख असलेल्या कृष्णाला पाहिले मात्र, तिच्या आनंदाला उधाणच आल्यासारखे झाले. जणू राधेच्या अंतःकरणातील कृष्णमूर्तीच तिला बाहेर कृष्णरूपाने दिसत होती.

कृष्णाच्या त्या विलोभनीय व रमणीय रूपाला पाहून राधा आनंदनिर्भर झाली आणि जागेवरून उठून तिने कृष्णाच्या चरणांवर आपले मस्तकच ठेवले. आपल्या अश्रूंनी कृष्णचरणांना प्रक्षालन करणाऱ्या राधेला कृष्णाने स्वतःच्या हाताने उठवले आणि तिला आपल्या जवळ घेतले. राधा व कृष्ण यांच्या भेटीचा हा आनंदसोहळा अनिमिष नेत्रांनी पाहणाऱ्या अनयालाही कृष्णाने दुसऱ्या बाजूने आपल्या जवळ घेतले. अनय व राधा यांना दोन्ही बाजूंनी आपल्या हातांनी धरून कृष्ण हळुहळू एकेक पाऊल टाकत कुंजवनातून बाहेर येऊ लागला. कुंजवनाच्या बाहेर आल्यानंतर कृष्णाने अनय व राधा यांचा पुन्हा प्रेमाने हात धरून निरोप घेतला. त्या उभयतांना त्यांच्या घराकडे जाण्याची सूचना करून कृष्ण आपल्या घराच्या दिशेने शांतपणे निघाला. अत्यंत जड झालेल्या पावलांनी, पण पूर्ण प्रेमाने भरलेल्या मनाने राधा स्वतःच्या कृष्णनादातच घराकडे चालू लागली. घडलेल्या प्रसंगाने विस्मय पावलेला पण अत्यंत आनंदात असलेला अनय सुद्धा, राधेचा हात आपल्या हातात प्रेमाने धरून तिच्याबरोबर घराकडे परतू लागला.''

राधा व कृष्ण यांच्यातील उत्कट प्रेमभक्तिभावाचा प्रसंग तेवढ्याच उत्कटतेने वर्णन करीत असताना नारदाची अवस्थाही साहजिकच भावपूर्ण झालेली होती. त्याचे अंतःकरण सगुण प्रेमभक्तिभावाने भरून वहात होते. त्याच्या होणाऱ्या आनंदाने नारदाचे सर्व अंगच फुलून राहिल्यासारखे दिसत होते. नारदाचा शब्दौघ जरी थांबला तरी अंतःकरणातून वाहणारा सगुण प्रेमाचा प्रवाह मात्र अखंड वाहतच होता. त्याच प्रवाहात बुडून राहिलेल्या नारदाने अलगद नेत्र उघडून लक्ष्मीकडे पाहिले तर तिची श्रवणसमाधीच लागलेली दिसत होती. नारदाचे कथन थांबले तरी लक्ष्मीचे श्रवण जणू घडतच होते असेच तिच्या मुखावरील भाव पाहिल्यावर जाणवत होते. लक्ष्मीची ती अवस्था नारदाने जाणली आणि त्याला लक्ष्मीचे कौतुकही वाटले. लक्ष्मीचा समाधीभंग न करता नारदाने आपला थांबवलेला शब्दप्रवाह पुन्हा पुढे तसाच चालू ठेवला.

*****






साहित्य प्रतिष्ठान®

# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी



श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ 'दत्त हाचि अवधूत' २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह 'आनंदाचे डोही' २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा' ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे 'दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा' हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.

साहित्य प्रतिष्ठान®

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान आपल्या वाचकांसाठी कृष्णसखा माझा या सुंदर पुस्तकाचे पाच भाग आणत आहे. सौ. प्रतिमा प्रविण आठवले यांच्या अथक परिश्रमांतून हे साकार होत आहे. त्यातला हा नारळीपौर्णिमेला आलेला चवथा भाग. हा तुम्हाला कसा वाटला ते सांगा. पाचवा भाग कृष्णाष्टमी ला प्रसिद्ध होईल. याच दरम्यान महाभारत (मूळ “जय” हा ग्रंथ) येत आहे.

२०१६ हे वर्ष ई साहित्यासाठी फ़ारच उत्साहाने सुरू झाले. या वर्षाची सुरुवातच मुळी लिओ टॉलस्टॉय, पॉल ब्रन्टन, आणि मनुस्मृतीने झाली. धर्माकडे पहाण्याचे तीन विविध दृष्टीकोन यांत आहेत. २०१५ मध्ये ई साहित्य मधून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत बहिणावाई, संत कान्होपात्रा, संत चोखामेळा, गीतारहस्य, भगवद्गीता, अशा अनेक मौल्यवान ग्रंथांची ई निर्मिती करण्याचा योग आला. २०१६ ची सुरुवात बायबल, मनुस्मृती पासून झाली आणि त्यात कुराण, बौद्धमत, जैनधर्म, ज्यू, पारशी, वेद, उपनिषदे अशा विविध धर्मशास्त्रांची भर पडावी असा योग दिसतो आहे. योग दिसतो असे यासाठी म्हणतो की ही पुस्तके गेल्यावर्षीही आम्ही कुठे मुद्दाम शोधायला गेलो नव्हतो. श्री विजय पांढरे, डॉ. श्री अशोक धांडे, श्री अविनाश नगरकर, श्री अरुण फ़डके, श्री रत्नाकर महाजन, श्री फ्रान्सिस आल्मेडा, श्री मधुकर सोनावणे, श्री अशोक कोठारे, श्री अरुण काकतकर या व इतर अनेक विद्वानांनी हे साहित्य मोठ्या विश्वासाने आमच्या हाती सोपवलं. आणि आम्ही फ़क्त पोस्टमनगिरी केली. आमच्या सुदैवाने प्रचंड मोठ्या वाचकवर्गाने या साहित्याचा आस्वाद घेतला. या महानुभावांच्या श्रमाचे काही प्रमाणात चीज झाले.

ई साहित्य प्रतिष्ठान निर्माण झाले नवीन साहित्यिकांसाठी एक व्यासपीठ म्हणून. ते तसेच आहे. आणि तसेच राहील. साधारण ८० टक्के पुस्तकं ही नवसाहित्यिकांचीच असतील. पण सुमारे वीस टक्के पुस्तकं नावाजलेली, वाचकप्रियही असावीत. म्हणजे वाचकांचा ओघ वाढता आणि वाहता रहातो.

मराठीतल्या महान प्रकाशकांच्या तुलनेत ई साहित्य अगदीच नगण्य आहे. आणि त्यांच्याशी तुलना वा स्पर्धा करण्याचा मानसही नाही. परंतू दर्जाच्या बाबतीत मात्र आम्ही तोडीस तोड राहू. हे वर्ष अत्यंत दर्जेदार कथा, कादंबर्‍या आणि काव्य-विनोद-शास्त्र पुस्तकांचे असेल याची आम्ही ग्वाही देतो.

आपण या साहित्य यज्ञात यथाशक्ती इंधन पुरवावे ही विनंती. आपल्या ओळखीच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आमच्याकडे पाठवा. आम्ही तुम्हाला आमचे VIP सभासद करू. याशिवाय या कामात इतर अनेक तऱ्हांनी आपण सहभागी होऊ शकता. वेबसाईटला भेट तर देतच रहा. खंबीरपणे पाठीशी उभे रहा. मग बघाच काय काय चमत्कार घडतील ते.

आपले विश्वासू

टीम ई साहित्य

